
भारताची राष्ट्रीय एकात्मता

प्रा. डॉ. बाबुराव पवार



भारताची राष्ट्रीय एकात्मता

लेखक ;
प्रा. डॉ. बाबुराव पवार
एम्. ए. पीएच. डी.
पदव्युत्तर इतिहास विभाग
के. टी. एच. एम. कॉलेज,
नाशिक–४२२ ००२.

प्रताप प्रकाशन
७, प्राजक्ता विद्याधन, माणिकनगर, गंगापूररोड, नाशिक–४२२ ००५.

प्रकाशक :
सौ. उषा पवार
७, प्राजक्ता विद्याधन, माणिकनगर, गंगापूर रोड,
नाशिक–४२२ ००५.

मुद्रक :
तुषार अंधृटकर
अक्षरचित्र, ६९/७० बी, औद्योगिक सहकारी वसाहत,
सातपूर, नाशिक–४२२ ००७.

विक्रीचा पत्ता :
७, प्राजक्ता विद्याधन, माणिकनगर, गंगापूर रोड,
नाशिक–४२२ ००५.

मुखपृष्ठ :
बाळासाहेब लासुरे
योजना ॲडव्हरटायझर्स,
नाशिक.

किंमत शंभर रुपये

देशाच्या स्वातंत्र्यासाठी धारातीर्थी पडलेले क्रांतिकारक, देशाच्या एकात्मतेसाठी देह अर्पण करणाऱ्या पंतप्रधान इंदिराजी गांधी, ज्यांनी माझ्या जीवनाला योग्य दिशा दिली ते माझे माता - पिता तसेच ज्यांनी मला देशहितासाठी लिहिण्यास प्रेरणा दिली ते आमदार प्रसाद तनपुरे

– यांना सस्नेह अर्पण.

प्रसाद उर्फ बापूसाहेब तनपुरे
आमदार
राहुरी.

शुभेच्छा !

डॉ. बाबुराव पवार यांच्याशी माझा गेली दहा वर्षे जवळून परिचय आहे. त्यांनी कोणतेही काम हाती घेतले तर अतिशय तळमळीने पुरे करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्याचे माझ्या मनाला लवकरच हृदयरूप दर्शन झाले.... ते डॉ. पवार यांच्या 'भारताची राष्ट्रीय एकात्मता' या ग्रंथाने !

अराजकतेचे ढग दशदिशात भितीचे सावट निर्माण करीत असतांना प्रकाशाचे चांदणे निर्माण होण्यात आशेचा तेज:कण आहे. त्यांनी या ग्रंथरूपाने आपला लहानसा वाटा यथाशक्ती उचलून अंध:कारमय वातावरणात जन-जागृतीचे वेड घेतलेले आहे.

ग्रामीण भागातील त्यांचा जन्म व अनेक वर्षांचे वास्तव्य म्हणूनच अशा जनतेला एकात्मतेचे विचार सांगून देशभक्ती व देशसेवा रुजविण्याचे त्यांचे प्रयत्न सफल होवोत आणि या दिशेने त्यांचा अविरत प्रयत्न होत राहो.... ही मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो.

धन्यवाद.

प्रसाद उर्फ बापूसाहेब तनपुरे

— पुरस्कार —

डॉ. बाबुराव पवार या तरुण चिकित्सक अभ्यासकाने परिश्रमपूर्वक लिहिलेल्या 'भारताची राष्ट्रीय एकात्मता' या महत्त्वपूर्ण ग्रंथास परीक्षणात्मक पुरस्कार देतांना मला अतिशय आनंद होत आहे. आज राष्ट्रीय एकात्मतेची समस्या जिवंत आणि ज्वलंत आहे. सातत्याने समाजप्रबोधन केल्याशिवाय ही समस्या समाधानकारकरित्या सुटणे अवघड आहे. वास्तविक सनातन भारतीय संस्कृती अतिशय उदार आहे. मनुष्य हा स्खलनशील असल्यामुळे त्याच्या मनाचे क्षितिज व्यापक व्हावे म्हणून सततच्या संस्कारांची अपेक्षा आहे. मूल्याधिष्ठित जीवन-रचना केल्याने अनेक प्रश्न सुटू शकतील. अशा प्रकारची शाश्वत मूल्ये भारताच्या उदात्त संस्कृतीने फुलवली आहे. लेखकाने या संस्कृतीच्या आधाराने विषयाची योग्यरित्या मांडणी केलेली आहे. तसेच ही संस्कृती व्यापक, सर्व-समावेशक आणि विविधतेत एकता असलेली आहे, हे स्पष्ट केले आहे.

अशा स्थितीत वास्तविक राष्ट्रीय एकात्मतेची समस्या निर्माण व्हायला नको. परंतु माणसाच्या मनोदौर्बल्यामुळे, संकुचित वृत्तिमुळे, स्वार्थामुळे देशप्रेमाला व देशभक्तीला तडे जाऊन एकात्मतेला हादरे बसले आहेत. भारत हे सनातन काळापासून सांस्कृतिकदृष्ट्या राष्ट्र या संज्ञेला पात्र होते. ब्रिटिश भारतात आल्यावर त्यांच्या राजवटीत भारताला राजकीयदृष्ट्या राष्ट्रत्त्व प्राप्त झाले. याच काळात राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून विस्कळीत समाज संघटित करण्याचा व स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याचा प्रयत्न झाला. समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षाचा विचार राष्ट्रवादात समाविष्ट असतो. भारतीय नेत्यांनी त्यादृष्टीने देखील प्रयत्न केले. पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात लोकशाही समाजवादाची तत्वे रूजविण्याचा परम निष्ठेने प्रयत्न केला. ब्रिटिशांच्या राजवटीत मुस्लीमांचा विभक्ततावाद व त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू संघटनेचे प्रयत्न इतिहासाने नोंदविले आहेत. महात्माजींनी मानवतावादाचा पुरस्कार करून सर्व जाती-धर्मांच्या लोकांच्या मनात खोलवर मानवतावाद

रुजवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्याचबरोबर सर्व भारतीय लोक मग ते कोणत्याही धर्माचे, जातीचे, वंशाचे, भाषेचे असोत, एकाच भूमीचे संतती आहोत असे उद्‌घोषित केले. त्यांचा प्रयत्न राष्ट्रीय एकात्मतेचा होता. त्यांचा राष्ट्रवाद आंतरराष्ट्रवादाशी समन्वय साधणारा होता. लेखकाने या सर्व प्रयत्नांची दखल घेतली आहे. भारतात राष्ट्रीय एकात्मतेचा उदय व विकास कसा झाला आणि ती कशी आणता येईल याचाही विचार या पुस्तकात केला आहे. तसेच राष्ट्रीय एकात्मतेला धक्के बसविणारे घटक कोणते याची मीमांसा देखील या ग्रंथात केलेली आहे.

स्वातंत्र्य हा राष्ट्रवादाचा एक महत्वाचा पैलू मानला जातो. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात नेमस्त, जहाल व क्रांतिकारक या तिनही कार्यकर्त्यांचे महत्वाचे योगदान आहे. काही वेळेस क्रांतिकारकांच्या कार्याची उपेक्षा होते. परंतु डॉ. बाबुराव पवार यांनी आपल्या विचारप्रवाहात क्रांतिकारकांच्या कार्यास योग्य ते महत्वपूर्ण स्थान दिले आहे. क्रांतिकारकात कोणत्याही प्रकारचे, धर्म, जाती, वंश इ. भेद नव्हते. ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करतांना स्वातंत्र्य हे त्यांचे एकमेव उद्दीष्ट होते. त्यांच्या साहसी राष्ट्रप्रेमामुळे समाजासमोर एकात्मतेचा आदर्श उभा होता. अशा या क्रांतिकारकांचा व राष्ट्रीय नेत्यांचा आदर्श आज सगळ्यांनी आपल्यासमोर ठेवून एकात्मता वृद्धीसाठी प्रयत्नशील रहावे. राष्ट्रीय नेत्यांनी व क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा इतिहास ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी लेखकाने केलेली सूचना महत्त्वाची आहे. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीत महाराष्ट्राचे योगदान विशेष स्वरुपाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही एकता टिकविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सतत आघाडीवर आहे. ही दखलही लेखकाने घेतली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात फुटीरशक्ती अधिक प्रभावी झाल्या. धर्म, भाषा, लिपी इत्यादी घटकातून वास्तविक एकात्मता निर्माण व्हायला हवी. परंतु प्रत्यक्षात फुटीरता निर्माण झाली. भारताला पुन्हा एकदा वैभवाचा काळ कसा येईल हा चिंतनाचा व चिंतेचा विषय आहे. या ग्रंथाच्या आधाराने अनेकांना राष्ट्रीय एकात्मतेच्या समस्येचा विचार करता येईल.

डॉ. शं. ना. नवलगुंदकर
उपकुलगुरू
पुणे विद्यापीठ, पुणे - ७.

प्रस्तावना

मी लिहिलेले "भारताची राष्ट्रीय एकात्मता" हे माझे दुसरे पुस्तक प्रकाशित होत असल्यामुळे मला मनापासून अत्यानंद होत आहे. भारतीय एकात्मतेसारख्या महत्वाच्या विषयावर माझ्या हातून मातृभाषेत सर्वप्रथम ग्रंथरचना होत असल्याचे ते आणखी एक महत्वाचे कारण आहे.

पूर्वी खैबरखिंडीतून आपल्या देशावर झालेली आक्रमणे आपल्या पूर्वजांनी यशस्वीपणे परतवून लावली. त्यानंतर परकीय सत्तांच्या आक्रमणांनाही खंबीरपणे तोंड दिले. तसेच भारतात ब्रिटिशांची राजवट अनंत वर्षे राहून शेवटी त्यांनाही येथून घालवून देण्यात भारतीयांना यश आले. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र जाती-भेद, धर्म-भेद, वंश-भेद, प्रादेशिकता, फुटीरता इ. गोष्टींना उत आला आणि आपापसात तंटे-बखेडे निर्माण होऊ लागले. परिणामी भारताच्या एकतेला तडे जाण्याची शक्यता निर्माण झाली. उदा. शिगेला पोहचलेली पंजाब समस्या, गुरखा भूमी आंदोलन इ. मुळे आता आपल्या पूर्वजांची परंपरा राखण्यासाठी एकात्मतेची लढाई जिंकणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिक पुढे आला पाहिजे. या जाणीवेतूनच मी प्रस्तुत पुस्तक लिहून वाचकांपुढे ठेवले आहे. ज्या उदात्त भावनेने हजारो भारतीयांनी देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रप्रेमाने व समर्पणाच्या भावनेने उडी घेतली, आपल्या प्राणांची आहुती दिली, ती भावना आजच्या तरुण पिढीमध्ये जागृत व्हावी आणि समाजातील सर्व प्रकारची विषमता दूर व्हावी, हा दृष्टिकोनही प्रस्तुत पुस्तक लिहिण्यामागे आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात जातीभेद, पंथभेद, धर्मभेद, विषमता नष्ट करून भारतीय समाज एकसंघ करणेसाठी म. गांधी अहोरात्र प्रयत्न करीत होते. परंतु हे कार्य करीत असतानाच स्वातंत्र्याच्या काळात त्यांनी एकात्मतेसाठी स्वतःच्या प्राणाची आहुती दिली. तसेच पंडित जवाहरलाल नेहरू व लाल बहादूर शास्त्री यांनीही देशाच्या एकतेवर अपार निष्ठा ठेवून ती

अबाधित राखण्यासाठी सतत प्रयत्न केले. पंतप्रधान कै. इंदिराजी गांधी यांनीही देशाच्या एकात्मतेसाठी, अखंडतेसाठी आपला देह ठेविला. तेव्हा स्वतंत्र भारतात महात्मा गांधी व श्रीमती इंदिराजी गांधी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी जो मोठा त्याग केला व भारतीय जनतेला एकतेचा संदेश दिला. तो एकतेचा संदेश लिखाणाद्वारे ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहचविण्याचा मी हे पुस्तक लिहून अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

देशाची एकता कायम राखण्यासाठी सर्व प्रकारचे भेद-भाव विसरून प्रत्येक भारतीयाने स्वदेशावर ममता करून समता निर्माण करावी म्हणजे त्यातून एकता साधली जाईल. आपला देश अखंड रहावा, तसेच देशाचे प्राण ज्या ग्रामीण भागात गुंतले आहेत तेथील सर्वसामान्य माणूस देशहितासाठी जागृत व तत्पर व्हावा आणि त्यातूनच बलशाली भारताचे समर्थ चित्रण निर्माण व्हावे, ही आकांक्षा मनात बाळगून हे प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करून देशसेवेतील माझा लहानसा .... खारीचा वाटा मी .... सर्वसामान्य जनतेच्या सहकार्याने उचलू पहात आहे.

महाराष्ट्रातील साधू-संतांनी, राष्ट्रीय नेत्यांनी, क्रांतिकारकांनी समाजात ममता, समता व एकता निर्माण करून टिकविण्याचा प्रयत्न केला. ही त्यांची मोलाची कामगिरी ठरली. त्या संतांचा, नेत्यांचा व क्रांतिकारकांचा आदर्श समोर ठेवून स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र राज्य देखील भारताची एकात्मता अबाधित राखण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे व भविष्यकाळातही राहील यात शंका नाही. आतापर्यंत महाराष्ट्रात सत्तेवर आलेले मुख्यमंत्री व त्यांच्या सरकारांनी देश बलवान करण्यासाठी सतत योग्य ती पाऊले उचललेली आहेत. भारताची एकात्मता टिकविण्याच्या कामी महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. याची जाणीवही मी सदरच्या पुस्तकाद्वारे सामान्य जनतेला करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तसेच एकात्मतावाढीसाठी माझे वैयक्तिक प्रयत्न म्हणून मी जन-सामान्यांच्या सहकार्याने नाशिक शहरात "एकात्मता केंद्र" "Center for National Integration" स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहे.

माझे हे प्रस्तुत पुस्तक पुणे विद्यापीठाने सुरु केलेल्या सर्व शाखातील एम. फील. च्या अभ्यासासाठी देखील अतिशय उपयुक्त आहे. याचा एम. फील. च्या विद्यार्थ्यांनी निश्चित फायदा घ्यावा.

डॉ. बाबुराव पवार

ऋणनिर्देश

"भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास" हे पहिले पुस्तक लिहिण्यासाठी ज्यांनी मला प्रेरणा दिली. ते राहुरी तालुक्याचे लोकप्रिय नेते आमदार मा. प्रसाद तनपुरे यांचा मी अंतःकरणपूर्वक ऋणी आहे. कारण त्यांच्या प्रारंभीच्या प्रेरणेने व सहकार्यानेच मी लेखन क्षेत्रात प्रवेश केला. व नंतर सदरचे पुस्तक लिहू शकलो. प्रकाशित झालेल्या या नूतन ग्रंथासही आमदार प्रसाद तनपुरे यांनी वेळोवेळी अर्थसहाय्य व मार्गदर्शन केले हे नमूद करण्यातही माझी कृतज्ञतेची भावना आहे बस्स एवढेच........

पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी वेळ नसतांनाही तसदी घेऊन प्रस्तुत पुस्तकास पुरस्कार देऊन मार्गदर्शन केले. त्यांचा मी शतशः ऋणी आहे

मा. डॉ. वसंतराव पवार सरचिटणीस ना. जि. म. वि. प्र. समाज, यानी मला प्रस्तुत पुस्तक लिहिण्यासाठी बहुमोल सहकार्य केले. तसेच माझे वर्गमित्र व मराठा संस्थेचे सभापती श्री. माणिकराव बोरस्ते यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले. त्यांचा मी ऋणी आहे.

माझे मित्र डॉ. बाजीराव रकिबे, मराठा संस्थेचे संचालक, यांनीही पुस्तक छपाईसाठी वेळोवेळी त्रास सहन करून बहुमोल सहकार्य केले त्यांचा मी आभारी आहे. तसेच श्री. संपत पाटील व एस. आर. पवार यांनीही मला या कामी सहकार्य केले त्यांचे आभार.

डॉ. एन. जे. सोनवणे, प्राचार्य देवळाली कँप कॉलेज यांनीं प्रस्तुत पुस्तकाचे संपूर्ण हस्तलिखीत तपासून बहुमोल सूचना केल्या. तसेच डॉ. एन. आर भदाणे प्राचार्य, के. टी. एच. एम. कॉलेज यांनीही मला या कामी सहकार्य केले. तसेच प्रा. गोपाळदत्त कुलकर्णी उपप्राचार्य यांनी पुस्तक लिहिण्याच्या प्रारंभापासून ते अखेरपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले त्यांचा मी शतशः ऋणी आहे.

प्रा. सुरेश गुंजाळ यांनी एकात्मतेच्या संदर्भात बहुमोल असे साहित्य मला उपलब्ध करून दिले; त्याचप्रमाणे प्रा. रघुनाथ रकिबे यांनीही मला राष्ट्रवादाविषयी माहिती देऊन सहकार्य केले. त्यांचे मनःपूर्वक आभार. प्रा. आर. व्ही. पाटील, डॉ. प्रल्हाद मौर्य, प्रा. सौ. निशा पाटील, प्रा. एम. आर. राऊत, प्रा. वाल्मिक पाटील, प्रा. सौ. स्नेहल सोनवणे, प्रा. पी. एल. रौंदळ, प्रा. बांदल, प्रा. वाळके, प्रा. हरिष आडके, प्रा. विष्णू रसाळ, या सर्वांचे मला पुस्तक लिहिण्याच्या कार्यात बहुमोल सहकार्य लाभले. त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. शां. ग. महाजन, के. टी. एच. एम. कॉलेजचे ग्रंथपाल श्री. किसन शेळके, बी. एड. कॉलेजचे ग्रंथपाल श्री. व्ही. टी. चव्हाण, वणी कॉलेजचे ग्रंथपाल श्री भाऊ जाधव, राहुरी कॉलेजचे ग्रंथपाल श्री. व्ही. पी. मिरगणे, ओझर कॉलेजचे ग्रंथपाल श्री. कारभारी पवार, एच. पी. टी. कॉलेजचे ग्रंथपाल श्री. शास्त्री व श्री. प्रविण नागरे यांनी मला लागणारे ग्रंथ वेळोवेळी पुरवून सहकार्य केले. या सर्वांचा मी आभारी आहे. के. टी. एच. एम. कॉलेजच्या ग्रंथालयातील कर्मचारी श्री. डुमरे, श्री. मानकर, श्री. कायस्थ, श्री. दळे, श्री. कमानकर, श्री. माणिक पाटील, श्री. आढाव, श्री. कोतवाल, श्री. बाबु हांडगे, या मंडळींनी ग्रंथालयात मला वेळीअवेळी मासिके व वर्तमानपत्र पुरविली, या सर्वांचे आभार.

प्रा. बी. बी. पगार व श्री. पी. के. ठोंबरे शिक्षणाधिकारी म. वि. प्र. समाज नाशिक यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले. तसेच फार्मशी कॉलेजचे प्राचार्य श्री. शेटे सर व अधिक्षक श्री. एस. के. जामदार यांनीही मला बहुमोल सहकार्य केले. त्यांचे मनःपूर्वक आभार.

शिंगवे येथील सरपंच श्री. पुनमचंद खताळ, फकिरा झाल्टे, रामदास खताळ, चिंधू पा. खताळ, डॉ. शिवाजी पवार, वाल्मिक पवार, विश्वनाथ पवार, श्री. दामोदर पवार, रामदास आहेर, नामदेव आहेर, श्री. देवराम पा. पवार, लहानू पवार, दारुबंदी खात्यातील श्री. गं. पा. माने व शिवाजी पवार यांचे मला प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. त्यांचे मनःपूर्वक आभार.

श्री. दत्तात्रय बांदल यांनी एकात्मतेवर काही विचार सांगून मला सहकार्य केले. त्यांचा मी ऋणी आहे.

सातपूर औद्योगिक वसाहतीतील 'अक्षरचित्र' मुद्रणालयाचे मालक श्री. तुषारभाई अंधृटकर यांनी प्रस्तुत पुस्तक अत्यंत अल्पवेळेत व सुबकरितीने छापून सहकार्य केले. तसेच व्यवस्थापक श्री. रंगनाथ टेमगर व इतर कर्मचारी वर्गाने मला आस्थेने सहकार्य केले. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. योजना ॲडव्हरटायझर्सचे मालक श्री. बाळासाहेब लासूरे यांनी अत्यंत सुरेख कल्पना वापरून प्रस्तुत पुस्तकाचे आकर्षक असे मुखपृष्ठ तयार करून दिले. त्यांचे आभार.

सर्वात महत्वाचे म्हणजे मी माझ्या पत्नीचे व मुलांचे ऋणनिर्देश करणे आवश्यक आहे. कारण माझी पत्नी सौ. उषा पवार, चि. प्रताप व चि. अतुल यांनी मला प्रस्तुत पुस्तक लिहिण्याच्या कामी कधीही अडथळा न आणता शांतता ठेवून सहकार्य केले. त्यांचाही मी आभारी आहे.

माझे सहकारी मित्र प्रा. डॉ. एम. जी. गायकवाड, प्रा. के. के. हारक, डॉ. जी. एन. गायकवाड, प्रा. टी. बी. साळुंके, प्रा. सौ. रेगे, डॉ. साळुंखे, प्रा. ए. एम. देशमुख, प्रा. नाना कापडणीस, प्रा. नारायण शिंदे, प्रा. डी. एन. निकम, प्रा. दळवी, प्रा. टी. बी. आहिरे, प्रा. सौ. पी. सी. पाटील, प्रा. बी. जे. आहेर, प्रा. जाचक, प्रा. बी. एम. आहेर, प्रा. बी. ए. पाटील, प्रा. सौ. शेवाळे, प्रा. भगुरे, प्रा. कोल्हे, डॉ. येवला, प्रा. सोनवणे, प्रा. उशीर, प्रा. लाड, प्रा. सापनर, प्रा. दादाजी बच्छाव, प्रा. आहिरे, प्रा. ठाकरे, प्रा. पाटील, डॉ. पवार, डॉ. निकम, प्रा. भिवा वाघ, डॉ. फरताळे, प्रा. सौ. देवरे, प्रा. घुले, प्रा. डेर्ले, प्रा. गिते, प्रा. पिंगळे, प्रा. ललीत पगार, प्रा. भंडारे, प्रा. आर. के पाटील, प्रा. सांगळे या सर्वांचे मला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. त्यांचा आभारी आहे.

– प्रा. डॉ. बाबुराव पवार

– अनुक्रमणिका –

प्रकरण पहिले – सर्वसमावेशक भारतीय संस्कृती

संस्कृतीची वैशिष्टये - सहिष्णुता - सर्व समावेशकता - विविधतेत एकता - समन्वयाची प्रवृत्ती - प्रगतीशिलता - कृषिप्रधानता.

प्रकरण दुसरे – राष्ट्रवादाचा उदय

राष्ट्रवादाचा उदय व स्वरूप - राष्ट्र या संकल्पनेचा अर्थ - व्याख्या - राष्ट्रवादाचे (राष्ट्रीयत्वाचे) घटक.

प्रकरण तिसरे – भारतातील राष्ट्रीय एकात्मतेचा उदय

ब्रिटिश पूर्वकालीन भारत - ब्रिटिशकालीन भारत - एकात्मतेचा उदय

प्रकरण चवथे – भारतीय क्रांतिकारक आणि राष्ट्रीय एकात्मता

क्रांतिकारकांची पार्श्वभूमी - वासुदेव बळवंत फडके - चाफेकर बंधू - रामसिंग कुका - पंडित शामजी कृष्ण वर्मा - मादाम कामा - वि. दा. सावरकर - मदनलाल धिंग्रा - सेनापती बापट - अनंत कान्हेरे - खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी - सत्येंद्र व कन्हैयालाल दत्त - सुशील सेन - विष्णू पिंगळे - बागी कर्तारसिंह - अशफाक अल्लाखान - भगतसिंग - राजगुरू - चंद्रशेखर आझाद - प्रितीलता वडेदार - शांती घोष व सुनिती चौधरी - वीणा दास - कु. कल्पना दत्त - सुहासिनी देवी - उज्वला - नेताजी सुभाषचंद्र बोस.

प्रकरण पाचवे – महात्मा गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता

प्रकरण सहावे – इंदिरा गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता

इंदिरा गांधींचे कार्य - त्यांचे एकात्मतेवरील विचार

प्रकरण सातवे – राष्ट्रीय एकात्मतेच्या समस्या

धर्मांधता व जातीयता - दारिद्रय व गरीबी - सांपत्तिक विषमता - भाषावादाचा भस्मासूर - सामाजिक बांधीलकीचा अभाव - सामाजिक समतेचा अभाव - राष्ट्रभाषा हिंदीला विरोध - प्रादेशिक निष्ठांची चढाई - मूल्याधिष्ठीत राजकारणाचा अभाव - भूमीपुत्र व रोजगार प्राधान्याची कल्पना - राजकीय पक्षांचा मतांवर डोळा - भ्रष्टाचार, बेकारीमुळे येणारे वैफल्य - अस्वस्थ इशान्य भारत - गुरखा भूमी आंदोलन - पंजाब प्रश्न - प्रादेशिक असमतोल - केंद्र - राज्य संबंधी - अज्ञान हाच शत्रू - परकीय शक्तींचा हस्तक्षेप.

प्रकरण आठवे – राष्ट्रीय एकात्मता वाढीवरील उपाय

जातीयतेचे उच्चाटन - धर्मनिरपेक्ष राजकारण - सर्व धर्म तत्त्वज्ञान प्रसार - दारिद्रय निर्मूलन कार्यक्षमतेने व्हावे - आर्थिक विषमतेचे उच्चाटन - सार्वजनिक क्षेत्राची पुनर्रचना - बेकारी व भ्रष्टाचार नष्ट करणे - रोजगारासंबंधीचे स्थानिक बंधने रद्द व्हावी - धर्मस्थानांचा वापर राजकारणासाठी नको - जलसंपत्तीचे समान वाटप - सर्वत्र गुणवत्तेचा विचार व्हावा - इतिहासाच्या सुधारित आवृत्त्या वृत्तपत्रांची निर्भीड भूमिका - प्रक्षोभांचा बिमोड वेळीच करावा - राष्ट्रभाषा हिंदी सक्तीची - प्रभावी शिक्षण पद्धतीची गरज इ.

प्रकरण नववे – महाराष्ट्राचा एकात्मता वाढीतील सहभाग

महाराष्ट्रातील संतांची कामगिरी - संत नामदेव - संत तुकाराम - रामदास - रोहिदास - स्वामी श्रीचक्रधर - यशवंतराव चव्हाण - वसंतराव नाईक - वसंतदादा पाटील - शरदराव पवार - बॅरिस्टर अंतुले - शिवाजीराव पाटील निलंगेकर - शंकरराव चव्हाण या सर्व मुख्यमंत्र्यांचे एकात्मतेसाठी कार्य.

प्रकरण दहावे – उपसंहार

परिशिष्ट –

१) राष्ट्रीय नेत्यांचे एकात्मतेवरील विचार.

२) संदर्भसूची.

प्रकरण पहिले

सर्वसमावेशक भारतीय संस्कृती

'विविधतेत एकता हा सृष्टीचा नियम आहे'
— स्वामी विवेकानंद

आज आपल्या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न अतिशय गंभीर असून सर्वत्र चर्चिला जात आहे. स्वामी विवेकानंदांच्या मतानुसार हजारो वर्षांची परंपरा व विविधता असलेल्या या भारतखंडात पूर्वीपासून जी एकतेची भावना खोलवर रुजलेली होती, ती सांस्कृतिक स्वरूपाची होती. संस्कृती म्हणजे चांगला आचार, सदाचार होय. तसेच मानवाचा जीवनविषयक दृष्टीकोन आणि त्यानुसार मानव-गटाने निर्माण केलेली देशकाल विशिष्ट जीवनपद्धती म्हणजे संस्कृती होय. संस्कृती व्यक्तीचीही असते व मानवसमुहाचीही असते. त्यासाठी मनाला स्थिर करून ज्ञान-शक्ती वाढवावी लागते. व्यक्तीला आणि समाजालाही पूर्णत्वाकडे नेऊ इच्छिणारी भारतीय संस्कृती ज्ञानसंपन्न आहे. भारत प्राचीन काळी आर्थिक विकासात अग्रेसर होता. गंगा, सिंधू या नद्यांची खोरी अतिशय सुपीक असल्यामुळे शेतीही समृद्ध होती. भारतातील औद्योगिक प्रगतिची, व्यापाराची व कलाकौशल्याची परदेशी प्रवाशांनी १७ व्या व १८ व्या शतकात मुक्त कंठाने स्तुती केली आहे. योग, आयुर्वेद, धनुर्वेद, खगोलशास्त्र, व्याकरण, रसायन इ. विविध शास्त्रांमध्ये भारतीयांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. भारताच्या अविचल एकतेचे व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोणत्याही प्रकारची राजकीय अराजकता न पसरण्याचे प्रमुख कारण म्हणजे या देशाची महान सांस्कृतिक एकता होय. सांस्कृतिक एकतेच्या पायावरच पुढील काळात ब्रिटिश भारतात आल्यानंतर राजकीय ऐक्य निर्माण होऊ शकले.

भारतीय संस्कृतीची अनेक प्रतीके आहेत. त्यापैकी कमळ हे भारतीय संस्कृतीचे प्रधान प्रतीक आहे. या कमलपुष्पात कोणता एवढा महान अर्थ आहे? ईश्वराच्या सर्व अवयवांना आपण कमळाची उपमा देतो, कमळाजवळ

अलिप्तपणा हा गुण आहे. पाण्यात असून ते पाण्यावर **रहाते**, चिखलात असून ते चिखलाच्या पृष्ठभागावर फुलते, कमळ अनासक्त आहे. कमळाचा दुसरा गुण म्हणजे वाईटातूनही चांगले घेऊन स्वत:चा विकास करून आपले हृदय मकरंदाने कमळ भरून ठेवते. काही कमळांना शंभर पाकळ्या, काहींना हजार पाकळ्या असतात. भारतीय संस्कृती सुद्धा कमळाप्रमाणेच शतपत्रांची आहे. शेकडो जाती-जमाती, अनेक वंश, पंथ यांच्यातून सार घेऊन ती वाढत असते. एकेक नवीन पान ती जोडते. भारतीय संस्कृतीचे कमळ फुलत आहे. विश्वाच्या अंतापर्यंत ते फुलत राहील. भारतीय संस्कृती अनंत पाकळ्यांचे कमलपुष्प होईल. कारण पृथ्वी अनंत आहे, काळही अनंत आहे आणि ज्ञानही अनंत आहे.

भारतीय संस्कृती आपल्या लेकरास सांगते "तुम्ही कमीत कमी रमा, निंदास्तुतीवर काटी लावून ध्येयात बुडा, तुम्ही स्वदेश विकासात इतके तन्मय झालेत की, किर्ती आपोआप तुमच्याकडे येईल.'' म्हणजे आजही आपण आपल्या देशाच्या विकासकार्यासाठी आपल्या संस्कृतीने दाखविलेल्या मार्गाने जाणे आवश्यक आहे. देशविकासाचे कार्य करीत असतांना कोणीही स्वकीर्तिचा विचार करू नये. कार्यपूर्तीनंतर कीर्ति सर्वत्र आपोआपच पोहोचेल. आणि यातून एकतेची वाढ होत राहील.

कमळ सांगते की, अमंगलातून मंगल घ्या, तपस्या करा, सत्कर्म करून नवीन, नवीन जोडा. भारतीय संस्कृतीही हेच सांगत आली, म्हणून तर ती कमळ आहे. भारतीय संस्कृती म्हणजेच त्याग होय. त्यामुळेच भारताच्या एकात्मतेचे मूळ संस्कृतीत आहे. कासव ज्याप्रमाणे अतिशय सहनशील आहे. तशीच आपली संस्कृतीही अत्यंत सहनशील आहे. त्यामुळेच जगातील अनेक संस्कृती काळाच्या आड झाल्या, परंतु भारतीय संस्कृती अजूनही फुलतच आहे. अशा या आपल्या भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये अतिशय मोलाची वाटतात, की ज्यांच्यामुळे भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेस बळकटी येऊ शकली.

भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये –

१) सहिष्णुता –

भारतीय समाजाइतका सहिष्णुता धारण केलेला समाज जगात कोठेही आढळत नाही. आर्य भारतात येण्यापूर्वी द्रविड संस्कृती नांदत होती. परंतु आर्य आल्यानंतर त्यांना द्रविड लोकांनी आपल्यात सामावून घेऊन ते एकत्र

नांदले. आर्यांनी अनार्यांना जिवंत ठेवले. आर्यांनी द्रविडांना नष्ट करण्याचा प्रयत्न कधीही केला नाही. म्हणजेच त्यांच्यात एकतेची भावना निर्माण झाली होती, असे म्हणता येईल. "उपासनापद्धती भिन्न असूनही सर्व मानव एकच." हा विचार तत्कालीन भारतीय लोकांच्या मनात रुजलेला आढळतो. त्यामुळे वेगवेगळ्या विचारसरणी धारण केलेले धर्म, पंथ, जाती, वंश भारतात एकत्र नांदते. एकाच दरबारात बौद्ध, जैन, वैष्णव, पंडित आढळून येत. वेरुळच्या लेण्यात तीन धर्मांची लेणी आहेत. हिंदूंनी बौद्धांना व जैनांना सहानुभूतीने वागविले. राजा कोणत्याही धर्माचा असला तरी प्रजेला मात्र धार्मिक स्वातंत्र्य होते. कोठेही एकेश्वरवाद नव्हता. त्यामुळेच हिंदूंची मंदिरे, बौद्धांचे विहार, जैन मंदिरे एकमेकाशेजारी तत्कालीन परिस्थितीत उभी राहू शकली. त्यानंतर पुढील काळात मशिदी व ख्रिश्चन देवळेही उभारली गेली. इतर धर्मियांचा छळ करून त्यांना हिंदू बनविल्याचे एकही उदाहरण भारताच्या इतिहासात सापडणार नाही.

आपली सांस्कृतिक जाणीव आपण एक राष्ट्र आहोत याची अनुभूती देते. सम्राट अशोक, अकबर, बुद्ध, शंकराचार्य, गुरुनानक आणि इतर संतमहंतांनीही पुढील काळात नेहमीच सत्याचा ध्यास घेतला आणि त्यांना या भारतभूमीतच शांतता व सलोख्याचा मंत्र मिळाला. इथेच ख्वाजा मोईउद्दीन चिश्ती होऊन गेला, ज्याने ईश्वराच्या प्रेमाचा संदेश दिला. सेंट थॉमसने मातृभावाची शिकवण दिली. महावीराने अहिंसेचा मंत्र दिला तर कबीराने माणुसकीचा संदेश दिला. या सर्व धर्मांच्या व पंथांच्या संतमहंतांच्या कामगिरीमुळे पूर्वीची सहिष्णुता भारतीय समाजात टिकून राहण्यास मोलाची मदत झाली. सर्वदृष्टीने विचार करता भारतीयांमध्ये इतरांना सामावून घेण्याची जी सहिष्णुवृत्ती आहे, इतकी सहिष्णुवृत्ती जगाच्या पाठीवर अन्य ठिकाणी कोठेही दिसून येत नाही. या सर्व गोष्टींमुळेच भारतीयांमध्ये सांस्कृतिक एकता निर्माण होऊ शकली.

२) सर्वसमावेशकता –

भारतीयांमध्ये पूर्वीपासून असलेल्या सहिष्णुतेमुळेच भारतीय संस्कृती सर्व समावेशक बनली आहे. वन्य जमातीपासून तर अगदी सुधारलेले नागरी जीवन जगणारे मानवसमूह भारतात राहातात. त्यामुळेच भारताचे वर्णन 'संस्कृतीचा अजबखाना' असे केले जाते.

डॉडवेल लिहितो, "हिंदुस्तानची संग्राहक शक्ती सागराप्रमाणे अनंत

होती. हिंदुस्थानातली जातिसंस्था व रोटीबेटी बंदी लक्षात घेतली म्हणजे त्याच हिंदुस्थानची परकीय लोक व त्यांची संस्कृती पचवून आत्मसात करण्याची ही अपूर्व संग्राहक शक्ती पाहून नवल वाटते. या संग्राहकवृत्तीमुळे हिंदुस्थानने आपल्या जीवनशक्तीतला जोमदारपणा कायम राखून वेळोवेळी कायाकल्प केला असावा. पुढे मुसलमान आले. त्यांच्यावरही या भारतीय संग्राहकवृत्तीचा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही''

व्हिन्सेंट स्मिथ म्हणतात, "परकीय विशेषतः मुस्लीम तुर्क लोक पूर्वी आलेल्या शक लोकांप्रमाणे हिंदू धर्मातील आश्चर्यकारक संग्राहकवृत्तीपुढे अलग राहू शकले नाहीत.'' हिंदुस्थानातील धर्माला संग्राहक असे आर्य धर्म हेच नाव प्राचीन काळी होते. पूर्वी हिंदी तत्वज्ञानामुळे मुख्यतः आलेली जीवनाकडे पाहाण्याची एक वृत्ती होती. त्या वृत्तीमुळे अशी एक अंतस्फूर्ती आलेली होती की, अनेक वेगवेगळया गोष्टींचा समन्वय साधून त्यांना एकरूप करावे. या समन्वय करण्याच्या संग्राहक वृत्तीचा प्रभाव हिंदी संस्कृतीची जोपासना करण्यात व वंश व्यवस्थेतही ठळक दिसतो.

अनेक धर्मांचे लोक पूर्वीपासून एकत्र नांदले, हे भारतीय संस्कृतीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. भूमीवर सर्व समान अर्थाची तत्वे सांगतात. म्हणजेच ध्येय एकच असून फक्त त्याप्रत पोहोचण्याचे मार्ग भिन्न आहेत. हा विचार भारतात खोलवर रुजलेला असल्यामुळे प्रत्येकाला आपल्या श्रद्धा बाळगण्याचे व त्यानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य होते. परिणामी अनेक मानवसमूह भारतात आनंदाने राहीले.

वेगवेगळया राज्यातील पवित्र स्थळे पुण्यक्षेत्रे ठरवून त्या स्थळांची यात्रा भरविणे पुण्यप्रद आहे असे सांगितले गेले. पूर्वी भिन्न ठिकाणच्या पवित्र स्थळांना वेगवेगळया वंशाचे लोक भेटी देत असत, त्यामुळे त्यांच्यात अप्रत्यक्ष एकता निर्माण झाली होती, असे म्हणता येईल. अतिशय प्राचीन काळापासून भारतीय जनतेने **'जगा आणि जगू द्या'** हे तत्व स्वीकारले आहे. पूर्वीपासून भारतात विविध धर्मिय लोक राहातात. परंतु त्यांना कधीही स्थानिक लोकांनी त्रास देऊन बाहेर घालविण्याचा प्रयत्न केला नाही. कारण जगात भारतीय संस्कृती ही सर्व-संग्राहक संस्कृती म्हणून गणली गेलेली आहे. भारतीय संस्कृतीची संग्राहकता दुबळे-पणातून निर्माण झालेली नाही. अजबखाना जमविणे हा तिचा हेतू नव्हता, तर या संग्राहकतेमागे विविधतेत एकत्व पाहाण्याचे व ते निर्माण करण्याचे ध्येय होते.

३) विविधतेत एकता –

विविधतेतही एकता, एकात्मता साधणे ही अतिशय कठीण गोष्ट भारतीय संस्कृतीने सोपी करून दाखविली आहे. भारत क्षेत्रफळाने मोठा देश असून, या ठिकाणी विविध भाषा आणि विविध संस्कृती एकत्र नांदताना आढळतात. संस्कृत ही बऱ्याच भाषांची जननी असल्याने तो सर्व प्रांतांना जोडणारा दुवा आहे. भारतासारखे विविध वंशाचे, धर्मांचे, जातींचे, भाषांचे आणि इतर अनेक बाबतीत विविधता असलेले लोक इतर देशात क्वचितच आढळतील. भारताच्या राजकीय असमतेच्या पलिकडे असलेली सांस्कृतिक विविधता हे आपले वैशिष्ट्य होय. भारतात पूर्वीपासून तीर्थयात्रा पुण्यप्रद मानल्यामुळे एकात्मता साधण्यास मदत झाली. रामायण, महाभारत ही महाकाव्ये त्याकाळी राष्ट्राची श्रद्धास्थाने बनली. तीर्थक्षेत्रांबद्दलचे प्रेम, आतिथ्यादि शिष्टाचार, सहिष्णुता, सर्वसामावेशकता या इत्यादी गोष्टींमुळे सर्व भारतीय एका सूत्रात बांधले गेले. त्यामुळेच सर्व परकीय ग्रीक, शक, कुशाण, हूण देखील आपल्या भारतीय संस्कृतीचा आदर्श पाहून भारतीय बनले. भारतीय संस्कृतीने आपल्या विशाल उदरात या परकीयांना मोठ्या आस्थेने सामावून घेतले.

भारत अनेक संस्कृतींचे माहेरघर असून निरनिराळ्या विचारप्रणालींचे प्रभाव पचवण्याची क्षमता या भूमीत आहे. भारत आपले विचार कोणावरही लादू इच्छित नाही. त्यामुळेच सहजीवन ही भारताला काही नवीन किंवा अपरिचित संकल्पना नाही. संस्कृती व विचारप्रणालींचा संगम हे तर भारताचे आगळे वैशिष्ट्य आहे. त्यातच खरा भारताचा मोठेपणा आहे. आपली जीवन-पद्धती व परंपरा यांनी विविध संस्कृतीचे स्वागत केले आहे. इतकेच नव्हे तर छळवादाला कंटाळून भारतात आलेल्या शरणागतींना आम्ही उदारपणे आश्रय दिला आहे. त्यांच्यावर कोणतीही बंधने लादली नाहीत. याऊलट त्यांच्या संपर्काने आम्ही नवीन आचार, विचार आत्मसात करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळेच भारतात सदैव गतिशील समतोल राखला गेला.

विविधतेतून एकतेच्या मूल्यांनीच आपल्याला एकत्र ठेवले आहे. ही विविधता भारतातच सर्व बाबतीत आढळून येते. या देशात इतक्या भाषा व संस्कृती आहेत की त्याची तुलना युरोप खंडाशी करता येईल. परंतु युरोपात फक्त एकच धर्म म्हणजे ख्रिश्चन धर्म आहे. त्यात फक्त कॅथॉलिक व प्रोटेस्टंट असे दोन पंथ आहेत. याऊलट भारतात हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन आणि इतर

अनेक धर्मपंथ एकमेकात नांदत आहेत. नेमक्या याच गोष्टीमुळे राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे. एकात्मतेसंबंधी संभाषण करण्यापूर्वी या परस्पराविरोधी हितसंबंधांमध्ये सलोखा घडवून आणला पाहिजे. जर मूळ समूहच ढासळला तर सर्वजणच नष्ट होणार आहे, हे मर्म प्रत्येक गटाला पटवून देण्यात एकात्मता आहे.

"Unity in the midst of diversity is the halmark of the Indian culture"

"विविधतेत एकता हे भारतीय संस्कृतीचे आगळे वैशिष्टय आहे."

पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात –

"परस्परांबरोबर सलोख्याने राहाण्याची भारतीयांची प्राचीन काळापासून परंपरा आहे. ही भारताची मूलभूत संस्कृती आहे. बुद्धाने फार पूर्वी आपणाला ही शिकवण दिली. सुमारे २३०० वर्षापूर्वी अशोकाच्या काळापासून आपण हा विचार वेळोवेळी जाहीर केला असून आचरणात आणला आहे. आपल्या काळातही महात्मा गांधींनी धार्मिक सलोखा आणि सद्‌भावना यांच्यावर भर दिला, म्हणूनच आपणास एक मौल्यवान ठेवा जतन करायचा असून त्याविरूद्ध आपण वागू शकणार नाही." म्हणजेच पंडित नेहरूंच्या म्हणण्यानुसार आपल्या संस्कृतीनेच आपल्याला एकत्र राहण्यास शिकविले असून त्यातूनच एकता निर्माण झाली आहे. पण ती सांस्कृतिक एकता होती.

भाषिक किंवा वांशिक एकात्मतेवर भर देणारे पाश्चात्य टीकाकार भारत हे एक राष्ट्र नाही, तेथे अनेक राष्ट्रे आहेत, अशी टीका करतात. परंतु या टीकेत अजिबात तथ्य नाही. विविधता आणि मतभेद हे जीवंतपणाचे लक्षण आहे. ही विविधता राष्ट्राच्या विकासात अडथळा ठरत नाही ना! हे पहाणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या एकात्मतेची परीक्षा राष्ट्रीय संकटाच्या वेळी होत असते. परकीय आक्रमण हे सर्वात महत्वाचे संकट असते. कारण त्यामुळे देशाच्या आस्तित्वासच आव्हान दिले जाते. राष्ट्रीय एकात्मता नसेल तर कोणतेही राष्ट्र परकीय आक्रमणास यशस्वीपणे तोंड देऊ शकणार नाही. भारताला १९४७–४८, १९६२, १९६५, १९७०–७१ या सालात परकीय आक्रमणांना तोंड द्यावे लागले. या सर्व प्रसंगी संपूर्ण भारत एकमुखाने एकसंघ राष्ट्र म्हणून शासकांच्या पाठीशी उभा राहिला. हे कशाचे द्योतक आहे? महा-

राष्ट्राचा भूकंप असो, आंध्रचे वादळ असो, गुजरातमधील दुष्काळ, देशातील कानाकोपऱ्यात आलेले संकट संपूर्ण भारतीय जनता ते आपल्याघरील संकट मानते आणि त्वरित भारताच्या कानाकोपऱ्यातून मदतीचा ओघ सुरू होतो. हे सर्वच मानवतेच्या भूमिकेतून होते असे नव्हे तर विविधतेची बंधने पार करणारी आत्मीयतेची भावना प्रबळ ठरते. यावरून भारतातील राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ आहे हे स्पष्ट होते.

युरोपातील राष्ट्रराज्याच्या धर्तीची एकात्मता आपल्याला चालणार नाही. कारण त्याठिकाणी अगोदर राजा आणि त्यानंतर त्याचे राज्य अशी राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे या राज्यात हुकूमशाही प्रवृत्ती अटळ होती. या राष्ट्र-राज्यात जी राजाची भाषा, तीच राज्याची भाषा, जो राजाचा धर्म तोच राज्याचा धर्म. इतर धर्म व भाषांना तेथे स्थान नाही. साहजिकच कॅथालिकांच्या राज्यात प्रॉटेस्टंट पंथीयांचा छळ झाला. जेथे छळ झाला नाही तेथे त्यांना दुय्यम नागरिकाचा दर्जा मिळाला. याऊलट प्रॉटेस्टंट पंथीयांच्या राज्यात तीच परिस्थिती कॅथालिकांच्या बाबतीत झाली. राज्याच्या भाषेशिवाय इतर भाषा नष्ट करण्याचे पद्धतशीर प्रयत्न झाले. ज्यांची भाषा नष्ट झाली ते स्थानिक समुहाशी एकरूप झाले. परंतु त्यांचा राष्ट्रवाद मात्र नष्ट होऊ शकला नाही. संधी येताच राष्ट्रवादाने डोके वर काढले. उदा. आयर्लंडला आपल्या देशात सामावून घेणे इंग्लंडला अद्याप शक्य झाले नाही. याऊलट भारतात मात्र लोकशाही शासन, अनेक भाषा, विविध धर्म असूनही एकात्मता टिकून आहे. फक्त काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. प्रत्येक बाबतीत विविधता, अनेकत्व असूनही एकात्मता अबाधित आहे, हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे. विविधता एकात्मतेला धोकादायक नाही, परंतु आपणा सर्वांचे हित समान आहे हे लोकांच्या लक्षात आले पाहिजे आणि त्यांची तशी खात्री पटली पाहिजे.

विविधता हे आपले मर्मस्थळ नव्हे तर बलस्थान आहे. याबाबत आपण अतिशय सुदैवी आहोत. अनेक धर्म, विविध भाषा, वंश असूनही आपण एकता टिकविली आहे. एवढ्या विविध विचारांचे, तत्वज्ञानाचे स्त्रोत आपले व्यक्ती-वैशिष्ट्य न गमविता इतके मिसळून जावे, की तेही काही वर्षे नव्हे तर अनेक शतके, असे हे भव्य चित्र जगातला इतर कोणताच देश बहुधा दाखवू शकणार नाही. इतिहासानेच बहाल केलेल्या या आपल्या भारतीय सामाजिक वस्त्रांची वीण जर कोणी उसवू पहात असेल तर ते हात काहीही करून थांबविले पाहिजेत.

विविधतेत एकता हा आपला परंपरागत तत्वविचार प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या जीवनात प्रत्यक्ष कृतीत आणला पाहिजे. गांधीजींची भारतीय राष्ट्रीयतेची संकल्पना याच तत्वावर आधारीत होती. भारतातील विविध लोकांच्या ऐक्याची खूण म्हणजे ते सर्व एक आहेत, ही त्यांची असलेली भावना होय. त्यामुळेच आमच्या देशातील प्रत्येक जात ही स्वतःला भारतमातेच्या कंठहारातील एक मोतीच समजते. कोणी आमच्या देशावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा प्रतिकार करण्यासाठी विविध जाती-धर्मांचे लोक भावनिक ऐक्यातून सर्व सिद्ध होतात.

४) समन्वयाची प्रवृत्ती –

मागील पाच हजार वर्षात ज्या ज्या वेळी वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनात संघर्ष निर्माण झाले, त्या त्या वेळी या भारतीय संस्कृतीने समन्वयाचे उदार धोरण स्वीकारल्याचे इतिहास साक्ष देतो. पहिला मोठा सांस्कृतिक समन्वयाचा प्रयोग म्हणजे आर्य आणि द्रविडी यांचा होय. द्रविडी लोक व त्यांची संस्कृती सिंधू संस्कृतीचे प्रतिनिधी असावेत असे वाटते. या समन्वयातून व एकीकरणातून हिंदी जाती-जमाती व मूलभूत हिंदी संस्कृती निर्माण झाली. आर्य व द्रवीड या दोहोंचाही विशिष्ट ठसा या समन्वय साधलेल्या नवीन संस्कृतीवर उमटलेला आहे. पुढील शेकडो वर्षात पुन्हा जाती-जमाती वेगवेगळे मानववंश आले. इराणी, ग्रीक पर्शियन, बॅक्ट्रियन, हूण, इस्लामपूर्व तुर्की, आरंभीचे ख्रिश्चन, ज्यू, झरथुष्ट्री कितीतरी आले. त्यांचा थोडाफार परिणाम होऊन हिंदी संस्कृतीत काही फरक होत गेला. पण अखेर ते सर्व स्वतः हिंदीच बनले.

भारतीय विचारवंतांनी भिन्न वंश, भिन्न विचारसरणी, भिन्न धर्मपंथ, तत्वज्ञानाचे पंथ, सामाजिक व वैयक्तिक ध्येय इ. सर्वांमध्ये समन्वय साधून भारतीय प्रगतीचा मार्ग अनुसरला व संघर्ष टाळले. परंतु कालांतराने भारतात स्वातंत्र्य लढा उभारला गेला व त्यात इंग्रजांविरूद्ध स्थानिक विविध लोकांनी संघर्ष केला. या संघर्षातही सर्व विविध धर्म व संस्कृतीचे लोक समन्वयाने राहिले. त्यामुळेच त्यांना इंग्रज भारतातून घालवून देण्यात यश मिळू शकले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही भारतामध्ये समन्वयाची भावना कायम राहिली. परंतु काही फुटीरवाद्यांनीच विविध धर्माच्या लोकांमधील समन्वय तोडण्याचा स्वार्थी प्रयत्न

सुरू केला आहे. परंतु त्यातही त्यांना यश येणे शक्य नाही. कारण जनतेत निर्माण झालेली समन्वयाची भावना ही आजकालची नसून तिला हजारो वर्षांची परंपरा आहे.

५) प्रगतिशिलता –

शाश्वत मूल्ये सुरक्षित ठेवून बदलत्या काळानुसार बदल घडवित भारतीय संस्कृती विशाल बनली. इजिप्त, ग्रीस, सुमेरियन, असेरियन इ. प्राचीन संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या. भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. अनेक वंशाच्या व भिन्न धर्मांच्या राजवटी नांदल्या. परंतु भारतीय जीवनमूल्ये बदलली नाहीत. म्हणूनच भारतीय संस्कृती अविनाशी आहे. जेव्हा जेव्हा या संस्कृतीने प्रगतिशिलता दाखविली नाही. त्या त्या वेळी संस्कृतीत दोष निर्माण झालेले दिसतात. अस्पृश्यता हा कलंक त्यामुळेच निर्माण झाला. पण हा कलंक पुसून टाकण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात जलद प्रयत्न सुरू असून सध्या जवळ जवळ अस्पृश्यतेचे निर्मूलन होत आले आहे.

६) कृषिप्रधानता –

सिंधू खोऱ्यातील संस्कृती व नंतरचा काळ यांच्यात परंपरासातत्य असल्याचे नक्की वाटते. परंतु मध्ये एक प्रकारचा खंड पडल्यासारखा वाटतो. पुढे जी संस्कृती आपल्याला आढळते ती अधिक कृषिप्रधान दिसते. भारतीय संस्कृतीत ग्रामे, नगरे आहेत. काही अंशी नागरी जीवनही आढळते. परंतु कृषिप्रधानता हेच तिचे वैशिष्ट्य दिसते. कदाचित नवीन येणाऱ्या आर्यांनी त्या प्राचीन नगर संस्कृतीला हे कृषिप्रधान स्वरूप दिले असावे.

भारतीय संस्कृती तिच्या वैशिष्ट्यांमुळे जगातील सर्व संस्कृतीमध्ये श्रेष्ठ ठरली. तसेच या संस्कृतीचे सर्वसमावेशकता हे अतिशय महत्वाचे वैशिष्ट्य असून त्यावर आधारित अशा कल्पनांचा पुढील काळात महात्मा गांधींनी स्वीकार करून भारतीय जनतेची अस्मिता जागृत केली. महात्मा गांधीनी सुरू केलेला सत्याग्रह सर्व समावेशक स्वरूपाचा होता. त्यांनी हाती घेतलेल्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यास जनतेने मोठ्या उत्साहाने सहाय्य केले. त्यामुळेच सर्व जाती, धर्म व पंथाचे लोक त्यांच्या अहिंसात्मक सर्वमान्य सत्याग्रहात भाग घेत असत. तसेच सत्याग्रहात भाग न घेणारेही गांधीजींचेच अनुकरण करीत असत. त्यांची

सत्याग्रहाची कल्पना ही सर्वसमावेशक संस्कृतीचीच होती. त्यांच्यापासून ज्यांनी स्फूर्ती घेतली, त्यांच्यात जात, कर्मकांड, स्त्रियांचा दर्जा इ. मुद्याबाबत संपूर्ण परिवर्तन झाले. गतीशिल राष्ट्र निर्मितीसाठी विभिन्न संस्कृतीत एकता असणे किती आवश्यक आहे, हे राष्ट्राने जाणले. महात्मा गांधीजींनी नव्या पंथाची किंवा धर्माची शिकवण दिली नाही. त्यांनी राष्ट्राच्या जीवनाचा एक नवीन मार्ग दाखवला लोकांची अस्मिता जागृत करणारा एक नवीन अनुभव त्यांनी लोकांना दिला.

बहुसंख्य कॉंग्रेसजन जरी साम्राज्यशाहीविरूद्ध झगडण्यात मग्न होते, तरी काही विधायक समाजसुधारक हरिजन उद्धार, ग्रामोद्योग, ग्रामीण आरोग्य, इ. क्षेत्रात कार्य करीत होते. या सर्व गोष्टी का घडत होत्या, याचा जर आपण विचार केला, तर या सर्व गोष्टींची परंपरा आपल्या संस्कृतीने आपणाला दिलेली आहे. सर्व प्रकारचे लोक आपल्या देशात पूर्वीपासून राहातात. त्याचा आपल्या संस्कृतीने कधीही ऱ्हास करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले नाही. तर या उलट परकीयांना भारतीय संस्कृतीने अतिशय खिलाडू वृत्तीने आपल्यात सामावून घेतले त्यामुळेच सर्व संग्राहक अशी भारतीय संस्कृती जगात उच्च स्थानी मानली जाते. याचाच परिणाम पुढील काळात भारतात राष्ट्रीय एकात्मतेचा उदय झाला.

प्रकरण दुसरे

राष्ट्रवादाचा उदय व विकास

राष्ट्रवादाचे स्वरूप –

माणसाची उभारणी एका मूलभूत नैसर्गिक प्रवृत्तीतून झालेली आहे. प्रत्येक माणसाला आपल्या जन्मस्थानाविषयी ज्याठिकाणी आपण बालपणी रमलो, खेळलो, बागडलो त्या स्थानाविषयी, तेथील नद्या, डोंगर, दरीखोरी, झाडे इत्यादींविषयी एकप्रकारचे उपजत प्रेम असते. जगाच्या पाठीवर कोठेही हिंडलो तरी बालपणीच्या आठवणीशी जवळीक असणाऱ्या जन्मगांवाविषयीचे आकर्षण काही वेगळेच असते. मातृभूमीसंबंधीचे प्रेम याच आकर्षणातून निर्माण होते. माणसाला स्वत:च्या मातृभाषेविषयी देखील असेच आगळे प्रेम असते. आपली जीवनपद्धती, आपल्या चालीरिती, परंपरा, आपला धर्म, इत्यादींविषयी प्रत्येक माणसाला एक विशेष आदरभाव असतो. आत्मियता असते. आत्मियता हा राष्ट्रवादाचा गाभा आहे. आत्मियतेच्या भावनेचा व्यापक आविष्कार राष्ट्रवादात होतो. भूमी, भाषा, वंश इत्यादींविषयी आत्मियता राष्ट्रवादाच्या मुळाशी आहे.

स्वराष्ट्राविषयीची आत्मियतेची भावना आधुनिक राष्ट्रवादाच्या जन्मापूर्वीही अस्तित्वात होती. परंतु ही भावना सुप्त स्वरूपात होती. या भावनेने लोकांच्या विचारांवर व कृतींवर मूलगामी आणि व्यापक परिणाम घडविला नव्हता. सर्व लोकांना भावना, विचार आणि कृती यासंदर्भात एकात्म बनविणारी जाणीवपूर्वक इच्छा असे तिचे स्वरूप नव्हते, असे **'जॉन आंकास्मिथ'** याने म्हटले आहे. फ्रेंच क्रांतिने राष्ट्रवादाला व्यापक असे स्वरूप दिले म्हणूनच जी. पी. गुच यांनी म्हटल्याप्रमाणे "राष्ट्रवाद हे फ्रेंच राज्यक्रांतिचे अपत्य मानले जाते."

(Nationalism is the Child of French Revolution.)

राष्ट्रवाद ही अनैसर्गिक भावना असून ती नैसर्गिक होऊ शकत नाही. कारण

आपल्या राष्ट्रातील आपण प्रत्यक्ष न ओळखू शकणाऱ्या लक्षावधी देशबांधवाबद्दल अथवा हजारो मैल दूरवर पसरलेल्या देशभूमीबद्दल वाटणारी आत्मीयता नैसर्गिक असू शकत नाही, तर शिक्षण, आर्थिक परावलंबन, सामाजिक संस्था आणि अनुभव इत्यादींमुळे राष्ट्रविषयी वाटणारी आत्मीयता निर्माण होते. या सर्व गोष्टीं· मुळेच भारतातही राष्ट्रवाद उदयास आला व त्यातूनच राष्ट्रीय भावना व एकतेची भावना उदयास आली.

राष्ट्र –

राष्ट्र या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी काही विचारवंतांनी दिलेल्या व्याख्या नमूद करणे अपरिहार्य ठरते.

राष्ट्राची व्याख्या करतांना **पिल्सबरी** या अमेरिकन मानस शास्त्रज्ञाने म्हटले आहे की, ' राष्ट्रीयता ही मानसिक अवस्था आहे ' पुढे ते म्हणतात, " राष्ट्र म्हणजे स्वतःला एकात्म मानणारा व्यक्तींचा समूह होय. एका विशिष्ट मर्यादेत तो गटाच्या हितासाठी व्यक्तीहितास तिलांजली देण्यास प्रवृत्त होतो. या समूहातील प्रत्येक व्यक्ती समूहाच्या प्रगतीने आनंदी होते. राष्ट्राचे सुखदु:ख हे व्यक्ती स्वत:चे सुखदु:ख मानते. " म्हणूनच राष्ट्रीयता ही मानसिक अवस्था आहे.

हॅन्स कोहन च्या मते " राष्ट्रवाद ही प्रथमतः आणि मुख्यतः मानसिक अवस्था आहे. आत्मीयतेच्या जाणीवेची ती कृती आहे.. "

प्रा. लुई स्नायडरच्या मते " राष्ट्रवाद हा इतिहासाच्या विशिष्ट अवस्थेतील राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक घटकांचा परिणाम आहे. निश्चित स्वरूपाच्या भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या, समान भाषा बोलणाऱ्या, राष्ट्राच्या भावना व्यक्त करणारे साहित्य असणाऱ्या, समान रूढी आणि परंपरांनी प्रभावित झालेल्या, क्वचितच समान धर्म असणाऱ्या, आपल्या राष्ट्र पुरुषांचा गौरव करणाऱ्या लोकांची भावनात्मक अथवा मानसिक अवस्था म्हणजे राष्ट्रवाद होय. " राष्ट्रवादाचा निश्चित अर्थ समजण्यासाठी राष्ट्र, राष्ट्रक या समानार्थी संकल्पनांचा अभ्यास करणे इष्ट ठरेल. 'राष्ट्र बनण्याची इच्छा असणारा समाज म्हणजे राष्ट्रक होय.'

राष्ट्र - राष्ट्रक - राष्ट्रवाद -

राष्ट्रवाद, राष्ट्रीयता, राष्ट्रक, राष्ट्र - राज्य हे सर्व शब्द मूळ ' राष्ट्र ' या

शद्वापासून झालेले परस्परसंबंधी शद्व आहेत. राष्ट्र हा शद्व इंग्रजी Natus या लॅटीन धातूपासून बनलेला आहे. या धातूचा मूळ शद्व जन्म किंवा वंश असा होतो. त्यामुळे व्युत्पत्ती शास्त्रदृष्ट्या ' राष्ट्र ' या शद्वाचा अर्थ ' वांशिक अथवा रक्तसंबंधामुळे निर्माण होणारा एकात्म समाज ' असा होतो.

आर्नेष्ट बार्कर याने खालीलप्रमाणे राष्ट्राची व्याख्या केलेली आहे. " सामान्यत: वेगवेगळ्या वंशाच्या परंतु समान इतिहासामुळे समान विचार आणि भावना असणाऱ्या, निश्चित भूप्रदेशावर राहाणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र होय. "

आर्नेष्ट रेनॉन "केवळ समान भाषा बोलण्याने किंवा समान वंश असल्याने राष्ट्र निर्माण होत नाही, तर ऐतिहासिक भूतकाळात भव्य, दिव्य, समान वारसा लाभलेल्या आणि भविष्यात भव्य साधण्याची इच्छा बाळगणाऱ्या समान प्रवृत्तीतून राष्ट्र निर्माण होते. "

राष्ट्रवादाचे (राष्ट्रीयत्व) घटक –

भावनिक एकात्मता आणि आत्मियता हा राष्ट्रवादाचा मूलभूत आधार आहे. ही आत्मियता का ? आणि कशी निर्माण होते, याचा विचार करावयास हवा. राष्ट्रीयत्वाची (एकतेची) भावना अनेक घटकांमुळे जोपासली जाते. ते घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) भौगोलिक एकात्मता –

निश्चित भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकांमध्ये भौगोलिक एकात्मतेमुळे राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली जाते. स्वदेशाबद्दलचे प्रेम हा एक अत्यंत प्रभावी घटक आहे. भौगोलिक सान्निध्यामुळे एकात्मता निर्माण होते. याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

अ) भावनिक एकात्मता –

भौगोलिक परिस्थितीवरच कोणत्याही प्रदेशाचे हवामान, पर्जन्यमान अवलंबून असते. याबर तेथील लोकांची शरीरप्रवृत्ती, मानसिक प्रवृत्ती यांची जडण-घडण होते. शारीरिक आणि मानसिक सान्निध्यामुळे परस्परांना समजून

घेण्याची, सहकार्य करण्याची वृत्ती वाढीस लागते आणि त्यामुळे भावनिक एकात्मता निर्माण होण्यास मदत होते. भारतभूमीचा नागरिक जगाच्या पाठीवर कोठेही गेला तरी युरोपियन, आफ्रिकन, चिनी नागरिकांपेक्षा त्याचे वेगळेपण लक्षात येते. म्हणून भौगोलिक परिस्थितीचा बव्हंशी परिणाम अ हे हे नाकारता येत नाही.

ब) मातृभूमीबद्दलची निष्ठा –

मानवी निष्ठा बदलत गेल्या आहेत. टोळी, जमात याबाबतच्या निष्ठेपेक्षा आज व्यापक अशी देशभूमीबद्दलची निष्ठा प्रमुख मानली गेली आहे. काश्मिर-पासून कन्याकुमारीपर्यंत आणि सोमनाथपासून इंफाळपर्यंत पसरलेल्या या भारतामध्ये भौगोलिक वैचित्र्य असले तरी कोठेही हिंडत असतांना आपण भारतातच आहोत हे सहज लक्षात येते. कोणत्याही परदेशी नागरिकापेक्षा भारतातील कोणताही परप्रांतीय हा आपणास अधिक जवळचा वाटतो.

क) जन्मभूमीबद्दलची ओढ –

प्रत्येक मानवाला आपल्या जन्मभूमीबद्दल स्वाभाविकच अनाकलनीय ओढ वाटत असते. या ओढीमुळेच देशभक्ती, देशप्रेम यांचा जन्म होतो. आपल्या मातृभूमीपासून अलग राहिल्यावर किंवा रहावे लागल्यावर मातृभूमीच्या ओढीची प्रामुख्याने जाणीव होते.

ने मजसी ने परत मातृभूमीला,
सागरा प्राण तळमळला !

या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या काव्यपंक्ती मातृभूमीच्या प्रेमाचे यथार्थ वर्णन करतात.

भौगोलिक एकता साधली नाही तर राष्ट्रीयत्वाची भावना जोपासणे कसे अवघड जाते हे बांगला देशाच्या उदाहरणावरून लक्षात येते. पूर्वीच्या पाकिस्तानातील पश्चिम विभागापासून हजार मैलांनी दूर असलेल्या पूर्व पाकिस्तानात एकराष्ट्रीयत्वाची भावना जोपासली गेली नाही. आणि त्यातूनच बांगला देश या नव्या व स्वतंत्र देशाची निर्मिती झाली.

राष्ट्रवादाच्या जोपासनेमध्ये भौगोलिक एकात्मतेस महत्वाचे स्थान असले तरी

केवळ अशा एकात्मतेनेच भागत नाही. जगात कोठेही स्वत:च्या मालकीचा भूप्रदेश नसतानाही, ज्यूवंशीय लोकांची एकात्मतेची भावना प्रखर होती. अर्नेष्ट रेनॉन म्हणतात, "केवळ भूमीमुळे राष्ट्र तयार होत नाही. माणूस हा राष्ट्रवादाचा (राष्ट्रीयत्व) आत्मा आहे. राष्ट्र हे आध्यात्मिक तत्व आहे. इतिहासाच्या गुंतागुंतीचा परिणाम आहे, केवळ जगाच्या भौगोलिक रचनेने ठरलेला समूह म्हणजे राष्ट्र नव्हे."

२) वांशिक एकात्मता –

वांशिक एकात्मता राष्ट्रवादाच्या निर्मितीस पोषक ठरते. या वांशिक एकात्मतेस कितपत महत्व द्यावे याबाबत विचारवंतात मतभेद आहेत. मॅझिनी स्पष्ट म्हणतो की, 'राष्ट्रवादासाठी वांशिक एकात्मतेची जरूरी नाही.' एक वेळ राष्ट्रीयत्वाच्या निर्मितीसाठी वांशिक एकात्मतेची आवश्यकता भासली असेल. परंतु ऐतिहासिक विकासात मानवी समाजांमध्ये दळणवळण जसजसे वाढत गेले तसतसा वंशसंकर होऊ लागला. आज कोणत्याही देशात पूर्णत: शुद्ध वंश आढळणार नाही. यावरून हे लक्षात येते की, आज राष्ट्रीयत्वाच्या निर्मितीसाठी 'वंश' हा इतका महत्वाचा घटक नाही.

परंतु तरी सुद्धा वांशिक एकात्मता असेल तर ती राष्ट्रीयत्वास पोषक ठरू शकते. वांशिक भिन्नता एकात्मतेस बाधकही ठरू शकते. भिन्न वंशियांना एकत्र नांदण्यास अशक्य झाल्यास अंतर्गत यादवी निर्माण होऊन देशाचे तुकडे होतात. या संदर्भात अलीकडच्या काळातील सायप्रसमधील ग्रीक आणि तुर्क यांचा संघर्ष लक्षात घेण्यासारखा आहे. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातही निग्रोंविरूद्ध गोऱ्यांचा संघर्ष मधून मधून होत असतो.

भारताच्या बाबतीत मात्र वेगळीच परिस्थिती आहे. भारतात वांशिक एकता नसतांनाही भारत हा पूर्वीपासून सांस्कृतिक दृष्ट्या एकसंध देश आहे. भारतात धर्म भिन्न असूनही शेकडो वर्षापासून अनेक वंशाचे लोक एकत्र राहतात. वांशिक एकात्मतेचा विचार करता इ. स. १९४७ साली हिंदुस्थानची फाळणी केवळ वंश व धर्मांधतेमुळे होऊन फक्त मुस्लीम धर्मीय राष्ट्र म्हणून पाकिस्तानचा जन्म झाला. एक धर्म, एक वंश, एक जात, एक संस्कृती, एक परंपरा असूनही आज पाकिस्तानात अस्थिरता निर्माण झालेली दिसते. स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे

झाली, तरीही पाकिस्तानला अजून अस्मितेचा आधार गवसण्याची चिन्हे दिसत नाहीत. कारण कराचीत स्थानिक पठाण व भारतातील बिहारमधून फाळणीच्यावेळी पाकिस्तानास आलेले लक्षावधी मोहाजीर मुसलमान, यांच्यात वांशिक दंगल झाली. स्थानिक पठाणांनी मोहाजीरांची कत्तल केली. पाकिस्तानात प्रथमच एवढी भीषण दंगल झाली, म्हणजे स्वातंत्र्याच्या वेळी आपले मुस्लीम धर्मिय राष्ट्र म्हणून जे मोहाजीर पाकिस्थानात गेले ते अजूनही उपरेच आहे. पाकिस्तानात वांशिक एकता असूनही राष्ट्रीय एकात्मतेला तडे जातात हे ज्वलंत उदाहरण आहे.

भारतात मात्र याउलट परिस्थिती आहे. अनेक वंशीय धर्मिक लोक असूनही शांततामय वातावरण दिसते. पंजाबमधील दहशतवाद्याच्या कारवाया सोडता सर्वत्र तशी शांतताच आहे आणि भारताची राष्ट्रीय एकात्मतताही अबाधित आहे. भारताच्या बाबतीत वांशिक एकात्मता हे राष्ट्रीयत्वाचे वैशिष्ट्य खोटे ठरते. थोडक्यात म्हणजे वांशिक एकात्मतेच्या अभावी राष्ट्र निर्माण होऊ शकते व दीर्घकाळ टिकू शकते हे लक्षात येते.

३) भाषिक एकात्मता –

आधुनिक राष्ट्रवादाचा अगर राष्ट्रीयत्वाचा विचार केला तर भाषिक एकात्मता हा राष्ट्रवादाचा सर्वात महत्वाचा घटक ठरलेला आहे. आधुनिक काळात युरोप खंडात निर्माण झालेली राज्ये ही प्रामुख्याने एक भाषिक राज्ये आहेत. उदा. इंग्लंडमध्ये–इंग्रजी, फ्रान्समध्ये–फ्रेंच, स्पेनमध्ये–स्पॅनिश, रशियात–रशियन या भाषा बोलल्या जातात. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जर्मन आणि इटालिन भाषा बोलण्याची अनेक छोटी छोटी राज्ये होती. फ्रेडरिक दी ग्रेट व प्रिन्स बिस्मार्क यांनी सर्व जर्मन भाषिकांना एकत्र आणून त्यांचे एक संघराज्य निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. इटलीतही गरिबॉल्डी, मॅझिनी काव्हूर, या नेत्यांनी इटालियन भाषिक राज्याना एकत्र आणून त्यांचे एक प्रबळ असे एक-भाषिक राज्य युरोपच्या नकाशावर निर्माण केले.

भाषिक एकात्मता राष्ट्रीयत्वास पोषक असली तरी तो एक अपरिहार्य घटक आहे असे मात्र म्हणता येणार नाही. कारण बहुभाषिक लोक असूनही एकसंघ राष्ट्र निर्माण होऊन टिकून असल्याची उदाहरणे आहेत. उदा. स्वित्झर्लंडमध्ये फ्रेंच, जर्मन आणि इटालियन भाषिक नागरिक रहात असूनही तेथील राष्ट्रीय-

त्याचा पाया भक्कम आहे. भाषिक विविधता असली तरी एकत्र राहण्याची इच्छा प्रबळ असेल तर राष्ट्रवाद जोपासला जाऊ शकतो. कारण माणसाची इच्छा भाषेपेक्षाही प्रभावी व महत्वाची ठरते.

बहुभाषिकत्व हे भारतीय राष्ट्रीयत्वाचे आगळे वैशिष्ट्ये आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात बहुभाषिक भारतीय राष्ट्रवादी चळवळीत एकमुखाने व एका ध्येयाने प्रेरित होऊन समरस झाले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र भाषिक विविधता हा भारतीय राष्ट्रीयत्वला धोका ठरलेला आहे. सक्तीने एकभाषिकत्व लादता येत नाही. भारतात वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. बहु-भाषिकांना आपले वैशिष्ट्ये टिकविता येईल अशा तऱ्हेने स्वतंत्रता मिळाली तर बहुभाषिक राज्यातही एकराष्ट्रीयत्वाची भावना जोपासली जाते. यानुसार भारत सरकारने प्रादेशिक भाषांना प्रांतापुरती स्वतंत्रता दिलेली आहे. मात्र राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेला मान्यता दिलेली आहे. त्यामुळेच भारताची राष्ट्रीय एकात्मता आजपर्यंत टिकून आहे.

४) धार्मिक एकात्मता –

इतर घटकांप्रमाणेच धर्म हा घटकही देशातील राष्ट्रवादाचे स्वरूप ठरण्यास कारणीभूत होतो. धर्म ही माणसाच्या जीवनातील अत्यंत जिव्हाळ्याची बाब असते. धर्माच्या बाबतीत मानवाची संवेदनाक्षमता सर्वात तीव्र असते. राष्ट्रवादाचा इतिहास असे सांगतो की, प्रारंभीच्या काळात धर्म ही लोकांना एकत्र आणणारी अतिशय महत्वाची प्रेरणा होती. भौगोलिक एकात्मता नसतांनाही केवळ धर्माच्या अभिमानाने ज्यू जमातींमध्ये भावनात्मक ऐक्य साधले होते. भारताशेजारील पाकिस्तानही इस्लाम धर्माधिष्ठित राज्य आहे.

विशेष म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी मुस्लीमांमध्ये द्विराष्ट्रवादाची जोपासना केली. त्यातूनच भारताची फाळणी होऊन पाकिस्तान निर्माण झाले. परंतु केवळ धार्मिक एकताच एकराष्ट्रीयत्व निर्माण करू शकत नाही. कारण तसे असते तर बांगला देश स्वतंत्र झाला नसता.

युरोपियन राष्ट्रवादाचा विचार करता असे आढळते की, आधुनिक काळात राज्य आणि धर्म यांच्या कक्षा स्वतंत्र ठेवण्याची प्रवृत्ती वाढली असून त्यातूनच धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना (Secular State) पुढे आली आहे. धर्मनिरपेक्ष

राज्यात धर्म ही खाजगी बाब मानली जाते. नागरिक स्वत:च्या सद्सद्‌विवेकबुद्धीनुसार वागतो आणि सरकार हे धार्मिक बाबतीत ढवळाढवळ करीत नाही. तरीही देशात अधूनमधून धार्मिक दंगली उद्‌भवतात.

ज्या देशात मोठ्या प्रमाणावर धार्मिक विविधता आहे. तेथे एकसंघ राष्ट्रवादाची जोपासना करावयाची असेल तर अल्पसंख्यांकाना देशाच्या एकंदर राजकीय आणि सामाजिक जीवनप्रवाहांमध्ये सहभागी होण्यासाठी समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते.

५) सांस्कृतिक एकात्मता –

सांस्कृतिक एकात्मता याचा अर्थ समान रूढी, समान परंपरा, समान चालीरिती, समान साहित्य, समान लोकवाङ्मय, समान महाकाव्ये इ. होय. या साम्यामुळे जी जवळीक आणि आत्मियता निर्माण होते, तीच राष्ट्रवादास पोषक ठरते. राष्ट्रीय शिक्षणाने राष्ट्रीयत्व निर्माण होते. राष्ट्रीय वाङमय हा राष्ट्रीय संस्कृतीचा अविष्कार असतो आणि नागरिकांना आपल्या राष्ट्रीय वाङमयाचा अभिमान वाटत असतो. रामायण, महाभारत, गीता, संतकाव्य, रविंद्रनाथ टागोर व बंकिमचंद्र यांचे साहित्य, इत्यादींना भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासामध्ये अनन्य साधारण महत्व आहे.

जॉन स्टुअर्ट मिल यांनी सांस्कृतिक एकतेस महत्वाचे स्थान दिले आहे. "राष्ट्राचा गौरवपूर्ण इतिहास आणि त्यासंबंधी स्मृती, ऐतिहासिक घटनांसंबंधी वाटणारा अभिमान आणि अपमान, सुख आणि दु:ख अशा सामुहिक भावना या राष्ट्रवादाचा निर्मितीमध्ये सर्वात महत्वाची भूमिका बजावतात. असे मील यांनी म्हटले आहे.

६) राजकीय हितसंबंध –

वंश, भाषा, धर्म, संस्कृती इत्यादी बाबतीत विविधता असूनही एकच राजकीय शासन असल्यास समान राष्ट्रीयत्व जोपासले जाते. यात दोन अंदाज संभवतात.

अ) परकीय सरकार – सामान्यत: परकीय अमलाखाली नागरिकांची कमीअधिक प्रमाणात पिळवणूक होत असते. त्यामुळे या पिळवणूकीस कंटाळल्या

मुळे लोकांमध्ये परकीय शासन नष्ट करण्यासाठी एकत्र येण्याची भावना बळावते. धर्म भाषा, वंश इत्यादींमुळे निर्माण झालेले भेद विसरले जातात आणि एकता प्रस्थापित होते. भारतातील राष्ट्रवादी चळवळ हे या संदर्भातले सर्वोत्कृष्ट उदाहरण होय. तसेच नेपोलियनबरोबर केलेल्या युद्धामुळे स्पेनमध्ये राष्ट्रवाद बळावला. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत राष्ट्रवाद फोफावला. इंग्लंडच्या राष्ट्रवादामुळेच आयर्लंडमध्ये राष्ट्रवादास बळकटी आली. अशी अनेक उदाहरणे देता येतील. थोडक्यात म्हणजे "राजकीय दडपशाहीमुळे राष्ट्रीयत्वाची भावना बळावते व स्वातंत्र्य चळवळींना प्रोत्साहन मिळते.

भारतातील राष्ट्रीय चळवळीपासून प्रेरणा घेऊन अफ्रिकेतील केनिया, नायजेरिया, झांबिया या देशांमध्ये राष्ट्रवादी चळवळी होऊन ते देश स्वतंत्र झाले व तेथील जनतेत एकात्मता निर्माण झाली.

ब) समान शासन – समान राजकीय शासनामुळे एकात्मतेची भावना वाढीस लागते. जेव्हा भिन्न धर्म, भाषा, संस्कृती असलेले लोक बराच काळ समान राजकीय शासन अनुभवतात आणि शासन अशा लोकांसंबंधी सहिष्णू धोरण अंगिकारते तेव्हा मतभेद विसरले जातात आणि एकराष्ट्रीयत्व जोपासले जाते. ही एकात्मता सहजासहजी साधली जात नाही. अमेरिका हे या संदर्भातील सर्वात महत्वाचे उदाहरण होय. स्वातंत्र्य मिळाल्यावर १३ अमेरिकन वसाहतींनी एकत्र येऊन संघराज्य स्थापन केले. समान राजकीय शासनाकडे कालांतराने तेरा वसाहतीतील विविध संस्कृतीच्या लोकांमध्ये एकात्मतेची भावना जोपासली गेली आणि आज अमेरिका एक बलशाली राष्ट्र निर्माण झाले.

७) बाह्य शक्तीच्या धोक्याची जाणीव –

जेव्हा देशाला बाह्य शक्तीपासून धोका निर्माण होतो तेव्हा राष्ट्रीयत्व सहज शक्य होते. बाह्य शक्तीच्या धोक्याची जाणीव हा राष्ट्रीयत्व घडविणारा एक प्रभावी घटक आहे. परंतु बाह्य धोका कमी झाल्यास देशाचे विघटन होण्याचीही शक्यता असते.

८) आर्थिक हितसंबंध –

समान आर्थिक हितसंबंधामुळे एक राष्ट्रीयत्वास प्रोत्साहन मिळते. उदा.

अतिवेगाने आर्थिक विकास साधून दारिद्र्य दूर करणे हे आजच्या बहुतेक अविकसित देशांचे उद्दीष्ट आहे. यासाठी भाषिक, धार्मिक, वांशिक हितसंबंध दुय्यम माणून आर्थिक विकासासाठी एकत्र राहाण्याची भावना बळावत आहे. भारतातील घटकराज्यांना परस्परांच्या आर्थिक सहकार्याची नितांत गरज आहे. आपल्या आर्थिक विकासासाठी जर्मन भाषिक राज्यांनी १९ व्या शतकात आर्थिक संघ (Zollverian) स्थापन केला व त्यातूनच पुढे जर्मन संघराज्याची स्थापना झाली. समान आर्थिक हितसंबंधामुळे लोकांना एकत्र येण्यास मोठी मदत होत असली तरी केवळ अशा हितसंबंधाच्या एकात्मतेमुळेच राष्ट्रवाद निर्माण होईल असे नाही.

वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की भूमी, वंश, भाषा, धर्म, शासन, आर्थिक हितसंबंध इ. बाबतीतील साधर्म्य राष्ट्रवादाच्या मुळाशी असते. हे सर्व राष्ट्रवादाचे घटक होत. यातील एकही घटक अपरिहार्य नाही. त्याचप्रमाणे वरील सर्व बाबतीत एकात्मता असणारे राष्ट्रही आपल्याला आढळणार नाही. तसेच सर्वच बाबतीत एकात्मता असणारे राष्ट्र आदर्श राष्ट्रवादी राष्ट्र ठरेल. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र कोठे धार्मिक एकात्मतेमुळे तर कोठे भाषिक, कोठे भौगोलिक एकात्तेमुळे तर कोठे राजकीयहितसंबंधामुळे राष्ट्रवाद जोपासला गेल्याचे आढळते.

भाषिक, धार्मिक, वांशिक विविधता असूनही एकत्र राहाण्याची इच्छा प्रबळ असेल तर एकराष्ट्रीयत्व निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाही. **टायन्बीच्या** मते " राष्ट्र बनून एकत्र एकत्र राहण्याची इच्छा हा राष्ट्रीयत्वाचा सर्वात मोठा घटक आहे ". डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी यांनीही एकात्मतेच्या भावनेवर भर दिला आहे.

आतापर्यंत राष्ट्रवादाच्या भावनेचा कोणत्याही देशात उदय होण्यासाठी कोणकोणत्या घटकांशी आवश्यकता असते, ते आपण पाहिले. परंतु आता भारतात राष्ट्रवादाचा (राष्ट्रीयत्वाचा) उदय व विकास कधी झाला व कसा झाला ते पहावयाचे आहे. म्हणजेच भारतात राष्ट्रीय एकात्मतेचा उदय कधी झाला ते पहाणे आवश्यक ठरेल.

प्रकरण तिसरे

भारतातील राष्ट्रीय एकात्मतेचा उदय

" राष्ट्रीय एकात्मतेची उभारणी विटा, माती आणि हातोड्याने होत नाही. लोकांच्या मनात आणि हृदयात या भावनेचा संथपणे विकास झाला पाहिजे; ही प्रक्रिया मंद आहे. पण ती संथ आणि कायम स्वरूपाची आहे. "

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

इंग्रजांच्या आगमनापूर्वी आज जीला आपण राष्ट्रीय एकात्मता म्हणतो ती कल्पना अस्तित्वातच नव्हती. तर सांस्कृतिक एकता मात्र होती, यात शंका नाही. पाश्चात्य विद्येचे संस्कार आणि इंग्रजांचे एकछत्री साम्राज्य यातून भारतात एकराष्ट्रीयत्वाचा प्रादुर्भाव झाला. पूर्वी भारत देशाला एकतेची परंपरा नव्हती व एकत्र बांधून ठेवणारे बळकट धागेही नव्हते किंवा शक्तीही नव्हती. याउलट एकमेकांपासून वेगळे होण्याचीच वृत्ती होती. आणि राजकीय क्षेत्रात जे काही काळ दिखाऊ ऐक्य दिसले, तेव्हा सुद्धा विभक्तपणाची शक्ती डोके वर काढीत होती. **सर जॉन स्ट्रॅचीच्या** मते हिंदुस्थान असा एक देश कधीच नव्हता, हिंदुस्थान राष्ट्र नव्हते, तर जो हिंदुस्थान आहे तो ब्रिटीश वसाहत-वाल्यांनी निर्माण केलेला आहे. सर्वांना एकत्रित ठेवणारी परकीय शक्ती नाहिशी झाली की, हिंदुस्थानची पुन्हा ब्रिटिश राजवटीपूर्वी होती तशीच अवस्था होईल. " म्हणजे जॉन स्ट्रॅचीचे म्हणणेही ब्रिटिशपूर्वकाळात भारतात एकात्मतेची कल्पना नव्हती, यास दुजोरा देणारे आहे. परंतु स्ट्रॅचीच्या म्हणण्यानुसार परकीय शक्ती म्हणजेच ब्रिटिश सरकार हिंदुस्थानातून गेले तरी हिंदुस्थानची स्थिती ब्रिटिश पूर्वकाळापूर्वी होती तशी झाली नाही, तर याउलट राष्ट्रीयत्वाच्या भावनेने मूळ धरले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर राष्ट्रीय एकात्मता भक्कम पायावर उभी राहिली. या भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या व्याख्या खालील-प्रमाणे देता येईल.

व्याख्या –

१) " देशामध्ये जेवढी राज्ये आहेत, जेवढ्या भाषा आहेत, वेगवेगळ्या प्रकारचे पेहराव आणि संस्कृती आहे, या सर्वांत जरी वेगळेपण असले तरी संबंध देशाला जोडणारी अशी एक आपली मूळची संस्कृती आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ सर्वांना सामावून घेऊन सर्वांच्या हितासाठी जे आपण करू शकतो, त्यालाच राष्ट्रीय एकात्मता म्हणता येईल. "

२) " भारत एक राष्ट्र आहे व या राष्ट्राशी – भारताशी एकरूप होऊन राहण्याची तीव्र इच्छा असणं म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता होय. "

३) **जयप्रकाश नारायण** म्हणतात,

" A nation might have its state and well-defined territory and yet lack the substance is defined as national conciousness or national sentiment. In our country when we speak of national integdration we mean precisely the development of this very Conciousness of nationality. "

" देशाला राज्य व नुसते भौगोलिक क्षेत्रफळ असून चालत नाही. त्या भूमीवर राहाणाऱ्या लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना असली पाहिजे. ही भावना म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता होय. " श्री. **जयप्रकाश नारायण** पुढे म्हणतात की ही भावना आहे की नाही, असेल तर ती किती प्रमाणात आहे, हे ठरवणे अवघड आहे. निरनिराळ्या देशात राष्ट्रीय एकात्मतेची भावना वेगवेगळ्या प्रमाणात आढळून येईल.

४) " राष्ट्रीयत्व, म्हणजे त्या राष्ट्रातील लोकांनी भूतकाळात जी काही मोठी मोठी कामे पार पाडली असतील, जे पराक्रम गाजविले असतील, अनेक प्रसंगी जे अनुभव घेतले असतील, त्यांच्या आचार-विचारांत ज्या काही विशिष्ट परंपरा ते पाळीत आलेले असतील, त्या सर्वांची लोकांना असलेली आठवण म्हणजेच राष्ट्रीयत्व होय. "

आपण समाजाचे एक अविभाज्य घटक आहोत ही जाणीव होणे, यालाच एकात्मता म्हणता येईल.

५) श्री. **इकबाल नारायण** यांच्या मते " राष्ट्रीय एकात्मता ही एक परिपूर्ण व अनेकांगी संकल्पना आहे. त्यामध्ये समाज, संस्कृती, अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, प्रशासन, शिक्षण इ. गोष्टींचा ते विचार करतात. शिवाय आर्थिक,

सांस्कृतिक, राजकीय व भावनिक ऐक्याचाही एकत्र विचार करावा लागतो. ''

६) '' राष्ट्रीय हितासमोर धर्म, जात, भाषा, प्रांत यासारख्या निष्ठा निष्प्रभ ठरल्या पाहिजेत असा राष्ट्रीय एकात्मतेचा सोपा अर्थ आहे. ''

७) '' राष्ट्रीय एकात्मता ही अशी जीवन पद्धती आहे की जिच्यात आपापसातील अनेक मतभेद तसेच ठेवूनही एका सामाईक उद्दीष्टासाठी, सामाईक प्रचंड कार्यासाठी, जनहितासाठी सर्वसामान्य जनता एकत्र गुंफून एकरूप होण्यास मदत होईल. ''

८) '' कायद्यात आणि प्रत्यक्ष जीवनात असलेले सर्व प्रकारचे भेदभाव, विशेष हक्क नष्ट करून सर्वांना मान्य असा लोकशाहीवादी आणि देशभक्त समाज निर्माण करणे हाच राष्ट्रीय एकात्मतेचा खरा अर्थ आहे. ''

९) '' सर्व राज्यातील लोकांचा जात, धर्म, भाषा निरपेक्ष एकोपा म्हणजेच एकात्मता होय. ''

एकात्मतेचा अर्थ –

ज्या समाजात वांशिक भिन्नता, विविध भाषिकता, अनेक धर्म, वेगवेगळ्या चालीरिती, जातीयता, वर्गीय भिन्नता, इ. प्रकारची विविधता असून देखील त्या समाजातील लोकात आपण एक आहोत ही भावना प्राबल्याने वास करत असेल, समान हिताची उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील असतील तर त्या समाजात राष्ट्रीय एकात्मता आहे असे म्हणता येईल. ''

राष्ट्रीय एकात्मता एखाद्या देशात निर्माण होण्यासाठी सामाजिक एकात्मता व भावनिक एकात्मता या दोन्ही गोष्टी घडून येणे आवश्यक असते. देशातील विविध भागांचे म्हणजे धर्म, वंश, भाषा, जात वगैरेंचे संपूर्ण राष्ट्रासाठी एकीकरण ही सामाजिक एकात्मता होय.

त्याचप्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेचा राष्ट्राच्या प्रादेशिक, राजकीय, आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक अशा परस्पर संबंधित विविध बाजूंशी संबंध असतो. राष्ट्रीय एकात्मतेची निर्मिती, विकास व स्थैर्य या सर्व बाजूंच्या समान विकासावर अवलंबून असते. फक्त राजकीय एकात्मता असेल पण पराकोटीची आर्थिक विषमता असेल तर ती एकात्मता ही एकांगी एकात्मता होय, एकतेची भावना ही देशाच्या कानाकोपऱ्यात दिसून आली पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मता ही मानसिक भावना असल्यामुळे ती काही यांत्रिक

पद्धतीने साध्य होणारे उत्पादन नाही. त्यासाठी देशातील सर्व स्त्री-पुरुषांच्या मनात जात पात, धर्म, वंश, भाषा यावर मात करून एकमेकांविषयी बंधुत्वाची, एकतेची व एकात्मतेची भावना सतत वास करीत राहिली पाहिजे. सर्वांच्या इच्छा आकांक्षा, यांच्यात सुसंवाद निर्माण झाला पाहिजे. असे नव्हे तर, त्याचा असा स्विकार केला पाहिजे की, ज्यामुळे राष्ट्रीय उद्दीष्टांशी त्यांचा योग्य सुसंवादी संगम होईल विविधतेतून एकता याचा अर्थ हाच होय.

ब्रिटिश पूर्वकाळ –

सुभाष बाबू ' The Indian Struggle ' या पुस्तकात लिहितात.

' Though geographilly, ethnologically and historically India presents an endless diversity to any observer, there is nonethless a fundamental unity underlying the diversity. That unity transcends the innumerable diversities of blood, colour, language, dress, manner and Sect. The ethnic diversity of India has never been a problem, for throughout her history She has been able to absorb different races and impose on them a common culture and tradition.

महात्मा गांधी आणि **सुभाषचंद्र बोस** या दोन राष्ट्रीय नेत्यांच्या मते -

" Common feeling of unity and oneness was developed among the people of Bharat even in ancient times. "

" प्राचीन भारतातही एकात्म भावनेचे व विश्वबंधुत्वाचे दर्शन घडत होते. " पुढे गांधीजी आणि सुभाषबाबू म्हणतात.

" The sense of unity of Indian people was not the by product of the unitary. British rule over them, but it was the gift of the ancient history and culture of India "

महात्मा गांधी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मते, " भारतातील एकतेची भावना ब्रिटिश राजवटीने निर्माण केलेली नसून ती प्राचीन भारतीय संस्कृतीने दिलेली देणगी होय." म्हणजेच भारतातील एकात्मतेचा उदय प्राचीन काळातच झालेला आहे. आणि तोही सम-समान संस्कृतीमुळेच होय असे म्हणता येईल. कारण प्राचीन भारतातील रोजची प्रार्थनाही भारतातील एकता प्रदर्शित करते.

गंगा च यमुना चैव (Chaiva)
गोदावरी,सरस्वती !
नर्मदा सिंधू कावेरी
जलेस्मीन सानिधीनी कुरू !!

या प्रार्थनेप्रमाणेच भारताच्या चारही दिशांना चार पवित्र मठांची स्थापना केलेली असून सर्वत्र तीर्थयात्रेसाठी प्राचीन काळापासून भारतीय लोक जात व आजही जातात. यावरूनच गांधीजी व सुभाषबाबू यांनी प्राचीन काळापासूनच भारतात एकतेचा उदय झाल्याचे निदर्शनास आणल्याचे दिसून येते.

प्राचीन काळापासून जरी एकतेचा उदय झाल्याचे सांगितले तरी हा फक्त सांस्कृतिक एकतेचा उदय झालेला दिसतो. राजकीय एकता प्राचीन काळात कधीही अस्तित्वात नव्हती. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी येथे अनेक लहान-मोठी राज्ये अस्तित्वात होती. त्यांनी एकत्र येऊन कधीही परकीय आक्रमणाचा प्रतिकार केला नाही. परकीयांनी एक राज्य खालसा केले तरी दुसरे राज्य निर्धास्त असे. एवढेच नव्हे तर आपल्या शेजाऱ्याला नामोहरम करतांना ते परकीयांना कधी कधी मदत करी. कधी कधी बलशाही राजे आपली सत्ता दूरदूरच्या प्रदेशांवर प्रस्थापित करीत असत. पण असा अंमल फार काळ टिकत नसे. खिस्तपूर्व ३०० व्या शतकात अशोकाने आपल्या राज्याचा विस्तार उत्तरेला गंगा नदीपर्यंत व दक्षिणेला काही भाग मिळून हिंदुस्थानचा जवळ जवळ दोन तृतीयांश भाग आपल्या वर्चस्वाखाली आणला. पण त्याच्या मृत्यू-नंतर ती सत्ता नष्ट झाली. पुढे सहा शतकानंतर गुप्त घराण्याने हिंदुस्थानचा बराचसा भाग आपल्या वर्चस्वाखाली आणला. पण खिस्तानंतर पाचव्या शतकात त्याची सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर हजार वर्षात अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकीर्दीत काही काळ ऐक्य टिकून राहिले, ते फक्त सोळाव्या शतकात मोगल साम्राज्याचा उदय होईपर्यंत.

सर्वाधिकारी म्हणून दाहीदिशात किर्ती असलेल्या प्रबळ राज्यांची जरी देशाच्या फार मोठ्या प्रदेशावर सत्ता असली तरी ती सत्ता अधिसत्तेखालील प्रत्येक भागावर परिणामकारकरित्या प्रस्थापित झालेली नसे. हिंदु राजांची साधारणतः आपली भरभराट करून घेण्याची कल्पना होती. मधून मधून राजा सैन्यानिशी आपल्या सत्तेखालील मुलखातील लोकांना भेटी देई. व आपल्या श्रेष्ठ अधिकाराला मान्यता मिळवी. त्या त्या ठिकाणच्या कमजोर सत्ताधाऱ्यांना

पदभ्रष्ट करून सर्व कारभार आपल्या अधिपत्याखाली आणण्याचा कधीच प्रयत्न नसे. असे असले तरी सुद्धा बलाढ्य राजसत्तेच्या अधिसत्तेखाली देशाचा काही भागच होता. अशोक कधीही दक्षिण द्विपकल्पाच्या वाटयाला गेला नाही. गुप्त राजवट तर त्यापेक्षा लहान होती. तुर्क व मोगल राजांनी आपली सत्ता दख्खन पर्यंत वाढविण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. परंतु प्रचंड क्षेत्रविस्तारामुळे त्यांनी ते प्रयत्न सोडून दिले. ब्रिटिश सत्तेचा उदय, दळण वळण व ने आण करण्याच्या साधनांमुळे सुलभ झाला. तरी त्यांचा राज्यकारभारही अव्यवस्थितच होता. कारण देशाचा अर्धा भाग दैनंदिन अधिकाराखाली होता तर दुसरा अर्धा भाग पांचशेच्या वर संस्थानिकांच्या वर्चस्वाखाली होता. आणि त्या संस्थानांचा कारभार संस्थानच्या राजघराण्याकडेच असे. सरहद्दीवरील काही भागाचा, उदा. वायव्य - सरहद्द प्रदेशाचा - टोळीवाल्यांचा प्रदेश व तिबेटाला जोडणारा विशाल भूभाग हे फार ढिलाईने व सढळ अनुदाने देऊन, राजकीय हेतूसाठी टोळी-प्रमुखांना लाचलुचपत देऊन, तर काही वेळा दडपशाहीच्या मार्गाने राज्य-कारभार केला जाई.

दळणवळणाची साधणे उत्कृष्ट असती व त्यांच्या सैन्याच्या हालचाली जलद असत्या तर कदाचित ब्रिटिशांपूर्वीच्या राज्यकर्त्यांनीसुद्धा संबंध देशावर म्हणजे कन्याकुमारीपासून तो हिमालयापर्यंतच्या जवळ जवळ १९०० मैलांच्या प्रदेशावर आणि कच्छच्या प्रदेशापासून तर आसामच्या डोंगराळ प्रदेशापर्यंत सत्ता प्रस्थापित केली असती. परंतु प्रश्न असा आहे की त्यांची सत्ता टिकावू ठरली असती का?

संपूर्ण भारत देशाला ग्रासून टाकणारी राजकीय सत्ता किंवा चळवळ झाली असा एखादा कालखंड दाखविता येणार नाही. बहुधा एका प्रदेशाचे सुवर्णयुग ते दुसऱ्या प्रदेशाचे अंधार युग असे. उदा. सतराव्या शतकात महाराष्ट्राच्या दक्षिण भागात उदयाला आलेल्या महान मराठा राजा शिवाजीचे यशोगान गोडवे गाईले तरी शेजारच्या गुजरात राज्यात शिवाजीची आठवण एक त्रास देणारा - ज्यांच्या हस्तकांनी राज्यातील सर्व संपत्ती लुटून नेली आणि लोकांना कठोर वागणूक दिली अशीच आहे. उत्तरेकडील लोकांना मौर्य आणि गुप्त राजांच्या कारकीर्दीत सत्ता कशी मिळाली याच्या आठवणी येतात, तर पूर्वेकडे बंगाल राज्यातील लोकपाल राजांचे गुणगाण गातात. ओरिसातील लोक खिस्त युगाबद्दल गुणगाण गातात. कारण खिश्चनांनी आजुबाजूचा प्रदेश

व्यापला होता, म्हणून आपल्या पूर्वजांची आठवण काढीत. तिकडे उत्तरेच्या टोकाला रणजितसिंगाने मोगल राजांच्या सत्तेखालून सोडवून निर्माण केलेल्या लहानशा राज्याव्यतिरिक्त, इतिहासाची काहीच जाण नाही. दक्षिण भागात कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू वगैरे प्रांतांवर आपल्या पूर्वजांनी राज्य केले असे आंध्र देशाभिमानी लोक मानतात.

पूर्वेइतिहासाच्या स्मृतींनी निर्माण केलेल्या अशा विभक्तपणाच्या कल्पना वाढत गेल्या. भिन्न सांस्कृतिक वारसा, आर्थिक विषमता, नाना प्रकारचे स्वभाव आणि भाषांची विविधता, याशिवाय धर्माची व वंशाची भिन्नता, यामुळे ही विभक्तपणाची दरी खोल झाली. हिंदुस्थानात कमीत कमी तीन तरी वेगवेगळे वंशीय प्रवाह आहेत. ते म्हणजे आर्य, द्रविड व इतर. ही वांशिक भिन्नता इतर अनेक धार्मिक व भाषिक कारणांनी लोकांमध्ये मानसिक भावनिक अडसर निर्माण करणारे जाळे उत्पन्न करण्याच्या प्रवृत्तीवर भर देते.

सर्वसामान्यत: असा निष्कर्ष काढता येईल की, प्रत्येक विभागातील लोक दुसऱ्या विभागातील लोकांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे मानतात आणि म्हणून दुसऱ्या विभागातील लोकांचा उघड उघड तिरस्कार करतात. उत्तरेकडील लोक आणि विशेषत: पंजाबी हे इतर प्रांतातील लोकांना अडाणी दिखाऊ वाटतात. दक्षिणेकडील लोकांची साधी राहाणी, कमीपणाचे लक्षण मानले जाते आणि चालू शतकात दक्षिणेने अनेक बुद्धिमान व्यक्ति पुरविल्या असल्या तरी त्यांचे वर्णन उत्तम कारकून व टंकलेखक म्हणूनच केले जाते.

इतकेच काय तर समान धार्मिक पौराणिक कथा प्रांता-प्रांताप्रमाणे बदलतात. जसे एका प्रांतात राक्षस समजले गेलेले दुसऱ्या प्रांतात संत व परमेश्वर गणले जातात. **रामायण** या हिंदु महाकाव्यातील मुख्य व्यक्ती जी '**राम**' ती आयोध्या नगरीच्या राजघराण्यात उत्तरेकडील गंगेच्या पठारातील मुलखात जन्मली तर राक्षसांचा राजा '**रावण**' जो रामाच्या पत्नीला पळवून नेतो, तो दक्षिणेकडचा असे मानतात. तामिळ व तेलगु भाषांतरात रावण हा अनेक दुर्गुण रहित व खूप सूज्ञ उदार मणुष्य चित्रित केलेला आढळतो. उत्तरेला असा समज आहे की हिंदु धर्म हा श्रेष्ठ अशा आर्य सुधारणेचा परिणाम आहे, तर दाक्षिणात्यांची खात्री आहे की आर्य लोक हे रानटी आहेत व श्रेष्ट आणि सुधारलेल्या द्रविड लोकांच्या समवेत ते सुधारले.

भारतात राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना फोफावलेल्या धार्मिक व प्रादेशिक

संकुचित वृत्ती, भारतीयांवर असलेला जातीयतेचा पगडा, यांच्याशी झगडून प्रस्थापित करावयाची आहे. हिंदु लोक आपणाला राजपुत ब्राह्मण मानतात. ते क्वचितच आणि साधारणतः जाणीवपूर्वक प्रयत्नानेच स्वतःला भारतीय समजतात. देशाचे विविध भाग राजकीय दृष्ट्या एका छत्राखाली आणण्यात ब्रिटिश सत्तेला यश येईपर्यंत हिंदुस्थानच्या विस्ताराबद्दलची कल्पना काहीशी अस्पष्ट व मर्यादित होती. सिंधू नदी, ज्यामुळे देशाला हिंदुस्थान हे नांव प्राप्त झाले, ही उत्तर-पश्चिम वाहाणारी नदी आता पाकिस्तानात आहे.

ब्रिटिश वसाहतींचा दर्जा प्राप्त होण्यापूर्वी **'हिंदूत्व'** हाच एकमेव एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारा घटक होता. संपूर्ण देशात हिंदुत्वाचा प्रसार झाला होता. मध्य आशियातून आलेले लोक आणि ज्यांना वारंवार होणाऱ्या हल्यामुळे दक्षिणेकडे वस्ती करावी लागली, तेही हाच धर्म पाळत असत. ख्रिस्त काळानंतर नवव्या शतकात जेव्हा शंकराचार्यांचा उदय झाला, तेव्हा त्यांनी पाखंडी वृत्तीच्या लोकांविरुद्ध मोहिम उघडली आणि दक्षिणेला कन्याकुमारीपासून ते उत्तरेला हिमालयापर्यंत हिंदुत्वाचा प्रचार केला. वृत्तीने हिंदुत्व पाळणाऱ्या व्यक्तीला, मग त्याची जात कोणतीही असो व तो कोणत्याही प्रदेशाचा रहिवाशी असो, त्याला आपल्या उर्वरीत आयुष्यात उत्तर प्रदेशातील **वाराणशी व हरद्वार**, आसामातील **कामरुप**, दक्षिणेला कन्याकुमारी, व 'रामेश्वरम' आणि गुजरातमधील द्वारका, वगैरे तीर्थयात्रा कराव्या लागत. त्याच्या मनात या देवतांची स्थाने या देशाच्या सीमाच उभ्या करतात. हिंदुत्वाच्या सीमा मर्यादित असल्यामुळे हिंदुस्थानात ऐक्य व एकात्मतेची भावना निर्माण झाली.

ब्रिटिशांची राजवट –

एकोणिसाव्या शतकात भारतीय राष्ट्रीयत्वाला पक्के स्वरुप प्राप्त झाले. ते खूप बळकट झाले. याचे कारण ब्रिटिश सत्ता हे होय, असे समजण्यात येते. ब्रिटिशांनी एक राजकीय परिमाण व समान राज्यशासन निर्माण केले. परंतु त्यामुळे हिंदी राष्ट्रवादाचा विकास झाला असल्याचा दावा करण्यात येतो. तो काहीसा अतिरिक्त वाटतो. इ. स. १८८९ मध्ये ब्रिटिश सत्तेखाली ब्रह्मदेश जरी आला, तेव्हापासून तो राजकीयदृष्टया हिंदुस्थानचा भाग म्हणून सरकारच्या अधिपत्याखाली होता आणि समान राज्ययंत्रणा होती, तरीही ब्रह्मदेश हा

हिंदुस्थानचा भाग आहे असे फारच थोड्या जनतेला वाटत होते. म्हणूनच ब्रिटिश पार्लमेन्टने १९३५ साली ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून विभक्त केला. तेव्हा कोणीही तक्रार केली नाही. यावरून ब्रिटिश समान शासन असले तरी हिंदुस्थानचा म्हणून भौगोलिक भाग निराळा आहे अशी कल्पना होती.

राष्ट्रीयत्वाचा उदय

राष्ट्रीयत्वाची भावना आधुनिक काळात निर्माण झाली असे आपण मानतो. ही कशी निर्माण झाली? पूर्वी भारतात अनेक छोटी-छोटी राज्ये होती. त्यांचा आपापसातील संघर्षाचा ब्रिटिशांनी फायदा घेऊन भारताच्या बऱ्याचशा भूभागावर आपली सत्ता प्रस्थापित केली. दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणा-वर आणली. सर्वत्र एकनाणेपद्धती सुरू केली. व्यापारातील अंतर्गत निर्बंध दूर केले. तेव्हा समान शासनपद्धती, समान गाऱ्हाणी आणि समान गरजा यातून आपण सर्व एका राष्ट्राचे नागरिक आहोत ही कल्पना इ. स. १८७० च्या सुमारास उदयास आली. तिच्यातूनच पुढे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.

सावरकर म्हणतात त्यानुसार १८५७ च्या उठावामुळे राज्यकर्ता, निष्ठा आणि देशप्रेम यातील फरक जनतेस समजला. भारत आपली मातृभूमी आहे अशी लोकांची भावना झाली. या काळात निर्माण झालेली राष्ट्रीय भावना पुढील स्वातंत्र्य चळवळीस दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरली आणि राष्ट्रीयत्वाचे नवीन रोपटे लावले गेले.

ब्रिटिशपूर्वकाळातील भारतातील राज्ये ही कार्यदक्ष यंत्रणांनी युक्त नव्हती. परंतु इंग्रज राजवटीत मात्र पूर्णपणे बदल होऊन एक केन्द्रवर्ती शक्तीमान अशी प्रशासनयंत्रणा निर्माण होऊन त्यात देशातील सर्व प्रदेश व खेडीसुद्धा गोवली गेली. खेड्यातील सरकारी प्रतिनिधी हा त्या यंत्रणेतील एक चाक बनला व मोठ्या चाकाबरोबर फिरणे त्याला भाग पडले. त्याची पूर्वीची स्वयंगती खच्ची झाली. त्यामुळे पूर्वीची स्वयंपूर्ण सामाजिक व राजकीय व्यवस्था मोडली आणि त्याऐवजी परकीय सत्तेचे राज्य चालू झाले. पूर्वपरंपरागत चालत आलेल्या जनतेच्या वृत्तीमुळे या परकीय सत्तेचे कायदे, निर्बंध, नियम वगैरेंना साहजिकच तीव्र विरोध झाला. स्थानिक संस्थाने खालसा करून इंग्रजांनी ते आपल्या साम्राज्यात बिलीन केली. परिणामी स्थानिक संस्थानिक चिडले व त्यांनी इ. स. १८५७ च्या इंग्रजाविरुद्ध झालेल्या उठावात भाग घेतला. परंतु हा उठाव इंग्रजांनी

यशस्वीरित्या दडपून टाकला. कारण उठाव फारसा संघटित स्वरूपाचा नव्हता. या उद्रेकामागील धूसर पण विस्तृत क्षेत्रावर पसरलेली सुप्त विरोधाची व वैयक्तिक पातळीवरची अन्यायाची भावना राष्ट्रीय चळवळीचा उगम व विकासाबरोबर अधिक प्रकट होऊ लागली.

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना - (२८ डिसेंबर १८८५)

इ. स. १८५७ च्या उठावानंतर इंग्रज सरकारने हिंदी जनतेला शांत करून पुन्हा उद्रेक होऊ न देण्यासाठी राणीचा जाहिरनामा आणि १८५८ चा कायदा पास करून हिंदी लोकांसाठी काही सवलती जाहिर केल्या. त्यात नोकरी देतांना वंशभेद मानला जाणार नाही, कंपनी सरकारने संस्थानिकांशी जे करार केले असतील ते पुढेही पाळले जातील, ख्रिश्चन धर्माची सक्ती केली जाणार नाही, धर्मासाठी कुणावरही कृपा अगर अन्याय होणार नाही. परंतु जाहिरनामा व कायद्यात दिलेली आश्वासने ब्रिटिशांनी पाळली नाहीत. त्यामुळे हिंदी जनतेत सरकारविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण झाला. तेव्हा मात्र सरकारविरुद्ध संपूर्ण देशात तणावपूर्ण वातावरण निर्माण होत होते. जनता व सरकार यांच्यातील समन्वय साधण्यासाठी आतापर्यंत एकही संघटना अस्तित्वात नव्हती. ही उणीव राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेने भरून काढली. काँग्रेसची स्थापना सर ॲलन ह्यूम व सर विल्यम वेडरबर्न यांच्या प्रेरणेने परंतु ब्रिटिशांची राजवट दीर्घकाळ टिकावी यासाठी काही अडथळे येऊ नये म्हणून स्वार्थी हेतूने करण्यात आली. परंतु या काँग्रेसमुळे ब्रिटिश सरकार दीर्घकाळ टिकण्याऐवजी त्याविरुद्ध आवाज उठविण्यास प्रारंभ झाला. सरकारविरुद्ध जनजागृतीचे महान कार्य काँग्रेसने केले आणि त्यातूनच राष्ट्रीयत्वाची भावना उदयास आली.

काँग्रेसचा महत्वाचा उद्देश म्हणजे संपूर्ण देशातील जनतेत जागृती निर्माण करून सरकारविरुद्ध एका झेंड्याखाली सर्वांना एकत्र आणणे हा होता. काँग्रेसचे पहिले अध्यक्ष उमेशचंद्र बॅनर्जी हे ख्रिस्ती, दुसरे अध्यक्ष दादाभाई नौरोजी हे पारशी, तिसरे अध्यक्ष बद्रुद्दीन तयबजी हे मुसलमान होते. त्यांच्याबरोबर काँग्रेसच्या कार्यात भाग घेणारे लोक प्रारंभी संख्येने फार थोडे होते. परंतु काँग्रेसच्या कार्यामुळेच भारतीय जनतेत जागृती निर्माण झाली, एकतेच्या भावनेचा उदय झाला. काँग्रेसच्या प्रयत्नांनीच सर्व जाती, धर्म, वंशाचे लोक

पुढे स्वातंत्र्याच्या समान ध्येयपूर्तीसाठी एकत्र आले आणि त्यांच्यात राष्ट्रीयत्वाच्या भावनेची वाढ झाली.

कर्झनची जुलमी राजवट

इ. स. १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन हिंदुस्थानात व्हाईसरॉय म्हणून आला. त्याने सत्तेचे केन्द्रीकरण करून पूर्वी सरकारने जनतेला दिलेल्या हक्कांवर निर्बंध लादले. बंगालची फाळणी केली. कर्झन साम्राज्यपिपासु व हुकूमशाही प्रवृत्तीचा असल्यामुळे हिंदी जनतेची त्याने सर्व बाजूंनी गळचेपी केली. त्यामुळे ब्रिटिश राजवट भारतात अतिशय अप्रिय होऊ लागली. ब्रिटिशांच्या विरुद्ध हिंदी जनतेत मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला. कर्झनप्रमाणेच लॉर्ड लिटनचीही राजवट ही दडपशाहीची व जुलमीच होती. त्यांच्या या हुकूमशाही प्रवृत्तीमुळे हिंदी जनतेत उदय पावलेल्या एकात्मतेच्या भावनेत तीव्र वाढ होऊन संपूर्ण हिंदी जनता ब्रिटिशांच्याविरुद्ध संघर्षात उतरली, ती राष्ट्रीय काँग्रेसच्या मार्गदर्शनाखालीच होय. ब्रिटिशांविरुद्ध हिंदी लोकात निर्माण झालेली भावना म्हणजेच भारतीयांची एकता होय. या एकतेची पाळेमुळे काँग्रेसच्या कार्यामुळे खोलवर रूजू लागली.

इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव

ब्रिटिश राजवटीबरोबरच भारताचा पाश्चिमात्य जगाशी संबंध आला. आणि पश्चिम युरोपात उगम पावलेले आधुनिक विचारप्रवाह भारतात शिरू लागले. इंग्रजांनी भारतात इंग्रजी भाषेतून शिक्षण देण्यास प्रारंभ केला तो फक्त प्रशासनात त्यांना खालच्या थरातील नोकरांची आवश्यकता होती म्हणून. परंतु त्यातून काही भारतीय उच्च शिक्षणही घेऊ लागले. तेव्हा भारतीयांनी उच्च शिक्षण घेतले तर ते आपल्या सत्तेला त्रासदायक ठरेल असे ब्रिटिशांना वाटू लागल्यामुळे त्यांनी भारतीयांच्या उच्च शिक्षणाला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. पण त्यात ब्रिटिशांना यश आले नाही. कारण बरेच हिंदी तरुण उच्च शिक्षण घेऊ लागले होते. नवीन ज्ञान संपादन केल्यामुळे या आधुनिक ज्ञानाचा उपयोग ब्रिटिश सत्तेच्या साम्राज्यवादी धोरणावर टिका करण्यासाठी करू लागले. त्यामुळेच भारतीयांनी शिक्षण घेऊ नये म्हणून सरकार अडथळे निर्माण करू लागले.

नव्या शिक्षण पद्धतीमुळे भारतात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली.

नव्या इंग्रजी शिक्षणामुळे सुशिक्षितांना भौतिक व सामाजिक शास्त्रावरचे व इतर मानवी विषयांसंबंधीचे वाङमय उपलब्ध झाले. ते वाचून सामाजिक चिकित्सा करण्याची दृष्टी सुशिक्षितांना आली. परिणामी एकता बळकट होण्यास मदत झाली.

इंग्रज राजवटीत झालेल्या शिक्षण प्रसारामुळेच भारतीयांच्या बौद्धिक जीवनात क्रांती सुरू झाली. लोकशाही जनतेचे सार्वभौमत्व, बुद्धिवाद, मानवतावाद, इत्यादी कल्पनांचा भारतीयांच्या मनावर पगडा बसला. या शिक्षणामुळेच ब्रिटिश साम्राज्यवादाचे खरे स्वरूप समजून घेण्याची भारतीयांना संधी मिळाली. त्यातूनच ब्रिटिश साम्राज्याला विरोध करण्याच्या भावनेतून एकात्मतेचा उदय झाला. आणि या राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेतूनच निरनिराळ्या धर्माचे, वंशाचे, जातीचे सुशिक्षित लोक प्रारंभी एकत्रित आले. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी व प्रगतीसाठी आपण आपले संकुचित विचार बाजूला सारले पाहिजेत, हे त्यांनी ओळखले. म्हणूनच जातीधर्मनिरपेक्ष राष्ट्रीयत्वाची कल्पना आपण इ. स. १९८५ पासून स्विकारलेली आहे.

भारतात राष्ट्रीय एकात्मतेची उभारणी करण्यात सर्वात महत्वाची व विधायक कामगिरी बुद्धिवादी वर्गाने बजावली. आधुनिक राजकीय व औद्योगिक क्रांती प्रथम इंग्लंडमध्ये झाली. म्हणून नव्या विचारांचा उगमही तेथेच झाला. लॉर्ड बेंटिकने राजाराम मोहन रॉय यांच्या मदतीने भारतात इंग्रजी शाळा काढून हिंदी लोकांना इंग्रजी भाषेद्वारे शिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू केली. परंतु त्यामुळे आधुनिक विचारांचे लोण सामान्य माणसापर्यंत येऊन पोहोचले. ' इंग्रजी भाषा हे वाघिणीचे दुध आहे. ' असे विष्णू शास्त्रींनी म्हटले आहे. कारण इंग्रजी भाषेत जे विचारप्रवर्तक साहित्य आहे, जो स्फूर्तिदायक इतिहास आहे, इंग्रजांमध्ये स्वातंत्र्याची जी दुर्दम्य अशी लालसा आहे, त्यामुळे हे वाङमय वाचणाऱ्या माणसाच्या मनात स्वातंत्र्यप्रीती व देशाभिमान संचारेल असे विष्णू शास्त्री चिपळूणकरांचे म्हणणे होते.

इंग्रज भारतात असल्यामुळे भारताच्या आधुनिकीकरणास प्रारंभ झाला. या स्थित्यंतराला दोन गोष्टी कारणीभूत झाल्या.

१) ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा धर्मप्रसार

२) इंग्रजी शाळातून मिळणारे विज्ञानाचे शिक्षण.

यापैकी आपल्या नवशिक्षितांवर विज्ञानापेक्षा ख्रिस्ती धर्माचाच प्रभाव अधिक पडला. **राजाराम मोहन रॉय** पासून ते गांधी विनोबापर्यंत आपले सर्व

लोकप्रिय राष्ट्रीय नेते अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. आगरकरांसारखाच एखादा अपवाद आढळतो. महात्मा फुले व डॉ. आंबेडकरही धार्मिकच होते. हे नेते जर धार्मिक नसते तर कदाचित त्यांना येथील जनतेच्या मताची पकड घेता आली नसती, हे देखील खरे आहे. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या पुण्याईवरच आपले वैचारिक जीवन उभे आहे. पण आपल्याला पुढे जायचे असेल तर त्या नेत्यांच्या मर्यादाही आपण समजावून घेतल्या पाहिजेत. वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून इतिहासाचे विश्लेषण केले पाहिजे. केवळ अंधश्रद्धेला आपण बळी पडतो तर इतिहासापासून आपण काहीच बोध घेऊ शकणार नाही. १९ व्या शतकात ख्रिस्ती धर्माचा येथील सुशिक्षितांवर खूपच परिणाम झाला. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या प्रचाराला आपले लोक बळी पडू नयेत अशी इच्छा असेल तर आपल्या धर्मात सुधारणा घडवून आणण्याखेरीज गत्यंतर नाही, याबद्दल येथील सुशिक्षितांची खात्री पटली. त्यातूनच ब्राम्होसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज अशा अनेक मंडळ्या स्थापन झाल्या. विवेकानंदांनी अमेरिकेत हिंदु धर्माची ध्वजा फडकावून संघटीतरित्या कार्य करण्यास जेव्हा सुरवात केली, तेव्हा त्यांच्यासमोर ख्रिस्ती मिशनचा आदर्श होता. ख्रिस्ती लोक धर्मप्रसाराच्या हेतूने प्रथम ग्रामीण भागात गेले. गोरगरीब, दीन दुबळे, रोगी यांची त्यांनी सेवा केली. तर यावेळी हिंदु धर्मातील उच्चवर्णीय मात्र खालच्या थरातील लोकांचा विटाळ मानीत असत. ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व त्यांच्या कार्यकर्त्यांतील नैतिकतेचा आपल्याकडील सुशिक्षितांवर फार मोठा प्रभाव पडला आणि त्यांना समाजसेवेची प्रेरणा मिळाली. परिणामी समाजसेवक समाजाला इंग्रजांविरूद्ध एकत्र करण्यात यशस्वी झाले. त्यांच्यात एकताही निर्माण झाली.

पारतंत्र्याच्या काळात आपल्या देशापुढे एक मोठा पेच होता. एका बाजूला इंग्रजांशी संघर्ष तर दुसरीकडे आपल्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या समाज व्यवस्थेतील नवी नवी मूल्ये आपल्याला आत्मसात करावयाची होती. म्हणजे एकीकडे त्यांना विरोध करायचा होता तर दुसरीकडे त्यांचे अनुकरण करायचे असा तो भावनात्मक पेच होता. भारतीय सुधारकांनी इंग्रजांच्या अनुकरणावरच भर दिला होता. त्यामुळेच राज्यकर्त्यांना हिरीरीने विरोध करणे त्यांना जमले नाही. साहजिकच त्यांच्यात राष्ट्राभिमान नाही अशी त्यांची हेटाळणी करण्यात आली. उलट इंग्रजांशी लढणे हेच ज्यांचे उद्दीष्ट होते, ते लोकांमध्ये प्रतिकारशक्ती आणण्यासाठी धडपडत होते. इंग्रजांच्या अनुकरणावर

भर दिल्यास लोकांच्या स्वाभिमानाला धक्का बसेल अशी त्यांना भीती वाटत होती. म्हणून आपला इतिहास, संस्कृती, धर्म, भाषा यांचे गोडवे गायला त्यांनी सुरुवात केली. त्यांतूनच पुनरूज्जीवनवादी प्रवृत्ती निर्माण झाली.

इ. स. १९०६ मध्ये मोर्ले-मिंटो सुधारणांना आकार येत असतांनाच मुस्लीम लीगची स्थापना झाली. या सुधारणा कायद्याने मुस्लीमांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले. १९१९ मध्ये मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा आला तेव्हा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला सुरवात झाली. गोलमेज परिषदेनंतर अस्पृश्य चळवळीला उठाव मिळाला तसेच ब्रिटिशांनी मुस्लीमांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन हिंदुंपासून त्यांना अलग करून आपले साम्राज्य दीर्घकाळ टिकविण्याचा डाव टाकला, पण तो फोल ठरला. उलट सरकारविरूद्ध जनतेत कटुतेची भावना निर्माण होऊन त्यातून सर्वत्र एकतेची भावना निर्माण झाली. सर्वांचा समान शत्रू म्हणजे ब्रिटिश सरकार, असे लोक मानू लागले.

ब्रिटिशांच्या एकछत्री अंमलाखाली फुटीरपणा सहन केला जात होता. इतकेच काय पण तो काळजीपूर्वक जोपासला जात होता. हिंदु-मुस्लीम यांच्यातील भेद बुद्धिपूर्वक वाढवून त्यांचा स्वार्थासाठी उपयोग केला जात होता. उदा. १९३२ च्या जातीय निवाड्याने निरनिराळ्या जमातींना विशिष्ट हक्क, संरक्षण, कायदेशीर प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे अस्पृष्य किंवा इतर अल्पसंख्यांक यांच्या मनात अशी भावना आली की, ते बहुसंख्यांकापासून वेगळे होते. एवढेच काय पण ते त्या गोष्टीला बळी पडणार होते. आणि म्हणून संरक्षणाची जरूरी होती. जेथे धार्मिक मतभेद अनुवंशीक नव्हते किंवा ते अत्यंत सौम्य प्रकारचे होते, ते दक्षतेने निर्माण केले जात होते. उदा. शीख लोक, पूर्वी सुधारक हिंदुतील लढाऊ जात म्हणून समजली जाई. त्यांना मुलकी व लष्करी सेवेत विशेष सवलती देऊन आणि इतर समान हक्क देऊन, तो एक स्वतंत्र समाज आहे, अशी कल्पना शीखांच्या मनात भरवून दिली. तसेच उत्तर-पश्चिम, उत्तर-पूर्व व मध्यहिंदुस्थानातील टोळीवाले यांनाही देशाच्या इतर भागापासून अलग करून, त्यांना त्यांच्या प्राचीन चालीरिती-प्रमाणे जीवन व्यतीत करण्यास प्रोत्साहन दिले. हिंदुंमध्ये अगोदरच जिथे अनेकांगी गुंतागुंतीचे मोठ्या प्रमाणावर निरनिराळे वर्ग होते. परंतु तेथे ब्रिटिशांनी आणखी विघ्ने निर्माण करून ‘ विशिष्ट जात ’ या नावाचा एक निराळाच वर्ग निर्माण केला. या वर्गामध्ये सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या जमातीचा समावेश

करण्यात आला. त्यामुळे इतर हिंदु समाजापासून दुर राहून स्वतःला तिने एक विशिष्ट स्थान प्राप्त करून घेतले होते. शस्त्रधारी सैनिकांची 'लढाऊ' आणि 'बिन लढाऊ' अशी विभागणी करून त्यांची निरनिराळी पथके ही धार्मिक, प्रादेशिक व जातीय तत्वावर आधारलेली होती आणि त्यांना समाजापासून दूर राहून दिवस कंठावे लागे.

समान शासन निर्माण केल्याचे इंग्रजांना जे श्रेय देण्यात येते ते समान शासनही उथळच होते. ब्रिटिशांचा राजप्रतिनिधी हा भारतीयांवर अनियंत्रित सत्ता गाजवित असे. परंतु त्याची सत्ता ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानिकांची राज्ये यात विभागली होती. राजकीय प्रगतीच्या दृष्टीने दोन्ही विभाग एकमेकांपासून खूप दूर होते. ब्रिटिश हिंदुस्थानात राजकीय जागृती मोठया प्रमाणात घडून आली होती. तर सत्ता सोडून जाणाऱ्या ब्रिटिशांकडून अधिकारसुत्रे घेण्यास लायक कायदेपंडित, प्रशासक व पुढारी तयार होते. तर जवळ जवळ हिंदुस्थानचा एक तृतियांश भाग संस्थानिकांच्या अमलाखालील प्रजेवर अनियंत्रित व मध्ययुगीन नियमांनी सत्ता गाजवित होता. हिंदुस्थानात एखादा कायदा पास झाला तर संस्थानिकांच्या कारभारात तो राज्यकर्त्यांच्या वैयक्तिक आवडी निवडीशी मिळता-जुळता नसेल तर तो मान्यता पावेलच असे नव्हते. ही संस्थानेही विभिन्न आकाराची होती. देशाची विभागणी सुद्धा निरनिराळया प्रांतात राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने केलेली होती. कित्येक वेळा ती विभागणी विसंगत, प्रादेशिक, सांस्कृतिक व भाषिक तत्वांचे विच्छेदन करणारी होती.

हिंदुस्थान हा संस्थानिकांचा भाषिक व रानटी टोळयावाल्यांचा, भिन्न भिन्न धर्मांच्या लोकांचा एकत्रित केलेला प्रदेश नसून ते एक राष्ट्र आहे ही कल्पना बळकट करण्यासाठी ब्रिटिशांची मदत ही काय बुद्धीपुरस्कर नव्हती. लॉर्ड मेकॉलेच्या कल्पनेप्रमाणे" बळजबरीने लादलेल्या इंग्रजी भाषेच्या शिक्षणाने फक्त कारकुनांची निपज झाली असे नसून पाश्चात्य विचारांची योग्यता जाणणारा व युरोपातील राष्ट्रीय भावनेच्या उदयाने उत्तेजित झालेला निवडक वर्गही निर्माण झाला. इंग्रज सैन्य जरी थोडे होते, १९३९ मध्येसुद्धा २ लाखापेक्षा कमी होते, तरी विस्तारीत रेल्वे मार्गाच्या जाळयामुळे त्याला हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशावर ताबा ठेवता येत होता. इतकेच नव्हे तर सर्वसाधारण हिंदु नागरिक ज्या संकुचित वृत्तीच्या वर्तुळात वावरत होता, त्याचाही छेद केला. या सर्वांमुळे हिंदुस्थानावरील ब्रिटिशांच्या सत्तेमुळेच सर्व जाती-जमाती आपले वंशभेद

विसरून एकोप्याने व एकदिलाने स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

हिंदु जनतेत अपूर्व ऐक्य व राष्ट्रीय भावना निर्माण होण्याचे मूळ निःसंशय स्वातंत्र्य मिळविण्याची इच्छा हेच होते, हे तर खरेच; पण त्याबरोबर गेल्या शंभर वर्षातील इतर घडामोडींचाही त्याला आधार होता. १९ व्या शतकाच्या शेवटी हिंदुस्थानात निरनिराळ्या भाषेतील जवळ जवळ तीनशेपर्यंत वर्तमानपत्रे होती. त्यामुळे पुरातन मानसिक विचारांच्या देवाण-घेवाणीच्या मर्यादा नष्ट करण्यास मदत झाली. मध्यमवर्गीय सुशिक्षित लोकांच्या उदयातून देशाला आवश्यक असणारे पुढारी निर्माण झाले. आधुनिकतेच्या प्रसारामुळे विशिष्ट उद्योगधंद्यांना एकत्रित हिंदुस्थानात आकर्षक बाजारपेठ सापडली. अहमदाबाद व मुंबई येथील कापडगिरणी मालकांनी स्वातंत्र्य चळवळीला उदारपणे आर्थिक मदत केली. यावेळी ब्रिटिश कापडावरील बहिष्कार हे गांधींचे ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळविण्याचे एक महत्वाचे शस्त्र होते.

महात्मा गांधींच्या अगोदर काँग्रेसचे नेते लोकमान्य टिळक, बिपीनचंद्रपाल व लाला लजपतराय यांनी राष्ट्रीय काँग्रेसला जहाल स्वरूप देऊन राष्ट्रीय चळवळीला धार आणली. लोकमान्य टिळकांनी यावेळी आकर्षक असा चतुः-सुत्रीचा कार्यक्रम हिंदी जनतेपुढे ठेवला. त्यात १) स्वदेशी २) बहिष्कार ३) राष्ट्रीय शिक्षण ४) संपूर्ण स्वराज्य, यांचा समावेश होता. टिळकांनंतरच्या नेत्यांनीही त्याच चतुःसुत्रीच्या कार्यक्रमाचा स्वातंत्र्य चळवळीसाठी उपयोग करून घेतला. परिणामी स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश सरकारला एकमुखी विरोध करण्यासाठी पुढे गांधीजींच्या नेतृत्वावर संपूर्ण देशाने शिक्कामोर्तब केले. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रह, हरताळ या तत्वज्ञानावर लोकांनी विश्वास ठेवला व याच मार्गांनी ब्रिटिशांना संघटितरित्या विरोध होऊ लागला. ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी गांधीजींच्या नेतृत्वाखाली सर्व भारतीय जनता एक झाली. त्यात सर्व जाती-धर्मांचे लोक होते. म्हणजेच स्वातंत्र्य मिळविण्याच्या हेतुमुळेच भारतीयांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचा उदय झाला.

१५ ऑगष्ट १९४७ ला स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपण उभे राहिलो. त्यावेळी खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मता सिद्ध झाली होती काय? भारतात जी राष्ट्रीय एकात्मतेची भावना काही प्रमाणात संघटित झाल्याचे आपणास दिसून येते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील स्वातंत्र्य चळवळ होय. स्वातंत्र्य चळवळीमुळे आपण एकत्र आलो आणि या चळवळीमुळे जी काही प्रतिके आपण

उभी केली, त्या प्रतिकांच्या बाबतीत आपल्या मनामध्ये एक प्रकारची राष्ट्रीय अस्मिता निर्माण झाली. हीच भारताची राष्ट्रीय एकात्मता होय.

परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनासंबंधीची जाणीव किंवा आठवण ही जसजशी अंधुक होत चालली आहे, तसतसा पूर्वी उभ्या केलेल्या प्रतिकांचा जो प्रभाव आपल्या मनावर आहे, तो प्रभाव कमी कमी होत आहे. परिणामी राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेलाच पर्यायाने तडे जाऊ लागले आहेत. म्हणूनच एकात्मतावाढीसाठी भारताच्या प्रत्येक नागरिकाने प्रयत्न केले पाहिजेत, मग तो कोणत्याही जातीचा, धर्मांचा व वंशाचा असो.

भारताची फाळणी झाली. भारत हे एक नवीन राष्ट्र झाले. देशाचे प्रत्यक्ष विभाजन होताना अनेक भागात भयंकर स्वरूपाच्या जातीय दंगली होत होत्या. कलकत्त्यात पाच हजार लोकांची कत्तल झाली होती. पोलीसही दंगली आटोक्यात आणू शकत नव्हते. दोन्ही जमातींनी दंगली थांबवाव्यात अशी विनंती करण्यासाठी महात्मा गांधी कलकत्त्याला गेले. ज्या स्वातंत्र्यासाठी गांधीजींनी १९२० सालापासून चळवळ केली होती, ते महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्याच्या पहाटेच्या वेळी नवी दिल्ली येथे नव्हते. फाळणीच्या दुःखद काळातही गांधीजींनी आपले प्रयत्न सोडले नाहीत. भारतीय लोकांमध्ये ऐक्य नांदावे आणि त्यांनी शहाणे व्हावे म्हणून त्यांनी दिल्लीतील दंगलग्रस्त भागातही पदयात्रा काढल्या. अशा या रक्तरंजित जातीय दंगलीच्या ऐन धुमश्चक्रीत भारताने 'धर्मनिरपेक्षता' हा आपला राष्ट्रीयत्वाचा पाया म्हणून घटनेद्वारे स्विकारला, ही काय छोटी बाब नव्हे. गांधीजींच्या या कामगिरीची आठवण आज आपण ठेवणे आवश्यक आहे, की ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागेल.

राष्ट्रीय एकात्मतेची निकड –

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीयत्वाची भावना कमी कमी होत चालली आहे. संकुचित ध्येय समोर ठेवल्यामुळे देशात बेअदली निर्माण होऊ पहात आहे. महात्मा गांधींच्या खूनापासून ते पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या खूनापर्यंत विघटनवादी शक्तींनी भारतातील एकात्मताच धोक्यात आणणारा लांछणास्पद मार्ग अवलंबिला आहे. स्वातंत्र्य मिळून ४० वर्षे झाली तरी अद्याप आपण दारिद्र्यावर मात करू शकलो नाही. आपणास एकीकडे आपली विविधता मर्यादित ठेवून संकुचित विचारांना थारा न देता देशाचा सर्वांगीण विकास

मनुष्य-भावना सदैव सुखदु:ख निश्रित असतात. अशा या भावनांच्या वेळी जे आपल्याविषयी स्नेह प्रगट करतात ते आपणास मित्र किंवा आप्त वाटतात. दुसऱ्याच्या सुखदु:खाशी समरस झाले की जिव्हाळा निर्माण होतो. तो जिव्हाळाच एकात्मतेला अत्यंत आवश्यक आहे, पोषक आहे.

प्रकरण ४ थे

भारतीय क्रांतिकारक आणि राष्ट्रीय एकात्मता

"भारतवासी हा माझा प्राण आहे, भारतीय समाज हा माझा लहानपणाचा पाळणा आहे. तरूणपणची फुलबाग आहे आणि वार्धक्याची काशी आहे, बंधो म्हण की, 'भारताची माती माझा सर्वश्रेष्ठ स्वर्ग आहे. भारताचे कल्याण हेच माझे कल्याण आहे."

स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंदानी दिलेला वरील संदेश अतिशय मोलाचा असून त्यांच्यानंतर भारतातील क्रांतिकारकांनी तो आत्मसात करूनच ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढा दिला. भारतातील क्रांतिकारकांची परंपरा १९ व्या शतकाच्या अखेरपासून सुरू झाली. वासुदेव बळवंत फडके यांच्यापासून साधारणपणे ही परंपरा सुरू होते. अगदी शेवटचा क्रांतिकारक उठाव म्हणजे इ. स. १९४६ मध्ये झालेला नाविकांचा उठाव होय. साम्राज्यशाहीस विरोध, क्रांतिकारक कडवी व त्यागी वृत्ती आणि समाजवाद ही क्रांतिकारकांची वैशिष्ट्ये होती. भगतसिंगाचे एक सहकारी **श्री. विजयकुमार सिन्हा** म्हणतात "एक अत्यंत औचित्यपूर्ण प्रश्न उपस्थित होतो की, हे क्रांतिकारकांचे गट निर्माण झाले त्यामागे कोणत्या शक्ती होत्या? तर त्यांचा त्याग आणि धैर्य अतुलनिय होते. त्यांनी अनेक धोक्याची पावले टाकली तेव्हा मृत्यूची पर्वा केली नाही. त्यांच्या उदात्त भूमिकेचा उगम त्यांनी वाचलेल्या कल्पना व त्यांनी महान स्त्रीपुरुषांच्या त्यागी जीवनापासून घेतलेली प्रेरणा व स्फूर्ती यात होता".

क्रांतिकारकांच्या त्यागी वृत्तीमुळेच हिंदुस्थानातील जनता खडबडून जागी झाली आणि एकत्र येऊन ब्रिटिश साम्राज्य घालवून देण्यास सज्ज झाली. क्रांतिकारकांच्या कार्यामुळे भारतीय लोकांमध्ये आपण सर्व एक आहोत अशी भावना निर्माण झाली. त्यांच्या प्रेरणेने भारतीय लोक इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी

रस्त्यावर आले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला यामुळेच तीव्र धार आली. याचा परिपाक म्हणजे भारतीय लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊन मूळ धरू लागली. परंतु पुढे स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळी पुन्हा राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला तो हिंदुस्थानच्या फाळणीने व त्यापुढे भारत निर्मिती नंतर भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेवर संकट आले ते भारतातील संस्थानिकांच्या भूमिके-मुळे होय.

एकोणिसाव्या शतकातला हिंदुस्थान म्हणजे एक विशाल माळरान. वैविध्यपूर्ण, सुजल सुफल, बेसावध आणि निद्रिस्त. स्वतःच्या शक्तीचा विश्वास गमावून बसलेला. जगभर चाचेगिरी करणाऱ्या गोऱ्या व्यापाऱ्यांनी साम्राज्यवादी सत्तेच्या राहुट्या या माळरानावर उभारल्या. काही काळ गेल्यानंतर गोऱ्या लोकांचा अन्याय, जुलूम सहन होईना म्हणून त्यांना हिंदुस्थानातून घालवून देण्यासाठी **इ. स. १८५७** मध्ये गोऱ्या सरकारविरुद्ध पहिला उठाव झाला. त्यात मंगल पांडे, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब, मोगल बादशहा इ. नी स्वतःला झोकून दिले. पण हा उठाव दडपला गेला. परंतु भारतीय लोकांमध्ये या उठावामुळे जी एकराष्ट्रीयत्वाची (एकात्मतेची) भावना निर्माण झाली होती, ती मात्र तीव्र होत जाऊन सरकारविरुद्ध भारतीय लोक संघटित होऊ लागले, आणि सरकारला दहशत बसविण्यासाठी काही क्रांतिकारी विचारांनी भारावलेले देशभक्त पुढे आले. त्यांनी सरकारला सळोकीपळो करून सोडले. अशा क्रांतिकारकांची माहिती सर्वसामान्य माणसाला होणे आज आवश्यक आहे. या क्रांतिकारकांचा आढावा या प्रकरणात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१) वासुदेव बळवंत फडके –

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात हिंदी सामर्थ्य पराभूत झाले. अग्नी शांत झाला तरी वरवर दिसणाऱ्या राखेखाली निखारे धगधगत होते. त्याच निखाऱ्यांनी वासुदेव बळवंत फडक्यांच्या अंतःकरणात सशस्त्र क्रांतीचा पोत पाजळला. अशा वासुदेव फडकेंचा जन्म रायगड (कुलाबा) जिल्ह्यात शिरढोण येथे ४ नोव्हें. १८४५ ला झाला. शिक्षण घेतल्यानंतर मिलिटरी फायनान्स ऑफिसातील इंग्रज अधिकारीही त्याच्या इंग्रजीवर खूष असत. शिक्षण संपल्या-नंतर सुरवातीला वासुदेव फडके मुंबईस नोकरीला लागले. त्यानंतर पुणे येथे पलटणीच्या हिशोब खात्यात कारकून म्हणून त्यांची बदली झाली. भारतभर

ब्रिटिश सत्तेच्या आधारस्तंभ बनलेल्या 'कारकुनांच्या फौजेतला वासुदेव हा एक काळा शिपाई. त्याच्या मनात सुरवातीपासूनच इंग्रजी राजवटीबद्दल तिटकारा होता. शस्त्रबलाने इंग्रजी सत्ता उलथून टाकण्याचे विचार त्यांच्या मनात घोळत होते. त्यासाठी त्यांनी शस्त्रे चालविण्याचे ज्ञान मिळविण्याचे ठरविले. त्यावेळी पुण्यात लहुजीबुवा या वस्तादाचा आखाडा प्रसिद्ध होता. त्यांनी या आखाड्यात लष्करी शिक्षण घेऊन, हत्यारे जमवून तरुणांनाही त्यांनी ते शिक्षण दिले. इंग्रजांशी सशस्त्र लढा देण्यासाठी ते अनुयायी तयार करू लागले. तथापि शिकलेल्या लोकांत इंग्रजाविरुद्ध लढाई करण्याची हिंमत नाही हे त्यांना दिसून आले.

रक्त तापू लागले –

महिन्याला २०-२५ रुपये पगाराची नोकरी करीत असतांना वासुदेवांस अतिशय कटु अनुभव आले. सरकारी नोकरीत त्याकाळी भारतीय माणसाला 'काळा आदमी' म्हणून ओळखला जाई. तात्या टोपे आणि रावसाहेब पेशवे या सत्तावनी वीरांना इंग्रजांनी फाशी दिल्यापासून वासुदेवास इंग्रजसत्तेविषयी विलक्षण चीड होती. बापू गोखला, यशवंतराव होळकर, उमाजी नाईक, नाना-साहेब पेशवा, तात्या टोपे, झाशीची राणी या सर्वांच्या झुंजार रोमहर्षक हकीकती ऐकून-वाचून इंग्रजाची चाकरी नको आणि त्यांचे जुलमी राज्यही नको या भावनेने त्यांचे रक्त दिवसेंदिवस तापू लागले.

आईच्या चितेच्या साक्षीने प्रतिज्ञा –

१८७० साली वासुदेवावर एक कौटुंबिक आपत्ती कोसळली. म्हटलं तर आपत्ती म्हटलं तर इष्टापत्ती. शिरढोणास त्यांची आई आजारी होती. तिला कधी भेटेन असं त्यांना झालं. तोच एके दिवशी आईची प्रकृती चिंताजनक असल्याचा निरोप आला. त्यांनी दिलेला रजेचा अर्ज अद्याप मंजूर झालेला नव्हता. पण आता त्या मंजुरीची त्यांना पर्वा नव्हती. आईच्या भेटीसाठी ते तसेच मिळेल त्या वाहनाने कर्जत मार्गे निघाले. वासुदेव फडके घरी जातात तो दारी त्यांच्या मृत आईची ताटी बांधली जात होती. घरात पळत जाऊन आणि आक्रोश करीत आईच्या छातीवर त्यांनी मनमुराद अश्रु ढाळले. त्याचदिवशी स्मशान-भूमीवर आईच्या चितेच्या साक्षीने त्यांनी मनोमन प्रतिज्ञा केली की, "माझ्या मातृदेवतेची भेट होऊ न देणाऱ्या आंग्ल सत्तेला जमेल त्या मार्गाने उखडून

टाकीन तरच नांवाचा वासुदेव बळवंत. मातेच्या माघारी मातृभूमी आहे. तिच्या मुक्तीसाठी तात्या टोपेंप्रमाणेच इंग्रजांशी झुंजत राहीन ''.

लाचार चाकरी सोडण्याची ते संधी पाहू लागले. ती १८७६-७७ वर्षात आली दक्षिणेत भयंकर दुष्काळ पडला. दोन वर्षे पावसाचा थेंब पडला नाही. हजारो माणसे अन्नपाण्यावाचून मेली व हजारो गुरेही चारापाण्यावाचून मृत्यूमुखी पडली. तथापि लठ्ठ पगार घेऊन ऐषआरामात राहणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या काळजाला काही त्या अभागी लोकांच्या करुण स्थितीमुळे पाझर फुटला नाही. दुष्काळग्रस्त जनतेच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा गोऱ्या मिशनऱ्यांनी उठविण्याचा सपाटा चालविला. ख्रिस्ती धर्म स्विकारण्याच्या अटीवर त्यांनी अडल्यानडलेल्या लोकांना अन्न व कपडा पुरविला. दुष्काळी परिस्थितीच्या कोंडीत पकडून हजारो लोकांना ख्रिस्ती पाद्रयांनी बाटवून ख्रिस्ती बनविले. यावेळी इंग्रज राज्यकर्ते व गोरे धर्मोपदेशक यांच्या चढाऊ व कावेबाज वागणुकीचा वासुदेव बळवंत फडके यांना संताप आला. खूप विचार करून त्यांनी दीर्घ मुदतीची रजा घेतली. माळण्यापासून तर कोल्हापूरपर्यंत दौरा करून गरीब रयतेची त्यांनी हलाखी पाहून घेतली. आणि केलेल्या प्रतिज्ञेची आठवण करून नोकरीवर लाथ मारली. त्यांच्या डोळयासमोर मूठभर अडाणी मावळयांच्या साहाय्याने हिंदवी स्वराज्य उभारणाऱ्या शिवछत्रपतींचा आदर्श होता. शिक्षणामुळे भेकड बनलेल्या सुशिक्षित माणसांचा नाद सोडून देऊन त्यांनी रामोशी, कोळी, ठाकर इत्यादी आदिवासी लोक हाताशी धरले. त्या इमानी लोकांना वासुदेव फडक्यांनी हत्यारे चालविण्याचे शिक्षण दिले आणि त्यांचे सैन्य उभे झाले.

उठावाचा वणवा –

पहिली पत्नी वारल्यावर वासुदेव बळवंतांनी दुसरे लग्न केले. ती पत्नी म्हणजेच गोपीकाबाई होत. वेळप्रसंग आल्यास आपल्या पत्नीलाही परिस्थिती-बरोबर दोन हात करता यावेत म्हणून त्यांनी तिला लिहिणे वाचणे, घोड्यावर बसणे, बंदुकीने नेम धरणे या गोष्टी शिकविल्या होत्या. तथापि स्वारीवर बाहेर पडण्यापूर्वी इंग्रजांच्या उपद्रवापासून सुरक्षिततेच्या दृष्टीने वासुदेव बळवंतांनी पत्नीला पुण्याहून जुन्नर येथे तिच्या आजोळी पाठविण्याचे ठरविले. बैलगाडी दाराशी उभी होती. कमरेला तलवार लटकावून व पतीच्या पाया पडून गोपिका-बाई गाडीत बसल्या. शरीर खंबीर होते, परंतु मन कोमल होते. वय तेरा

चौदा वर्षांचे. पतीचा वियोग होताना हृदय हेलावले. डोळ्यात पाणी उभे राहिले. गदगदित स्वरात त्यांनी विचारले " आपली भेट परत कधी ? " शब्द व अश्रु-बिंदू बरोबर बाहेर पडले " देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर." वासुदेव बळवंतांनी आत्मविश्वासयुक्त वाणीत उत्तर दिले. वासुदेव बळवंतांनी डोक्यावर केसांच्या जटा राखल्या होत्या, दाढी वाढविली होती. ते रंगाने गोरे असून उभट बांध्याचे होते. त्यांना पहाताच लोकांच्या मनात भीती व दरारा निर्माण होत होता. ते दत्तभक्त होते. त्यांचे नांव घेताच इंग्रज कावरेबावरे होत.

इंग्रजांच्या विरूद्ध उठाव करण्यास व सैन्याची हालचाल करण्यास सोईचे पडावे म्हणून त्यांनी भोवतालच्या प्रदेशाचे नकाशे तयार केले. सैन्याचा पगार भागविण्यासाठी व हत्यारे विकत घेण्यासाठी त्यांनी आपल्या सैन्यानिशी श्रीमंत व जुलमी सावकारांच्या आणि जमीनदारांच्या घरावर दरोडे घालण्यास सुरवात केली. तथापि स्त्रिया व मुले यांना त्रास देऊ नये, अशी त्यांची आपल्या सैनिकांना सक्त ताकीद होती. सैन्यातील लोक त्यांना महाराज म्हणत. महाराजांनी दौलतराव नाईक (रामोशी) यास सरदार नेमले होते. लुटीतून मिळालेल्या संपत्तीचा हिशोब ठेवणे, सैनिकांची हजेरी ठेवणे व पगार वाटपाचा हिशोब ठेवण्यासाठी दौलतरावाने एक ब्राम्हण हिशोबनीस नेमला होता. राज्य-कारभाराला साजेसा कारभार त्या अडाणी रामोशी सरदाराने सुरू केला.

वासुदेव बळवंतांच्या सैन्याच्या धाकामुळे शेट सावकार व सरकारी अधिकारी घाबरून गेले. सरकारने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सैन्य पाठविले दौलतराव ज्या जंगलात होता, त्याला ब्रिटिश सैन्याने वेढा दिला. दोन्हीही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. मोठ्या सैन्यापुढे दौलतरावांचा टिकाव लागेना. साथीदार म्हणाले " आपण शरण जाऊ " दौलतरावाच्या मानी मनाला ते पटले नाही अखेर शत्रूशी लढता लढता त्याने वीरमरण पत्करले.

वासुदेव बळवंतास पकडून देणाऱ्यास मोठे बक्षिस देण्याचे जाहिरनामे सरकारने ठिकठिकाणी लावले, आणि गंमत अशी की, वासुदेव बळवंताचेही जाहिरनामे त्या सरकारी जाहिरनाम्याशेजारीच लागले गेले. वासुदेव बळवंतास पकडून देणाऱ्यास ४,००० रुपयाचे 'इनाम' सरकारने घोषित केले. पण ती घोषणा प्रसिद्ध होताच " मला मुंबईच्या गव्हर्नरचे डोके छाटून आणण्यासाठी पांच हजार रुपये व पुण्याचे कलेक्टर व जिल्हा न्यायाधिश यांच्या डोक्यासाठी तीन तीन हजार रुपये देण्यात येतील असे घोषित केले.

१३ मे १८७९ ला सरकारी कार्यालये असलेला पुण्याचा बुधवारवाडा नि त्याच्याच जोडीला दुसरा विश्राम बाग वाडा, या दोन्ही वाड्यांना फडक्यांच्याच एका सहकाऱ्याने मध्यरात्री आग लावून दिली. त्या आगीने वासुदेव बळवंतांच्या बंडाची ज्वाला थेट लंडनपर्यंत प्रकाशली. आतापर्यंत मुंबईचा 'टाईम्स ऑफ इंडिया' कलकत्त्याचे 'स्टेट्समन' लाहोरचे 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट या पत्रांनी वासुदेव बळवंतावर झोड उठविली होती. आता लंडन टाईम्सनेही ते केले. ब्रिटिश पार्लमेंटमध्येही वासुदेव बळवंतांच्या उठावावर प्रश्नोत्तरे झाली.

काळाच्या पिंजऱ्यात –

वासुदेवाचे बंड दडपून टाकण्यात इंग्रज सरकारला यश आले. सैन्यातील रामोशीही पुढे बेईमान झाले. त्यामुळे वासुदेव बळवंतांचे मन विषण्ण झाले. मनाला शांती लाभावी म्हणून संगतीला फक्त गोपाळ मोरेश्वर यास घेऊन ते प्रथम गाणगापूरला गेले. त्यांना पकडण्यासाठी १७ जुलै १८७९ ला शेवटी मेजर डॅनियलची नियुक्ती झाली. हेरांकडून वासुदेव बळवंताचा ठावठिकाणा काढून बरोबर मोठी फौज घेऊन मेजर डॅनियल वासुदेव बळवंताच्या मागावर निघाला. परंतु त्यांचा पत्ता लागेना. त्याला अचानक बातमी मिळाली की वासुदेव बळवंत गाणगापूरला आहेत. पुण्याची एक बाई गाणगापूरहून परत पुण्यास आली होती. ती कथा ऐकण्यासाठी देवळात गेली होती. तिथे बोलता बोलता इतर बायकांना म्हणाली, 'सरकार मारे इकडेच बक्षिस लावते. वासुदेव बळवंत फडके तर गाणगापूरला मी प्रत्यक्ष पाहिले.' जवळ बसलेल्या एका जमादाराच्या पत्नीने ते ऐकले. बक्षिस मिळविण्याच्या आशेने तिने ती बातमी नवऱ्याला सांगितली. त्या जमादाराने लगेच डॅनियलला सांगितली.

वासुदेव बळवंत गाणगापूरहून निजामाच्या राज्यात गेले. इंग्रजांशी लढण्यासाठी त्यांनी तेथील घोडेस्वार रोहिल्यांशी करार केले. त्यानंतर ते नरसोबाच्या वाडीला दत्त दर्शनासाठी गेले. तेथून श्रीशैल्य मल्लिकार्जुन करून परत गाणगापूरची वाट धरली. लांबलांबच्या मजला मारल्यामुळे त्यांना थकवा आला होता. अंगात ताप होता. मध्ये भीमा नदी लागली. ती पुराने दुथडी भरली होती. विनंती केल्यावर एका नावाड्याने त्यांना घेऊन पुरात होडी ढकलली. पैलतिराला गेल्यावर त्यांनी नावाड्याला भरपूर बिदागी दिली व होडी पाण्यात

बुडवून टाकली. कारण डॅनियल त्यांचा पाठलाग करीत आहे, ही बातमी त्यांना कळाली होती. बरोबरच्या साथीदारांसह वासुदेव बळवंत जीव बचावित इंग्रजांना हुलकाव्या देऊन २० जुलै रोजी त्यांनी देवरनवडगी (जि. विजापूर) येथील बुद्ध विहाराचा आश्रय घेतला. तेथे रात्री वासुदेव बळवंत झोपलेल्या वाटसरूंमध्ये निद्राधिन झाले. त्यांच्या मागावर असलेला मेजर डॅनियल फौजेसह भोपळ्यांच्या आधारे नदी पार करून वरिल गांवी आला. रस्त्याने विचारपूस करीत तो बुद्ध विहारात आला. तेव्हा वासुदेव बळवंत यांना जणू काय काळ झोपच लागली होती. तेथे झोपलेल्या लोकांचे चेहरे चोरदिव्याच्या प्रकाशात निरखीत डॅनियल वासुदेव बळवंतांच्या जवळ आला. सरकारी जाहिरनाम्यात वासुदेव बळवंतांच्या दिलेल्या वर्णनाशी तो चेहरा जुळला. वासुदेव बळवंतांच्या शरीराजवळ अंथरूणांत एक तलवार होती. डॅनियलने त्या तलवारीवर बुटाचा पाय ठेवला व तो वासुदेव बळवंतांच्या छातीवर बसला. अंगी बळ आणून वासुदेव बळवंत ताडदिशी उठले आणि त्यांची व डॅनियलची झोंबाझोंबी झाली. इतक्यात डॅनियलच्या साथीदारांनी त्यांची शस्त्रे हिसकली. मग मात्र त्यांच्यापुढे वासुदेव बळवंत हतबल झाले. बेड्या घालून व साखळदंडाने बांधून त्यांना रातभर गावच्या चावडीवर डांबून ठेवले. दुसरे दिवशी शंभर पोलीसांच्या पहाऱ्यात पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वेतून त्यांची धिंड निघाली. २३ जुलै रोजी पहाटे पुणे स्टेशनवर गुपचुप उतरवण्यात आलं. पुणे मुंबईतील वर्तमानपत्रात त्यांच्या अटकेच्या बातम्या झळकल्या. इंडियन पीनल कोडच्या एकूण पांच कलमाखाली वासुदेव बळवंत व त्यांचे चौदा साथीदार यांच्यावर पुण्याच्या सेशन कोर्टात खटला सुरु झाला. पाच ज्युरी नेमले गेले. ३ नोव्हें. १८७९ पासून सत्र न्यायालयात प्रख्यात वकील महादेव आपटे यांनी त्यांचा बचाव केला. परंतु दरोडे घालणे, शस्त्रे गोळा करून असंतोष फैलावणे, राणी सरकारविरुद्ध बंड पुकारणे या आरोपांखाली वासुदेव बळवंतांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झाली. त्यांनी नंतर हायकोर्टात अपिल केले पण अखेर १८ डिसेंबर रोजी तेही फेटाळले व त्यांना ठाण्याच्या कारागृहात डांबण्यात आले. त्रिंबकजी डेंगळे याच कारागृहातून सुटल्याची त्यांना आठवण झाली. पण बंदोबस्त इतका पक्का होता की सुटकेची कल्पनाच करवेना. वासुदेव बळवंतांनी न्यायाधिशासमोर केलेल्या भाषणावरून त्यांच्या ज्वलंत देशप्रेमाची व जनतेच्या कल्याणाविषयीची कल्पना येऊ शकेल. वासुदेव बळवंत म्हणाले,

"हिंदुस्थानातील जनता ब्रिटिश सत्तेच्या टाचेखाली चिरडली जात आहे. उपासमारीने आणि दारिद्रयाने लोक मृत्यूपंथाला लागलेले आहेत. त्यांनी अन्नान्न करीत उपाशी मरावे, आणि आपण कुत्र्याप्रमाणे स्वत:चे पोट भरीत रहावे, हे मला पहावले नाही आणि म्हणून मी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारले. स्वराज्यासाठी लूट करून पैसे मिळविण्याचे ठरविले. पुण्याचा खजिना लुटण्याची माझी योजना पूर्ण झाली होती. पण फितुरीने घात केला. माझे अंतिम उद्दिष्ट प्रजासत्ताक राज्याची स्थापना करणे हे होते. ते सिद्धिस गेले असते तर माझा आत्मा शांत झाला असता, पण ते होऊ शकले नाही. शेवटी मी अयशस्वी झालो. पण ईश्वरालाच माहित की मी हे सर्व देशासाठी केले."

एडनच्या तुरूंगात रवानगी -

खटला संपल्यानंतर साखळदंड व बेड्यांनी बद्ध केलेले वासुदेव बळवंत पोलीस पहाऱ्यात न्यायालयाबाहेर पडले. एखाद्या राजाला द्यावी अशा प्रकारची मानवंदना जनतेने त्यांना दिली. व 'वासुदेव फडके की जय!' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. त्यांच्या आत्मवृत्तातील एका उताऱ्यात ते म्हणाले "अहो हिंदुस्थानवाशी लोकहो, आणि माझ्या बंधूंनो मी तुमच्या हितासाठी माझे प्राण देऊन ईश्वराच्या सभेत हजर होणार आहे. सर्व स्त्रियांना मी माझ्या मातेसमान मानले आहे. दधिची ऋषींनी आपल्या अस्थी नाही का देवांच्या कल्याणासाठी काढून दिल्या? तसेच माझे प्राण घेऊन ईश्वराने तुम्हा सर्वांना सुखी करावे. अशी माझी त्याला हात जोडून प्रार्थना आहे."

अशा रितीने शेवटी ३ जानेवारी १८८० ला पहाटे माझगांवला आणि पुढे तेहरान बोटीने वासुदेव बळवंत यांना एडनला काळया पाण्यावर पाठविण्यात आले. एडनचा भयंकर उन्हाळा, मचूळ पाणी, तुरुंगातील कदान्न, जनावराप्रमाणे करावे लागणारे कष्ट, यामुळे त्यांची प्रकृती अत्यंत अशक्त झाली. अशा नरकात कुजत मरण्यापेक्षा सुटकेचा धाडशी प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले. १२ ऑक्टोबर १८८० रोजी रात्री ३ वाजता पहारेकरी गाढ झोपेत आहेत असे नीट पाहून तुरुंगाच्या कोठडीची दारेच कुसासह मोडून ते तुरुंगाच्या तटापर्यंत घेऊन गेले. दरवाजाच्या फळया तटाच्या भिंतीला लावून हातातील लोखंडी बेड्या तोडल्या. दरवाजाच्या फळया तटाच्या भिंतीला लावून ते तटावर चढले. तटावरुन खाली उडी टाकतांना त्यांचा पाय मुरगळला, तरी ते तसेच बारा

मैलाचे अंतर पळत गेले. कैदी तुरुंगातून पळाल्याचे सकाळी समजले. चोहोकडे घोडेस्वार पाठविण्यात आले. वासुदेव बळवंतांना पकडून परत तुरुंगात नेण्यात आले. त्यानंतर त्यांचे हाल चालूच राहिले. ते क्षयाने जर्जर झाले आणि शेवटी १७ फेब्रुवारी १८८३ ला तुरुंगातच वयाच्या केवळ अडतिसाव्या वर्षी ते मरण पावले. एक महान तेजस्वी तारा अंतर्धान पावला. भारतासाठी त्यांनी एक मोठी गरुडझेप घेतली.

वासुदेव बळवंतांची कामगिरी भारतीयांच्या दृष्टीने आज जपमाळीसारखी रोज आठवण करण्याजोगी आहे. त्यांनी केलेले बंड पोलीसांना आवरणे अवाक्याबाहेरचे झाले होते हे खूद ब्रिटिशांनीच मान्य केले आहे. फडके हे हुलकावणी देऊन हातून निसटून जाण्यात अतिशय प्रविण होते. त्यामुळेच त्यांना पकडण्यास खूप दिवस लागले. म्हणूनच त्यांच्या अंताने सर्व देशभक्त अतिशय दु:खी झाले. १८८० मध्ये बंकिमचंद्रांनी आपल्या 'आनंदमठ' कादंबरीतील नायक त्यांच्यावरूनच रंगवला. वासुदेव बळवंतांच्या बंडामुळेच हिंदी जनतेत खऱ्या अर्थाने राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊन ब्रिटिशांविरुद्ध असंतोष भडकला होता. त्याचाच परिणाम म्हणून १८८५ मध्ये ए. ओ. ह्यूम साहेबांनी हिंदी असंतोषाला एक वायुद्वार म्हणून काँग्रेसची स्थापना केली. लॉर्ड माऊंटबॅटन म्हणूनच म्हणाले, "हिंदुस्थानात स्वराज्याच्या चळवळीचा प्रारंभ वासुदेव बळवंत यांनीच केला."

थोडक्यात म्हणजे वासुदेव बळवंतांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध उठविलेल्या वादळामुळेच १८७९ च्या दरम्यान भारतीय जनतेत एकीची भावना निर्माण झाली. जनतेत निर्माण झालेल्या भावनेमुळेच पुढील काळात भारतात राष्ट्रवादाची (राष्ट्रीयत्व) बीजे खोलवर रूजू शकली आणि राष्ट्रीय एकात्मतेचा उदय होऊ शकला. म्हणजे देशाच्या एका भागात का होईना पहिल्यांदा वासुदेवांनी प्रस्थापित ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध उठाव केला की ज्यामुळे हिंदी लोकांत ब्रिटिश राजवटी-बद्दल घृणा निर्माण होऊन ते संघटित होऊ लागले. संघटित झाल्यामुळेच पुढील काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रव्यापी बनली. वासुदेवांचाच पुढे तरुण क्रांतिकारकांनी आपल्यापुढे आदर्श ठेवला.

वासुदेव बळवंत झाले नसते तर कदाचित ह्यूम साहेब काँग्रेस स्थापनेच्या भानगडीत पडले नसते. परंतु वासुदेवांच्या दहशतीमुळेच हिंदी लोकांना शांत करण्यासाठी व त्यांची गाऱ्हाणी सरकारच्या वेशीवर टांगण्याच्या हेतूने राष्ट्रीय

काँग्रेसची स्थापना करण्यात आली होती. परंतु त्याचा परिणाम उलट होऊन भारतीय क्रांतिकारकांनी या काँग्रेसचा उपयोग ब्रिटिश सरकारविरुद्ध संघटन करून लढण्यासाठी करून घेतला. त्यामुळेच भारत स्वतंत्र झाला. परिणामी भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना मूळ धरू शकली.

२. रामसिंग कुका –

१८५७ साली स्वातंत्र्य संग्रामात हिंदी जनतेचा पराजय झाला. इंग्लंडच्या राणीने जाहिरनामा काढून हिंदी जनतेतील असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला. वरून जरी जनता शांत दिसत असली तरी पराजयाचा सूड अंतर्यामी खुपत होता. इंग्रजांनी सुधारणा दिल्या परंतु लोकांचे समाधान झाले नाही. आपले स्वातंत्र्य इंग्रजांनी हिरावून घेतले, ही गोष्ट एखाद्या विषारी काव्याप्रमाणे त्यांच्या हृदयात सलत होती. अशा भावनेमुळे त्या लोकांनी इ. स. १८७२ मध्ये इंग्रजी राजवटीला आव्हान देऊन पंजाब प्रांतात स्वतःची राजवट सुरू केली. रामसिंग यांच्याकडे त्यांचे नेतृत्व होते.

कुका संप्रदायाची स्थापना –

रामसिंग हे शीख होते. त्यांचा जन्म १८२४ मध्ये लुधियाना जिल्ह्यात झाला. प्रारंभी ते रणजितसिंग या पंजाबच्या शीख राज्याच्या सैन्यात नोकरीस होते. रणजितसिंगाच्या मृत्युनंतर त्यांनी ती नोकरी सोडली. त्यानंतर शीख समाजात धर्मसुधारणा व समाजसुधारणाच्या कार्यास ते लागले. असे म्हणतात की, महाराष्ट्रातील कोणी एक रामदासी पंथाचे बाबाजी पंजाबात गेले होते. त्यांनी रामसिंगांना राजकारणाचा गुरुमंत्र दिला. रामसिंग राजकारणात उतरले. त्यांच्या अनुयायांना नामधारी असे म्हणण्यात येई. नामधाऱ्यांचे गुरु रामसिंग यांनी स्थापन केलेल्या संप्रदायाला 'कुका' संप्रदाय असे नाव पडले.

पंजाबात कुका राजवट –

१८७२ मध्ये रामसिंग कुकाने पंजाब प्रांतात स्वतःची कुका राजवट नव्याने इंग्रजांना शह देण्यासाठी सुरू केली. त्यांनी राज्यव्यवस्थेसाठी पंजाब प्रांताची विभागणी बावीस जिल्ह्यांत करून तेथे स्वतःचे अधिकारी नेमले. कुकांनी स्वतःची कोर्टे, कचेऱ्या, शाळा व पोस्ट ऑफिसे सुरू केली. रामसिंगाने

एक जाहिरनामा काढून स्वतःच्या अनुयायांना व जनतेला फर्माविले की, सर्वांनी इंग्रजी सरकारशी संपूर्णपणे असहकार करावा. इंग्रजानी सुरू केलेल्या संस्थांवर बहिष्कार टाकावा. या जाहिरनाम्याचा इतका परिणाम झाला की, इंग्रजांची राज्यव्यवस्था पंजाबमध्ये कोलमडून पडली. त्यामुळे कुकांचे पारिपत्य करणे ब्रिटिशांना आवश्यक झाले.

गाईचा वध करणाऱ्यांना कुकांनी देहांताची शिक्षा दिली. याच सुमारास कुकांचे पारिपत्य करण्याची संधी इंग्रजांना मिळाली. दि. १३–१–१८७२ रोजी बहिनीनगर या कुकांच्या ठाण्याच्या गांवी त्यांच्या गुरुंचा उत्सव होता. त्यासाठी एक कुका मलारकोट या शेजारच्या मुसलमान संस्थानच्या हद्दीतून जात होता त्याच्यावर काही मुसलमानांनी हल्ला केला. हे वृत्त कळताच चार-पाचशे हत्यारबंद कुकांनी मलारकोटवर हल्ला चढविला. त्यामुळे घाबरून जाऊन मलारकोटच्या संस्थानिकाने लुधियाना येथील डेप्युटी कमिशनरकडे मदत मागितली. त्यानुसार मेजर कोरिन हा सैन्यानिशी मलारकोटमध्ये आला. इंग्रजी सत्तेवर जरब बसविण्यासाठी डेप्युटी कमिशनर कोव्हन याने गेल्या गेल्या पकडलेल्या पासष्ट कुकांना तोफेच्या तोंडी देऊन उडविण्यात आले. त्यानंतर इंग्रजी लष्कराने नामधारी कुकांचे धार्मिक अधिष्ठान जे बहिनीनगर यावर हल्ला केला करून ते लुटले. आपापल्या गांवी कुकांना स्थानबद्ध करण्यात आले. थोडक्यात म्हणजे आता कुकांची ससेहोलपट सुरू झाली. १८८० साली रामसिंग कुकांना पकडून इंग्रजांनी त्यांना अलाहाबादच्या किल्ल्यात डांबून ठेवून काही दिवसांनी त्यांना ब्रम्हदेशात रंगून येथे तुरुंगात ठेवले. परंतु तेथून ते एकाएकी नाहीसे झाले. रामसिंग कुका मरण पावल्याचे सरकारने घोषित केले परंतु नामधारी कुकांची अशी समजूत आहे की, गुरु रामसिंग हे स्वतःच्या दैवी सामर्थ्याने इंग्रजांच्या तावडीतून निसटले व ते अद्याप जिवंत असावेत.

पुढे १९२०–३० या दशकात अकाली बालवीर या रुपाने कुकांनी इंग्रजांना आव्हान दिले. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत हे अकाली नामधारी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेत होते.

वासुदेव बळवंत फडकेप्रमाणेच १८५७ नंतर ब्रिटिश साम्राज्याला शूर कुकांनी जबरदस्त धक्का देण्याचे काम करून पंजाबमध्ये लोकांचे संघटन केले, लोकांना एका झेंड्याखाली ब्रिटिशांच्या विरुद्ध आणल्यामुळे त्यांच्यात देशप्रेम, देशभक्ती निर्माण होऊन राष्ट्रीय एकतेची भावना निर्माण झाली. या पायावरच

पुढे भारताच्या कानाकोपऱ्यात राष्ट्रवादाचा प्रसार जोमाने मूळ धरू शकला. कुकांची चळवळ प्रारंभी अहिंसक व असहकाराची होती. त्यावरून गांधीजींच्या असहकार चळवळीच्या किती तरी पूर्वी भारतीयांना कुकांनी ब्रिटिशांविरुद्ध असहकार पुकारण्याचे आव्हान केले होते.

३) चाफेकर बंधू

'गोंद्या आला रे, आला.' गोंद्या आल्याची वर्दी एका भावाने दुसऱ्या भावास दिली. हा गोंद्या कोणी हिंदी माणूस नसून इंग्रज माणूस होता हे ऐकून आपल्याला आश्चर्य वाटते. गोंद्या हे नांव कोणा उडाणटप्पू पोराचे नसून एका बड्या सनदी इंग्रज अधिकाऱ्याचे होते. ते एक सांकेतिक नाव होते. त्या नावाशी संबंधित असलेला इतिहास मोठ्या शौर्याचा, अभिमानाचा व रोमांचकारी आहे.

इ. १८९६-९७ तील दुष्काळ व प्लेगचे संकट –

इ. स. १८९६–९७ साली महाराष्ट्रात महाभयंकर दुष्काळ पडला होता. त्यात पुन्हा प्लेगने कहर केला. पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला. त्यामुळे प्लेगच्या प्रतिबंधासाठी सरकारने पुणे शहरासाठी रँड या सनदी इंग्रज अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याच्या मदतीला लेफ्टनंट आयर्स्ट या लष्करी अधिकाऱ्याला दिले. प्लेग दूर होणेसाठी म्हणून घरे जंतुनाशक औषधांनी फवारावी लागत. प्लेगने लागण झालेले रोगी स्वतंत्र दवाखान्यात न्यावे लागत. प्लेगला आळा घालण्यासाठी या गोष्टी योग्य होत्या. तथापि दिवस थंडीचे होते. सर्वच घरांत पैसाआडका व मोलाचे सामान होते. त्यामुळे लोकांना सरकारी धोरणाची अंमलबजावणी त्वरित करणे अवघड होऊन बसले होते. परंतु रँड व आयर्स्ट यांना सामोपचाराचे धोरण माहितच नव्हते. लोकांनी घराच्या बाहेर जाण्यास नकार दिल्यामुळे सरकारी धोरणाचा अपमान झाला. त्यामुळे त्यांनी गावातील लोकांना बाहेर काढण्याचा हुकूम दिला. त्या गोऱ्या सोजीरांनी बुटा-निशी देवघरे व स्वयंपाकघरे येथपर्यंत धडक मारली. देवघरातील देवांच्या मूर्ती अंगणात भिरकावल्या. भांडी रस्त्यावर फेकली. बंधूकीचा धाक दाखवून माणसांना घराबाहेर काढले. स्त्रियांच्या अब्रूची विटंबना केली. घरातील दाग-दागिने व मौल्यवान वस्तू लुटून नेल्या, रँडच्या लोकांनी घातलेला धुमाकूळ

पाहून प्लेगने देखील शरमेने मान खाली घातली असेल! ही अत्याचारी वागणूक पाहून नामदार गोखल्यांसारख्या मवाळ पुढाऱ्याने देखील हताश होऊन जनतेला सल्ला दिला की, "भागुबाईसारखे रडता काय? आडदांडास कायदा शिकवा." आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, त्या आडदांडास कायदा शिकविला एका कथेकऱ्याच्या तरुण मुलांनी.

टिळकांपासून स्फूर्ती –

दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव ही हरिभाऊ चाफेकर या कथेकऱ्याची मुले होती. हरिभाऊचा वडिल मुलगा दामोदरपंत वडिलांप्रमाणेच कीर्तने करीत असत. परंतु देश आणि धर्म हाच त्यांचा देव होता. लो. टिळकांनी सुरु केलेल्या शिवजयंती उत्सवात व गणेशोत्सवात ते भाग घेत असत. वासुदेव बळवंत फडके यांच्या क्रांतिकारक जीवनापासून चाफेकर बंधूंना देशभक्तीची स्फूर्ती मिळाली होती. इंग्रजांच्या जुलुमी राजवटीने त्यांची अंतःकरणे सूडाने पेटली होती. ब्रिटिशांची सत्ता उलथून टाकण्याचा दामोदरपंतांनी सशस्त्र क्रांतीचा गुप्त मार्ग स्विकारला. मुंबईत फोर्टच्या भागात इंग्लंडच्या राणीचा पुतळा होता. त्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याच्या तोंडास त्यांनी डांबर फासले व गळ्यात फाटक्या पायतणांची माळ घातली.

१२ जून १८९७ रोजी शिवजयंती उत्सवानिमित्त लकडी पुलाजवळील विठ्ठल मंदिरात लो. टिळकांचे भाषण झाले. त्यानंतर दामोदरपंत चाफेकर यांनी एक गीत म्हटले. सभेत वीरश्रीयुक्त भाषणे करणाऱ्या पुढाऱ्यांचा उल्लेख त्या गीतात नामर्द म्हणून करण्यात आला. सभा संपल्यानंतर लोकमान्य टिळक दामोदर चाफेकरांजवळ जाऊन म्हणाले "गीत म्हणणाऱ्यांच्या अंगी पौरुषत्व असते, तर पुण्यात हलकल्लोळ माजविणारा रँड जीवंत राहिलाच नसता."

लो. टिळकांच्या टोमण्याने दामोदर चाफेकरांची अस्मिता जागृत होऊन त्यांना स्फूर्ती मिळाली. त्यांच्या पौरुषाने टिळकांचे आव्हान झेलले. दामोदर-पंतांनी आपले बंधू व मित्र यांच्या मदतीने रँडचा काटा काढण्याचे ठरविले. रँडवर पाळत ठेवून ते त्याला ठार करण्याच्या संधीची वाट पाहू लागले. आणि दि. २२ जून १८९७ रोजी तो मुहूर्त साधण्याचे ठरले.

रँड व आयर्स्ट यांच्यावर हल्ला –

व्हिक्टोरिया राणीच्या हिरकमहोत्सवानिमित्त गणेशखिंडीतील गव्हर्नरांच्या

बंगल्यावर आनंदोत्सव होणार होता. याप्रसंगी सरकारी अधिकाऱ्यांना मेजवानी देण्यात येणार होती. त्यामुळे सर्व गोरे अधिकारी याप्रसंगी उपस्थित राहाणार होते.

ही संधी साधण्याचे दामोदर चाफेकरांनी ठरवले. रँडची गाडी पाहून ठेवण्यास वासुदेव चाफेकर यांना पुढे पाठविण्यात आले. गणेशखिंडीच्या रस्त्याच्या कडेला एका ठराविक ठिकानी लपून बसून रँडची गाडी आली की, "गोंद्या आला रे, आला!" हे परवलीचे वाक्य त्यांना उच्चारण्यास सांगण्यात आले. अंधार पडल्यावर दामोदरपंत, त्यांचा भाऊ बाळकृष्ण व मित्र महादेव रानडे आणि विनायक आपटे हे आपापले पिस्तूल भरून गणेशखिंडीच्या रस्त्यालगत ठरलेल्या ठिकाणी दबा धरून सावजाची वाट पहात बसले. रात्री साडेबाराच्या सुमारास गव्हर्नमेंट हाऊस वरून अधिकारी परतू लागले. लेफ्टनंट आयर्स्टची गाडी प्रथम आली. ती दिसताच अंधारातून शब्द उमटले. "गोंद्या आला रे, आला!" ते परवलीचे शब्द ऐकताच बाळकृष्ण चाफेकर त्या गाडीवर धावले. आत बसलेल्या साहेबांच्या डोक्यावर त्याने गोळी झाडली. तो साहेब खाली कोसळला. तो रँड नसून लेफ्टनंट आयर्स्ट होता. इतक्यात दुसरी गाडी आली. "गोंद्या आला रे, आला!" असे म्हणत वासुदेव चाफेकर त्या गाडीमागे धावू लागले. ते पाहून दामोदरपंतांनी त्या गाडीवर उडी घेऊन रँडच्या पाठीवर गोळी झाडली. रँड गाडीत कोसळला व ३ जुलैला तो मरण पावला.

रँड व आयर्स्ट या अधिकाऱ्यांवर झालेल्या खुनी हल्यांमुळे सरकारी वरिष्ठ अधिकारी आश्चर्यचकित झाले. रँडच्या खुनानंतर दामोदरपंतांनी त्या रस्त्यावरील पुलाखाली मुठीला तांबडी चिंधी बांधलेली तलवार फेकून निघून गेले होते. ती तपासात पोलीसांना सापडली. तेवढ्या एका खुणेशिवाय गुन्हेगारासंबंधीचा अन्य कोणताही सुगावा सरकारला लागला नाही. गुन्हेगाराचा तपास लावून देण्यासाठी सरकारने वीस हजार रुपयांचे बक्षिस जाहीर केले.

लोकमान्य टिळकांना अटक –

एवढ्या मोठ्या रकमेचे बक्षीस जाहीर केले असताही रँडचा वध करणाऱ्यांचा तपास सरकारला लागेना. त्यामुळे पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लोकमान्य टिळक व नातू बंधू यांना पकडले. तेव्हा आपल्या कृत्याचा इतरांना निष्कारण त्रास होत असल्याचे पाहून दामोदरपंतांना वाईट

वाटले. रँडच्या खूनानंतर ते मुंबईत जाऊन राहिले होते. त्यांनी मुंबईतूनच गव्हर्नरला पत्र लिहिले त्या पत्राबरोबर एका तांबड्या रंगाची चिंधी जोडली व पत्रात म्हटले, "रँडचा वध पुण्याच्या कोणी ब्राह्मणाने केला नाही. तो मी केला आहे. सरकारने इतरांना पकडून निष्कारण त्रास देऊ नये. रँडच्या वधाच्या वेळी जी तलवार मी रस्त्याच्या पुलाखाली फेकून दिली होती, तिच्या मुठीला जी तांबड्या पागोट्याची चिंधी बांधली होती, त्याच पागोट्याची चिंधी पत्रासोबत जोडीत आहे. त्यामुळे मीच हे कृत्य केले याची खात्री पटेल."

द्रविड बंधूंनी केलेला विश्वासघात –

चापेकरांच्या ओळखीचे गणेश द्रविड हे खोट्या सह्या करण्याच्या गुन्हयावरून त्यावेळी तुरुंगात होते. त्यांच्या भावाकडून त्यांना चापेकर बंधू व त्यांचे मित्र यांच्या गुप्त हालचालींची माहिती मिळत होती. आपली शिक्षा माफ करून आपणास परत सरकारी नोकरीत घेतल्यास व गुन्हयाचा शोध लावून देण्यासाठी ठेवलेले बक्षीस देण्याचे सरकारने कबूल केल्यास आपण रँडचे खूनी पकडून देऊ, असे गणेश द्रविडाने सांगितले. त्यानुसार गणेशाला तुरुंगातून सोडून दिले. तुरुंगाच्या बाहेर आल्यानंतर त्याने चापेकरांच्या मित्रांकडून बरीच माहिती मिळवली. त्या माहितीच्या आधारे दामोदरपंतांना मुंबईत पकडण्यात आले. त्यांच्यावर खटला चालून त्यांना दि. १८ एप्रिल १८९८ रोजी येरवड्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. हातात भगवत् गीता घेऊन ते फासावर चढले. बाळकृष्ण चापेकर भूमीगत होते. परंतु दामोदरपंतांना फाशी दिल्याचे कळाल्यावर ते अस्वस्थ झाले. व स्वतःहून पोलीसांच्या स्वाधीन झाले.

द्रविड बंधूंना प्रायश्चित –

द्रविड बंधूंनी आपल्या भावाचा विश्वासघात केला, ही गोष्ट वासुदेव चापेकरांना कळली. त्यांच्यावर सूड उगवायचा वासुदेवाने ठरविले. ते व महादेव रानडे यांनी मुसलमानी पोषाख केला व ते द्रविडांच्या घरी गेले ब्रुईनसाहेबाने गणेश द्रविडाला त्वरित बोलाविले आहे, असे ते उर्दूतून बोलले. खटल्याच्या तपासाचे काम ब्रुईन नावाच्या पोलीस अधिकाऱ्याकडे होते. गणेश द्रविडाने गुन्हयाचा तपास लावून दिल्यामुळे त्याला वारंवार ब्रुईनला भेटावे लागे. त्यामुळे वेशांतरित व्यक्तींनी सांगितलेला तो निरोप खरा समजून गणेश व रामचंद्र हे

द्रविड बंधू घराबाहेर पडले. लगेच वेशांतरित चाफेकर व रानडे यांनी द्रविडांना आपली खरी ओळख दिली व पिस्तुलाच्या गोळयांनी ठार केले. रानडे व वासुदेवराव जेव्हा द्रविडांच्या वाड्याकडे गेले तेव्हा त्यांचे साथीदार खंडेराव साठे हे लाठी घेऊन गल्लीच्या कोपऱ्यावर पहारा करण्यासाठी उभे होते. रात्री साडेनऊ वाजेच्या दरम्यान वासुदेव रानड्यांनी द्रविड बंधूंवर झाडलेल्या पिस्तुलाच्या गोळयांच्या बाराने रात्रीची ती शांत गल्ली दणाणून गेली. वासुदेवराव व रानडे आणि साठे अंधारात नाहीसे झाले.

दुसऱ्या दिवशी ब्रुईन या अधिकाऱ्याने द्रविडांच्या खुनाच्या चौकशीसाठी वासुदेव चाफेकरांना चौकीवर बोलाविले. उपरण्याच्या आतून खांद्याला अडकविलेल्या पिशवीत पिस्तुल व एक मोठा चाकू घालून वासुदेवराव पोलीस चौकीत गेले. ब्रुईन साहेब त्यांना प्रश्न विचारीत असता जवळ उभा असलेला रामा पांडू हा फौजदार उद्दामपणे म्हणाला, "सर्व चाफेकर साले हरामखोर!" हे हलकट उद्‌गार ऐकून पिशवीतून पिस्तूल काढून वासुदेवरावाने रामा पांडूवर गोळी झाडली. परंतु गोळीचा नेम चुकल्यामुळे रामा पांडू वाचला. लगेच ब्रुईन साहेबावर दुसरा नेम धरला. परंतु पिस्तुलाचा चाफ ओढण्यापूर्वीच पोलीसांनी वासुदेवावर झडप घालून त्यांना निशस्त्र केले.

वासुदेव, बाळकृष्ण, रानडे, आपटे, साठे यांच्यावर खटला चालून पहिल्या तिघांना फाशीची शिक्षा झाली. आपटे हे शेवटपर्यंत सरकारला सापडले नाहीत. खंडेराव साठ्यांना दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली.

वासुदेवरावांना त्यांच्या कोठडीतून जेव्हा फाशी देण्यासाठी फासाकडे चालविले, तेव्हा रानडे, बाळकृष्ण यांच्या कोठडीजवळ येताच ते मोठ्याने ओरडले, "बापू, रानडे चलतो मी आता. राम राम." स्वर्गाच्या वाटेवरल्या त्या एकाकी पांथस्थाला दुसऱ्या दोघांनी कोठडीतूनच मोठ्या आवाजात प्रतिसाद दिला. "तू पुढे चालू लाग. आम्हीही येतो तुझ्यामागून. राम राम." दोन दिवसांच्या अंतराने त्यांना पुणे येथील येरवड्याच्या कारागृहात फाशी देण्यात आले.

४. पंडित श्यामजी कृष्ण वर्मा –

हिंदुस्थानच्या राजकारणाच्या सोयीसाठी लंडनच्या **भर वस्तीत सुंदर** जागेत पंडित श्यामजी कृष्ण वर्मा या कच्छ-काठेवाडात गरीब कुटुंबात जन्म-

लेल्या गृहस्थाने एक सुंदर इमारत विकत घेऊन तिला '**इंडिया हाऊस**' असे नाव दिले. इ. स. १९०५ मध्ये या भारत भवनाचे समारंभपूर्वक उद्घाटन झाले. दरिद्री कुटुंबात जन्मलेल्या व बालपणीच पोरके झालेल्या श्यामजींवर परमेश्वराने अचुक विद्या, वैभव, संपत्ती व सन्मान या गोष्टींचा सुवर्णपुष्पाप्रमाणे वर्षावच केलेला होता.

श्यामजी कृष्ण वर्मा यांचा जन्म इ. स. १८५७ मध्ये कच्छ संस्थानातील मांडवी या गावी झाला. वयाच्या नवव्या वर्षीच माता पिता निवर्तले. त्यानंतर कोण्या सहृदय माणसाने त्या पोरक्या मुलाला मुंबईस नेऊन त्याच्या विद्याभ्यासाची सोय केली. पुढे दयानंद सरस्वतींनी त्यांची कुशाग्र बुद्धी पाहून त्यांना आर्य समाजाची दीक्षा दिली. त्यांनी नाशिक, पैठण, काशी, अहमदाबाद या धर्मपीठांना भेटी देऊन स्वतःच्या ज्ञानाने तेथील पंडितांना दिपविले. त्यामुळे त्यांना पंडित ही पदवी मिळाली. १८७५ मध्ये मुंबईचे धनाढ्य व्यापारी छबीलदास लल्लुभाई यांच्या भानुमती नामक मुलीशी त्यांचा विवाह झाला. त्यानंतर ते ऑक्सफर्ड विद्यापीठात गेले. तेथेही त्यांना चांगला मानसन्मान मिळाला. ते ऑक्सफर्डचे पदवीधर झाले. नंतर ते बॅरिस्टरही झाले. त्यांची विद्वता पाहून भारतमंत्र्याने त्यांना भारताचे प्रतिनिधी म्हणून इंग्रज सरकारतर्फे जर्मनीत भरलेल्या विद्वज्जनांच्या परिषदेस पाठविले. त्यामुळे त्यांचा भारतमंत्री, इंग्लंडचे पंतप्रधान ग्लॅडस्टन यांच्याशी संबंध आला. शेवटी ते १८८५ मध्ये हिंदुस्थानात आले.

रतलाम संस्थानचे दिवाण –

हिंदुस्थानात आल्यानंतर त्यांना रतलाम संस्थानची दिवाणगिरी मिळाली परंतु तब्येतीच्या तक्रारीमुळे ती नोकरी त्यांनी दोन तीन वर्षातच सोडून दिली. त्यानंतर काही दिवस त्यांनी वकिली केली व पुन्हा उदेपूर संस्थानचे दिवाण झाले. काही दिवस जुनागड संस्थानमध्ये राहिले.

इंग्लंडमध्ये स्थलांतर –

भारतात सरकारविरुद्ध अस्थिरतेचे वातावरण निर्माण होत असतानाच श्यामजी कृष्ण वर्मा यांनी इंग्लंडला स्थलांतर केले. आतापर्यंत सत्ता, संपत्ती या स्वार्थात मशगुल झालेल्या त्यांच्या विचारापुढे प्रथमच आपल्या देशाचे पारतंत्र्य

उभे राहिले. इंग्रज लोक हिंदी लोकांना सहजासहजी कोणतेही राजकीय हक्क देणार नाहीत याची श्यामजींना खात्री पटली होती. त्यामुळे हिंदुस्थानला राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने त्यांनी 'इंडियन होमरूल' सोसायटी स्थापन केली. राजकीय विचारविनिमयासाठी व हिंदी राजकारणी लोक व विद्यार्थी यांच्यासाठी श्यामजींनी स्वखर्चानेच 'इंडिया हाऊस' घेऊन दिले.

भारतीय तरुणांना शिष्यवृत्ती –

भारतातून उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये येऊन रहाणे शक्य व्हावे म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपयांच्या पाच शिष्यवृत्त्या देण्याचे श्यामजींनी जाहीर केले. मात्र अट ही की, शिष्यवृत्ती घेऊन शिक्षण घेतलेल्या तरुणाने इंग्रजांची नोकरी करता कामा नये.

श्यामजी कृष्णानी देऊ केलेल्या पाचपैकी एक शिष्यवृत्ती (शिवाजी शिष्यवृत्ती) घेऊन विनायक सावरकर इंग्लंडला गेले. तेथेही त्यांनी 'अभिनव भारत' या गुप्त क्रांतिकारी सोसायटीची स्थापना केली. मादाम कामा, श्यामजी कृष्ण वर्मा, सरदारसिंग राणा ही मंडळी 'अभिनव भारत' संस्थेचे सभासद झाले. पुढे सावरकर पकडले गेले. त्यामुळे विषण्ण मनस्थितीत भारतीय स्वातंत्र्याचा ध्यास करीत श्यामजी कृष्ण वर्मा १९३० मध्ये मरण पावले.

श्यामजींनी इंडिया हाऊस दिल्यामुळेच सावरकरांना भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे लंडनमध्ये एक गुप्त केन्द्र उभारता आले. नाहीतर पुढील क्रांतीकारकांनी केलेली कामगिरी झाली नसती. म्हणून सावरकरांना इंडिया हाऊस विकत घेऊन देऊन श्यामजींनी अतिशय मोलाचे सहकार्य केले. त्यामुळेच पुढे अनेक तरुण क्रांतिकारक सावरकरांच्या खांद्याला खांदा लावून चळवळीत सहभागी झाले.

५) मादाम कामा –

इ. स. १९०७ साली जर्मनीत स्टटगार्ट शहरी आंतरराष्ट्रीय समाजवादी सभा भरली होती. त्या सभेसाठी निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी तेथे जमले होते. त्याठिकाणी जमलेल्या प्रतिनिधींनी देशोदेशींच्या ध्वजांना वंदना दिली होती. हिंदुस्थान त्यावेळी इंग्रजांच्या अंमलाखाली होता. इंग्रजांनी हिंदी राजेरजवाड्यांना जिंकल्याबरोबर भगवा झेंडा, जरीपटका चांदतारा हे सर्व ध्वज खाली

आले व युनियन जॅक हे इंग्रजांचे निशाण हिंदुस्थानच्या भूमीवर फडकू लागले. यावेळी हिंदुस्थानला स्वातंत्र्य नसल्यामुळे ध्वजही नव्हता. हिंदी स्वातंत्र्यासाठी ज्या काँग्रेसचा जन्म झाला तिलाही स्वतंत्र राष्ट्रध्वज नव्हता. प्रकृतिच्या स्वास्थ्यासाठी इंग्लंडमध्ये गेलेल्या मादाम कामा या हिंदी महिलेला आपल्या राष्ट्राचा स्वतंत्र ध्वज नाही, या कल्पनेने अस्वस्थ केले. रात्रीतून तिने रेशमी कापडाचा तारांकित ध्वज तयार केला व दुसऱ्या दिवशीच्या त्या आंतरराष्ट्रीय सभेमध्ये स्वतंत्र भारताचा तो नवजात ध्वज फडकाविला. त्या बहाद्दूर महिलेचे नाव मादाम कामा होय. या आंतरराष्ट्रीय परिषदेत कामाबाईंनी खालील उद्गार काढले.

"हा पहा स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज! नुकता जन्म झाला आहे. भारतीय हुतात्मा युवकांच्या रक्ताने तो पावन झाला आहे. उपस्थित सद्गृहस्थहो, आपण या स्वतंत्र भारताच्या ध्वजाच्या सन्मानासाठी उभे राहून त्याला प्रणाम करावा, असे मी तुम्हाला आवाहन करीत आहे."

समाजसेवेचे व्रत –

कामाबाईंचा जन्म मुंबईस एका सधन पारशी कुटुंबात १८६१ मध्ये झाला. त्यांचे नांव भिकाजीबाई. रूस्तुमजी या पारशी बॅरिस्टरशी त्यांचा विवाह झाला. त्यांच्याकडे संपत्ती व वैभव होते. परंतु त्यांचे त्या गोष्टीत मन रमत नसे तेव्हा त्यांनी समाजसेवेचे व्रत स्विकारले. इ. स. १९०२ च्या दरम्यान मुंबई इलाख्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. तेव्हा त्यांनी प्लेगच्या रोग्यांची सुश्रुषा करण्यास प्रारंभ केला. परंतु सेवा करीत असतांनाच त्या स्वतःच प्लेगच्या शिकार झाल्या. त्यापासून बचाव करण्यासाठी त्या इंग्लंडला गेल्या. इंग्लंडमध्ये दादाभाई नौरोजींशी त्यांची गाठ पडली. कामाबाई दादाभाईंच्या राजकीय चळवळींकडे आकर्षिल्या गेल्या. परंतु नंतर लौकरच श्यामजी कृष्ण वर्मा व सरदारसिंग यांच्या सानिध्यात त्या आल्यामुळे लढाऊ बनल्या.

अमेरिकन जनतेपुढे कामाबाईंचे भाषण –

स्टटगार्ड येथील समाजवादी राष्ट्रांच्या परिषदेनंतर मादाम कामा अमेरिकेत गेल्या. तेथे अमेरिकन जनतेसमोर दिलेल्या एका भाषणात त्या म्हणाल्या, "आमच्या देशातील उत्तमोत्तम माणसांना हद्दपार तरी करण्यात येत आहे,

किंवा गुन्हेगाराप्रमाणे तुरूंगात तरी लोटले जात आहे. आणि तेथे त्यांच्या पाठीवर चाबकाचे फटकारे मारून रक्तबंबाळ स्थितीत त्यांना इस्पिताळात जावे लागत आहे. आम्ही शांततप्रिय लोक आहोत, आम्हाला रक्तलांच्छित क्रांतिची हाव नाही, परंतु आम्हाला आमच्या जनतेला तिच्या हक्कांची जाणीव करून देऊन तिच्यावर लादलेले पारतंत्र्याचे जोखड उखडून टाकावयाचे आहे. ''

सावरकर इंग्लंडला जाऊन राहु लागले, तेव्हा मादाम कामा यांना त्यांनी अभिनव भारताची शपथ दिली. त्यामुळे कामाबाई अतिशय जहालमतवादी बनल्या. इंग्लंडमध्ये आता राहाणे असुरक्षितपणाचे वाटू लागल्याने सावरकर, श्यामजी कृष्ण वर्मा, सरदारसिंग यांच्याबरोबर कामाबाईही फ्रांसमधील पॅरिस येथे वास्तव्यासाठी गेल्या. हिंदी जनतेत क्रांतिचे विचार प्रसृत करण्यासाठी त्यांनी 'वंदे मातरम्' नावाचे मासिक पत्रक सुरू केले होते. निरनिराळ्या क्रांतिकारकांना व क्रांतिकार्यांना मादाम कामा आर्थिक सहाय्य करी असत. जेव्हा ब्रिटिशांनी सावरकरांना पकडले, तेव्हा नंतरच्या काळात त्यांनी सावरकरांच्या कुटुंबियांना वेळोवेळी आर्थिक सहाय्य केले.

फक्त भारताच्या स्वात्तंत्र्यासाठीच नव्हे तर संपूर्ण पूर्वेकडील देशाच्या स्वतंत्र्याची तळमळ मादाम कामांना लागली होती. इजिप्त, इराण, चीन, तुर्कस्थान या देशातील क्रांतिकारक त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांच्याकडे जात. पहिल्या महायुद्धाच्या काळात इंग्रजांच्या चिथावणीवरून फ्रेंच सरकारने त्यांच्यावर खूप बंधने घातली. आठवडयातून एकदा त्यांना पोलीस चौकीवर हजेरी लावावी लागे. इकडे इंग्रज सरकारने हिंदुस्थानात कामाबाईंचे घर, मालमत्ता इ. लाखाची मिळकत जप्त केली.

अशा असहाय्य परिस्थितीत सर कावसजी जहांगीर यांनी सरकारला विनंती केल्यावरून मादाम कामांना हिंदुस्थानात आणण्याची परवानगी मिळाली. मुंबईतील पेटिट इस्पितळात बरीच वर्षे अंथरूणात खिळलेल्या अभागी, असहाय्य अवस्थेत दिवस काढून दि. ११ ऑगष्ट १९३६ रोजी त्यांचा अंत झाला.

जिच्या शब्दांच्या सामर्थ्याने प्रबळ साम्राज्यशाही एकेकाळी हादरत होती, ती भारतीय क्रांतिची कालीमाता मुंबईसारख्या गजबजलेल्या नगरात अगदी अज्ञात अवस्थेत इहलोक सोडून गेली.

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर –

"हे हुतात्म्यांनो, आम्ही तुम्हांला विसरलो नाही. शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत इंग्रजांशी लढा देऊ, ज्या कार्यासाठी तुम्ही तुमच्या प्राणांच्या आहुत्या दिल्या ते कार्य पुढे चालू ठेवू, अशी प्रतिज्ञा तुमच्या स्मृतीच्या साक्षीने आम्ही करीत आहोत."

– वि. दा. सावरकर

इंग्रजांची राजधानी लंडन शहरातून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वरीलप्रकारे आरोळी ठोकली. त्यावेळी सरकारच्या विरुद्ध चकार शब्द बोलण्याची कोणी हिंमत करीत नसे, अशावेळी सरकारविरुद्ध सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दंड थोपटले. वरील मजकुराची पत्रके त्यांनी तयार करून वाटली. सावरकर हे नाशिकजवळील भगूरचे राहणारे, बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी इ. स. १९०६ मध्ये ते इंग्लंडला गेले होते. १९०७ साली १८५७ च्या उठावाला पन्नास वर्षे पूर्ण झाली. सावरकरांनी यावेळी त्या स्वातंत्र्याचा अर्धशतसांवत्सरिक उत्सव आपल्या सहकाऱ्यांसह साजरा केला आणि '१८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम' हा ग्रंथ त्यांनी तयार केला. सावरकरांच्या वेळचे व नंतरचे सशस्त्र क्रांतिकारक या ग्रंथाला गीतेसारखे पूज्य मानीत असत. या ग्रंथाने तरुणांची मने सशस्त्र क्रांतिच्या विचाराने पेटवून दिली. सरकारने ते पुस्तक जप्त केले. तरी देखील त्या पुस्तकाच्या प्रती गुप्तरितीने भारतात हिंदी क्रांतिकारकांकडे पाठविण्यात आल्या.

सावरकरांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण नाशिक येथे झाले. उच्च शिक्षण पुणे येथे होऊन प्रसिद्ध क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे बॅरिस्टर होण्यासाठी ते लंडनला गेले. श्यामजी वर्मांनी लंडनमध्ये एक प्रशस्त इमारत घेतली होती. इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह म्हणून त्या इमारतीचा उपयोग केला जात होता. सावरकर त्याच भारत भवनात राहत होते. त्यावेळी भारतातून अनेक निवडक बुद्धिवान विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जात होते. तेथे सावरकरांनी या शिक्षणासाठी आलेल्या भारतीय तरुणांना सशस्त्र क्रांतिची दीक्षा देण्यास सुरवात केली. नासिक येथे त्यांनी सुरू केलेल्या 'अभिनव भारत' या गुप्त संघटनेची शाखाही तेथे सुरू केली. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये गेलेले भारतीय तरुण त्यांच्याकडे आकृष्ट होऊ लागले. मदनलाल धिंग्रा, लाला हरदयाळ, भाई

परमानंद, सेनापती बापट वगैरे क्रांतिकारकांनी सावरकरांपासून स्वतःच्या जीवन-कार्याला स्फूर्ती घेतली. सावरकर व त्यांची 'अभिनव भारत' संस्था म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरवातीच्या क्रांतिकार्याची गंगोत्रीच होय. तिच्यातून निघालेल्या क्रांतिकारकांच्या जीवन-प्रवाहांनी भिन्न भिन्न क्षेत्रात क्रांतिकार्याचा प्रसार केला.

भारतात पिस्तुलांची रवानगी –

भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून करून सरकारला दहशत बसविसाठी सावरकरांनी इंग्लंडमधून जाडजूड पुस्तकांची पाने कोरून त्या पोकळीत काही पिस्तुले नाशिकला अभिनव भारत संघटनेच्या क्रांतिकारी कार्यकर्त्यांकडे पाठविली. तसेच इंडिया हाऊसमध्ये आचारी म्हणून काम करीत असलेल्या चतुर्भुज या माणसाबरोबर वीस पिस्तुले त्याच्या पेटीच्या तळाशी भरून भारतात पाठवून दिली. पिस्तुलांच्या वरच्या बाजूला फळ्या ठोकून वर इतर सामान व कपडे भरलेले होते. त्यामुळे चतुर्भुज ही पिस्तुले भारतात सही-सलामत आणू शकला. चतुर्भुजाने ही पिस्तुले भारतात आणून मुंबई येथे अभिनव भारताच्या कार्यकर्त्यांकडे पोहचती केली. याच पिस्तुलांपैकी एका पिस्तुलानेच अनंत कान्हेरे यांनी नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात कलेक्टर जॅकसनला ठार मारले.

सावरकरांना अटक –

कलेक्टर जॅकसनच्या खुनानंतर अनंता कान्हेरेची चौकशी सुरू झाल्या-नंतर त्यांच्याजवळ सापडलेले पिस्तुल हे सावरकरांनी इंग्लंडमधून पाठविल्याचे सिद्ध झाले. म्हणून ब्रिटिश पोलीसांनी सावरकरांना लंडन येथे पकडले.

सुटकेचा प्रयत्न फसला -

त्यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या संबंधात सावरकरांना भारतात आणण्या-साठी पोलीस पहाऱ्यात 'मोरिया' बोटीवर चढविण्यात आले. बोटीच्या प्रवासात कोणत्या ठिकाणी सुटका करून घ्यावी या संबंधीची विचारचक्रे त्यांच्या मनात फिरू लागली. बोटीवरील संडासाच्या विवराचे (पोर्टहोल) माप त्यांनी दोरीने घेऊन ठेवले व त्या विवरातून त्यांचे शरीर मावते का नाही, याचा अंदाज त्यांनी

बांधून ठेवला व योग्य संधीची ते वाट पाहू लागले. प्रवास सुरू झाल्यावर बोटीच्या यंत्रात काही बिघाड झाल्यामुळे बोट फ्रान्सच्या किनाऱ्यावरील 'मार्सेल्स' या बंदराजवळ नांगरली गेली. ही संधी योग्य आहे असे वाटुन सावरकर संडासात गेले. संडासात असलेल्या आरशात आपले प्रतिबिंब बाहेर पहाऱ्यावर असलेल्या पहारेकऱ्यास दिसू नये म्हणून त्यांनी आपला अंगरखा त्या आरशावर टाकला. शरीराचे शक्य तेवढे आकुंचन करून त्यांनी पोर्टहोलमध्ये शरीर कोंबले व समुद्रात उडी टाकली. बोटीवरील एका अधिकाऱ्याने ते पाहिले. कैदी पळाल्याची गोष्ट अधिकाऱ्यांच्या ध्यानात आली. काही शिपायांनी बोटीवरून सावरकरांच्या रोखाने गोळीबार केला. सुदैवाने त्यांना गोळी लागली नाही. काही शिपायांनी त्यांना पकडण्यासाठी लगेच समुद्रात उड्या टाकल्या. सुमारे मैलभर अंतर पोहत जाऊन सावरकर फ्रान्सच्या किनाऱ्याला लागले. किनारा गाठताच 'गाडी गाडी' असे ओरडत ते घोडागाडीच्या शोधासाठी पळू लागले. रस्त्यात एक फ्रेंच पोलीस उभा होता. सावरकर आश्रयासाठी त्याच्या-जवळ गेले. ते आता एका स्वतंत्र देशाच्या भूमीवर उभे होते. नियमाप्रमाणे आता त्यांना ब्रिटिश पोलीस पकडू शकत नव्हते. तथापि त्या फ्रेंच पोलीसाने आपल्या कर्तव्यपालनात कसूर केली. त्याने सावरकरांचा पाठलाग करणाऱ्या ब्रिटिश पोलीसांच्या स्वाधीन त्यांना केले.

सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा –

भारतात आणल्यावर सावरकरांवर खटला भरण्यात आला. सावरकरांनी भारतातून इंग्रजांचे राज्य घालवून देण्याचा प्रयत्न केला. इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करण्यासाठी पिस्तुले पुरविली इत्यादी आरोपांखाली त्यांना दोन जन्मठेपेची व पन्नास वर्ष काळ्यापाण्याची १९१० मध्ये शिक्षा ठोठावण्यात आली.

सावरकरांच्या हातापायात लोखंडी बेड्या ठोकण्यात आल्या व साखळ-दंड अडकविण्यात आले.

सावरकरांची अंदमानात रवानगी –

शिक्षा जाहीर झाल्यानंतर अंगात कैद्याचा पोषाख घातलेले सावरकर अंदमानास जाणाऱ्या बोटीकडे संगीनधारी पोलीसांच्या पहाऱ्यात चालले होते. त्यांच्या हातापायांना बांधलेले साखळदंड खळखळ वाजत होते. बुटांच्या थटथट

आवाजाला साखळदंडाचा खळखळ आवाज साथ देत होता. भारताचा किनारा सोडतांना सावरकर जमिनीवर वाकले. धरणीवरची चिमुटभर माती उचलून त्यांनी आपल्या कपाळी लावली, तोंडात घातली व धरणीमातेला वंदन केले. त्यांचे मन म्हणत होते, 'भारतमाते, तुझ्या स्वातंत्र्यासाठी मी हे सर्व केले. आई, मला तू कधी भेटशील ? आपल्या बाळाचा शेवटचा नमस्कार घे आणि आशीर्वाद दे.' केवढे हे देशप्रेम! केवढा हा देशाभिमान! केवढी ही देशभक्ती!

बोटीने भारताचा किनारा सोडला. भारतापासून तीन-चारशे कोसांवर अंदमान नांवाचे बेट आहे. त्या बेटावर अट्टल दरोडेखोर, खुनी व भयंकर अशा कैद्यांना ठेवण्यासाठी खूप कोठ्या असलेला एक तुरुंग आहे. त्याला 'सेक्युलर जेल' खोल्यांचा तुरुंग असे म्हणत असत. काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी तेथे ठेवण्यात येत असत. अंदमानाची हवा फार वाईट होती. कैद्यांच्या खोल्यांतून डास, ढेकूण, पिसवा व इतर किटक यांचा सुळसुळाट होता. गवतात असलेल्या जळवा कैद्यांच्या अंगात तोंड खुपसून त्यांचे रक्त शोषून घेत असत. जर एखाद्या कैद्याने मोठ्या प्रयासाने पळून जाण्याचा प्रयत्न केला तर तो जिवावर बेतत असे. अंदमान बेटावरील जंगलात तेथील मूळच्या रहिवासी रानटी लोकांची वसाहत होती. ते लोक नरमांसभक्षक होते. पळून जाणाऱ्या कैद्यांची ते लगेच शिकार करीत असत.

तुरुंगातील हाल –

अंदमानच्या राक्षसी तुरुंगात सावरकरांना ठेवले. तेथे त्यांना जड जाते ओढीत दळण दळावे लागे. काही वेळा त्यांना तेलघाण्याला बैलाप्रमाणे जुंपले जाई. काथ्यांचे दोर हाताने वळतांना त्यांचे तळहात रक्तबंबाळ होत. त्या राक्षसी श्रमांनी त्यांचा ऊर फुटून निघून तोंडातून रक्त येई. क्रुर जेलरचे चाबूकही खावे लागत. तरी देखील हा भारतीय स्वातंत्र्यवीर त्या यमयातनांना डरला नाही, नमला नाही. म्हणूनच सावरकर हा खरा मृत्युंजय वीर!

साखळदंडाने जखडलेला हा देशभक्त दिवसभरचे जीवघेणे काम करून संध्याकाळी अफाट पसरलेल्या या सागराच्या क्षितिजापलीकडे असलेल्या आपल्या मातृभूमीकडे दृष्टी रोखीत त्या सामर्थ्यवान सागराची मनोमन आळवणी करीत असे.

ने मजसी ने मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला ।।

मदनलाल धिंग्रा –

मदनलाल हा पंजाबी विद्यार्थी होता. त्याचे वडील अमृतसर येथे सिव्हिल सर्जनच्या हुद्यावर काम करीत होते. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची परवानगी मदनलालने वडिलांच्याजवळ मागितली. परंतु मुलाच्या हूड स्वभावामुळे वडिलांनी परवानगी नाकारली म्हणून एके दिवशी गुपचुपपणे घरातून बाहेर पडला. इंग्लंडला जाणाऱ्या बोटीवर इंजिनात कोळसे टाकण्याची नोकरी पत्करून तो इंग्लंडला गेला. तेथे तो स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करू लागला. लंडन शहरात असताना मदनलाल सावरकरांच्या सहवासात आला व 'अभिनव भारत' संस्थेचा सभासद झाला.

अवघड कामगिरी पार पाडली –

इंडिया हाऊसच्या माळ्यावरील एका खोलीत एकदा सावरकर एक काचेचे भांडे तापवित होते. त्या काचेच्या भांड्यात काही स्फोटक द्रव्ये होती. ते भांडे फारच तापले होते व लगेच खाली उतरविणे आवश्यक होते. नाहीतर काचपात्रातील द्रव्याचा मोठा स्फोट झाला असता. काचेचे भांडे पकडण्याचा चिमटा जवळपास मिळेना. पुढे घडणारी ही गंभीर घटना लक्षात येताच थोडाही विचार न करता सावरकरांच्याजवळ बसलेल्या मदनलालने उघड्या हाताने काचपात्र पकडून ते खाली उतरून ठेवले. तापलेल्या काचपात्राने मदनलालच्या हाताच्या तळव्याची नाजूक कातडी भाजून करपून गेली, तरी देखील स्वतःच्या दुःखापेक्षा पुढे घडणारा अनर्थ आपण टाळू शकलो, या विचाराने त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे स्मित झळाळत होते.

भारतमंत्र्याच्या चिटणीस कर्झन वायलीचा खून –

भारतातील राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्याचे धोरण व्हाईसरॉय कर्झनने अवलंबिले होते. बंगालची फाळणी, लाला लजपतराय यांची हद्दपारी, लोकमान्य टिळकांना ठोठावलेली शिक्षा. सावरकरांचे बंधू गणेश सावरकरांना दिलेली काळ्या पाण्याची शिक्षा, या सर्व गोष्टींना भारतमंत्र्याचा चिटणीस सर कर्झन वायली व भारताचा व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन हे दोघे जबाबदार आहेत, असे मदनलाल धिंग्रांना वाटले. त्या दोघांचा काटा काढण्याचा बेत त्यांनी मनाशी ठरविला. आपल्या योजनेची पूर्वतयारी म्हणून त्यांनी एक पिस्तुल विकत घेतले व नेमबाजी शिकले.

आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मदनलालने सर कर्झनशी परिचय करून घेतला. व त्यांचेकडे वारंवार जाणे-येणे सुरू केले. थोड्याच दिवसात धिंग्रांनी कर्झन वायलीचा विश्वास संपादन केला. कर्झन वायलींना वाटले, या तरुण मुलाच्या पोटात शिरून क्रांतिकारकांच्या गटातील गुप्त बातम्या काढून घेण्याचा मार्गच उपलब्ध झाला आहे.

दि. १ जुलै १९०९ हा दिवस, 'नॅशनल इंडियन असोसिएशन' या संस्थेचा वार्षिक दिन. वार्षिक दिनानिमित्त खाणे पिणे, व्याख्याने अशा पद्धतीने तो साजरा झाला. सर कर्झन वायली हा त्या संस्थेचा सभासद होता. मदनलाल देखील त्या संस्थेचे सभासद होते. समारंभ संपला. सर कर्झन वायली जाण्यासाठी बाहेर पडू लागले. मदनलाल देखील त्यांच्यामागून गेले. त्यांनी पंजाबी पद्धतीचा पेहराव केला होता. डोक्यावर पंजाबी पद्धतीची टोपी व तिच्याभोवती साप्ता (फेटा) गुंडाळला होता. अंगरख्यात दोन तीन पिस्तुले व एक मोठा चाकू लपवून घेतलेला होता. जणू काही गुप्त बातमी सांगण्याच्या तोऱ्यात त्यांनी कर्झन वायलीच्या कानाजवळ तोंड नेले. इतक्यात खिश्यातून पिस्तुल काढून मदनलालने कर्झन वायलीच्या तोंडावर गोळी झाडली. कर्झन वायली जमिनीवर कोसळला. कर्झनला वाचविण्यासाठी लालकाका नावाचा पारशी डॉक्टर मध्ये पडला. त्याच्यावरही गोळी झाडून मदनलालने त्याला ठार केले. त्यानंतर स्वतःच्या कपाळावर गोळी झाडण्यासाठी मदनलालने पिस्तुल वर केले इतक्यात जमलेल्या लोकांपैकी काहीजणांनी त्यांच्या हातातील पिस्तुल काढून घेतले व यांना पकडले.

मदनलाल धिंग्रांना फाशी –

मदनलाल यांना पकडल्यानंतर त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यात त्यांना फाशीची शिक्षा होऊन त्यांना दि. १७ ऑगष्ट १९०९ रोजी लंडन शहरातील पेंटन व्हिले कारागृहात फाशी देण्यात आली.

लंडनमध्ये असलेल्या काही राजनिष्ठ हिंदी लोकांनी मदनलालच्या कृत्याचा धिक्कार करण्यासाठी एक सभा ठरविली. त्या सभेस मदनलालचा निषेध करणारा ठराव आला. त्यावेळी सावरकर उभे राहिले व म्हणाले, "या निषेधाचा ठरावास माझा विरोध आहे." सावरकरांचे हे शब्द ऐकताच एका इंग्रज माणसाने रागाने त्यांच्या तोंडावर बुक्का मारला. त्यांचे तोंड रक्तबंबाळ झाले.

मदनलाल यांनी फाशीच्या शिक्षेची वार्ता ऐकली तेव्हा त्यांच्या मनाची थोडी देखील चलबिचल झाली नाही. मातृभूमीच्या प्रेमाने त्यांचे हृदय किती भारावले होते व मृत्यूदंडाच्या शिक्षेला ते किती धैर्याने सहजतेने सामोरे जात होते, हे त्यांनी न्यायालयात पुढीलप्रमाणे केलेल्या त्यांच्या भाषणावरून दिसून येईल.

"देशभक्त हिंदी युवकांच्या निर्दय फाशीच्या शिक्षांचा आणि सीमापारींचा अल्पसा सूड म्हणून परवा एका इंग्रजाचं रक्त सांडण्याचा मी प्रयत्न केला, हे मी मान्यच करतो. या प्रयत्नात माझ्या सद्सद्विवेक बुद्धीवाचून दुसऱ्या कोणाचाही मी विचार घेतला नाही.

माझा असा विश्वास आहे की, परकीय संगिनीच्या साहाय्याने परदास्यात जखडलेलं राष्ट्र हे नित्य युद्धमानच असतं. नि:शस्त्र जमातीला उघड युद्ध करणं अशक्य असल्यानं मी दबा धरून हल्ला चढवला. मला बंदूका मिळू शकल्या नाहीत, म्हणून मी माझं पिस्तुल बाहेर काढल आणि झाडल.

हिंदू म्हणून माझी अशी भावना आहे की, माझ्या मातृभूमीवर झालेला अन्याय हा परमेश्वराचा अपमान होय. तीच कार्य हे प्रभुरामचंद्राच कार्य आहे. तीची सेवा ही श्रीकृष्णाची सेवा आहे. निकृष्ट प्रकृतीच्या नी बुद्धीच्या माझ्यासारख्या मुलाजवळ स्वत:च्या रक्तावाचून मातेला अर्पण करता येईल असं दुसरं काही नाही आणि म्हणून मी तेच तिच्या वेदीवर अर्पण केलं आहे.

हिंदुस्थानला सध्या ज्या एकाच शिकवणीची गरज आहे, ती म्हणजे आत्मबलिदान कसं करावं ही होय, आणि ती शिकवण देण्याचा मार्ग म्हणजे स्वत:चं आत्मार्पण करणं हा होय. म्हणून मी आत्मयज्ञ करीत आहे आणि माझ्या हौतात्म्याचा मला अभिमान वाटत आहे. परमेश्वराजवळ माझी इतकीच प्रार्थना आहे की, हे कार्य यशस्वी होऊन मानवाच्या हितासाठी आणि परमेश्वराच्या वैभवासाठी ती स्वतंत्र होईपर्यंत याच मातृभूमीच्या पोटी मला पुनर्जन्म प्राप्त होवो आणि त्याच पवित्र कार्यात मला पुन्हा मृत्यू येवो."

सेनापती बापट –

पुण्यातील डेक्कन कॉलेजात शिकत असताना समोर नंगी समशेर ठेवून, तिच्या धारदार, चकाकत्या पात्याला हाताच्या बोटांनी स्पर्श करून सेनापती बापट हलक्या आवाजात म्हणत होते, "मी पांडुरंग महादेव बापट, या नंग्या

समशेरीची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञा करतो की, माझ्या परतंत्र मायभूमीला स्वतंत्र करण्यासाठी मी आजपासून कायावाचा मनाने झटेन, आणि तिची हाक येताच तिच्या सेवेसाठी धावत येईन. या कामी मला देहाचा होम करावा लागला तरी मी फिरून याच भरतखंडात (भारत) जन्म घेईन व अपुरे राहिलेले काम पुरे करून दाखवीन. ही माझी प्रतिज्ञा पुरी करण्यास श्रीहरी मला जरूर ती बुद्धी, युक्ती आणि शक्ती देवो ! वंदे मातरम् ! ''

शपथ घेणारा सेनापती बापट हा कॉलेज विद्यार्थी नगर जिल्ह्यातील पारनेर ह्या तालुक्याच्या गावचा राहणारा. त्याचे आईवडील पारनेरपासून थोड्या अंतरावर डोंगराच्या पोटाशी असलेल्या गणेशखिंडीतील गणपतीच्या मंदिरात राहात होते. ते नियमित गणपतीची पूजाअर्चा करीत असत.

यांत्रिकी शिक्षणासाठी इंग्लंडला प्रयाण –

बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावर पुढील उच्च शिक्षणासाठी बापट विलायतेला गेले. एडिंबरो (आयर्लंड) येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयात यांत्रिकी शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रवेश घेतला. बापटांचे मन अभ्यासात लागत नव्हते. त्यांचे मन लागले होते पारतंत्र्यात पडलेल्या मातृभूमीकडे. भारतातून इंग्रजांचे राज्य घालविले पाहिजे, हा एकच विचार सदोदित त्यांच्या मनात घोळत होता. त्यादृष्टीने बापटांनी स्वतः तयारी सुरू केली.

बाँब बनविण्याची विद्या आत्मसात –

बापटांनी प्रारंभी क्वीन्स रायफल पलटणीत लष्करी शिक्षण घेण्यासाठी नाव नोंदविले. गुप्तपणे दारुगोळा तयार करून त्याच्या सहाय्याने इंग्रज अधिकाऱ्यांवर हल्ले केले पाहिजेत तरच भारतातील इंग्रजी सत्ता संपुष्टात येईल. अशी त्यांची समजूत झाली.

वरील विचारामुळे त्यांनीं औषधे विकणाऱ्या एका जर्मन व्यापाऱ्याशी मैत्री केली. बाँब बनविण्याचे एक हस्तलिखित त्यांच्याजवळ होते. परंतु ते रशियन भाषेत होते. डॉ. अन्याखोस ही रशियन विद्यार्थीनी जर्मनीतील बर्लिन शहरात वैद्यकीय महाविद्यालयात शिकत होती. बापटांनी तिच्याशीही मैत्री केली. बाँबच्या कृतीच्या रशियन भाषेतील हस्तलिखिताचे डॉ. अन्याखोसने बापटांना इंग्रजीत भाषांतर करून दिले. त्या कामामुळे त्या बिचारीचा अभ्यास बुडून वर्ष वाया

गेले. परंतु पारतंत्र्यातील लोकांच्या प्रयत्नांना आपण हातभार लावीत आहोत या विचारामुळे अभ्यासाचे वर्ष वाया गेल्याबद्दल तिला वाईट वाटले नाही. अशा रितीने बापटांनी बॉंब बनविण्याची विद्या आत्मसात केली.

बॉंब तयार करून इंग्रजांच्या पार्लमेंटवर टाकण्याचा बापटांचा बेत होता. तथापि तसे केल्याने आपल्या पुढील कामात संकट येईल, असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना सांगितले. यावेळी बॉंबच्या कृतीच्या भाषांतराचे फोटो घेऊन त्या फोटोच्या प्रती बापटांनी भारतात पाठवून दिल्या. त्यानंतर बापट १९०८ मध्ये भारतात परत आले. बापटांनी पाठविलेल्या माहितीवरून बंगाल प्रांतात क्रांतिकारकांनी इंग्रजांवर हल्ले करून त्यांना भारतातून घालवून देण्यासाठी बॉंब तयार केले.

बॉंब बनविण्याची माहिती बापटांनी पुरविण्यासंबंधीची वार्ता पोलीसांना कळली. तेव्हा पुणे सोडून ते भूमिगत झाले. भूमिगत असतांना त्यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली. पुढे शिक्षकाची नोकरी केली. यावेळी इंग्रज पोलीस एकसारखे त्यांचा शोध करीत होते. शेवटी बापट पकडले गेले. परंतु त्यांच्यावर कोणतेही आरोप सिद्ध न झाल्यामुळे सरकारने त्यांना सोडून दिले.

त्यानंतर लोककल्याणासाठी बापटांना बऱ्याचवेळा तुरुंगात जावे लागले. ते अतिशय शिस्तप्रिय होते. तुरुंगाचे नियम ते काटेकोरपणे पाळीत. त्यांना भेटण्यासाठी काही लोक तुरुंगात गेले. भेटीचा वेळ पंधरा मिनिटांचा असे. त्यांच्या छोट्या मुलीने त्यांच्यासाठी झग्याच्या खिशात खाऊ आणला होता. तुरुंगाच्या नियमाप्रमाणे कैद्याला घरून आणलेले पदार्थ देता येत नाहीत. त्या छोट्या मुलीला या गोष्टीची काय कल्पना! बालस्वभावानुसार ती वडिलांना खाऊ देऊ लागली. सेनापतींनी नकारार्थी मान हालविली. "तुरुंगाच्या नियमाप्रमाणे मला तो खाऊ घेता येणार नाही, बाळ. शिवाय भेटीची पंधरा मिनिटेही संपत आली आहेत. तेव्हा, "तुम्ही जा" असे सांगून सेनापती तुरुंगाच्या आत जाऊ लागले. तेव्हा त्यांच्या छोट्या मुलीच्या डोळ्यातून गंगा-यमुना वहात होत्या. तुरुंगाच्या शिपायाचे डोळे देखील पाणावले होते.

अनंत कान्हेरे –

सावरकरांनी 'अभिनव भारत' संस्थेची स्थापना केली तेव्हा हत्यार-बंदीच्या कायद्यामुळे इंग्रजी राज्यात हत्यारे मिळत नव्हती. औरंगाबाद येथील

गंगाराम रूपचंद यांच्याकडे नासिकहून ' अभिनव भारत ' चे काही सभासद हत्यारे खरेदी करण्यासाठी गेले. कारण औरंगाबाद हे निजामाच्या राज्यात होते. तेथे हत्यारबंदीचा कायदा लागू नव्हता. त्यांनी औरंगाबाद येथे जंबिये, पिस्तुले, समशेरी इ. हत्यारांची खरेदी केली. त्यानंतर गप्पा चालू असतांना गंगारामकडे अनंता कान्हेरे नावाचा अठरा-एकोणीस वर्षांचा एक तरुण आला. तो गंगारामचा मित्र होता. व्यायाम शाळेत अनंताची महाराष्ट्रीयन तरुणांची ओळख झाली. त्यांच्या सान्निध्याने अनंताच्या मनात सशस्त्र क्रांतिच्या विचाराचे वारे वाहू लागले. त्यामुळेच अनंत कान्हेरे हा गंगारामकडे आलेल्या नाशिकच्या मंडळीच्या संभाषणात सामील झाला.

नाशिक शहरात एक गाडीवान गाडी रस्त्याने जात होता. मागून वुईल्यम्स नावाच्या एका इंग्रज इंजिनियरची बगी येत होती. गाडीवानाचे बैल मरतुकडे असल्याने लवकर कडेला होईनात. काळा माणूस आपल्याला वाट देत नाही, हे पाहून त्या गोऱ्या इंजिनियरचे पित्त भडकले. तो बगीच्याखाली उतरला व हातातील कातडी चाबकाचे फटकारे त्याने भराभर त्या गाडीवानाच्या अंगावर ओढले. गाडीवानाच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. त्यातच पुढे त्याचा अंत झाला. त्या गोऱ्या इंजिनियरवर खटला भरला गेला. खटला जॅक्सन या मजिस्ट्रेटपुढे चालला. त्याने आपल्या गोऱ्या देशबांधवाला निर्दोष सोडले. त्याच्या मानाने, एका जित काळ्या माणसाचे प्राण कवडीमोलाचे होते. तसेच देशभक्तीपर कवितांचे पुस्तक प्रकाशित केले म्हणून सावरकरांचे वडील बंधू गणेश दामोदर सावरकर यांना जॅक्सनने काळ्या पाण्याची शिक्षा देऊन अंदमानला पाठविले होते.

ह्या गोष्टी अनंता कान्हेरे याच्या कानावर आल्या होत्या. म्हणून शस्त्रे घेण्यास आलेल्या नासिककर मंडळींची त्याने हेटाळणी केली. नासिकला एवढा जुलूम करणारा अधिकारी अद्याप जिवंत कसा राहू शकला, असे अनंताने त्यांना हिणविले. आपणास पिस्तुल चालविण्याचे शिकविल्यास आपण जॅक्सनला ठार करण्यास तयार आहोत, असे अनंत म्हणाला.

यानंतर काही दिवसांनी अनंतला नासिककरांनी नासिक येथे बोलाविले. अनंता जॅक्सनचा खरोखर खून करण्यास पात्र आहे की नाही, त्यांच्या अंगी एवढे धैर्य आहे की नाही, यात्री क्रांतिकारकांना खात्री करून घेण्यासाठी अनंताची परिक्षा पहावयाची होती.

अनंता कान्हेरे कसोटीला उतरला –

अनंताच्या धैर्याची नाशिककरांना शंका आल्यामुळे त्याची कसोटी पहाण्याचे ठरवून त्याच्या समोर जळत असलेल्या दिव्याची तापलेली काच अनंताने हातात घट्ट पकडून ठेवली. हाताच्या कोमल कातडीला खूप चटके बसत असतांनाही त्याने हुं की चूं केले नाही. त्याच्या मनाची अशी खंबीर तयारी पाहून त्याला नंतर पिस्तुलाची नेमबाजी करण्याचे शिक्षण देण्यात आले. आणि अनंता आता जॅक्सनचा खून करण्यास सिद्ध झाला. 'अभिनव भारत' सभासदांच्या कसोटीला अनंता उतरला.

विजयानंद नाट्यगृहात जॅक्सनचा खून –

कलेक्टर जॅक्सनची नाशिकहून मुंबईस वरिष्ठ जागेवर बदली झाली होती. जॅक्सनला संस्कृत भाषेची आवड होती. याचवेळी नासिक येथे किर्लोस्कर नाटक मंडळीचा मुक्काम होता. 'शारदा' या नाटकाचा प्रयोग पाहाण्यास जॅक्सन-साहेबांनी येण्याचे मान्य केले होते. त्याच्याच सुचनेवरून मंगळवार दिनांक २१–१२–१९०९ या दिवशी रात्री ते नाटक करण्याचे ठरले.

ठरलेल्या दिवशी नासिकचे विजयानंद नाट्यगृह प्रेक्षकांनी फुलून गेले होते. अनंता कान्हेरे हा नाटकाचे टिकीट काढून नाट्यगृहात खुर्च्यांच्या रांगां-मागील बाकावर प्रवेशद्वाराजवळच बसला. त्याचे साथीदार कृ. गो. कर्वे (अण्णा) व पंचवटीतील शिक्षक वि. ना. देशपांडे थोड्या अंतरावर वेगवेगळ्या जागी बसले होते. नाटकाला सुरवात झाली. तरी सुद्धा नाटकाचा मुख्य पाहुणा जॅक्सन आला नव्हता. प्रेक्षकांची अंतःकरणे आनंदाने बहरून गेली. तथापि अनंता कान्हेरे याचे व मन ही रंगभूमीवरच्या त्या झगमगाटाने व सुंदर दृश्याने इतरांप्रमाणे बहरलेले नव्हते. त्याची दृष्टी आपल्या सावजाचा वेध घेत प्रवेशद्वारा-जवळ खिळली होती. आणि इतक्यात जॅक्सन प्रवेशद्वारातून आत आला. तो खुर्च्यांच्या रांगेत मध्यभागी बसण्यास जाऊ लागला तोच अनंताने चित्याच्या वेगाने त्या दिशेला झेप घेऊन जॅक्सनच्या पाठीवर पिस्तुलाने गोळी झाडली. लगेच जॅक्सनच्या समोर जाऊन त्याने एकामागून एक अशा गोळ्या त्याच्या छातीवर मारल्या. जॅक्सनचे शरीर रक्ताच्या थारोळ्यात पडले.

अनंताला पकडण्यात आले. त्याच्या जवळचे पिस्तुल पोलीसांनी हस्तगत केले. ते पितुल व तशीच आणखी एकोणीस पिस्तुले सावरकरांनी इंग्लंडमधून

, अभिनव भारत ' संस्थेकडे गुप्तरितीने पाठविली होती, असे तपासात आढळून आले. म्हणूनच सावरकरांना लंडन येथे पकडण्यात आले.

अनंतास फाशीची शिक्षा –

कोर्टात खटला चालून अनंता कान्हेरे व त्याचे दोन साथीदार कर्वे व देशपांडे शिक्षक यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. न्यायमंदिरातील अनंता कान्हेरेंची जबानी पुढीलप्रमाणे होती. " जनतेच्या न्यायालयातील नियम असा आहे कि, जो हिंदी लोकांचे प्राण कवडीमोल आहे असे सुचवितो, त्या अपराध्याला देहांताची शिक्षा देण्यात यावी, ती शिक्षा जॅक्सनला देण्याचे काम माझ्या अंगावर पडल्याने मी ही गोष्ट केली आहे. इंग्रजांच्या जुलमाचा सूड उगविण्यासाठी मी हे कृत्य केले आहे. "

फाशी जाण्याच्या आदल्या दिवसाची रात्र. उद्या आपले प्राण जाणार या भीतीने त्या तिघांच्या मनात विचारांची कालवाकालव चालली नव्हती. याऊलट आयुष्यात घेतली नसेल इतकी गाढ झोप त्यांना लागली होती. कदाचित कर्तव्यपूर्तीच्या आनंदाची ती समाधी असेल ! पहारेकऱ्याने त्यांना जागे केले. प्रातर्विधी व स्नान करून मातृभूमीचे नामस्मरण करीत त्यांनी प्रफुल्लीत मनाने स्वतःच्या हातांनी दोराचे फास आपल्या गळ्याभोवती अडकून घेतले.

अनंता कान्हेरेच्या कृत्यामुळे व त्याला झालेल्या फाशीच्या शिक्षेमुळे उभा महाराष्ट्र हळहळला. परिणामी गोऱ्या सरकारविरुद्ध भारतीय जनतेत चीड व सूडाची भावना निर्माण झाली. जागृती निर्माण होऊन लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यास मोलाची मदत झाली. देशप्रेम व देशशक्ती या गोष्टी लोकांना समजल्या. स्वातंत्र्याचा अर्थही समजला. त्यामुळेच पुढे अनेक तरुण क्रांतिकारी विचारांचे बनून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले.

खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी –

बंगालमधील तरुणांचा शपथविधी :

मध्यरात्रीची वेळ होती. मंदिरातील अंधार समयांच्या ज्योतींच्या प्रकाशात उजाळला होता. त्या मंद प्रकाशात कालीमातेची शस्त्रधारी मूर्ती उग्र दिसत होती. त्या देवीच्या मूर्तीसमोर पूजेचे साहित्य असून देवीपुढे काही तरुण बसले

होते. स्वत:च्या सुखासाठी देवीजवळ मागणे मागण्यासाठी जमलेले ते भक्त नव्हते' तर कालीमातेला साक्ष ठेवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी गुप्तरितीने टक्कर देण्यासाठी सज्ज झालेला तो बंगालमधील तरुणवर्ग होता. या तरुणांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची शपथ देवीसमोर घेतली होती. इ. स. १९०५ च्या पुढे बंगालमध्ये ठिकठिकाणी देवीच्या मंदिरात व काही ठिकाणी स्मशानात देखील वरील प्रकारचा शपथविधी होत होता.

भारतात इंग्रजांचे पाय रोवले गेले ते प्रथम बंगालमध्ये, त्यामुळे पाश्चात्य शिक्षणाचा सर्वांत प्रथम व सर्वात अधिक परिणाम झाला तो बंगाली लोकांवर. इंग्रजी शिक्षणाने काही खर्डेघाशी कारकून तयार झाले, तसेच इंग्रजी वाघिणीच्या दुधाने करारी विचारवंतही निर्माण झाले होते. इंग्रजांचे राज्य हे वरदान नसून शाप आहे, अशी पक्की खात्री त्या करारी बंगाल्यांची झाली होती. त्यात पुन्हा कर्झनने बंगाली लोकांची चळवळ दडपून टाकण्यासाठी बंगाल प्रांताचे दोन तुकडे पाडले. शाळा-कॉलेजात जाणाऱ्या भावनाप्रधान तरुणांना बंगालची फाळणी म्हणजे आपल्या मातृभूमीच्या हृदयावर केलेला जिव्हारी वारच वाटला. त्यांची मने सूडाने पेटली.

अनुशीलन समितीची स्थापना –

'अनुशीलन समिती' नावाची गुप्त संघटना डाका व कलकत्ता या ठिकाणी स्थापन करण्यात आली. तिच्या शाखा ठिकठिकाणी उघडल्या गेल्या. जिवावर उदार झालेले बंगाली तरुण या गुप्त संघटनेत सामील झाले. गोऱ्या अधिकाऱ्यांचा प्राण घेण्यासाठी गुप्तपणे पिस्तुले व बंदुका जमविण्याचे काम सुरू झाले. बाँब तयार करण्याची विद्याही बंगाली क्रांतिकारकांनी सेनापती बापटांकडून आत्मसात केली. बारिंद्रकुमार घोष यांचा माणिकतोळा बाग म्हणजे बंगाली क्रांतिकारकांचा अड्डा बनला. तेथे बाँब तयार करण्यात येऊ लागले.

किंग्जफोर्ड मॅजिस्ट्रेटवर हल्ला करण्याचा प्रयत्न –

बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' सरकारने बेकायदा ठरविली. क्रांतिकारकांची धरपकड सुरु झाली. इंग्रज न्यायाधिश व मॅजिस्ट्रेट क्रांतिकारकांना जरब बसावी म्हणून जबर शिक्षा ठोठावू लागले. त्यामुळे क्रांतिकारक अधिकच भडकले.

किंग्जफोर्ड हा मुजफरपूरचा जिल्हा मॅजिस्ट्रेट होता. त्याने क्रांतिकारकांना जबर शिक्षा ठोठावल्या होत्या. त्यामुळे तो क्रांतिकारकांच्या डोळ्यात सलत होता. खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी हे अठरा-एकोणीस वर्षांचे तरुण यांच्यावर किंग्जफोर्डवर हल्ल्याची कामगिरी सोपविण्यात आली. याचवेळी किंग्जफोर्डने बजावलेल्या कामगिरीमुळे सरकारने त्यास जिल्हान्यायाधिश म्हणून बढतीच्या जागेवर नेमले. सर्व इंग्रज अधिकारी व त्यांच्या बायका संध्याकाळी एका क्लब-मध्ये जमत असत. किंग्जफोर्डला रात्री क्लबमधून परत जात असता त्याला दि. ३० एप्रिल १९०८ ला ठार मारण्याचे ठरले. ठरल्यानुसार खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी हे पिस्तुल व बॉंब घेऊन क्लबच्या जवळपास दबा धरून बसले. काही वेळाने क्लबमधून एक बगी बाहेर पडली. ती किंग्जफोर्डच्या बगी-सारखीच होती. त्या बगीत किंग्जफोर्डच असणार या कल्पणेने खुदीराम बोसने त्या बगीवर बॉंब फेकला. बॉंबच्या स्फोटाबरोबरच स्त्रियांच्या किंकाळ्याचे आवाज उठले. त्या बगीत किंग्जफोर्ड नसून सरकारी वकील केनेडी यांची पत्नी व मुलगी होती. बॉंबच्या स्फोटात त्या दोघीही ठार झाल्या. आणि किंग्जफोर्ड सुदैवाने वाचला.

बॉंबचा स्फोट झाल्यानंतर खुदीराम व प्रफुल्ल चाकी हे दोघेही अंधारात पळत सुटले. परंतु त्यांना रेल्वे स्टेशनवर संशयावरुन पकडण्यात आले. पोलीसांनी खुदीरामला विचारलेल्या प्रश्नाना योग्य उत्तरे देता आली नाही. त्यांना अटक करून चौकीवर नेण्यात आले. त्यात प्रफुल्ल चाकीने स्वत:जवळच्या पिस्तुलाने स्वत:च्या कानशिलावर गोळी झाडून प्राणत्याग केला.

यानंतर पुन्हा पुस्तकाच्या पोकळीत बॉंब ठेवून ते पुस्तकाचे पार्सल किंग्ज-फोर्डकडे पाठविण्यात आले. परंतु त्याचे नशिब शिकंदर. यावेळीही तो वाचला.

अलीपूर खटला –

सरकारने कटाचा शोध सुरु केला. माणिकतोळा बाग व बागेतील बारिंद्र कुमार घोष यांचे घर यावर पोलीसांनी छापा घातला. तेथे त्यांना बॉंब, बॉंब बनविण्याचे साहित्य, पिस्तुले बंदुका मिळाल्या. म्हणून अरविंद घोष, बारिंद्र कुमार, नरेन्द्र गोस्वामी, सत्येन्द्र बोस, कन्हैयालाल दत्त इ. पंचवीस क्रांति-कारकांना पकडण्यात येऊन त्यांच्यावर खटला भरण्यात आला. अलीपूर कट खटला अथवा माणिकतोळा बाग कटाचा खटला म्हणून तो प्रसिद्ध आहे.

न्यायालयात खटला चालू झाला. खुदीराम बोसला फाशीची शिक्षा ठोठावली. ११ ऑगस्ट १९०८ रोजी खुदीराम बोस हातात गीता घेऊन हसत मुखाने फासावर गेले. खुदीराम बोसच्या उदात्त मरणामुळे त्यांच्या जाळलेल्या देहाची पवित्र राख जनतेने सोन्याचांदीच्या करंडकातून ठेविली.

सत्येंद्र व कन्हैयालाल दत्त –

सत्येंद्रनाथ बोस, कन्हैयालाल दत्त, उल्हासकर दत्त, इंदुभूषण रॉय हे सर्व क्रांतिकारक माणिक तोळा बागेत सापडलेली शस्त्रास्त्रे, बाँब व अन्य दारूगोळा या प्रकरणी पकडले गेले. कन्हैयालाल दत्त हे चंद्रनगरला राहून कलकत्त्यातील आपल्या साथीदारांना शस्त्रास्त्रे पुरवीत.

माणिकतोळा बागेत पकडलेल्या क्रांतिकारकांकडून कटाची माहिती करून घेण्यासाठी पोलीसांनी त्यांचा अतोनात छळ केला. त्यात याच प्रकरणी नरेंद्र गोस्वामी याचा भयंकर छळ झाला. त्या शारिरीक यातनांना कंटाळून नरेंद्र गोस्वामी हा माफीचा साक्षीदार झाला व त्याने क्रांतिकारकांच्या कार्यासंबंधी पोलीसांना माहिती दिली. आपण क्रांतिची दीक्षा दिलेला नरेंद्र गोस्वामी याने फितूर होऊन संघटनेचा घात करावा हे पाहून कन्हैयालाल दत्त यांना मनस्वी दु:ख झाले. त्या विश्वासघातकी माणसाचा काटा काढण्याचे त्यांनी ठरविले. पण हे कसे शक्य करावे? कारण ते सुद्धा इतर क्रांतिकारकांच्या बरोबर अलीपूरच्या कारागृहात होते.

नरेंद्र गोस्वामीस फितुरीचे बक्षीस –

कन्हैयालालने न्यायालयातून एका साक्षीदाराला आपणास तुरुंगात पिस्तुल पाठविण्यासंबंधाने सांकेतिक भाषेत कळविले. इशाऱ्याचा संदेश मिळालेल्या साथीदाराने चार-आठ दिवस टेहळणीवर राहून तुरुंगात दैनंदिन जाणाऱ्या व येणाऱ्या व्यक्ती व वहाने यांच्या व्यवहारावर लक्ष देवून मग आपला बेत आखला. कारागृहाच्या आवारात रोज जी गवताची गाडी येते, त्या गाडीचा गाडीवान बनून नेहमीप्रमाणे आपण ती गाडी घेऊन आत येऊ, त्या-वेळी तयार रहावे, असा संदेश त्याने कन्हैयास दिला.

ठरल्यानुसार तो साथीदार गाडीवान बनून नेहमीप्रमाणे गवताची गाडी घेऊन तुरुंगाच्या महाद्वारातून आत शिरला. कन्हैयाजवळ गाडी येताच पेंढ्या

पडल्याचे निमित्त करून त्याने गवताच्या पेंढीतून कन्हैयास पिस्तुल देऊन खाली पडलेल्या पेंढ्या गाडीवर टाकून गाडी पुढे हाकारली.

पिस्तुल मिळताच कन्हैयाने आपण आजारी असल्याचे निमित्त करून दवाखान्यात प्रवेश मिळवला. आणि त्यांनी एका आजारी कैद्याच्या हाती नरेंद्र गोस्वामीस आपणही माफीचे साक्षीदार होणेस तयार आहे. यासाठी तू आम्हाला दवाखान्यात एकांतात येऊन भेट व सल्ला दे. सत्येंद्र व कन्हैयांनी पाठविलेला निरोप मिळताच नरेंद्रला फार आनंद झाला. सत्येंद्र व कन्हैयालाल आपल्या जोडीला येणार असल्यामुळे आता आपणास क्रांतिकारकांपासून फार धोका नाही, असे त्याला वाटले. त्यानुसार नरेंद्रने भेटीची परवानगी मिळवून सत्येंद्र व कन्हैयास दवाखान्याच्या एका खोलीत भेटला. भेटीच्या वेळी युरोपियन शिपायाला दूर उभे केले. इतक्यात कन्हैयाने खिशातून पिस्तुल काढून नरेंद्रावर गोळी झाडली. नेम चुकला. ती त्याच्या पायाला लागली. तो लंगडत तुरुंगाच्या कार्यालयाकडे पळू लागला. कन्हैयाने नरेंद्रला गाठून पुन्हा त्याच्यावर भराभर गोळ्या झाडल्या. नरेंद्र रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. त्याला लाथ मारीत कन्हैया संतापाने म्हणतात.

" हे घे फितुरीचे बक्षिस. " नरेंद्राची कोर्टापुढे होणारी जबानीच सत्येंद्र कन्हैयाने बंद केली.

नरेंद्र गोस्वामीच्या खूनाबद्दल कन्हैयालाल दत्त यांना १० नोव्हेंबर १९०८ रोजी अलीपूरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली. त्यांचा देह त्यांच्या नातेवाईकांनी तुरुंगाबाहेर आणला. त्या हुतात्म्याच्या मृतदेहाला अत्तर व चंदनाची उटी लावून शेवटचे स्नान घालण्यात आले. सुवासिनींनी अत्तराच्या निरंजनांनी ओवाळले. फुलांच्या थराने तो देह झाकाळला गेला होता.

कन्हैयालालच्या जंगी अंतयात्रेमुळे सत्येंद्रनाथाचे प्रेत सरकारने त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यात न देता तुरुंगाच्या आवारात त्याचे दहन केले. २१ नोव्हेंबर १९०८ ला सत्येंद्राना फाशी दिले. फाशी जाण्यापूर्वी वेदांतील संस्कृत मंत्र म्हणत होते.

सुशील सेन-

कौरव-पांडवांच्या युद्धात छोट्या अभिमन्यूने भीमपराक्रम करून अभेद्य असा चक्रव्यूह भेदला आणि कौरवांच्या सैन्याला त्राही भगवान करून सोडले.

व्यूहाच्या चक्रात सापडलेल्या बालअभिमन्यूवर कौरवांच्या शेकडो गदा व समशेरी कोसळल्या. अभिमन्यूला वीरमरण आले, परंतु त्याच्या दिव्य पराक्रमाने भरतभूमीची कूस पावन झाली. एका अभिमन्यूच्या बलिदानाबरोबर शौर्याची ती उज्वल परंपरा विराम पावली नाही. तेव्हांपासून तो आतापर्यंत तशा शेकडो अभिमन्यूंना जन्म दिला आहे. त्याचे नांव सुशील सेन.

भूपेंद्रनाथ दत्त हे स्वामी विवेकानंदांचे बंधू. त्यांच्या लेखणीतून स्त्रावणाऱ्या अक्षरातून विजेची धारा वहात होती. वीरेंद्रकुमार घोष या क्रांतिकारकाच्या 'वंदे मातरम्' या वृत्तपत्रात भूपेंद्रनाथ दत्त इंग्रजांच्या जुलमी राजवटीवर स्फोटक लिखाणाच्याद्वारे ताशेरे ओढीत होते. त्यामुळे त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून सरकारने भूपेंद्रनाथांवर खटला भरला.

सन २६ ऑगष्ट १९०७ रोजी कलकत्त्याच्या कोर्टात खटला सुरू झाला. बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी बिपिनचंद्रपाल यांना सरकारने भूपेंद्रनाथांच्या विरुद्ध साक्ष देण्यासाठी कोर्टात बोलविले होते. परंतु पालबाबूंनी साक्ष देण्यास साफ नकार दिला. त्यामुळे इंग्रज न्यायधिश संतापला. त्याने कोर्टाच्या अवमानाच्या आरोपावरून पालबाबूंना सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा केली. हा निकाल ऐकताच कोर्टाबाहेर जमलेल्या हजारो बंगाली लोकांनी 'वंदे मातरम्' च्या आरोळ्या दिल्या. ते पाहून पोलीसांनी लाठीहल्ला केला.

सुशील सेनचा गोऱ्या अधिकाऱ्यावर हल्ला –

लोकांच्या अंगावर रुपासप लाठ्या पडू लागल्या. इतक्यात सुशील सेन हा चौदा-पंधरा वर्षांचा विद्यार्थी त्या रस्त्याने जात होता. पोलीस निर्दयपणे गरीब जनतेवर हात टाकीत असल्याचे पाहून त्याचे हृदय द्रवले. त्याचे रक्त एकदम तापले. नागाच्या त्वेषाने त्याने लाठीप्रहार करणाऱ्या एका गोऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर झडप घालून त्याच्या हातातून लाठी हिसकावून घेतली आणि त्याच लाठीने त्याचे शरीर फोडून काढले. पोलीस अधिकारी रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळला. सुशील सेनला पोलीसांनी पकडून त्याच्यावर खटला भरला. न्यायधिशाने सुशीलसेनला पंधरा फटक्यांची सजा ठोठावली. तुरुंगाच्या आवारात सुशीलच्या कोवळ्या अंगावर वेताचे फटके बसत असतांना रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. तरीही त्याने हुं का चूं केले नाही. तुरुंगातून बाहेर पडताच जनतेने त्याची मिरवणूक काढली. त्याच्या सन्मानार्थ विराट सभा भरून

बंगालचे प्रसिद्ध पुढारी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या हस्ते त्याला सुवर्णपदक देऊन जनतेने ' वंदे मातरम् ' च्या जयघोषात त्याचा गौरव केला.

पुढे सुशील सेनच्या नेतृत्वाखाली तरुण मुलांनी एके रात्री रामकुवर सावकाराच्या घरावर सशस्त्र दरोडा घातला त्यात त्यांना मोठे धन मिळाले. रात्री पोलीस त्यांच्या मागावर होते. सुशील सेन व त्यांचे साथीदार नदीतील होड्यांकडे जातांना पोलीसांनी गोळीबार केला. त्यात सुशीलला दोन गोळ्या लागल्या. जखमी सुशीलला साथीदारांनी होडीत ओढून घेतले. होड्या पुढे सरकत होत्या. मरणाच्या वाटेवर असलेला सुशील आपल्या साथीदारांना म्हणाला "मी आता काही क्षणांचाच सोबती, आता फक्त एक करा. मी मरताच माझे मुंडके या जंबियाने धडापासून कापून टाका. धड एका ठिकाणी तर मुंडके दुसऱ्या ठिकाणी पुरा म्हणजे पोलीसांना कशाचाच पत्ता लागणार नाही व तुम्ही सर्वजण सुरक्षित रहाल. भावनाविवश होऊन असे करण्यास कचरू नका. मला तसे वचन द्या!" असे म्हणून त्याने स्वतःचा जंबिया त्यांच्या हवाली केला.

होड्या पैलतीराला लागल्या. सुशीलचे प्राणही तत्पूर्वीच पैलतीराला लागले होते. सुशीलला दिलेल्या वचनपूर्तीसाठी साथीदारांनी जड अंतःकरणांनी सुशीलचे मुंडके धडापासून वेगळे केले आणि धड व मुंडके वेगवेगळ्या ठिकाणी पुरले. लुटीत मिळविलेल्या तीन हजारांच्या धनाने भरलेल्या पिशव्या घेऊन ते जड पावलांनी अंधारात अदृष्य झाले.

विष्णु गणेश पिंगळे –

पिंगळे हे पुणे जिल्ह्यातील तळेगांव दाभाडे येथील रहिवाशी. व्यायामाने त्यांनी शरीरबल संपादन केले होते. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी १९११ मध्ये ते अमेरिकेत गेले. तेथे त्यांचा संबंध बाबा सोहनसिंह, लाला हरदयाळ, डॉ. खानखोजे इ. गदर पार्टीच्या कार्यकर्त्यांशी आला. ब्रिटिशांविरुद्ध लढण्यासाठी गदर पार्टीने जी सैन्य उभारणी केली. तिचे नेतृत्व डॉ. खानखोजे व पिंगळे यांच्याकडे होते. पहिल्या महायुद्धाच्या संकटाच्यावेळी इंग्रजांविरुद्ध उठाव करण्यासाठी ते भारतात आले. कानपूर, अमृतसर, लाहोर, मीरत इत्यादी ठिकाणच्या लष्करी छावण्यातून गुप्तपणे प्रचार करून त्यांनी इंग्रजांविरुद्ध सैन्य फितविण्यास सुरवात केली.

पिंगळे यांना अटक व फाशी –

मीरत येथील लष्करी छावणीत पिंगळे बाँबची पेटी घेऊन प्रचारास गेले. फंदफितुरीमुळे पिंगळे यांना मीरत येथेच पकडण्यात आले. १४ सप्टेंबर १९१५ रोजी त्यांना फाशीची शिक्षा होऊन १६ नोव्हेंबर रोजी त्यांना लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले.

फाशीची शिक्षा ऐकून पिंगळे म्हणाले, " इतकीच शिक्षा ? " आपली बाजू मांडतांना ते म्हणाले " देश स्वतंत्र करणे हा मुळीच गुन्हा नाही. हे कार्य करतांना कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यात मी पाप मानीत नाही. आमचा लढा हा इंग्रज या व्यक्तीशी मुळीच नाही. तर इंग्रजांनी भारतीय जनतेला जे पारतंत्र्यात खितपत ठेवले आहे, त्या राज्ययंत्रणेशी आमचा लढा आहे. भारताचे स्वातंत्र्य हे माझे ईप्सित आहे. हा लढा या आयुष्यात यशस्वी झाला नाही तर पुन्हा जन्म घेऊन आम्ही लढ्यात सिद्ध होऊ. "

फाशी जातांना पिंगळे यांना ' अखेरची इच्छा काय ? असे विचारले. तेव्हा " माझ्या हातातील बेडया काढा मला दोन्ही हात जोडून परमेश्वराची प्रार्थना करू द्या." असे त्यांनी सांगितले.

बागी कर्तारसिंह –

कर्तारसिंहाचा जन्म पंजाबातील लुधियाना जिल्ह्यात सटावा या गांवी १८६९ साली झाला. वडील मंगलसिंग लहानपणीच निवर्तले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पंजाबात झाले. त्यांच्या आजोबांच्या आणि मित्रांच्या सहाय्याने सन १९१२ साली ते अमेरिकेस गेले. तेथे त्यांना लाला हरदयाळ यांनी गदर पक्षाची दीक्षा दिली. कोमागाटारू प्रकरणात परत आलेल्या क्रांतिकारकांना धीर देऊन गदर पार्टीच्या सदस्यांनी हिंदुस्थानात जाऊन बंडाची उभारणी करावी असे सर्वानुमते ठरले. इ. सन १९१४ त 'बिपिनमारू' या जहाजातून कर्तारसिंह, विष्णुपंत पिंगळे, जगतसिंग, वगैरे मंडळी गुप्तपणे कोलंबो मार्गे पंजाबात येऊन दाखल झाली.

पैशांची आवश्यकता भासल्यामुळे कर्तारसिंगांनी आपल्या साथीदारांसह दरोड्याचे सत्र सुरु केले. कर्तारसिंहाने हिंदी सैनिकांना स्वातंत्र्यासाठी उठविण्याचे कामही मोठ्या धडाडीने केले. २१ फेब्रुवारी १९१५ या दिवशी भारतात सार्वत्रिक सशस्त्र उठाव करण्याची योजना कर्तारसिंह, पिंगळे, रासबिहारी

प्रभृतींनी आखली होती. परंतु ती पूर्ण होण्याच्या आधीच कृपालसिंग फितूर होऊन त्याने सरकारात बातमी पोहचविली.

यावेळी अफगणिस्तानात जातांनाच सरहद्दीवर त्यांना पकडण्यात आले. त्यांना फाशीची शिक्षा सांगण्यात आली. शिक्षा ऐकल्यावर कर्तारसिंह म्हणाले, "शिक्षेबद्दल आपला आभारी आहे. आपण इंग्रज साम्राज्यशाहीचे हस्तक आहात. हमारा हिंद भी फुले-फलेगा एक दिन लेकीन मिलेंगे खाकमें लाखों हमारे गुलबदन पहले! ह्यास्तव माझ्या अंगावरचा हा कोट, पायजमा व पायातील बूट यांचा लिलाव करून आलेले पैसे त्या साम्राज्यशाहीच्या खजिन्यात भरा." कर्तारसिंहाचे हे उद्‌गार ऐकून सर्व अधिकारी चिन भिन झाले.

शिक्षा जाहिर झाल्यानंतर पंजाबचा गव्हर्नर ओडरवायर याने लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये जाऊन राजकीय बंद्यांची व्यक्तिशः गाठ घेतली. तो कर्तारसिंहच्या कोठडीजवळ आला व पंजाबी भाषेत म्हणाला, "मि. कर्तारसिंह, तुमचे वय फार कमी आहे. तेव्हा फाशीची शिक्षा टाळण्यासाठी तुम्ही दया याचनेचा अर्ज करा. म्हणजे फाशीऐवजी तुम्हाला काळ्या पाण्याची शिक्षा मिळेल. तुमचे प्राण वाचतील."

ओडरवायरचा सल्ला ऐकताच कर्तारसिंह तिरस्काराने उद्‌गारले, "मेहरबानी करून तुम्ही माझ्या कोठडीजवळून चालते व्हा!"

फासाकडे जाताना ते खालील गाणे म्हणत होते.

नमाज संध्या यही हमारी और
पाठ पूजा भी सब यही है।
धरम, करम सब यही है प्यारो
यही खुदा और राम अपना।
तेरी सेवा में ए भारत
अगर तन जाये सिर जाये।
तो मै समजु की है मरन।
यहाँपर मुक्तीपथ मेरा।

अशफाक उल्लाखान –

श्री. अशफाक उल्लाखान हे जातीचे पठाण असून शहाजानपूरला रहात असत. त्यांचा जन्म गर्भश्रीमंत घराण्यात झाला होता. ते पंडित रामप्रसाद

बिस्मिल यांचे भक्त होते व क्रांतिकाऱ्यात शिष्य होते. पंडित बिस्मिल यांनी रेल्वेमार्गातून जाणाऱ्या द्रव्याच्या थैल्यांवर दरोडा घालण्याची सूचना केली. परंतु खानाने तीस विरोध केला. काकोरी कटात ते सहभागी झाले होते. काकोरी स्टेशन गेल्यावर तिजोरी खाली लोटली ती अशफाक यांनी घणाने फोडली. पुढे त्यांच्या मित्राने विश्वासघात करून पोलीसांना बक्षीसाच्या लालचेने अशफाक यास पकडून दिले. त्यांना पोलीसांनी काकोरी कटात गोवले. कोर्टात त्यांना फाशीची शिक्षा झाली. १७ डिसेंबर १९२७ रोजी फैजाबादच्या तुरुंगात त्याना फाशी देण्यात आले. फाशी जातांना ते पुढील कविता म्हणत होते.

सुनाए गम की किसे कहानी।
हमे तो अपने सता रहे है।
हमेशा सुबह-शाम दिलपर
सितमके खंजर चला रहे है।
न कोई इंग्लिश न कोई जर्मन,
न कोई रशियन न कोई तुर्की।
मिटानेवाले है अपने हिंदी,
जो आज हमको मिटा रहे है।

भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद –

भगतसिंगचा जन्म ९ ऑक्टो. १९०७ रोजी पंजाब प्रांतात झाला. त्यांच्या वडिलांचे नांव किसनसिंग व आईचे नांव विद्यावती. त्यांचे दोन चुलते व वडील यांना इंग्रजांविरुद्ध चळवळ केल्यामुळे कारावासाची शिक्षा भोगावी लागली होती. अशा देशभक्त कुटुंबात जन्म झाल्यामुळे बालपणापासूनच देश-भक्तीचे बाळकडू मिळाले होते. लाहोर येथील महाविद्यालयात शिकत असतांनाच भगवतीचरण व्होरा, सुखदेव यशपाल या क्रांतिकारी मित्रांशी त्यांचे संबंध आले.

असेंब्लीत बॉंब –

दिल्लीच्या असेंब्ली गृहात बैठक भरली असतांना सरकारचे 'सार्वजनिक सुरक्षितता' बिल सभागृहापुढे ठेवले होते. क्रांतिकारकांच्या चळवळी दडपून टाकण्यासाठी हे बील सभागृहापुढे ठेवले होते. इतक्यात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी सभागृहाच्या मोकळ्या जागेत बॉंब फोडला. इतक्यात 'इन्किलाब

जिंदाबाद' (क्रांतीचा जय होवो), 'वंदे मातरम्' अशा घोषणा देत भगतसिंग व बटुकेश्वर दत्त उभे राहीले. त्यांच्याजवळ पिस्तुले होती. त्यांनी शस्त्रे फेकून दिल्यानंतरच पोलीसांनी त्यांना पकडले.

सॉंडर्सचा वध –

पोलीसांच्या लाठी हल्यात लाहोर येथे लाला लजपतराय जखमी झाले व नंतर त्यांचा मृत्यू झाला. यामुळे भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांनी लालाजीच्या मृत्यूचा सूड घेण्याचे ठरविले. १७ डिसेंबर १९२८ हा दिवस स्कॉटला मारण्यासाठी ठरविण्यात आला. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद व शिवराम हरी राजगुरु हे तिघे भरलेली पिस्तुले खिशात घालून पोलीस कचेरीजवळ थांबले. पोलीस कचेरीतून एक पोलीस अधिकारी बाहेर आला व मोटारसायकलवर बसू लागला. लगेच राजगुरुने त्याच्यावर गोळी झाडली. भगतसिंगाने पुन्हा त्याच्यावर झडप घालून आणखी गोळ्या झाडून त्याला ठार केले. परंतु त्यांनी ठार केलेला इंग्रज स्कॉट नसून तो त्याचा सहकारी सॉंडर्स होता.

असेंब्लीत बॉंब टाकल्याबद्दल काळ्या पाण्याची व सॉंडर्सच्या वधाबद्दल देहान्ताची शिक्षा भगतसिंग व राजगुरु यांना सांगण्यात आली. बटुकेश्वरास काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. फाशी जाण्यापूर्वी भगतसिंग मित्रांना गंभीरपणे म्हणाले, "क्रांतिच्या वाटेवर जेव्हा मी पाऊल टाकले, तेव्हाच मनाशी ठरविले होते की, 'क्रांतिचा विजय असो!' हा जयघोष मी राष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत जरी पोहचवू शकलो, तरी जीवनाचे सार्थक झाले असे समजेन."

आझादी और जिंदगी एक बात है।
गुलामी और मौत एक बात है।

भगतसिंग.

भगतसिंगास अटक झाल्याची बातमी चंद्रशेखर यास समजली. त्यावेळी चंद्रशेखरांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. परंतु पुढे चंद्रशेखर देखील ब्रिटिशांच्या गोळ्यांचा बळी ठरला. चंद्रशेखरही हुतात्मा झाले. पोलीसांच्या बंदुकीतून आझादाच्या अंगावर गोळ्या झाडल्या जात असतांना, शेवटी स्वतःच्या हाताने त्यांनी स्वतःवर गोळी झाडून ते जमिनीवर पडले, ते म्हणत असत –

दुष्मनकी गोलियोंका हम सामना करेंगे,
आझाद ही रहे है आझाद ही मरेंगे।

ज्या झाडाखाली चंद्रशेखरला मृत्यू आला त्याच्यावर गुलाल उधळून लोक त्याची पूजा करू लागले. त्यामुळे भारतीय जनतेत मोठ्या प्रमाणावर देशप्रेम देशभक्ती पर्यायाने एकता निर्माण झाली.

प्रीतिलता वडेदार –

प्रीतिलता वडेदार ही कलकत्ता विद्यापीठाची पदवीधर असून नंदन कानन या मुलींच्या शाळेची मुख्याध्यापिका होती. प्रीतिलता ही सर्वातवडील मुलगी होती. डाक्का येथे लीला नाग हिचा 'दीपाली संघ' ही संस्था स्त्रियांमध्ये सशस्त्र क्रांतीची बीजे पेरीत होती. या संस्थेत प्रीतिलताने प्रवेश घेऊन लष्करी शिक्षण घेतले होते. १४ जून १९३२ रोडी ढालघाट येथे जी गडबड झाली तेव्हापासून ती भूमीगत झाली होती.

इंग्रज लोकांच्या पहारतली येथील एका क्लबवर हल्ला करण्याची कामगिरी प्रीतिलतेवर सोपविण्यात आली. त्या क्लबवर इंग्रज अधिकारी व त्यांच्या बायका चैन करण्यासाठी जमत असत. २४ सप्टेंबर १९३२ रोजी रात्री ती क्लबजवळ आली. तिने पिस्तुलाच्या गोळीने एका इंग्रज अधिकाऱ्याच्या बायकोचा बळी घेतला. प्रीती साथीदारांना म्हणाली, "साथींनो, शत्रूचा पराभव होईपर्यंत शस्त्र खाली ठेवू नका."

वयाच्या विसाव्या वर्षात असणाऱ्या तरुणीचे हे देशप्रेम महाभयंकर होते. पोलीसांनी तिला पकडण्यापूर्वीच तिने बरोबर आणलेले विष प्राषण करून देह ठेविला. आपण शत्रूच्या हाती सापडलो तर शत्रू आपली विटंबना करील असे तिला वाटले होते. तिने देशातील लोकांच्या कल्याणासाठी स्वतःचे प्राण दिले. तिच्या कोमल शरीरात देशप्रेमाचा केवढा मोठा ज्वालामुखी धगधगत होता.

शांती घोष आणि सुनीती चौधरी –

कुमिल्ला हा चित्रगांव शेजारचा जिल्हा. स्टीव्हन्स नांवाचा इंग्रज मॅजिस्ट्रेट कुमिल्ला येथे होता. त्याने कुमिल्ला शहरात लष्करी अंमल सुरू केला. प्रत्येक माणसाने स्वतःचे ओळखपत्र जवळ ठेवून बाहेर फिरले पाहिजे, असा त्यांने हुकूम काढला.

अशा या स्टिव्हन्सच्या खूनाची जबाबदारी कु. शांती घोष व सुनीती चौधरी यांच्यावर टाकली. या दोन्हीही मुली नवव्या इयत्तेत शिकत होत्या. शांती घोष ही बारिसाल येथील रहिवाशी तर सुनीती चौधरी तिपेरा गांवची होती. कुमिल्ला येथे शिक्षणासाठी आल्या होत्या. त्या गुप्त संघटनात सामील झाल्या. या युवतींनी लष्करी शिक्षण घेऊन ' छत्री संघ ' नावांची संस्था काढली होती. या दोन मुलींना क्रांतिकारकांनी घोडयाच्या गाडीतून स्टिव्हन्सच्या बंगल्याजवळ सोडले.

या दोन शाळकरी मुली स्टिव्हन्सच्या बंगल्यावर गेल्या. बंगल्याच्या व्हरांडयात गेल्यानंतर खिडकीतूनच स्टिव्हन्सने याच्याकडून अर्ज स्विकारला व वाचला. स्टिव्हन्स बंगल्याच्या व्हरांडयात येताच त्याच्यावर सुनीतीने साडीतून पिस्तुल काढून गोळ्या झाडल्या. शांतीनेही लगेच आपल्या पिस्तुलाने स्टिव्हन्सवर गोळ्या झाडल्या. त्यामुलींना पोलीसांनी खूप चोपले. परंतु आपल्या सहकार्याची त्यांनी नांवे सांगितली नाहीत.

त्यांच्यावर खटला भरला. त्यांची वये लक्षात घेऊन न्यायधिशाने त्यांना फाशीऐवजी काळ्या पाण्याची शिक्षा दिली.

१९३९ साली त्यांची सुटका झाली. त्यानंतर पुढे सुनीती चौधरी डॉक्टर झाली. शांती घोष राजकारणात पडून आमदार झाली.

वीणा दास –

कु. वीणा दास हिचा जन्म १९११ त झाला. १९२८ साली सायमन कमिशनने कलकत्त्याला भेट दिली तेव्हा वीणा दासने राजकीय क्षेत्रात पहिले पाऊल टाकले. तेथे गुप्तपणे कार्य करणाऱ्याने क्रांतिकारकांशी तिचा संबंध आला.

६ फेब्रुवारी १९३२ रोजी विद्यापीठाचा पदवीदान समारंभ बंगालच्या गव्हर्नरच्या हस्ते होणार होता. त्यावेळी वीणा दासने पदवी घेतांना गव्हर्नरवर गोळ्या झाडाव्यात असे ठरले होते. ठरल्याप्रमाणे वीणा जय्यत तयारीने सभा-गृहात जाऊन बसली. गव्हर्नर स्टॅन्ले भाषणास उभे राहिले. तोच वीणाने पिस्तुलातून गव्हर्नरच्या रोखाने गोळ्या झाडल्या. परंतु त्या सर्व चुकल्या. तिला अटक झाली. नंतर १९३९ मध्ये इतर राजकीय कैद्यांबरोबर तिचीही सुटका झाली.

भारत-पाक फाळणीच्यावेळी नौखालीत झालेल्या जातीय दंगलीच्या दिवसात तिने दुःखितांची सेवा केली.

कु. कल्पना दत्त –

कु. कल्पना दत्त ही चित्तगांवची राहणारी. ती कु. प्रीतिलता वड्डेदार बरोबरच क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेत सामील झाली. कु. कल्पना दत्त ही नेहमी पुरुषाचा पोषाख करून हिंडत असे. पोलीस डोळ्यात तेल घालून क्रांतिकारकांचा कसून शोध करीत असतांनाच चित्तगांवमध्ये एके दिवशी एक तरुण मुलगा संशयास्पद रीतीने जातांना पोलीसांना आढळला. त्यास पोलीसांनी चौकीवर नेले. पोलीसांनी जेव्हा बारकाईने निरिक्षण केले, तेव्हा त्यांना असे आढळून आले की तो तरुण म्हणजे पुरुषांचा पोषाख केलेली एक तरुणी होती. नंतर तिच्यावर खटला भरला. परंतु आरोप नसल्यामुळे तिची निर्दोष सुटका झाली.

सुटकेनंतर ती भूमीगत होऊन क्रांतिकारकांबरोबर राहू लागली. त्यामुळे पुन्हा पकडून तिला काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

सुहासिनी देवी –

सुहासिनी देवीचे शिक्षण डाक्का येथे झाले. शिक्षण घेत असतांनाच ती क्रांतिकारकांच्या संघटनेत शिरली. चित्तगांवचे सरकारी शस्त्रागार लुटल्यानंतर काही क्रांतिकारक कलकत्त्यास आश्रयास गेले. कोणालाही संशय येऊ न देता त्यांची राहण्याची सोय करणे आवश्यक होते. म्हणून चंद्रानगर येथे एक घर भाड्याने घेऊन शशधर आचार्य ह्या क्रांतिकारकाने घरात यजमान बनावे असे ठरले. परंतु त्यांचे लग्न झालेले नव्हते. म्हणून त्या घरात वावरून ते नाटक वठवावे, असे ठरले. अनंतसिंग, लोकनाथ बाळ, आनंद गुप्ता, जीवनघोषल हे क्रांतिकारक त्यांचे पाहुणे बनले.

पोलीसांना समजल्यानंतर त्या घराला वेढा दिला. त्यात सुहासिनीचे खूप हाल झाले. परंतु तिने पोलीसांना क्रांतिकारकांच्या गुप्त कारवायांची काहीच माहिती दिली नाही. तिच्यावर कोर्टात खटला चालून ती निर्दोष सुटली.

उज्ज्वला –

उज्ज्वला ही एका क्रांतिकारक जमिनदाराची मुलगी होती. वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच वडील तिच्या लहान वयाचा फायदा घेऊन तिच्या करवी हत्यारांची ने आण करीत असत. त्यात ती पकडली गेल्यामुळे कोर्टात खटला चालून तिला काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

नेताजी सुभाषचंद्र बोस -

'तुम्हीं रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो'

सुभाष बाबू

वरील प्रकारचे सैनिकांना आव्हान करून त्यांच्या भावना मातृभूमीच्या स्वातंत्र्याकडे आकर्षून घेण्यात सुभाषबाबू यशस्वी झाले होते. याचवेळी स्त्रियांना उद्देशून नेताजी म्हणाले होते, 'हिंदी स्त्रियांची परंपरा अतिशय जुनी आहे. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात एकच झाशीची राणी निर्माण झाली. परंतु आपल्या आगामी स्वातंत्र्य युद्धात अशा हजारो राण्या तुमच्यातून निर्माण झाल्या पाहिजेत.'' नेतांजीचे हे वक्तव्ये ऐकताच लगेच पूर्व आशियातील अनेक हिंदी स्त्रिया झाशी रेजिमेंटमध्ये भरती झाल्या.

नेताजींनी तीन लाख सैन्य उभे करण्याचा निर्धार प्रकट केला व सैनिक म्हणून नांवे नोंदविण्यासाठी तरुणांना आवाहन केले. त्यानुसार १४ वर्षापासून तर ५७ वर्षापर्यंत लोक मोठ्या संख्येने पुढे आले. त्यांच्यासाठी ठिकठिकाणी लष्करी शिक्षण केन्द्रे उघडण्यात आले.

लष्कराची पुनर्रचना करून नेताजींनी 'इंडियन इंडिपेन्डन्स लीग' ची खातेवार विभागणी करून पुनर्रचना केली. प्रचारखाते, अर्थखाते, शिक्षण खाते इ. खाती पाडून त्यावर मंत्री नेमले व लगेच 'आझाद हिंदचे हंगामी सरकार' सिंगापूर स्थापन झालेले आहे अशी घोषणा २१ ऑक्टोबर १९४३ ला केली. त्यांच्या सरकारला जपान, जर्मनी, इटली अशा नऊ देशांनी मान्यता दिली. नेताजींच्या सरकारने इंग्लंड - अमेरिका विरुद्ध युद्ध पुकारले व तशी नेताजींनी लगेच सिंगापूर रेडिओवरुन घोषणा केली. अवघ्या दोन तासातच ही वार्ता जगात पसरली.

आझाद हिंद सेनेचे नेतृत्व करतांना सैन्याला उद्देशून नेताजी म्हणाले, "मित्रहो तुम्ही आता आघाडीवर जाणार आहात, ऐका ! ऐका ! आपला भारत आपणास हाका मारीत आहे, आपले ३८ कोटी बांधव त्यांच्या मुक्तीसाठी आपणाला बोलावित आहेत, तयार रहा ! आपण वेळ गमावता कामा नये. तुमची शस्त्रे तयार ठेवा. दिल्लीचा मार्ग म्हणजे स्वातंत्र्याचा मार्ग - चलो दिल्ली''

या भाषणाने लष्करात नवचैतन्य संचारले. नेताजी इंग्रजांशी लढले परंतु नेताजींना भारतातून अंतर्गत मदत झाली नाही. त्यामुळे निराश होऊन त्यांना परत फिरावे लागले.

नेताजींवर सैनिकांनी अपार प्रेम केले. जात, धर्म, प्रांत असे सर्व भेद विसरून सर्वजण एकदिलाने आझाद हिंद फौजेच्या झेंड्याखाली उभे होते. कॅप्टन सैगल होते, कर्नल शहानवाझखान होते, कॅप्टन लक्ष्मी, कर्नल लोकनाथ आणि ले. कर्नल हाबिबूर रहिमान होते. यातूनच खरी राष्ट्रीय एकात्मता दिसत होती. एक दिल, एक कदम!

नेताजींवर जनतेनेही अपार प्रेम केले. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त रंगून येथे झालेल्या समारंभात नेताजींच्या गळयात घातलेल्या हारांचा त्यांनी लिलाव पुकारला. बोलता बोलता त्या हारांची नऊ लाख किंमत झाली. हे पाहून एका धनाढ्य व्यापाऱ्याने आपली सर्व संपत्ती त्या हारावर लावली.

यावरून नेताजींच्या कार्याने किती लोक एकत्र येऊन एक दिलाने राहू लागले याची कल्पणा येते.

ज्या ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता, त्या पृथ्वीभर पसरलेल्या सत्तेशी रणक्षेत्रावर भारतीयांनी अत्यंत अपुऱ्या व परावलंबी साधनानी संग्राम केला. सतत शंभर वर्षापर्यंत क्रांतिकारकांनी रणकुंड धगधगत ठेवले. त्यामुळेच भारतीयांमध्ये संघटन घडवून येऊन ब्रिटिशांचा अंत झाला. जेव्हा १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा इंग्लंडचा पंतप्रधान ॲटली म्हणाला, "भारतातील भाडोत्री सैन्य आता ब्रिटिशांना एकनिष्ठ राहिले नाही व भारतावर आपली सत्ता चालविण्यासाठी जेवढी मोठी ब्रिटिश सेना लागेल तेवढी आपण बाळगू शकत नाही. यामुळे भारताला स्वातंत्र्य द्यावे लागत आहे."

म्हणजे क्रांतिकारकांच्या कार्यामुळे भारतीय जनता त्यांच्या पाठीशी एक-संध उभी राहिलीच, परंतु ब्रिटिशांना एकनिष्ठ असलेले भारतीय सैनिकही क्रांतिकारकांच्या कार्यामुळे मोहित होऊन, सुभाषचंद्र बोस सारख्या क्रांति-कारकाच्या भाषणाने प्रेरित होऊन त्यांनी ब्रिटिश लष्कर सोडून ते देशभक्त होऊन भारतीय क्रांतिकार्याला वाहून घेतले. त्यामुळे संपूर्ण देशात राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. परिणामी इंग्रजांना या देशातून जावे लागले.

महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी १८९७ मध्ये पेटलेल्या रण-कुंडात आपली समाधी टाकूण त्यांनी ते धगधगत ठेवले. त्यांचेच कार्य पुढे चाफेकरांनी महाराष्ट्रात व कुका यांनी पंजाबात चालविले. टिळकांनी ही सतत ब्रिटिशांविरुद्ध आवाज उठविला. त्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर जनजागृती झाली. खानखोजेसारखा तरुण अमेरिकेत लष्करी शिक्षण घेऊन भारतात

परतल्यावर अनेक तरुणांना ते प्रशिक्षण देतो व त्याच्या भोवती बरेच तरुण जमतात व क्रांतिकार्याला वाहून घेतात. यातून देशप्रेम, देशभक्ती वाढीस लागण्यास मदत झाली.

मेकॉले एका ठिकाणी म्हणाला, "इंग्रजांविरूद्ध बंगाली माणसांनी लढ्यास उभे राहणे म्हणजे लांडग्याविरूद्ध कोकरांनी किंवा राक्षसाविरूद्ध माणसांनी बंड पुकारण्यासारखीच अशक्यप्राय गोष्ट होती."

मेकॉलेच्या या वक्तव्यामुळे बंगाली जनतेत तर निस्सिम देशभक्त निर्माण झालेच, परंतु बंगाली जनतेला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण देशातील विविध जाती धर्माचे लोक पुढे आले आणि त्यांनी इंग्रजांविरूद्ध शस्त्रे उपसली ती एकीच्या भावनेनेच होय.

कर्झन वायलीचा मदनलाल धिंग्रा याने इंग्लंडमध्ये, जॅक्सनचा कान्हेरे यांनी नाशिक येथे केलेला वध किंवा खुदीराम बोसने बंगालमध्ये केलेले बॉंबस्फोट या गोष्टींमुळे जनतेत इंग्रजांविरूध्द भावना निर्माण होऊन स्वातंत्र्याची लालसा निर्माण झाली.

गोविंद कवींनी म्हटले आहे की,

रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना ।
असा भूतकालीन सिध्दांत जाणा ।

ह्या सनातन सिध्दांताच्या मार्गानेच भारतीय क्रांतिकारकांनी ब्रिटिशां-विरूध्द भारतीयांमध्ये एकराष्ट्रीयत्वाची ज्योत पेटविली.

चंद्रशेखर आझाद क्रांतिकारकांचा ज्या झाडाखाली मृत्यू झाला. त्या झाडावर लोक फुले व गुलाल उधळून पुजा करू लागले. म्हणजेच चंद्रशेखरच्या हुतात्म्यामुळेच लोकांनी त्या झाडाला एकात्मतेचे प्रतिक मानले.

हमारा हिंद भी फुले-फलेगा एक दिन लेकीन।
मिलेंगे खाकमे हमारे गुलबदन पहले।

क्रांतिकारक परमानंद हे गाणे म्हणत असतांना तुरुंगातील सर्वच क्रांतिकारक सुरात सुर मिसळून गाणे म्हणू लागले. यावेळी तुरुंगाचे अधिकारी, पोलीस, नोकर, वकील यांच्या देखील डोळ्यात पाणी उभे राहिले. तेव्हा या गाण्याचा व क्रांतिकारकांच्या ज्वलंत भावनेमुळे भारतातील सर्वसामान्य जनतेच्या मनावर किती खोलवर परिणाम झाला असेल की, ज्यामुळे या क्रांतिकारकांना ब्रिटिशांविरुद्ध पाठिंबा देण्यासाठी भारतीय जनता रस्त्यावर आली. ती एकता

निर्माण झाल्यामुळेच. मग ती ब्रिटिशांच्या द्वेषाने का होईना.

पहिले महायुद्ध सुरु झाले, तेव्हा या काळात एका बाजूने सैन्याचे हिंदीकरण वाढविण्याची मोहीम हाती घेऊन व दुसऱ्या बाजूने सर्व समाजात ब्रिटिशांविरुद्ध सर्वंकष संग्राम करण्याची प्रखर प्रेरणा निर्माण करून लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे." ही भाषा लोकांच्या तोंडी उतरविली. त्याचा परिणाम सैनिकांवरही झाल्याशिवाय राहिला नाही. त्याचवेळी क्रांतिवीर हरदयाळ, खानखोझे, पिंगळे, कर्तारसिंग, बन्तासिंग, मथुरासिंग आदी क्रांतिकारकांनी इंग्रजांविरुद्ध जनतेच्या भावना तेवत ठेवून लढा सुरू केला. त्यामुळेच भारतीयांमध्ये एकात्मतेची भावना वाढीस लागली असे म्हणता येईल.

भगतसिंग, राजगुरु, सखदेव, भगवतीचरण व्होरा, दुर्गा देवी व्होरा, कु. उज्ज्वला, वीणा दास इ. क्रांतिकारक स्वातंत्र्यवादी असल्यामुळे ते सरकारच्या कोणत्याही लोभाला बळी न पडता, माघार न घेता, त्यासाठी पडतील ते कष्ट सोसण्याची व त्याग करण्याची त्यांची तयारी होती. त्यामुळेच भारतीय जनतेच्या मनात ते क्रांतिची ज्योत पेटवू शकले. क्रांतिकारक विचारांमुळेच भारतीय लोक एक दोरीत बांधले गेले व त्यांच्यात एकता निर्माण होऊन वाढीस लागली.

महात्मा गांधींचा मार्ग क्रांतिकारकाना पटत नव्हता. कारण जास्तीतजास्त लोकांकडून कमीत कमी त्यागाची अपेक्षा बाळगून किमान हक्क मिळविण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता, तर लोकांच्या जास्तीत जास्त त्यागानेच देशात क्रांतिवादाला अनुकूल परिस्थिती निर्माण करता येईल व शेवटी लष्करी सामर्थ्य निर्माण करण्यानेच स्वातंत्र्य मिळू शकेल व ते टिकेल असे क्रांतिकारकांचे नेते टिळक, सावरकर, प्रभृतींचे मत होते.

क्रांतिकारक व महात्मागांधी यांच्या आंदोलनाचे मार्ग वेगवेगळे होते. परंतु ध्येय मात्र एकच होते ते स्वातंत्र्याचे. दोघांच्याही प्रयत्नांनीच देशातील जनतेत देशप्रेम, देशभक्ती, किंवा त्यागाची भावना निर्माण होऊ शकली. पर्यायाने एकात्मताही त्यांच्या कार्यामुळेच वाढीस लागली.

स्वातंत्र्यासाठी लढणारे वीर जरी फाशी गेल्यामुळे हे जग सोडून गेले व काळ्या पाण्याच्या शिक्षेमुळे काहीजण या राजकीय रणभूमीवरून दूरदूर गेले, तरी त्यांनी पेटविलेल्या होमकुन्डातील अग्नीच्या ठिणग्यांनी सामान्य जनतेच्या

शरीरात प्रवेश केला. सर्व जाती, धर्म, वंशाचे लोकांमध्ये एकीची भावना निर्माण झाली. त्यांना आपण एक आहोत असे तीव्रतेने वाटू लागले. त्यांच्यात एकतेची ज्योत पेटली होती. या एकतेच्या ज्योतीला स्वातंत्र्य मिळेपर्यंत तेवत ठेवण्याचे काम या सर्वसामान्य इंग्रजांच्या सुडाने पेटलेल्या जनतेनेच केले हे निर्विवाद सत्य आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतापासून पाकिस्तान अलग झाला तेव्हा मात्र भारतात निर्माण झालेल्या एकात्मतेला धोका पोहचला तो जातीय दंगली-मुळे. तरी या जातीय दंगली शमविण्यासाठी महात्मा गांधी जीवाचे रान करून गावोगाव हिंडत होते. त्यांना स्वातंत्र्य मिळाल्याच्या अनंदा ऐवजी या दंगलीमुळे अत्यंत दु:ख झाले होते.

प्रकरण ५ वे

महात्मा गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता

" ज्या वेळी व्यक्ती आनंदाने मृत्यूला मिठी मारतात त्याच वेळी राष्ट्र जिवंत राहते. "

महात्मा गांधी.

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीत जनतेने सहभागी व्हावे म्हणून गांधीजींनी वरीलप्रकारचे आव्हान केले होते. हे आव्हान एकतेसाठीच होते. त्यांच्या आव्हानाला भारतीय जनतेने भरघोस प्रतिसाद देऊन स्वातंत्र्य चळवळ यशस्वी केली. त्यामुळेच १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले व पाकिस्थानही उदयास आले. परंतु यावेळी सबंध देशात जातीय दंगली उसळल्या. तेव्हा हिंदू व मुस्लिम या दोन्हीही जमातींनी दंगली थांबवाव्यात अशी विनंती गांधीजींनी सर्व देशबांधवांना केली. ज्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधींनी १९२० सालापासून चळवळ केली होती, ते महात्मा गांधी भारताच्या स्वातंत्र्याच्या पहाटेच्या वेळी नवी दिल्ली येथे नव्हते. आपल्या सहकाऱ्यांना ते म्हणाले, "विजयोत्सव" "आनंदोत्सव" कसला साजरा करावयाचा? रक्ताच्या वाहणाऱ्या नद्यांशिवाय मला दुसरे काहीच दिसत नाही." म्हणजे स्वातंत्र्य चळवळीचा गाडा जीवनभर ओढून थकलेले गांधीजी स्वातंत्र्य दिनाचा सोहळाही राष्ट्रीय एकात्मतेस तडे जावू नये म्हणून पाहू शकले नाही. यावरून भारताच्या राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी गांधीजींनी अहोरात्र कष्ट सोसले हे लक्षात येते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला होता. तो धोका म्हणजे संस्थानिकांचा होय. संस्थानिकांनी स्पष्ट सांगितले होते की, तेही स्वातंत्र्य व स्वायत्ततेची स्वप्ने पहात होते. परंतु हिंदुस्थानच्या एकतेच्या दृष्टीने हे हानिकारक होते. ही स्वप्ने प्रजेलाही अमान्य होती. संस्थाने भारतीय संघराज्यात सामील करू नयेत अशी काही संस्थानिकांची

इच्छा होती. त्यामुळे पंडित नेहरू आणि इतर नेत्यांनाही धक्का बसला होता. परंतु महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव असलेल्या पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यासारख्या नेत्यांच्या प्रयत्नांनी १९४७ नंतरही भारत एकसंघ राखला गेला. तसेच फाळणीनंतर जातिय दंगली शमविण्यासाठी महात्मा गांधी अवाहन करीत असतांनाच १९४८ मध्ये त्यांचा खून झाला. हा खून हिंदू व्यक्तीच्या हातून झाल्यामुळे जातीय द्वेषभावना बोथट झालीं. म्हणजे म. गांधींनी स्वातंत्र्यासाठी १९२० पासून अहोरात्र कष्ट घेऊन ते प्राप्त केले आणि निर्माण केलेल्या राष्ट्राच्या एकात्मतेसाठीच स्वत:चा बळी दिला. केवढा महान त्याग या नेत्याचा ! त्यांचा आदर्श आज देशातील नागरिकांनी आपल्या समोर ठेवून देशाचे ऐक्य मजबूत करण्यासाठी झटले पाहिजे.

गांधीजींचा नवीन दृष्टीकोन –

गांधीजींच्या काळात आपल्या आजच्या नैतिक मूल्यांची बरीचशी घडण झाली. त्यांच्या कार्याची पावती जरी केवळ स्वराज्य मिळवण्याच्या कामापुरतींच देण्यात येते तरी त्यांच्या नैतिक अधिष्ठान देण्याच्या कार्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पारतंत्र्यात आपण गमावलेली प्रतिष्ठा त्यांनी आपल्याला परत मिळवून दिली. तसेच आपल्याला पुन्हा धैर्य दिले. समाजातील विविध थरातून त्यांनी नेत्यांचा एक नवीन संच तयार केला आणि आपल्या राष्ट्रीय जीवनात एकप्रकारचा एकसंधपणा निर्माण केला.

आधुनिकतेची शिकवण –

गांधीजींच्या तत्वज्ञानात परंपरेचा मोठा भाग असला तरी त्यांनी स्वत:ला कालबाह्य कधीच होऊ दिले नाही. याउलट ते आपल्या युगातील आधुनिकतेचे जनक होते. त्यांनी भारतीय जनतेला व्यापक स्वरुपात आधुनिकतेची शिकवण दिली. गांधीजी मंदिरात जाऊन पुजा-अर्चा करीत आहेत किंवा एखाद्या साधु-संताला, मांत्रिकाला वा ज्योतिषाला भेटत आहेत किंवा एखाद्या विशिष्ट धर्माच्या वा पंथाच्या समारंभाला हजर राहिले आहेत असे कुणाच्या ऐकिवातही नाही. धर्मनिरपेक्ष अशा राष्ट्रीय व्यक्तिमत्वाशी त्यांचे वागणे सुसंगतच होते.

सर्वसमावेशक सत्याग्रह –

गांधीजींचे सार्वजनिक आणि खाजगी जीवन वेगळे नव्हते. त्यांनी आपले

उदाहरण अनेक नेत्यांपुढे असे अप्रत्यक्ष ठेवले. सत्याग्रहाची त्यांची कल्पणा सर्व समावेशक अशा संस्कृतीची व जीवनाची होती. त्यांच्यापासून ज्यांनी प्रेरणा घेतली, त्यांच्यात जातपात, कर्मकांड स्त्रियांचा दर्जा, इत्यादिबाबत संपूर्ण परिवर्तन झाले. ज्यांनी त्यांच्या सत्याग्रहात भाग घेतला नाही, तेही लोक बदलले. त्यांच्या चळवळीत भारतातील सर्व धर्माचे, पंथाचे, वंशाचे लोक सहभागी होऊन एकमुखाने इंग्रजांशी त्यांनी गांधींच्या नेतृत्वाखाली लढा दिला. त्यामुळेच त्यांच्यात एकतेची भावना वाढीस वागून राष्ट्रीय एकात्मतेने मूळ धरले.

गांधीजींनी नव्या पंथाची किंवा धर्माची शिकवण दिली नाही. त्यांनी भारतीयांना जीवनाचा एक नवा मार्ग दाखविला. जनतेची अस्मिता जागृत करणारा एक नवा अनुभव त्यांनी लोकांना दिला. सामाजिक शिथिलता घालविण्यासाठी त्यांनी अनेक चळवळी सुरु केल्या. धर्म आणि परंपरेच्या नावाखाली समाज सतत गाळात चालला होता. समाजाला वर काढताना काही माथेफिरु लोकांनी आक्षेप घेतलेच. परंतु सर्वसामान्यपणे भारतीय समाजाने म. गांधीजींचा द्रष्टेपणा जाणला.

बहुसंख्य कॉंग्रेस नेते जरी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध झगडण्यात गुंतले होते. तरी काही विधायक कार्यकर्ते हरिजन उद्धार, ग्रामोद्योग, ग्रामीण आरोग्य, इत्यादी क्षेत्रात कार्य करीत होते. ते गांधीजींच्या प्रेरणेमुळेच! फाळणीच्या दुख:द काळातही गांधीजींनी ऐक्यास तडा जावू नये म्हणून खूप प्रयत्न केले. लोकांमध्ये ऐक्य नांदावे आणि त्यांनी शहाणपणा स्विकारावा म्हणून दंगलग्रस्त भागात गांधीजींनी पदयात्रा काढल्या. त्याचाच परिणाम म्हणून रक्तरंजीत जातीय दंगलीच्या ऐन धुमश्चक्रीत राष्ट्राने धर्मनिरपेक्षता हा आपल्या राष्ट्रीयत्वाचा पाया म्हणून घटनेद्वारे स्विकारला ही फार महान गोष्ट आहे.

मूल्याधिष्ठित राजकारण –

आपले प्रशासन राजकीय जीवन यांनी संकुचित अशा जातीय आणि पंथीय वादापासून अलग राहिले पाहिजे. यामुळेच सर्वांना सामाजिक न्याय मिळेल असे गांधीजींना वाटत होते. गांधीजींनी काही पूर्वापार चालत आलेल्या परंपरांचा आधुनिक कार्यपद्धतीत अचूक वापर केला. या प्रक्रियेत जुन्या कल्पनांना त्यांनी नवा अर्थ दिला. रामराज्याची कल्पना सामाजिक न्यायाचे प्रतिक ठरली तर त्यांची सत्यनिष्ठा सत्याग्रहाला धर्माधिष्ठित करुन गेली.

हरिजनांना वर्षानुवर्षे समाजातून हद्दपार करणाऱ्या कर्मकांडाला गांधीजींनी विरोध केला.

राष्ट्रीय उद्दीष्टांच्या पूर्तीसाठी नवे सामाजिक, राजकीय वातावरण कसे निर्माण केले जाऊ शकते याची शिकवण त्यांनी आम्हाला दिली. "**धर्म आणि राजकारणात मला कोणताही फरक वाटत नाही**" असे गांधीजी म्हणत. धर्माच्या संकल्पनेतून बाहेर पडून खऱ्या धर्माचा शोध घेण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता.

मानवी मूल्य आणि वैयक्तिक नितिनियमांवर गांधीजींचा भर होता. द्वेष आणि भेदभाव यांना त्यांच्या **मनात** थारा नव्हता. आज आमच्या मूल्याधिष्ठित राजकारणात आणि सार्वजनिक व्यवहारात याच गोष्टीवर पुन्हा भर देण्याची गरज आहे.

गांधीवादी राजकारणाला इंग्रजांनी केलेल्या विरोधात सर्व जातीय तणावचे मूळ आहे. आजही जाती द्वेषाचा हा राक्षस धुमाकूळ घालतो आहे. जातीयवादाने आमची अपरिमित हानी होत आहे. त्यामुळे देश विकासासाठी ही जातीयतेवर आधारित समाजव्यवस्था अगोदर संपुष्टात आणणे भाग आहे. असे केल्यास गांधीजींचे राष्ट्रीय एकात्मतावाढीचे स्वप्न साकार होईल.

महात्मा गांधींनी राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ अगदी साध्या आणि सोप्या शब्दात सांगितला आहे. ते म्हणतात.

" Consists in our having a Common purpose, a Common goal and Common Sorrows. It is best promoted by Co-operating to reach the Common goal by Sharing one another's Sorrows and by mutual toleration. "

" समान हेतू, समान ध्येय व समान दुःखे असणे व ती परस्पर सहकार्याने वाटून घेणे व असे करतांना सहनशीलता दाखविणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता." असे गांधीजींचे मत होते.

सर्व राज्यातील लोकांचा धर्म, जात, भाषा निरपेक्ष म्हणजेच एकात्मता व त्यातून आत्मियतेची जाणीव होते. **महात्मा गांधी** एकदा म्हणाले होते " आम्ही सर्व प्रथम आणि अखेरपर्यंत भारतीय आहोत. एकाच मातृभूमीची लेकरे आहोत. आमच्यात कसलाही भेदाभेद नाही. खरा धर्म जोडण्याचे काम करतो. माणसा-माणसात फुट पाडत नाही. पण आज धर्माचा चुकीचा अर्थ सांगून लोकांच्या

भावना भडकविल्या जात आहेत. ईश्वर आणि धर्माच्या नांवावर माणसे माणसांची हत्या करायला तयार झाली आहेत.

भारत एक चैतन्ययुक्त लोकशाही राष्ट्र म्हणून राहावा यासाठी कोणत्याही प्रकारच्या भितीला आपण मूळीच थारा देऊ नये. विशेषत: आपल्या मातृभूमीला काळीमा फासणाऱ्या जातीय उद्रेकांचे भय तर बाळगूच नये. निर्भय व्हा आणि आत्मिक शक्तीच्या साह्याने प्रश्नाला सामोरे जा, अशी शिकवण गांधींजींनी आपल्याला दिली. शांती आणि बंधूभाव, धर्म, जाती, भाषा, आर्थिक विषमता: हे विसरून एकत्र येणाचाही मंत्र त्यांनी दिला. आपापसात कोणताही भेदभाव न करता एकाच मातृभूमीचे सुपूत्र म्हणून जगू या, असे ते सांगत.

गांधीजींप्रमाणेच पं. जवाहरलाल नेहरूंचीही एकात्मतेवर निष्ठा होती. ते एकदा म्हाले होते. " नवभारताची उभारणी करतांना सर्वप्रथम गरज आहे. ती देशाची एकजूट राखण्याची फक्त भौगोलिक एकसंधपणा नव्हे तर जनतेची वैचारिक व भावनिक एकजूट."

महात्मा गांधीजी देशातील निरनिराळ्या भाषा वेळात वेळ काढून अभ्यासित. पू. विनोबाजीही पुढे गांधीजींचे अनुकरण करीत आले. परंतु आज आपल्यापैकी कितींना ही तहान आहे. म्हणजे आज हिंदी राष्ट्रभाषा असूनही हिंदीबरोबरच इतर प्रांतीय भाषांचा आज प्रत्येक भारतीयाने अभ्यास करणे आवश्यक आहे. तरच महात्माजींचे अनुकरण केल्यासारखे होईल आणि एकात्मता राखण्याचे प्रयत्न होतील.

गांधीजींकडे कोणी जर संदेश मागितला तर ते म्हणत असत की, " **मेरा जीवन ही मेरा संदेश है** " त्यांनी जे सांगितले तेच स्वत:च्या जीवनात प्रत्यक्षात उतरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. म्हणून गांधी-विचार व गांधी-कर्म यातच मानवतेसाठी महत्वाचे संदेश आहे. त्यानुसार जर आपले देशबांधव नियमित वागले व संदेशाचे आचरण केले तर देशावर कितीही महान संकट आले तरी त्याचा यशस्वीरित्या मुकाबला करण्यास देश समर्थ होईल व राष्ट्रीय एकात्मतेला लागलेली किडही नष्ट होऊन एकात्मता राखली जाईल.

शेवटी महात्मागांधीजींनी ऐक्यासाठी पुढील संदेश दिला तो असा, " जोपर्यंत सबंध मानव जातीत ऐक्याच्या भावनेस महत्व दिले जात नाही, तोपर्यंत प्रार्थना, उपवास, जप, तप, यासारख्या साऱ्या गोष्टी निरर्थक आहे."

पुढे गांधीजी म्हणतात की, " पराक्रमी विरोत्तमांनी उभारलेला

स्वातंत्र्याचा ध्वज क्षणभरही खाली नमता कामा नये. असे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य हवे.''

स्वातंत्र्य मिळविण्याच्या ध्येयासाठी गांधीजीनी एक ' Nation Building Programme ' आखला होता. त्याची आज खरी आवश्यकता आहे.

गतप्राण झालेला, जातिभेदाने भंगलेला, पारतंत्र्यामुळे खचलेला, अस्मितेला वंचित झालेला असा हा देश होता. गांधीजींनी आपल्या तत्वज्ञानाने गतप्राण झालेल्या राष्ट्रात जिवंतपणा आणला. सर्वांना संघटित केले. आणि ग्रामीण जनतेत एकता निर्माण करण्यासाठी इ. स. १९३६ साली फैजपूर या ग्रामीण भागातील खेडेगावी अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरविले होते.

गांधीजींनी ८ ऑगष्ट १९४२ रोजी मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनातील त्यांच्या भाषणात खालील घोषणा केली होती. तीची आज आपण आठवण ठेवली पाहिजे.

"एक तर आम्ही भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊ किंवा त्या कार्यात मरण तरी पत्करु. आमच्यावर लादलेली ही कायमची गुलामगिरी पाहाण्यासाठी आम्ही जिवंतच रहाणार नाही .... आपल्या अंतरीच्या आत्म्याला साक्षी ठेवून परमेश्वराजवळ शपथ घेऊ या की, भारतमाता जोवर स्वतंत्र होणार नाही, तोवर आपण स्वस्थ बसणार नाही आणि आवश्यकता भासल्यास आपल्या प्राणांची आहुती देण्यास मागेपुढे पहाणार नाही.''

प्रकरण ६ वे

इंदिराजी गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता

"जर आपण भूतकाळाकडे बघत असाल तर ती लोकशाही ठरणार नाही. जर आपला दृष्टिकोन संकुचित असेल आणि आपण माणसा-माणसात भेदभाव बाळगीत असाल तर तीही लोकशाही ठरणार नाही. कारण लोकशाहीत असमानता आणि विषमता एकत्र नांदु शकत नाही."

इंदिरा गांधी

इंदिरा गांधी यांनी आपल्या पंतप्रधानपदाच्या काळात देशातील असमानता व विषमता नष्ट करण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु विषमता इतकी वाढलेली आहे की, ती समूळ नष्ट होणे आपल्या देशात तरी कठीण आहे. फारच प्रयत्न केले तर ती कमी होऊ शकेल. त्याचप्रमाणे इंदिराजींनी भूतकाळाकडे न पहाता सध्याच्या देशस्थितीचा विचार करून भविष्यावर दृष्टी ठेवली पाहिजे असेही प्रतिपादन केले होते. आज त्यांचा वरील संदेश पाळूनच भूतकाळाकडे न पहाता देशातील सध्यस्थिती व्यवस्थित हाताळणे आवश्यक आहे. त्यांचे अपुरे कार्य आता कॉंग्रेस पक्ष व राजीव गांधींचे सरकार अतिशय कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशिल आहेत.

भारतीय स्वातंत्र्यासाठी अनेक ज्ञात, अज्ञात क्रांतिकारक हुतात्मे बनले. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते टिकविण्यासाठी स्वातंत्र्यातच महात्मा गांधींनी स्वतःला बळी देऊन एकात्मता टिकविली. महात्मा गांधी नंतर देशाच्या स्वातत्र्यासाठी व देशाचे विघटन होऊ नये म्हणून पंडित नेहरु प्रयत्नशिल राहिले. त्यांची देशाच्या अखंडतेवर गाढ श्रद्धा होती. पंडित नेहरुनंतर लालबहादूर शास्त्रींनी पाकिस्तानशी युद्ध करून भारतावरील संकट टाळले व एकात्मताही टिकवली. परंतु देशाचे विघटन होऊ नये म्हणून शेवटी महात्मा गांधीजींप्रमाणेच इंदिराजींना बळी जावे लागले. त्यांच्या बलिदानाने देशाची एकात्मता व

अखंडता वाढीस लागली. त्यामुळे महात्मा गांधी व इंदिरा गांधी यांच्या बलिदानाचे फळ म्हणजे भारताची एकात्मता अबाधित राहिली हे होय. म्हणून त्यांनी दिलेला एकात्मतेचा संदेश आपण अंगिकारला पाहिजे.

देशाच्या एकतेसाठी अतिरेक्यांच्या बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलणाऱ्या देशभक्त कै. इंदिरा गांधी लहानपणापासूनच त्यागी वृत्तीच्या होत्या. लहानपणी त्यांना त्यांच्या मावशीने परदेशी कपड्याचा सुंदर फ्रॉक आणला असतांना त्यांनी तो सुंदर असल्याचा मान्य केले. परंतु तो परदेशी असल्यामुळे त्याचा स्विकार करण्यास नकार दिला. कारण इंदिराजींना आपल्या मातृभूमीतच तयार होत असलेल्या खादीचे प्रेम होते. त्यांच्या या बालवयातल्या गोष्टीवरुनच समजते की, त्यांना स्वदेशाबद्दलचे किती प्रेम होते. त्या प्रेमापोटीच त्यांनी स्वातंत्र्य लढ्यातही भाग घेतला होता.

इंदिराजी पंतप्रधानपदावर आरूढ झाल्यानंतर भारतीय लोकशाही अतिशय स्थिर स्वरुपाची आहे, हे दाखवून देण्यासाठी त्यांनी अनेक महत्वाची पाऊले उचलली. ज्याप्रमाणे पंडित नेहरुंची देशाच्या एकात्मतेवर श्रद्धा होती. तशीच इंदिराजींचीही एकतेवर परमनिष्ठा होती. त्यांनी अलिप्त राष्ट्रांचे नेतृत्व करून भारताची राष्ट्रीय एकात्मता भक्कम असल्याचे सिद्ध केले. त्यांच्या काळात ज्या ज्या वेळी भारताच्या एकतेला धोका निर्माण झाला, त्या त्या वेळी त्यांनी खंबीरपणे योग्य निर्णय घेऊन आलेल्या संकटावर यशस्वीरित्या मात केली.

इंदिरा गांधी प्रथम १९६६ साली पंतप्रधान झाल्या. इ. स. १९६६ पासून ते १९८४ पर्यंत, मधली जनता राजवटीची तीन वर्षे सोडता त्या पंतप्रधानपदावर त्यांची हत्या होईपर्यंत राहिल्या. पंतप्रधान असताना देशाची एकात्मता वाढीसाठी व अखंडता टिकविण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेता येईल.

१) बँकांचे राष्ट्रीयकरण –

इ. स. १९६९ मध्ये इंदिराजींनी राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने जो अति-महत्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे बँकांचे राष्ट्रीयकरण होय. या अगोदर देशात सर्व बँकांचे स्वतंत्र व खाजगी अस्तित्व होते. परंतु राष्ट्रीयकरणामुळे बँकांच्या कार्यात सुसुत्रता निर्माण झाली. त्यामुळेच देशातील आम जनतेने या निर्णयाचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. परिणामी जनतेच्या मनात देशाची एकता रूजण्यास मदत झाली.

२) संस्थानिकांचे तनखे बंद केले –

भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानिकांशी सामिलनामा करार करून भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आली तर हैद्राबाद व जुनागड सारखी संस्थाने जबरदस्तीने विलीन केली गेली. संस्थानिकांच्या विलिनिकरणा-नंतर संस्थानिकांना त्याचा मोबदला म्हणून काही रक्कम दरवर्षी तनखा म्हणून देण्याचे भारत सरकारने मान्य केले. तेव्हा लक्षावधी रुपये भारत सरकारला आपल्या तिजोरीतून त्यांना द्यावे लागत. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी तनखा देण्याचे बंद करण्याचा धाडशी निर्णय घेऊन देशाच्या तिजोरीवरील संकट टाळले. त्यामुळे सर्वसामान्य जनतेने हा निर्णय उचलून धरला. परिणामी राष्ट्राची एकता भक्कम होण्यास मदत झाली.

३) बांगला देशमुक्ती संग्राम –

बांगला देशमुक्ती संग्रामाच्यावेळी इंदिराजींनी त्वरित धाडसाने निर्णय घेऊन पाकिस्तानच्या विरुद्ध युद्धात भाग घेतला. त्यावेळी लाखो निर्वासीत भारतात आले होते. त्या निर्वासितांनाही योग्य रितीने मदत केली. इंदिराजींचा स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या लोकशाही तत्वांवर दृढ विश्वास असल्यामुळेच पाकि-स्तान विरुद्ध संघर्ष करून बांगला देश स्वतंत्र करण्यास सर्वतोपरी मदत केली. पाकिस्तानचा पराभव व बांगला देशाची निर्मिती यामुळे भारतीय जनता उल्हासित होऊन देशाची एकात्मता व अखंडता टिकविण्यास कटिबद्ध झाली. इंदिराजींच्या या धोरणामुळे पाकिस्तानही भारताकडे योग्य दृष्टीने पाहू लागला. परंतु आज मात्र पाकिस्तान भारताकडे पुन्हा सुडाच्या भावनेने पहात आहे. अतिरेक्यांच्या खलिस्तानच्या मागणीस प्रोत्साहन देऊन त्यांना सर्वप्रकारची शस्त्रास्त्रांची मदत पाकिस्तान करीत आहे. भारताची छकले करण्यास पाकिस्तान पुढे येत आहे. परंतु पाकिस्तानला ते शक्य नाही. कारण इंदिराजींच्या धोरणा-वर आधारित आज निर्णय घेऊन भारत सरकार आपले धोरण ठरविल.

४) काँग्रेसमधील फुट –

काँग्रेस एकात्म करण्याचा प्रयत्न म्हणजेच देश एकात्म करण्याचा इंदिराजींचा प्रयत्न होता. काँग्रेस पक्ष एक असेल तरच देशाची एकात्मता टिकू शकेल या कल्पनेने त्यांनी काँग्रेसचे शुद्धीकरण केले. इंदिराजींनी सिक्कीमचे

भारतात विलिनीकरण घडवून आणले. त्यामुळे देशाच्या प्रदेशात भर पडून एकता वाढीस लागली.

५) सत्तेचे समीकरण बदलले –

इंदिराजी सत्तेवर आल्यानंतर त्यांनी सत्तेचे समीकरण पूर्णपणे बदलले. परंपरागत सत्ताधारी वर्गाची मक्तेदारी मोडून इतर मागासवर्गीय व खालच्या थरातील जाती-जमातींना सत्ता भोगण्याची संधी मिळवून दिली. राज्यकारभारात त्यांना हिस्सा दिल्यामुळे सरकारवरील त्यांचा विश्वास दृढ झाला. परिणामी यामुळे सर्वांना एकत्र जोडून ठेवणे सोपे झाले. म्हणजे एकात्मता वाढीसाठी ही अत्यंत महत्वाची कृती होती.

६) विज्ञान, कला, गायन या सांस्कृतिक कृतिंना प्रोत्साहन –

सांस्कृतिक कार्यक्रमात कला गायन इ. बाबतीत देशातील युवक-युवतींना इंदिराजींनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे सर्व राज्यातील कलावंतांना त्यापासून स्फूर्ती मिळाली आणि कला क्षेत्राचा विकास होऊन एकतावाढीस उपयोग झाला. अमेरिका व फ्रान्समध्ये देखील ‘ फेस्टिवल ऑफ इंडिया ’ सारखा सण साजरा करण्याची पद्धत सुरू केली. विज्ञान क्षेत्रातही भारत मागे नाही हे दाखवून देण्यासाठी राजस्थानातील पोखरान येथे अणुस्फोट केला. या अणुस्फोटामुळे परकीय शक्तींना भारताची ताकद समजली, त्यामुळे भारताचे शेजारील देश भारताकडे कमकुवत दृष्टीने न पहाता वेगळ्या दृष्टीने पाहू लागले. याचा परिणाम भारतीय जनतेत एकीची भावना वाढीस लागली.

७) आणीबाणीची घोषणा (१९७५) –

आणीबाणीचा निर्णय वादग्रस्त होता. पण इंदिराजींनी आणीबाणी लागू केली, त्यामागील हेतू लोकशाहीला तडा जावा असा मुळीच नव्हता. याउलट आणीबाणीच्या काळात देशातील लोकांना योग्य शिस्त लावून गुन्हेगारी कमी झाली होती. परंतु प्रशासनाचा काही महाभागांनी या काळात फायदा उठवला. त्यात इंदिराजींचा काही दोष नव्हता.

८) व्यापक स्वरूपाची ४२ वी घटना दुरूस्ती –

इंदिराजींनी घटनेत दुरूस्ती करून घटनेच्या सरनाम्यात एकात्मता

शब्दाचा समावेश करून भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दीष्ट अधिक स्पष्ट केले. तसेच समाजवादी आणि धर्मनिरपेक्षता ही राष्ट्रीय **एकात्मता वाढीस** पोषक असणारी उद्दीष्टयेही घटनेच्या सरनाम्यात स्पष्टपणे अंतर्भूत करण्यात आली. एकात्मतेच्या वाढीसाठी नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचाही घटनेत समावेश करण्यात आला. थोडक्यात म्हणजे ४२ वी घटना दुरुस्ती एकात्मता व अखंडता टिकविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची ठरली. या अगोदर एकात्मता या शब्दाचा समावेश कायदेशीररित्या घटनेत झालेला नव्हता.

९) मिलिटरी ऑपरेशन ब्लूस्टार –

पंजाबमध्ये **जानेवारी** १९८० पासून अतिरेक्यांनी थैमान घातले आहे. दहशतवाद्यांना पाकिस्तान उघडपणे मदत करीत असल्यामुळे त्यांची दुष्कृत्ये वाढत गेली. सुवर्ण मंदिरात सर्व दहशतवाद्यांना आश्रय होता, त्यांची सर्व कट-कारस्थाने तेथेच शिजत होती. दहशतवादाला तेथूनच प्रोत्साहन मिळत होते. तेव्हा या दहशतवादी कारवाया करणाऱ्या अकालींना मंदिराबाहेर घालविण्यास केंद्र व राज्य सरकारने अनेक वेळा मंदिरप्रमुखांना विनंत्या केल्या. परंतु मंदिरात तसे काहीच घडत नसल्याचा सतत निर्वाळा दिला. त्यामुळे केंद्र सरकारला सुवर्णमंदिरात लष्कर घुसविल्याशिवाय पर्यायच शिल्लक राहिला नाही. यावेळी सर्वसामान्य शीख बांधव दहशतवादाला कंटाळले होते. त्यांना भिंद्रनवालेंच्या कारवाया पसंत नव्हत्या. अशा कठिण परिस्थितीत शेवटी सरकारने सुवर्ण मंदिरात लष्करास प्रवेश करण्यास परवानगी दिली. ऑपरेशन-ब्लूस्टारमध्ये भिंद्रनवालेचा मृत्यू झाला. त्याच्या दोन सहकाऱ्यांचाही अंत झाला.

सुवर्ण मंदिरात बंदुकी, दारूगोळा यांचा साठा व इतर हत्यारे सापडली. या साठ्यात पाकिस्तान, चीन व अमेरीका या देशांनी पुरविलेली हत्यारे मिळाली. सुवर्ण मंदिरात लष्कर घुसविण्याचा निर्णय एकट्या इंदिराजींनी घेतला, असे म्हणणे अत्यंत चुकीचे ठरेल. कारण भविष्यकाळातील संकट ओळखून हा निर्णय कोणत्याही सरकारला घेणे क्रमप्राप्त होते. नाहीतर देशाचे विघटन नक्की होणार होते. यात शंका नाही. भारताच्या एकात्मता व अखंडतेवर आलेले संकट टाळण्यासाठी इंदिराजींच्या सरकारने वरील निर्णय घेतला. त्यामुळेच पंजाबातील अकालींच्या कारवायांना तात्पुरता आळा बसू शकला. त्यांचे कट, कारस्थाने उधळली गेली. परिणामी संकटात असलेली राष्ट्रीय एकता वाढीस लागली.

वास्तविक, इंदिरा गांधींचे अकाली काही शत्रू नव्हते. याउलट त्या शीखांच्या गुरूंना अतिशय उच्चस्तरीय मान देत असत आणि शीखाच्या गुरूंनी देशाच्या एकतेसाठी काय केले तेही नेहमी सांगत असत. २८ नोव्हेंबर १९६६ रोजी त्या म्हणाल्या,

" Concept of equality of all religions given by Gurunanak was his unique Contribution to the Unity of India."
पुढे त्या म्हणाल्या की,

" The Sikhs have a very significant role in making India Stronger. "

यावरून इंदिराजींचे शीख समाजावर किती प्रेम होते हे कळते. तरी सुद्धा अतिरेक्यांनी कुठलाही विचार न करता त्यांना मारण्याचा कट केला. त्यांच्याविरूद्ध शिजलेल्या कटाची त्यांना माहिती असावी, तरीही त्या निर्भिडपणे वागत असत. शेवटी त्यांचा रक्षकच भक्षक झाला. आणि ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिराजींवर गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आली.

इंदिराजींची हत्या होण्याच्या आदल्या दिवसापर्यंत त्या देशाचे दौरे करीत होत्या. त्यांची शेवटची सभा भुवनेश्वर येथे ३० ऑक्टो. १९८४ रोजी झाली. त्या सभेत इंदिराजी अत्यंत भावनावश होऊन म्हणाल्या की,

'I am alive, Tomorrow I may not be here.' असे म्हटल्यानंतर खरोखरच दुसऱ्या दिवशी इंदिराजी आपणा सर्वाना पोरके करून सोडून गेल्या. त्याच सभेत त्या म्हणाल्या होत्या की,

'I am not afraid, But every drop of my blood will be shed for the country., शेवटी तसेच घडले. कारण इंदिराजींच्या रक्तानेच देशाचे विघटन टळले. किती महान कार्य त्यांचे ! की जे भविष्यकाळात सर्व राज्यकर्त्यांसमोर आदर्श ठरेल. देशाच्या एकतेसाठी, एकात्मतेसाठी राष्ट्राच्या पंतप्रधानाचा बळी जातो ही एक आपल्या दुर्दैवाची गोष्ट होय. इंदिराजींचा प्राण घेऊनही अतिरेकी अजून शांत नाहीत. एकात्मता वाढीस किंवा टिकविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर भारतात म. गांधींनंतर इंदिरा गांधींनीच खरा सर्वस्वाचा त्याग केला. स्वत:चा देह देशाच्या एकात्मतेस अखंडतेस अर्पण केला. तेव्हा आपण सर्वांनी आपल्या मनात एकात्मता टिकविण्यासाठी इंदिराजींनी केलेल्या त्यागाची आठवण ठेवणे आवश्यक आहे. इंदिराजींना मारले गेले, तेव्हा संपूर्ण देशातील

जनतेच्या डोळ्यात दु:खाश्रू उभे राहिले होते. कारण त्या राष्ट्राच्या माता होत्या.

१०) परराष्ट्रीय धोरण –

इंदिराजींनी अलिप्ततावाद बळकट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अलिप्त चळवळीच्या त्या नेत्या होत्या. अलिप्ततावाद बळकट करतांना त्यांनी अमेरिकेसारख्या बलाढ्य देशालाही जुमानले नाही. महासत्तांच्या दडपणातून अनेक देशांची त्यांनी सुटका केली. अलिप्त राष्ट्रांची परिषद भरवून तिचे नेतृत्व केले. सार्क परिषद यशस्वी केली. दक्षिण आशियायी देशांस बळकटी आणली. तसेच अरब राष्ट्रांशी त्यांनी मैत्रिसाठी प्रयत्न केले.

पंजाबातील दहशतवाद्यांना पाकिस्तान हत्यारे, बंदुकी व इतर शस्त्रास्त्रे दारूगोळा पुरवून खलिस्तानच्या मागणीस उघड उघड प्रोत्साहन देत असतांनाही इंदिराजींनी पाकिस्तान बरोबरही योग्य रीतीने समजोता केला पाकिस्तानशी संबंध सुधारण्यासाठी सिमला करार केला. राष्ट्रकुलास त्यांनी बळकटी आणण्याचा प्रयत्न केला. बांगलादेश मुक्त करून स्वतंत्र करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. इंदिराजींचे परराष्ट्रीय धोरण अतिशय कणखर स्वरूपाचे होते. एकदा घेतलेला निर्णय त्या कधीही पुन्हा मागे घेत नसत. त्यामुळेच त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली. त्यांच्या या वागण्यामुळेच भारताची जगात मान उंचावली आणि भारताकडे वाकडी मान करून पहाणारे देशही सरळ झाले. केवळ त्यामुळेच आज भारत जगात ताठ मानेने उभा आहे. भारताची एकताही यामुळे वाढीस लागली. थोडक्यात म्हणजे इंदिराजींनी आपल्या काळात मृत्यू येईपर्यंत जे कार्य केले ते देशाची एकात्मता अबाधित राहण्यासाठीच होय, असे म्हणावे लागेल. इंदिरा गाधींच्या हत्येबद्दल पंतप्रधान राजीव गांधी म्हणाले -

" Indira Gandhi, India's Prime Minister, has been assassinated. She was mother not only to me, but to the whole nation. She served the Indian people to the last drop of her blood. "

एकात्मतेवरील श्रीमती इंदिरा गांधींचे विचार –

१) आजची देशातील स्थिती काही अंशी आशादायक तर काही अंशी धोक्यांनी भरलेली आहे आणि माझ्या मते आशा असल्याने धोके आणखी गडद झाले आहेत.

आपला दृष्टीकोन धार्मिक असला, माणूस-माणूस आणि नागरिक-नागरिक यांच्यात दरी असली तर तेथे लोकशाही नांदू शकत नाही. समाजवाद नसल्यास तेथे लोकशाही असू शकत नाही कारण लोकशाही व असमानता एकत्र नांदू शकत नाही. म्हणून त्या साठी पांच वर्षांत एकदा मतदान करून थांबणार नाही. लोकांना देशासाठी असलेल्या कार्यक्रमात खऱ्या अर्थाने सहभागी व्हावे लागेल. माझ्या मते आपल्या देशात ही भावना आहे. परंतु ती संघटित करण्याचा प्रयत्न आपण केलेला नाही.

लोकशाही व जनतेचा सहभाग याचा अर्थ कोणाच्याही मनात भीती असता कामा नये. तरच आपण लोकशाहीचा विविध मार्गांनी विनाश करू पहाणाऱ्या शक्तींचा मुकाबला करू शकू.

माझा कोणत्याही राजकीय पक्षाला विरोध नाही. माझा विरोध काही कल्पनांना आहे. या कल्पना कोणत्याही पक्षाने मांडल्या तर त्या नाहीशा करण्यासाठी आपल्याला लढले पाहिजे. धार्मिक विद्वेषाचे रोपटे, एखादे बीज पडले तरी बघता, बघता फोफावते. चांगल्या माणसाच्या मनातही ते उगवू शकते. जातीय दंगलीच्या काळात आपण पाहिले, एकदा विष पेरले की शेजारी नांदल्याचे, एकमेकास मदत केल्याचे व आपली मुले-बाळे एकत्र खेळल्याचे ते विसरतात. म्हणून जेथे विष पेरले गेले, त्या जागा स्वच्छ करणे आणि जेथे विष पोहचले नसेल तेथे ते पेरले जाणार नाही याची खबरदारी घेणे, हे आपले कर्तव्य आहे. ते आपण पार पाडले तरच भारत देश सुंदर होऊ शकेल.

२) आज जग ज्या प्रकारे अस्तित्वात आहे, बदलत आहे, त्या स्थितीत राष्ट्रीय एकात्मता ही आपल्याला जिवंत राहण्यासाठी एक अनिवार्य अट बनलेली आहे. आपल्या विकास योजना पुढे न्यायच्या असतील व एकतेबाबत प्रगती करायची असेल तर ती एक व्यवहार्य गरज आहे. ही वस्तुस्थिती ज्या प्रमाणात आपण जाणून घेऊ त्याच प्रमाणात विविध समस्या सोडविण्यासाठी अनुकूल वातावरण आपण निर्माण करू शकतो. एखाद्या क्षणी या समस्या सोडविण्यास अशक्य दिसत असल्या तरी आधुनिक भारताचा संपूर्ण इतिहास अशा समस्यांची उकल कशी झाली याच्या वर्णनाने भरला आहे. देशाची एकता दुर्बल करण्याची इच्छा कोणाही विचारी माणसाने धरू नये. एकात्मतेच्या अनुकूल शक्ती मजबूत असल्याची मला खात्री असली तरी त्या संघटीत करून त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय एकात्मतेची चळवळ ही केवळ सरकारी होता कामा नये. ती लोकांची सर्वसमावेशक चळवळ बनणे आवश्यक आहे, सर्व जातीचे, सर्व धर्मांचे, सर्व प्रांताचे लोक एकत्र येऊन त्यांनीच ही चळवळ उभारायला हवी. आपल्या देश उभारणीच्या कार्यात आपण सर्व सहकारी आहोत आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या पूर्ण क्षमतेचा, तिच्या कौशल्याचा योग्य उपयोग करून घेऊन तिच्या व्यक्तिमत्वाला विकासाच्या दृष्टीने योग्य ती संधिही मिळेल अशी दक्षता घ्यावयास हवी. वर्षांनुवर्षांच्या अडचणीतून वर येण्याकरता त्यांना मदतीचा हात द्यावयास हवा. सर्व प्रकारच्या पिळवणुकांविरुद्ध, अपमानाबद्दल आपण लढा दिला पाहिजे. घटनादत्त अधिकारांचा पुरेपूर लाभ घेण्याची क्षमता असलेल्यांना ती मिळविण्यासाठी आपण सहाय्य केले पाहिजे. महात्मा गांधी, पंडित नेहरु, मौलाना आझाद आणि इतर प्रेरणादायी महान नेत्यांचे ऋण फेडण्यासाठी या कार्याला वाहून घेणं आपलं कर्तव्यच ठरतं.

हिंदु असो, मुसलमान असो, शीख असो, इतर कोणताही समाज असो, धर्मांधता दोषास्पदच आहे. तिची उपस्थिती जाणवताच आम्ही तिचा धि:क्कार केला नाही हे खरे नाही. त्याचप्रमाणे एखाद्या संघटनेचे किंवा व्यक्तीचे एखादे विधान जातीद्वेषाला चिथावणारे असले तर त्याचा आम्ही कडक निषेध केलेला नाही, हे सुद्धा खरे नाही. मात्र याचा अर्थ असा नव्हे की बहुसंख्यांक समाजाने काहीही केले तरी त्याकडे आम्ही डोळेझाक करावी.

बहुसंख्य समाजावर एक खास जबाबदारी असते. जेथे जेथे एखादा वर्ग बलवान असतो तेथील दुर्बल वर्गाची जबाबदारी त्याच्यावर असते. परंतु जेथे हिंदु बहुसंख्य आहेत तेथे त्यांच्यावर मुसलमान, खिश्चन व इतर अल्पसंख्य वर्गाची जबाबदारी आहे. परंतु जेथे शीख बहुसंख्य आहेत, तेथे त्यांच्यावर इतरांची जबाबदारी आहे, मग अल्पसंख्य हिंदु असोत की मुस्लीम, किंवा इतर कोणी असो. काश्मिरमध्ये मुस्लीम बहुसंख्य असल्याने तेथे त्यांनी हिंदु शांततेने व सुरक्षितपणे जगतील हे पाहण्याची जबाबदारी मुसलमानांची आहे.

धर्म आणि राजकारण यांची भेसळ करून हिंदु, मुस्लीम, शीख आणि इतर संकुचित विचारांचा वापर पक्षीय आणि व्यक्तिगत स्वार्थासाठी करणारे पक्ष आणि व्यक्ती अजूनही आहेत. या शक्तींचा सामर्थ्यानिशी मुकाबला करण्याची गरज राष्ट्र सुरक्षित ठेवण्यासाठी निकडीची आहे.

राजीव गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता

इंदिराजींच्या हत्येनंतर लगेच बुधवार दि. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी संध्याकाळी श्री. राजीव गांधी यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. यावेळी देशावर शोककळा पसरली होती. देशाच्या विविध भागात दंगली उसळल्या होत्या. जाळपोळ चालू होती. कायदा व सुव्यवस्था मोडकळीस येण्याच्या बेतात होती. राजधानीतही दंगल सुरू होती. सर्वत्र दंगली व अस्थिर परिस्थितीमुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आली होती. विघटनवादी शक्ती डोके वर काढू लागली होती.

राजीवजींचे जनतेला आवाहन –

राजीव गांधींनी सत्तेवर येताच देशातील नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. यावेळी लोक म्हणू लागले 'blood for blood' परंतु राजीव गांधी स्वतः तीन मूर्ती हाऊसवर जाऊन नागरिकांना म्हणाले की नागरिकांनी अशा घोषणा देणे इष्ट नाही. कारण आपणास देशाची एकता व अखंडता टिकवायची आहे. त्यासाठी आपण शांततेच्या मार्गानेच गेले पाहिजे.

एवढेच नव्हे तर देशातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री दिल्लीत इंदिराजींच्या अंत्यविधीस आले असतांना, त्यांना राजीव गांधींनी आपापल्या राज्यात जाऊन शांतता राखण्यास सांगितले की ज्यामुळे देशाच्या एकतेला धोका निर्माण होणार नाही.

दिल्लीच्या दंगलग्रस्त भागाला स्वतः राजीव गांधींनी भेट देऊन पहाणी केली. आणि नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. दूरदर्शनवरून आवाहन करताना ते म्हणाले की, "प्रत्येकाच्या संपत्तीस व जिवीतास संरक्षण मिळेल याची सरकारने काळजी घेतली. प्रत्येकाच्या धर्माच्या, जातीच्या, वंशाच्या नागरिकांची संरक्षणाची जबाबदारी सरकारची असून ती योग्यरित्या पार पाडली जाईल. जातीय वेडेपणा आपला नाश करील म्हणून तसे सरकार करू देणार नाही."

राजीवजींनी सत्तेवर आल्यावर एका आठवड्यातच देशातील कायदा व सुरक्षा यांची घडी व्यवस्थित बसवून राष्ट्राच्या एकतेवर आलेले संकट दूर केले.

दंगलग्रस्तांना मदत –

दंगलीत हजारो लोक होरपळले होते. अनेकांची संपत्ती लुटली होती.

अनेक मारले गेले होते. त्यावर उपाययोजना म्हणून राजीव गांधींनी त्वरित 'Releif Camp' आखून दंगलग्रस्तांना मदतीचा हात पुढे केला. अवघ्या सहा तासातच दंगलग्रस्त भागात मोठया प्रमाणावर अन्नाचा पुरवठा केला. तसेच त्यांना पांघरण्यासाठी ब्लँकेटस्‌चाही पुरवठा त्वरित केला.

अलिप्त चळवळीचा नेता -

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी सत्तेवर आले. त्यांनीही मागील धोरण स्विकारून अलिप्त चळवळीचे नेतृत्व स्विकारले. अफ्रिकेत दुष्काळ पडल्यामुळे धान्य व औषधांची मदत त्वरित पाठविली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्य राखले गेले.

पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवट -

राजीव गांधींनी पंजाब प्रश्न सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु अकाली नेतेही आपल्या यादीतील मागण्या वाढवितच राहिले. त्यामुळेच पंजाब समस्या गुंतागुंतीची बनली. अजूनही पंजाब समस्येवर उपाय करणे शक्य झाले नाही. आज पंजाब प्रश्नच मुख्य प्रश्न म्हणून उभा आहे. पंजाबात अलिकडे पुन्हा दहशतवादी कृत्यांचे प्रमाण वाढले. अस्थिरता निर्माण झाली. सामान्य माणसाला जगणे कठिण झाले. त्यामुळे पुन्हा पंजाबात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.

आसाम समस्या -

बांगला देशातून येणाऱ्या लोकांमुळे खऱ्या अर्थाने आसाम समस्या निर्माण झाली आहे. परंतु पंतप्रधान राजीव गांधी यांनी आसाम समस्या अतिशय शांततेत हाताळली. त्यामुळेच आसाममध्ये आज शांतता आहे.

राजीव गांधी सत्तेवर आले तेव्हा देशात अनंत समस्या उभ्या होत्या. परंतु त्यांनी पंजाब समस्या सोडली तर बाकीचे सर्व प्रश्न निकालात काढले. आसाम प्रश्न सोडविण्यासाठी गणसंग्राम परिषदेशी 'आसाम करार' केला. पंजाबचा प्रश्न निकालात काढण्यासाठी 'पंजाब करार' केला. मिझोरामची समस्या सोडविण्यासाठी 'मिझोराम करार' केला. यापैकी आता मात्र दहशतवाद्यांच्या कारवाया चालू असून त्यावरही लवकरच तोडगा निघेल असे

पंतप्रधानांचे मत आहे.

राजीव गांधींच्या मतानुसार रूढी, परंपरा, नष्ट करणे आवश्यक असून जातियताही समूळ नष्ट होणे आवश्यक आहे. त्यासाठीच त्यांनी सर्वत्र आधुनिकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिकतेतून राष्ट्रीय एकात्मता वाढीचा प्रयत्न सध्या चालू आहे. आधुनिकतेतूनच जनतेत राष्ट्रीय वृत्ती निर्माण होईल.

इगल ऑपरेशन –

श्रीलंकेत निर्माण झालेली तामिळींची समस्या सोडविण्यासाठीही राजीव गांधींचे सरकार प्रयत्नशील आहे. तामिळी व श्रीलंका यांच्यात संघर्ष चालू असताना तामिळी लोक अन्नान्न करून तडफडत होते. तेव्हा राजीव गांधींनी या अडचणीच्या काळात श्रीलंका सरकारला न जुमानता मानवतावादाच्या दृष्टीने योग्य असा निर्णय घेऊन विमानांचा वापर करून अन्न व औषधांचा पुरवठा केला. यावेळी आजूबाजूचे सर्व शेजारी देशांनी तोंडात बोट घातले, की भारतही आता सबळ असून भारताच्या वाटेला गेले तर योग्य व चोख उत्तर मिळेल.

राजीव गांधींच्या या निर्णयाचे भारतीय जततेने उत्स्फूर्तपणे स्वागत केले व त्यांना एकमुखाने पाठिंबा व्यक्त केला. आपल्या देशाच्या एकात्मता वाढीवर निश्चित परिणाम होऊन परकियांचे दडपणही कमी होऊ लागले आहे. श्रीलंकेबरोबर यशस्वी कराराही राजीवजींनी घडवून आणून संघर्ष मिटविण्याचा प्रयत्न केला.

प्रकरण सातवे

राष्ट्रीय एकात्मतेच्या समस्या

" आपला देश अत्यंत कठिण कालखंडातून वाटचाल करीत आहे. भारतीय जनतेवर माझा विश्वास असून आपली सर्वधर्म समभावी लोकशाही त्यातून विजयी होऊन बाहेर पडेल याची मला खात्री आहे. सर्वधर्म समभाव म्हणजे निधर्मीपणा नव्हे तर त्याचा अर्थ आहे सर्व धर्मांच्या प्रती समान आदर "

डॉ. झकीर हुसेन

त्रिवेंद्रम, २० डि. १९६७

" एकात्मतेबद्दल ज्यांना कळकळ आहे त्या सर्वांना एकत्र येण्याची हाक आपण दिली पाहिजे. या एकात्मतेच्या विक्राळ समस्येला योग्य उत्तर देणे असे जन आंदोलन राष्ट्रीय एकात्मतेसाठी दीर्घकाळ उभारूनच शक्य होईल. "

उभय नेत्याच्या वक्तव्यावरून भारताच्या एकतेला स्वातंत्र्य मिळाल्या-पासूनच धोका निर्माण झालेला असून, राष्ट्रीय एकात्मता ही विक्राळ समस्या असून तिला तोंड देण्यासाठी दीर्घकाळ जन आंदोलन उभारण्याची गरज पंडित नेहरूंनी वर्तवली होती.

पंडित नेहरु

भारतात प्राचीन काळापासून सांस्कृतिक ऐक्य निर्माण झालेले असून, राजकीय ऐक्य निर्माण होण्यास मात्र ब्रिटिश लोक भारतात येण्याची वाट पहावी लागली, हेच आपले दुर्दैव होय. ब्रिटिशांनी जेव्हा संपूर्ण भारतात आपली सत्ता स्थिर केली, त्यावेळी खऱ्या अर्थाने भारतात राजकीय ऐक्य व राष्ट्रीय एकात्मतेचा उदय झाला असे म्हणावे लागेल. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळीच संस्थानिकांनी देशाच्या एकतेवर घाला घालण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र काही वर्षातच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार व प्रचार जोरात सुरू करावा लागला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्य रक्षण आणि प्रगती हीच राष्ट्रीय एकात्मतेची समस्या होती.

"स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतासमोर मूलभूत समस्या म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेची आहे. राष्ट्रीय एकात्मता पूर्ण झाली असली तरी ती पुरेशी नाही. भारतासमोरील आजचा प्रश्न राजकीय ऐक्यापेक्षा मानसिक एकात्मतेचा आहे. प्रांतवाद, जातीयवाद वगैरे देशाच्या ऐक्यावर हल्ला करणारे वाद नष्ट करून देशाची एकात्मता बळकट करायला हवी." असे पंडित नेहरुंनी प्रतिपादन केले.

परंतु अलीकडच्या काळात देशात विघटनवादी शक्ती आणि असामाजिक तत्वांच्या हालचालींमुळे राष्ट्राच्या ऐक्यालाच धोका निर्माण होतो की काय अशी शंका येऊ लागली आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न कधी नव्हे एवढ्या तीव्रतेने जाणवत आहे. आपणापुढील सर्वात महत्वाचा प्रश्न हा राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न आहे. सध्या राष्ट्रीय एकात्मतेवर अनेक प्रकारे हल्ले होत आहेत. त्यामुळेच एकात्मता, लोकशाही आणि आपले स्वातंत्र्य या सर्वांना गंभीर धोका निर्माण झाला आहे. आतून आणि बाहेरून प्रतिगामी शक्ती कार्यरत असून दुष्ट प्रवृत्तींना खतपाणी घालण्याचे, भडकवण्याचे आणि आश्रय देण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे एकात्मतेला अडथळा आणणाऱ्या सर्व समस्यांचा आपण विचार करणे आवश्यक आहे. या समस्यांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

१) धर्मांधता व जातियता –

जाती-धर्म द्वेषाची भावना धूर्त इंग्रजांनी या देशात रूजवली. आपली अमर्याद सत्ता टिकविण्यासाठी, साम्राज्यवादाविरूद्धचे आंदोलन दडपण्यासाठी, स्थानिक जनतेत फूट पाडण्यासाठी इंग्रजांनी अवलंबिलेली फोडा व झोडा नीति भारताच्या ऐक्याला मारक ठरली.

आधी सार्वजनिक सेवेत आणि नंतर मतदारसंघात त्यांनी जाती, भाषा, वंश, धर्म आणि वर्णावर भर देण्यास सुरूवात केली. ऐक्य विरोधी राजकारणातील त्यांचा हा महत्वाचा डाव होता. स्वतंत्र मतदारसंघ जाहिर केल्यामुळे जातीयवादाचा संबंध थेट राजकारणाशी जोडला आणि परिणामतः हितसंबंधातून संघर्ष आणि त्यातून जातीय दंगलींचा जन्म झाला. आजही ठिकठिकाणी जातीय दंगलींचा डोंब उसळल्याच्या बातम्या वाचावयास मिळतात. उदा. मेरठमधील जातीय दंगल, दिल्लीतील जातीय दंगल, नाशिकमधील जातीय दंगल इ.

धर्माचा चुकीचा अर्थ सांगून आज लोकांच्या भावना भडकावल्या जात आहेत. धर्माच्या नावावर माणसे माणसांची हत्या करायला प्रवृत्त झाली आहेत.

हींच आज देशाच्या एकात्मतेपुढील समस्या आहे. जातीच्या हितासाठी राष्ट्र-हिताचा बळी देण्याची प्रवृत्ती पोसली गेली. व्यक्तीगत कर्तृत्वाला जातीय, व्यवस्थेत वाव नाही. व्यक्तीच्या गुणांना मान न मिळाल्याने निराशा, द्वेष-मत्सर यांची वाढ होऊन सामाजिक अशांती निर्माण होते. जातीभेदामुळे विविध गटांमध्ये एकप्रकारचे पडदे निर्माण होऊन जातीजातीतील सामाजिक दळण-वळण आज बंद पडत चालले आहे. त्यामुळेच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला धोका निर्माण झाला आहे.

धार्मिक असहिष्णुतेप्रमाणेच जातीयता ही देखील विघटनवादी वृत्तीस हातभार लावणारी आहे. निवडणुका आणि सत्तावाटपाची संपूर्ण प्रक्रिया ही भिन्न जातीतील झगड्यास पोषक ठरत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मंत्रीमंडळ बनवतांना, नेता निवडतांना, धर्म, जात जमातींच्या वर्चस्वाचा आपण विचार करतो तोपर्यंत धर्मांधता व जातियता नष्ट होणे शक्य नाही. देशाच्या एकात्मतेचे धर्मवाद व जातीयवाद हे मोठे शत्रू आहेत. आज जातीय शक्तींनी पुन्हा डोके वर काढले आहे. वाढत्या जातीय आणि प्रादेशिक शक्तीमुळे भारतीय समाजा-पुढे एक आव्हान उभे टाकले आहे. पंजाबमधील सध्याच्या घटनांमुळे दोन जमातीत द्वेष आणि संताप निर्माण करण्यात येत आहे. संपूर्ण देशात समाज-कंटकांनी जातीयतेचे बीज रूजवून स्फोटक परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्याचाच परिणाम म्हणून हिंदू-मुस्लिम दंगे, हिंदू-शीख हिंसात्मक संघर्ष निर्माण होतात. परिणामी या धर्मवाद व जातीयवाद यांच्यामुळे फुटीरता निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आलेली आहे.

धर्माच्या नावांखाली जातीय फुटीरतेचा पाया घातला जातो. अल्प संख्यांकांनी चालविलेल्या संस्था या पुनरूज्जीवनवाद्यांचे आणि फुटीर प्रवृत्तींचे अड्डे आहेत. शैक्षणिक संस्थांमधून मुलांना प्रारंभीपासूनच जातीयतेची शिकवण मिळते. त्यासाठी शैक्षणिक संस्थांवरील जातीयवाद्यांची पकड दूर करणे आवश्यक आहे.

२) दारिद्र्य आणि गरीबी –

आमच्यापैकी बहुसंख्य अगदी गरीब आहेत. ते उपाशीपोटी झोपतात. असंख्य निरक्षर आहेत. त्यांच्या औषधोपचारांचीही सोय नाही. काहींना निवारा नाही. आज सातव्या योजनेत म्हटल्यानुसार आपल्या देशात सुमारे ३६.९ टक्के लोक गरीब आहेत. कोणत्याही देशाच्या शासनयंत्रणेचा विचार केला तर

त्या देशात जर जनता दारिद्र्याने जर्जर झाली असेल, परंतु शासनकर्ता अति-उत्साही असून काहीच उपाययोजना करीत नसेल तर तेथील जनता क्रांतिला सिद्ध होते. याउलट एखाद्या देशात आर्थिक सुबत्ता असून दारिद्र्य कमी असेल व शासनकर्ता अविचारी, विलासी, चैनीही असेल तर त्या देशात शांतता नांदू शकते. आज आपल्या देशातील जनतेची स्थिती काही अंशी अशीच झालेली दिसते. आपल्या देशात गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमत झालेले दिसतात. याचाच अर्थ असा की आपल्या एकाच देशात श्रीमंताचे आणि दुसरे गरिबांचे अशी दोन राष्ट्रे आहेत. या द्विराष्ट्रवादातूनच राष्ट्रीय एकात्मतेच्या आड येणारे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या द्विराष्ट्रवादाला नेस्तनाबूत करणे आवश्यक आहे. कारण या द्विराष्ट्रवादी शक्ती एका गटाविरुद्ध दुसरा गट, जातीविरुद्ध जाती, धर्माविरुद्ध धर्म, गांवाविरुद्ध गांव, एका पक्षाविरुद्ध दुसरा पक्ष उठवून राष्ट्रीय एकात्मतेची मोडतोड होण्याची शक्यता आहे.

३) सांपत्तिक विषमता –

एकात्मतेच्या प्रश्नाची अनेक कारणे असली तरी आर्थिक विषमता हे त्याचे प्रमुख कारण आहे. ऐषारामात लोळणारे धनदांडगे आणि गरिबीत पिचणारे आणि दारिद्र्यात सडणारे दीनदुबळे यांच्या सहजीवनातील विषमता आर्थिक विकासाच्या वेगाबरोबर वाढतच आहे. परिणामी देशाच्या एकात्मतेला ही गोष्ट घातकच ठरणार आहे.

काही मूठभर उद्योगपती आणि बड्या कंपन्या यांना प्रमाणाबाहेर मिळाणाऱ्या नफ्यातून खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यात निर्माण झालेल्या सांपत्तिक विषमतेला आळा घालण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राची कल्पना पुढे आली. नियोजनाच्या दस्तऐवजात सार्वजनिक क्षेत्रातील उद्देश विशद करताना म्हटले आहे की, आधुनिक उद्योगधंद्याचे स्वरूपच असे आहे की त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवल आणि साधनसंपत्ती लागते. याचा परिणाम असा होतो की ज्या मूठभर लोकांकडे या गोष्टी आहेत त्यांच्याच हातात आर्थिक सत्ता केन्द्रीत होते. त्यामुळे त्यांनाच अधिकाधिक लाभ होऊन खाजगी क्षेत्रातील उत्पन्नात आणि संपत्तीत विषमता निर्माण होते.

सार्वजनिक क्षेत्र हे खाजगी आजारी उद्योगधंद्यांचे एक इस्पितळ बनले आहे. परवाना पद्धतीमुळे तर सरकारी अधिकारी आणि व्यापारी यांना भ्रष्टाचाराचे कुरण चरायला मोकळे मिळाले आहे. किमतींचा विचार केला तर गेल्या तीस

वर्षात चलन फुगवटा वाढीचा दर प्रत्येक वर्षाला ७% राहिला, त्यामुळे उत्पादकांचे उखळ पांढरे झाले आणि गरीब ग्राहकांचे चिपाड झाले. या विचित्र परिस्थितीत सरकारने उदार धोरणाचा अवलंब केला. परंतु त्यामुळे आर्थिक विषमता कमी होणार नाही. आर्थिक विषमतेतूनच फुटीरतेची बीजे फोफावतात. आर्थिक विषमतेमुळेच मानवी समाज कमकुवत होतो आणि समाजाला घातक असा जातीयवाद, सनातनी प्रवृत्ती आणि फुटीर शक्ती डोके वर काढतात परिणामी राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होतो. तो होऊ नये म्हणून त्वरित आर्थिक विषमतेची समस्या हाताळणे योग्य ठरेल. तसेच धर्माधिष्ठित जातीयवाद नष्ट करावयाचा असेल तर आर्थिक प्रगती हाच एक उपाय आहे.

४) भाषावादाचा भस्मासूर –

भाषिक तत्वावर राज्यांची पुनर्रचना म्हणजे एकात्मतेच्या मार्गातील अडसर होय असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कारण अनेक राज्यात भाषिक दंगली उद्‌भवल्याची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. नुकतीच गोवा प्रांतात 'कोकणी' विरुद्ध 'मराठी' भाषिक दंगल उद्‌भवली होती. भाषिक दंगलीमुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते हे विसरुन चालणार नाही. भाषेचा दुराभिमान देशाचे ऐक्य संकटात आणीत असतो. भाषिक वेडामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे धागे तुटू लागतात.

प्रजासत्ताक भारत हा अनेक राज्यांचे संघटन असलेला देश आहे. दुर्दैवाने भाषाविषयक धोरणाची अंमलबजावणी समाधानकारक नाही. त्यात विसंवाद आहे. नजिकच्या भूतकाळात अनेक वेळा भाषिक संघर्ष उद्‌भवले. सध्याही उद्‌भवताहेत व पुढेही ते संघर्ष होण्याची शक्यता आहे. तेव्हा वेळीच सावधगिरीची योजना करायला हवी.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरुंना त्यांच्या इच्छेविरुद्ध प्रांतांची भाषावार विभागणी करावी लागली. त्यावेळी देशातल्या विचारवंतांनी उद्‌गार काढले, "भाषावार प्रांत रचनेने राष्ट्राच्या विलयाची वाट तयार केली आहे." भाषावार प्रांतरचनेमुळे संकुचितता वाढली. देशरुपी विशाल समुद्राची डबकी झाली. ब्रिटिश काळात 'राज्यकारभाराची सोय' या तत्वावर प्रांतरचना केली होती. त्यावेळी भाषिक भेद कधीच विकोपाला गेले नाहीत. आता विघटनाकडे नेणाऱ्या कारणांमध्ये भाषिकवादाची भर पडली. भाषेचा दुराभिमान वाढला व

शेजारी प्रांत एकमेकांचे शत्रू झाले. फुटीरताही वाढली. उदा. शीखांची खलिस्तानची मागणी, तसेच सिमावादाचे घोळ आणि त्यातून निर्माण झालेला विद्वेष राष्ट्रांच्या विघटनाला घातक आहे. पाणी वाटप, कारखान्यांची निर्मिती, नोकऱ्यातील जागा, अशा अनेक मुद्यांवरुन कलह निर्माण झाले. भाषेच्या भिंतींनी राष्ट्रप्रेमाला ठिकठिकाणी बांध घातले.

भाषावाद ही एकात्मतेस मारक ठरणारी विघटनकारी शक्ती आहे. भाषा म्हणजे खरे पहाता शासनाला लोकशाही बनवण्यास तसेच शासकीय कामकाजाचे सर्वांना ज्ञान होण्यास सहाय्यभूत ठरु शकल्या असत्या. परंतु दुर्दैवाने स्थानिक पुढारी भाषेच्या प्रश्नावर जनतेची दिशाभूल करून जनतेला भडकविण्याचा व त्यायोगे एकात्मतेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. उदा. गोव्यात आमची भाषा राजभाषा असली पाहिजे, यासाठी कोकणी व मराठी भाषिकांची तीव्र आंदोलने होतात. अशा प्रकारे भाषाभिमान व भाषेचा प्रश्न राष्ट्रविरोधी बनवत आहे. गोव्यात झालेले भाषिक आंदोलन हे खऱ्या अर्थाने सत्तेच्या स्वार्थासाठी केलेले होते. ते भाषिक आंदोलन नसून ती एक प्रकारची भारताविरोधी लढाई होती, असे म्हणावे लागेल. कारण गोवा पोर्तुगिजांच्या ताब्यातून मुक्त केला. तेव्हापासून तर आजपर्यंत कोकणी भाषिक प्रेमी झोपेत होते की काय हे समजत नाही. आजच त्यांच्यात भाषेचा पुळका कसा निर्माण झाला! यामागे काही तरी इप्सित दडलेले दिसते.

५) सामाजिक बांधिलकीचा अभाव –

आज आपल्या देशातील समाजव्यवस्थेचा विचार केला तर समाजातील घटकांमध्ये आपल्या समाजाबद्दलची बांधिलकी उरलेली नाही. आपण आपल्या समाजासाठी काही कार्य केले पाहिजे अशी भावनाही राहिलेली नाही. वास्तविक पहाता समाजाने आपल्यावर अनेक उपकार केलेले असतात. त्यांची परतफेड करणे आपले कर्तव्य ठरते. घेतल्याची जाणीव व देण्याची वृत्ती आज आपल्या समाजात शिल्लक नाही. मी समाजाचा व समाज माझा ही भावना निर्माण न झाल्यामुळे लोक एकमेकांपासून दुरावतात व पर्यायाने आपल्या देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण होतो. नेमकी हीच परिस्थिती आपल्या देशात निर्माण झालेली आहे.

पैसा हे सर्वस्व मानण्याची प्रवृत्ती प्रबळ झाल्यामुळे सामाजिक बांधि-

लकीची जाणीव नष्टप्राय झालेली आहे आणि त्याचा परिणाम देशाची एकता धोक्यात येण्यावर झालेला दिसून येतो. अडचणीत सापडलेल्यांचे शोषण कसे करता येईल, याचाच विचार करण्याकडे कल आढळतो. दुसऱ्याच्या हालअपेष्टा कमी करण्याच्या नांवाखाली स्वत:ची तुंबडी भरण्यात अनेक जण आपल्या देशात मश्गूल असलेले दिसतात. दुसऱ्याच्या कष्टावर चैन करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. तसेच स्वत:च्या कष्टांचा मात्र जास्तीत जास्त मोबदला ध्यावासा वाटतो. अशाप्रकारे सामाजिक बांधिलकीकडे दुर्लक्ष करून दुर्बलांचे शोषण करण्याची वाढती प्रवृत्ती दिसून येते. ही प्रवृत्तीच सामाजिक विघटनाला कारणीभूत ठरते. सामाजिक विघटनाबरोबरच देशाच्या विघटनाचीही प्रक्रिया सुरू होऊ पहात आहे. नेमकी हीच परिस्थिती आपल्या देशात निर्माण झालेली पहायला मिळते.

मेजवाण्या झोडणाऱ्यांना उपाशीपोटी राहाणारांची आठवण होत नाही. मद्यपानावर वारेमाप उधळपट्टी करणारांना पैशाअभावी औषधोपचारा वाचून तडफडणाऱ्यांची पर्वा नसते. ऐषआरामात लोळणाऱ्यांना घाम गाळणाऱ्यांच्या कष्टाचे काहीच वाटत नाही. विलासात व चैनित रममाण असणाऱ्यांना ऊन-पावसात निवाऱ्यावाचून अर्धनग्न अवस्थेत जीवन कंठणाऱ्यांच्या हालअपेष्टांची कल्पना येत नाही. अतिसुखी लोकांना दीनदुबळ्यांची दु:खे कळतच नाही. आजची सुशिक्षित व्यक्ती समाजाकडून जास्तीत जास्त फायद्याची अपेक्षा ठेवते. आजचे सुशिक्षित आपली सेवा ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्यास नाखूष असतात. ‘ खेड्याकडे चला ’ या गांधीजींच्या संदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला सक्ती करावी लागते, ही आपल्या दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल.

शिक्षणाचे न्यून्यत्व –

अनेक वेळा सामाजिक बांधिलकीची जाण अशिक्षित व अडाणी माणसात आढळते पण सुशिक्षित माणसात ती आढळत नाही. अनेकदा सुशिक्षित माणसात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होऊन तो आपल्यापेक्षा विविध बाबतीत निम्नस्तरांवर असलेल्या लोकांशी अधिकच बेपरवाईने वागतो. तळा-गाळातले लोकही शिक्षण घेतले की आपल्या समाज बांधवांना विसरल्याचे विचित्र दृष्य आज पहावयास मिळते. अशा परिस्थितीत आजच्या शिक्षणाने

सामाजिक बांधिलकीचा योग्य तो संस्कार होऊ शकत नाही असे म्हणणेच योग्य ठरेल. शिक्षण घेतलेला आजचा तरुण वैयक्तिक हितासाठी, स्वार्थासाठी आटापीटा करतो. सामाजिक बांधिलकीचे त्याला फारसे सोयर सुतक नसते. आजच्या शिक्षणात सामाजिक बांधिलकीची जोरदार घोषणा आहे. पण प्रत्यक्षात मात्र '**शब्द बापुडे केवळ वारा**' अशी अवस्था आहे. आजच्या अभ्यासक्रमात समाजसेवांतर्गत काही उपक्रम राबविले जातात, पण ते बहुतांशी रकाने भरण्यासाठीच असतात. सर्वत्र उपक्रमांचा डामडौलच दिसतो. तर कित्येकदा हे उपक्रम शिक्षक व विद्यार्थ्यांना एक प्रकारची कटकटच वाटते. सामाजिक बांधिलकीचे महत्व सांगणारे पाठ्यपुस्तकातील पाठ परिक्षेत त्यावरील केवळ उत्तरे लिहिण्यासाठीच शिकवले जातात. सामाजिक बांधिलकी व त्यातून एकात्मता वाढीची वृत्ती निर्माण करण्यासाठी त्यांचा उपयोग केला जात नाही.

भारतीय समाजातील बांधिलकीची जाणीव लोप पावत चालल्यामुळे परिणामी एकमेकांबद्दलचे प्रेम व आस्थाही कमी होत आहे. म्हणजेच पर्यायाने त्यामुळे देश विघटनाच्या मार्गावर उभा आहे. उदा. पंजाब, आसाम, नागालँड अशा अनेक राज्यांमध्ये आपापसात संघर्ष सुरू आहे. आणि देशाचे अखंडत्व, एकात्मता धोक्यात आलेली आहे.

६) सामाजिक समता –

आज आपल्या देशात सामाजिक समता कोणालाही नको आहे. सामाजिक समता ही एक आजची घोषणा आहे. परंतु ती फक्त घोषणाच आहे. प्रत्यक्षात सामाजिक समता यावी अशी फारशी कोणाची इच्छा दिसत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले होते की, "या देशात राजकीय लोकशाही असेल, परंतु जोपर्यंत सामाजिक समता नांदणार नाही तोपर्यंत या लोकशाहीला काही अर्थ नाही." इ. स. १९२९ साली बाबासाहेबांनी असे लिहिले होते की, "तुम्ही जर म्हणत असाल की मी प्रथम भारतीय आहे, मग हिंदू आहे अथवा मुसलमान आहे तर ते चुकीचे आहे. हा विचार एकात्मतेला बाधक आहे. वास्तविक अशी भूमिका घेतली पाहिजे की मी प्रथम भारतीय आहे आणि नंतरही भारतीयच आहे." यावरून डॉ. आंबेडकरांचे सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मतेविषयीचे विचार स्पष्ट होतात.

आज आपल्या देशात वेगवेगळ्या प्रकारची विषमता पोसलेली आहे. जात आहे, जमात आहे, आर्थिकदृष्ट्या विषमता आहे, अनेक प्रकारची विषमता या देशात पसरलेली आहे. संपूर्ण समाजव्यवस्थाच विषमतेवर आधारलेली आहे. विषमतेमुळेच समाजात फुटीर वृत्ती जोपासली जाते आणि देशाची एकात्मता, अखंडता धोक्यात येते. एकात्मता वाढीसाठी सामाजिक समतेसाठी झटणे आवश्यक आहे.

७) राष्ट्रभाषा हिंदीस विरोध -

राष्ट्रीय समान हेतू, एक राष्ट्रगीत, एक राष्ट्रध्वज आणि एक राष्ट्रभाषा यांची प्रत्येक राष्ट्राला आवश्यकता असते. किंबहुना याशिवाय राष्ट्रच उभे राहू शकत नाही. जगामध्ये असा कोणताच देश नाही, की ज्याने आपली परंपरा किंवा भाषेला सोडून प्रगती केली. स्वतंत्र देशाला अस्मिता टिकविण्यासाठी स्वतःची 'राष्ट्रभाषा' असते. त्यानुसार आपल्या घटनेनेही भारताची राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेस मान्यता दिलेली आहे. परंतु या राष्ट्रभाषेचा देशातील किती राज्यांनी स्विकार केला आहे याचा विचार केला तर दक्षिण भारतात केवळ महाराष्ट्र सोडला तर जवळ जवळ सर्वत्र प्रारंभापासून तर आज पावेतो विरोध आहे. विरोध करणाऱ्यांना हिंदी ऐवजी 'इंग्रजी' ही परदेशी भाषा हवीशी वाटते.

अनेक वेळा दक्षिण भारतात हिंदीविरोधी आंदोलने झालेली असून, अजूनही दाक्षिणात्य हिंदी भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून स्विकार करण्यास तयार नाही. राष्ट्रभाषा हिंदीचा जर संपूर्ण देशातील जनता स्विकार करीत नसेल तर आपल्या देशाची एकात्मता कशी टिकेल, याचा विचार करणे आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रभाषा हिंदीला विरोध म्हणजे फुटीरतेला उत्तेजन दिले जात आहे. परंतु या फुटीरतेला वेळीच आळा घालून हिंदी ही राष्ट्रभाषा सक्तीची करून स्थानिक बोली भाषांच्याही विकासास वाव देण्याची गरज निर्माण झालेली आहे.

इंग्रजी भाषेचा आग्रह नको-

इंग्लंड सारख्या देशाची पूर्वीची राजभाषा फ्रेंच व लॅटीन होती. परंतु नंतर १८३० साली इंग्रजांनी आपल्या देशाची राजभाषा म्हणून इंग्रजी तेथील जनतेच्या गळी उतरून तिचा संपूर्ण जगभर प्रसार केला. रशियानेही रशियन

भाषेचाच आपली राजभाषा म्हणून स्विकार करून विज्ञानात नेत्रदिपक प्रगती केली. जपान, चीन, जर्मनी यासारख्या प्रगतीपथावर असलेल्या देशांनी पूर्णपणे आपापल्या राष्ट्रभाषेचा वापर करुनच प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली. मग आपल्या देशात तरी इंग्रजी भाषेचा आग्रह का ? हे कळत नाही. अनेक हिंदी प्रचार समित्या अस्तित्वात आल्या परंतु त्या समित्यांचा कारभार जर इंग्रजी भाषेत असेल तर राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार व प्रसार कसा होईल याकडे सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे.

हिंदीविरोधी झालेली आंदोलने भारत सरकारने मोडून काढली नाही, त्यामुळेच पुन्हा हिंदीविरोधकांना संघर्षाची संधी मिळाली. आणि त्यामुळेच आपल्या देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे. अजुनही हिंदी राष्ट्रभाषा अहिंदी भाषिक लोकांवर सक्तीने लादून राष्ट्रभाषेतच सर्वत्र दळणवळण होणे सोयीस्कर होईल. जोपर्यंत हिंदी व इंग्रजी यांच्या लढाईमध्ये प्रादेशिक भाषा प्रभावी राहतील तोपर्यंत इंग्रजी ही परदेशी भाषाच विजयी राहील. म्हणूनच इंग्रजी भाषेचे उच्चाटन करणे आवश्यक आहे.

८) प्रादेशिक निष्ठांची चढाई-

सध्या आपल्या देशात राष्ट्राभिमानाच्या संदर्भात एक विस्मयजनक बदल दिसत आहे. यंत्रयुगातील ज्वलंत राष्ट्रभावना विझून जात आहे. आणि प्रादेशिक भावना जोर धरीत आहेत. भारताने बहुपक्षपद्धतीचा स्विकार केलेला असल्यामुळे आज देशात मोजता न येण्याजोगे पक्ष अस्तित्वात आलेले आहेत. प्रत्येक पक्ष सत्तेसाठी प्रयत्नशिल असून राष्ट्रीय पक्ष बोटावर मोजण्याइतकेच आहेत. परिणामी राज्या-राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची स्थापना होऊन त्या पक्षांचे तत्वज्ञानही राज्यापुरतेच मर्यादित आहे. त्यामुळेच राज्या-राज्यातील जनतेच्या मनात फाजील प्रादेशिक अभिमान निर्माण होऊन आज देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण झालेला आहे. प्रादेशिक अभिमानामुळे संपूर्ण देशाच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. उदा. आन्ध्र प्रदेशातील प्रादेशिक पक्षाचे सरकार, तामिळनाडु मधील सरकार, पश्चिम बंगालचे सरकार.

यापुढेही प्रादेशिक निष्ठा जशा वाढत जातील त्यामुळेच देशातील राष्ट्रप्रेम व राष्ट्रभावना अशक्त होईल.

९) मूल्याधिष्ठित राजकारणाचा अभाव-

आपले प्रशासन आणि राजकीय जीवन यांनी संकुचित अशा जातीय आणि पंथीय वादापासून दूर राहाणे आवश्यक आहे. परंतु आज मात्र उलट अवस्था दिसत आहे. राजकारणी लोक जातीचा आणि पंथाचा आधार घेतल्या-शिवाय राजकारण करीत नाही, हे आपले दुर्दैव म्हणावे लागेल. आपले राजकारण मूल्याधिष्ठित असले पाहिजे, तेव्हाच एकात्मता भक्कम होऊ शकेल. महात्मा गांधीनी भारतीय नेत्यांना मूल्याधारित राजकारणाचा संदेश दिलेला असूनही त्याचा आज पूर्णपणे स्विकार केला जात नाही ही शोकांतिका आहे. गांधीजी म्हणत असत की "धर्म आणि राजकारणात मला कोणताही फरक वाटत नाही." पण आज मात्र धर्माचा जातीचा, पंथाचा आधार घेऊनच राजकारण करण्याचे विचार रुजवले जात आहेत. परिणामी राजकारणाची मूल्ये पायदळी तुडवून देशाच्या एकात्मतेवर संकट येऊन देश विघटनाच्या मार्गावर आणून सोडण्याची कामगिरी राजकारणी करीत आहेत.

१०) "भूमीपुत्र आणि रोजगार प्राधान्याची कल्पना-

सध्या प्रत्येक राज्यातील उपलब्ध रोजगार हा स्थानिक रहिवाशांनाच दिला जावा अशी सूचना व मागणी पुढे येत आहे. यामुळे राष्ट्रीय भावनेस तडे जाऊन देशाची अखंडता, एकात्मता धोक्यात आली आहे. नोकऱ्या किंवा रोजगार देताना स्थानिक लोकांनाच म्हणजे फक्त भूमीपुत्रांनाच देण्यात यावा, ही मुंबईत व कर्नाटकात करण्यात येणारी काँग्रेस आणि बिगर काँग्रेस जनांची मागणी देशाच्या भल्याचा विचार करुन करण्यात आलेली नाही.

आदिवाशी भागातून अशी मागणी झाली तर ती समजू शकते. या भागाचा मागासलेपणा लक्षात घेता त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी अशी मागणी कोणी केली तर ती स्तुत्यच ठरेल. याऊलट केवळ स्थानिक लोकांना रोजगार मिळावा आणि यासाठी इतर लायक भारतीय नागरिकांनी रोजगारा-पासून वंचित रहावे, ही अतिशय संकुचित वृत्ती झाली. परंतु सुदैवाने महा-पालिका स्तर वगळता या राष्ट्रविरोधी मागणीस कोणतेही स्थान मिळाले नाही ही अत्यंत समाधानकारक बाब म्हणावी लागेल.

अशा प्रकारची भूमिपुत्रांनाच रोजगार मिळण्याची मागणी म्हणजे राष्ट्रविरोधी कृत्य असून त्यामुळे देशावरील जनतेच्या निष्ठा कमी होण्यावर

त्याचा निश्चित परिणाम होऊन देशाच्या एकतेला धोका निर्माण होईल. 'भूमिपुत्र' आणि रोजगार प्राधान्याची कल्पना जेव्हा एकत्रित जोडली जाते त्यावेळी राष्ट्रीय एकात्मता, अखंडता आणि धर्मनिरपेक्षतेकडे दुर्लक्ष करण्यास जनता तयार होते. परिणामी देशाचे विघटन होण्याची शक्यता निर्माण होते.

११) राजकीय पक्षांचा मतांवर डोळा –

निवडणुकीच्या राजकारणामुळे लोकांना सतत तुम्ही हिंदू आहात, तुम्ही मुसलमान आहात, नव्हे तर ब्राह्मण, रजपूत, हरिजन, मागासवर्गीय, आदिवासी किंवा दुसऱ्या गटाचे आहात, याची आठवण करून दिली जाते. विशेषत: अल्पसंख्यांकांना नेहमीच मतांचे गठ्ठे समजण्यात येते. निवडणुकीच्या काळात त्यांना थोड्या सवलती जाहीर केल्या जातात. धर्म, प्रदेश, भाषा आणि एकमेकांपासून अलग करणाऱ्या बाबींनी लोकांचे वेगवेगळे गट कायम कसे राहतील याकडे लक्ष देण्यात येते. त्यांच्याकडे मतदार म्हणून पहाण्यात येते.

जगातील कोणत्याही राजकारणी व्यक्तीला पुढच्या निवडणूकीतील त्याच्या स्वत:च्या व पक्षाच्या भवितव्याची काळजी घेणे भाग आहे. परंतु प्रामुख्याने संकुचित भावनांना आवाहन करून ही मत मिळविण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. ही प्रवृत्तीच राष्ट्राला धोका निर्माण करीत असते. उदा. **बाबरी मशिद व रामजन्मभूमी या प्रश्नावरून** खा. शहाबुद्दीनने आपल्या प्रजासत्ताक दिनावरच बहिष्कार घालण्याचे मुस्लिमांना आवाहन केले होते. खा. शहाबुद्दीन हे जनता पक्षाचे असून त्यांनी देशविघातक कृत्ये केल्यामुळे त्यांना त्यांच्या पक्षाने कडक शब्दात समज द्यावयास हवी होती किंवा त्यांना पक्षातून त्वरित निलंबित करावयास पाहिजे होते. परंतु तसे न होता पक्षाच्या भविष्यकाळातील हित लक्षात घेऊन स्वार्थामुळे खा. शहाबुद्दीनच्या विरुद्ध काहीही कारवाई केली नाही. पक्षाच्या हितासाठी राजकीय पक्ष राष्ट्रविरोधी केलेल्या कारवायाही सहन करतात त्यामुळे देश धोक्यात येतो. देशाची एकात्मताही संकटात आहे.

अल्पसंख्यांकांना नेहमीच मतांचे गठ्ठे समजून त्यांची मते मिळविण्यासाठी राजकीय पक्ष मग ते सत्तेवर असो किंवा नसो त्यांच्या योजना, आव्हाने, निरनिराळ्या गटांना खूष करण्यासाठी असतात. त्यामुळे समाजात

अल्पसंख्यांक नेहमीच बहुसंख्यांकांपासून दूर राहातात. परिणामी सामाजिक विषमता वाढत जाऊन त्यांच्यात अलगतेची भावना निर्माण होऊन फुटीरतेची बीजे रुजून देशावर विघटनासारखे संकट कोसळले जाते. नेमकी हीच परिस्थिती आज आपल्या देशात पहावयास मिळते.

आपल्या देशाच्या इतिहासात विभक्ततावादी आणि फाटाफुटीच्या शक्तींचे एकात्मतेवर सतत आक्रमण होत आले आहे आणि आज देखील ही लढाई चालूच आहे.

१२) भ्रष्टाचार, बेकारी आणि त्यामुळे येणारं वैफल्य –

आपल्या देशातील भ्रष्टाचार, बेकारी आणि त्यामुळे येणारं वैफल्य व फाजिल महत्वाकांक्षा विटघनवादी शक्तींना पोषक ठरत आहेत. भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होण्यापेक्षा वाढत आहे. त्यामुळे सामान्य माणूस त्रासला आहे. बेकारीचे प्रमाणही मर्यादेपेक्षा जास्त झाले आहे. श्रीमंती जीवन किंवा सत्ता फक्त १० टक्के लोकांच्या हाती व बाकीच्यांच्या नशिबी फक्त गरिबी व अठराविश्वे दारिद्र्य, अवहेलना व उपेक्षा यामुळे त्यांच्या मनात कडवट वैफल्याची आणि तीव्र असंतोषाची भावना निर्माण होत आहे. परिणामी विषमतेची दरी निर्माण होऊन देशाची अखंडता धोक्यात आली आहे. बेकारीमुळे बेरोजगार लोक एकत्र येऊन देशाविरुद्ध कारवाया करण्यास प्रवृत्त होतील. ही मोठी भीती आहे.

१३) अस्वस्थ इशान्य भारत –

बंगाली प्रदेशाच्या १९४७ च्या फाळणीमुळे इशान्य भारताचा बाकीच्या भारताबरोबर असलेला संबंध तुटला असे म्हणावयास हरकत नाही. दळण-वळणाचे परंपरागत मार्ग, रेल्वे, जलमार्ग व रस्ते, सर्व पूर्व बंगालमधून जात असत. पूर्व बंगाल हे पूर्व पाकिस्तान बनल्यामुळे दळणवळणाचे हे मार्ग खंडीत झाले. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर केंद्र सरकार जागे झाले व आसाम-महामार्गाची योजना आखण्यात आली.

आज जो अरुणाचल प्रदेश म्हणून संबोधिले जाते तो पूर्वोत्तर सरहद्दीचा टापू कायदेशीररित्या आसामचा भाग होता. पण त्याची व्यवस्था केंद्राने व आसामच्या राज्यपालाने पाहावी अशी तरतूद होती. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारचे भारतातील धोरण प्रशासकीय व्यवस्था मॅकमोहन सीमारेषेपर्यंत

भिडविण्याचे होते. सर्व खर्च केंद्राने करावयाचा होता. पण प्रत्यक्षात इशान्य सरहद्दीचा भार प्रशासकीय व्यवस्थेखाली आणण्यात विलक्षण हयगय करण्यात आली. इशान्य सिमेवर परकीय आक्रमणाचे संकट सुप्तरूपानेही अस्तित्वात आहे असे ब्रिटिशांना कधी वाटले नाही. कारण त्यांच्या सैन्याची एक तुकडी तिबेटमध्ये होती. तिबेटमधून चिनी सैन्याची पूर्वीच हकालपट्टी केली होती. सिक्कीमची स्थिती जवळ जवळ भारतातील इतर संस्थानांप्रमाणेच होती. भूतान इंग्रजांचा मांडलीक होता. नेपाळही ब्रिटिशांच्या आधीन होता. अशा स्थितीत **मॅकमोहन** सीमारेषेपर्यंत सरकारी यंत्रणा नेऊन पोहचविण्याची निकट इंग्रजांना वाटली नाही यात आश्चर्य नाही.

परंतु स्वतंत्र भारत सरकारने ब्रिटिश गेल्यानंतर या वरील प्रदेशाची हवी तितकी काळजी घेतली नाही. इशान्य सिमाप्रदेशात काय किंवा काश्मिर लडाखच्या इशान्य भागात काय, प्रशासकीय व्यवस्था आणि पोलीस ठाणी सीमेपर्यंत नेऊन भिडविण्याच्या कामात अक्षम्य दिरंगाई झाली. चिनमध्ये १९४८ साली कम्युनिस्ट क्रांती यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे हे सुज्ञ निरिक्षकांना कळून चुकले होते. यावेळी गेलेला प्रदेश म्हणजे तिबेट, मंगोलिया परत घेण्याची घोषणा चिनी नेत्यांनी केली होती. अशा वेळी भारत सरकारने भ्रमात राहण्याचे काहीही कारण नव्हते. सीमा प्रदेशाची व्यवस्था डोळ्यात तेल घालून केली असती तर चिनी आक्रमनाचे संकट कदाचित ओढवले नसते, किंवा निदान त्याचा प्रतिकार परिणामकारक रीतीने करता आला असता. त्याचे पुढील काळात जे दुष्परिणाम व्हायचे ते झाले. तरीही आपले भारत सरकार अजून पूर्णपणे जागे झाले आहे असे दिसत नाही. म्हणून आज भारतसरकारने इतिहासापासून काही शिकण्याची गरज आहे. अन्यथा आपल्या देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही.

इशान्य भारतात ब्रह्मपुत्रा व बराक नदी, या दोन नद्यांची प्रमुख खोरी आहेत. या डोंगराळ प्रदेशात जैतिया, नागा, मिझो, नेपाळी, बंगाली, चकमा आदि लोक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर येऊन स्थायिक झाले आहेत. ऐतिहासिक दृष्टीने पाहिले तर डोंगराळ भागाचा प्रश्न हा हिंदू समाजाच्या, धर्माच्या व संस्कृतिच्या दुर्बलतेचे व असफलतेचे फळ आहे. इंग्रजी सत्तेबरोबर इशान्य भागात निरनिराळ्या पंथांचे खिश्चन धर्मप्रसारक आले. त्यांनी आपल्या विचारांनी त्या ठिकाणी राहात असलेल्या पहाडी टोळ्यांना वश करून घेतले.

इशान्य भागात असंतोष –

भारताची घटना अमलात येते न येते तोच इशान्य भागात असंतोषाने मूळ धरले. परिणामी भारताच्या अखंडतेला धोका निर्माण झाला. आसामींचा दृष्टीकोन बंगालींप्रमाणेच संकुचित होता. प्रशासकीय आसामचे संपूर्ण आसामीकरण करण्याचा आता त्यांनी चंग बांधला. आसामी भाषा राज्यातील सर्व लोकांवर लादण्याच्या प्रयत्नांची तीव्र प्रतिक्रिया उमटली. यावेळी या डोंगराळ भागातील टोळ्यांमध्येही एकवाक्यता नव्हती. परस्पर अविश्वास व संघर्ष मोठ्या प्रमाणावर होता. यातूनच नागा प्रदेशात सशस्त्र बंडाळी सुरू झाली.

इशान्य भारत हा डोंगराळ भाग असून तेथील जंगलामुळे सशत्र बंडखोरांना तग धरणे सोपे होते. शिवाय हे बंडखोर शेजारच्या राज्यात जाऊन आश्रय घेऊ शकत होते. नागा बंडखोर ब्रह्मदेशात स्वतःच्या बांधवांकडे आश्रयाला जात. पूर्व पाकिस्तान व चीन यांच्याकडून त्यांना प्रशिक्षण व हत्यारे मिळत असत. असे असले तरी हे बंडखोर भारतीय राज्याला हिंसेच्या मार्गाने नमवतील, हे शक्य नव्हते. म्हणून शेवटी नागा बंडखोरांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारला आणि भारतीय घटनेच्या चौकटीत घटक राज्याचा दर्जा स्विकारला. भारत सरकारने नागांच्या समस्येनंतर मेघालय - १९६९, मणिपूर व त्रिपुरा - १९७१, मिझोराम १९८६ या प्रदेशांनाही राज्याचा दर्जा दिला.

पूर्वोत्तर भारतातील प्रश्न केवळ सशक्त बंडाचा नाही. तेथे सीमांच्या संरक्षणाची समस्याही आहे. शिवाय नागप्रदेश, मेघालय, मिझोराम, आसाम व सिक्कीम या भागातील राज्यात वंश व भाषा यांची गुंतागुंत आहे. ही एकजिनसी राज्ये नाहीत; त्यात सरमिसळ आहे. या विभिन्न भाषिक गटांमध्ये व डोंगरी टोळ्यांमध्ये देखील परंपरागत वैर आहे. एकत्र कार्य करण्याची वृत्ती एकूण भारतीयांमध्येच कमी आहे. परस्पर अविश्वास मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या साठ-सत्तर वर्षात नेपाळातून मोठ्या प्रमाणात नेपाळी भाषिक सिक्कीममध्ये येऊन दाखल झाले आहेत. तेव्हा स्थानिक लोक व बाहेरुन आलेले लोक यांच्यात संघर्ष अटळ आहे परिणामी देशापुढे एकात्मतेसारखी नविन समस्या उभी रहाते.

१९६६ मध्ये मिझो डोंगरात बंडखोरीने डोके वर काढले. आज वीस वर्षानंतर शस्त्रे खाली ठेवायला मिझो नेते तयार झाले आहेत. इशान्य भागात झालेल्या चुकांची पुनरावृत्ती पश्चिमोत्तर भारतात होत आहे. या दृष्टीने 'मिझो करार' असामायिक होता असे म्हणावे लागेल. या कराराचा 'मुहूर्त' खचितच

उचित नव्हता. हे अकाली नेत्यांच्या वक्तव्यावरुन कळते. भारतातील स्फोटक परिस्थिती लक्षात घेता मिझो करार कांही काळ पुढे ढकलणे उचित झाले असते. याबाबत सर्वात महत्वाची चूक म्हणजे व्यापारासंबंधीची तरतूद नसून बृहत मिझोरामबद्दलची संदिग्धता ही आहे. लालडेंगांकडुन बृहत मिझोरामची मागणी वीस-पंचवीस वर्षे तरी होणार नाही अशी कबुली भारतसरकारने घ्यावयास हवी होती, पण केंद्र सरकारने तसे केलेले नाही. उलट त्यांना भारतीय घटनेच्या अनुच्छेद क्रमांक ३ व ४ चा मार्ग त्यांनी दाखवून दिला आहे. राज्यांची पुनर्रचना करणे, क्षेत्रफळ कमी करणे अथवा वाढविणे यासंबंधीची ही कलमे आहेत. हा मार्ग देशात अस्थिरता निर्माण करणारा आहे. इशान्य भारतातील इतर शेजारी राज्ये बृहत मिझोरामच्या मागणीमुळे चिंतातूर झाली आहेत. या मागणीमुळे अकारण उलथापालथ होईल अशी सार्थ भिती त्यांना वाटते. वांशिक आधारावर किंवा भाषेच्या तत्वावर निराळी राज्ये करावयाची म्हटले तर ते या भागात शक्य होणार नाही. मग चाळीस-पन्नास राज्ये करावी लागतील. मग भारतातील इतर भागही गप्प बसणार नाहीत. नव्या नव्या मागण्या पुढे येतील. शांतता प्रस्थापना, पोलीस दलाचे शुद्धीकरण शासनव्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे व आर्थिक विकासाची गती तीव्र करणे ही आपल्या पुढची निकडीची कामे आहेत. इशान्य भारत आर्थिक विकासाला पारखा झाला आहे. तेथील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. रोजगार नसल्यामुळे सुशिक्षित वर्ग हताश होत आहे. अशा स्थितीत बृहत मिझोरामचे तुणतुणे वाजविणे अराजकाला निमंत्रण देण्यासारखे आहे.

गुरखा भूमी आंदोलन

पश्चिम बंगालमध्ये गुरखा प्रदेशाच्या आंदोलनाने एकदम उग्र रूप धारण केले आहे. इशान्य भारतात सहाव्या सूचीची जी गत झाली, मेघालय उपराज्याचा जो निष्फळ प्रयोग झाला तो लक्षात घेता दार्जिलिंग-जैलपैगुडी भागातील चळवळीची परिणिती अशीच होणार की काय असा प्रश्न उभा राहातो. गुरखा प्रदेशाची स्वायत्तता ही मागणी वरकरणी गोंडस दिसते. पण हिमालयाच्या परिसरातील राजकारणाची ज्यांना चांगली कल्पना आहे. त्यांना ही स्वायत्ततेची मागणी फसवी आहे, दिशाभूल करणारी आहे हे समजू शकते.

गुरखा प्रदेशाचे आंदोलन ताबडतोब भडकण्याचे कारण मेघालयाने पाच

हजार नेपाळी लोकांची केलेली उचलबांगडी हे आहे असे बोलले जाते. इशान्य भारतातील राजे, तेथील वांशिक गट, आपली "अस्मिता," आपले वेगळे अस्तित्व बाहेरच्या भागातून येणाऱ्या 'उपऱ्यां' मुळे नष्ट होईल या चिंतेने व्याकूळ आहेत. पण हे अंतर्गत स्थलांतर थांबविता येणार नाही. गुरखाभूमी आंदोलनामध्ये स्वतंत्र राष्ट्राचे स्वप्न पहाणारे काही गट प्रथमपासूनच कार्यरत आहेत. या गटांचा सुभाष घिसिंगांना एकमुखी कधीही पाठिंबा नव्हता. पण बंडखोरासाठी वातावरण निर्मिती करण्यास घिशिंग यांचे आंदोलन त्यांना आवश्यक वाटत होते. त्यामुळे अपेक्षेप्रमाणेच दार्जिलिंग जिल्ह्यात गुरखा आंदोलनास पूर्ण पाठिंबा मिळत गेला. परंतु विधानसभा निवडणूका संपल्यानंतर केंद्राने सरळ त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच अतिरेकी गट प्रबळ बनत आहेत. या परिस्थितीमुळे भारतात अस्थिर वातावरण निर्माण होत असून देशाची अखंडता व एकात्मता धोक्यात आली आहे.

नेपाळ दरबार बृहतनेपाळचे स्वप्न पहात आहे. त्याच्या हालचालींकडे ते हिंदू राज्य आहे म्हणून कानाडोळा करा असेही काही देशबुडवे म्हणतील. पण भारतीय राज्य सर्वांचे, प्रत्येक नागरिकाचे आहे. येथे ऐंशी टक्के हिंदू आहेत. तेव्हा हे राज्य त्यांचेही आहे. तेव्हा बृहतनेपाळचा चावटपणा चालू देता कामा नये "**शेजाऱ्यांबरोबर गोडी गुलाबी**" हे जनता सरकारचे घोषित धोरण शुद्ध बावळटपणाचे होते.

सर्व बाजूंनी विचार करता इशान्य भारत सध्या अस्वस्थ असून फुटीरता, अलगता, या गोष्टींना वाव मिळत आहे. पर्यायाने आपला देश संकटात सापडतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. तेव्हा इशान्य भारतातील अनेक समस्या व आंदोलनाचे मार्ग केंद्र सरकारने अतिशय हळूवारपणे हाताळणे आवश्यक आहे. तरच आपली राष्ट्रीय एकात्मता टिकू शकेल अन्यथा एकात्मतेला ग्रहण लागल्याशिवाय रहाणार नाही.

१४) पंजाब प्रश्न

पंजाब प्रश्नामुळेच खऱ्या अर्थाने भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला सध्या ग्रहण लागल्याचे स्पष्ट दिसत आहे. कारण रोज अतिरेकी शेकडो निष्पाप लोकांची, बालकांची, नेत्यांची हत्या करीत आहेत. पंजाबातील सर्वसामान्य माणसाला जीवन जगणे अवघड झाले आहे. कोठून व कधी अतिरेकी बंदुकीतून

गोळ्या झाडील याचा नेम नाही, त्यामुळे पंजाबातील जनता असुरक्षित बनली आहे. शीख अतिरेक्यांची अवास्तव मागणी म्हणजे त्यांना खलिस्तान हवे आहे. धर्माचा आधार घेऊन ही अतिरेकी मंडळी पंजाबात सार्वजनिक हत्याकांड घडवून आणीत आहे. त्यामुळे तेथे सर्वत्र भीतीचे वातावरण दिसते. याचा परिणाम देशाची एकात्मता धोक्यात येण्यावर झाला आहे.

धर्मवेड्या अतिरेक्यांच्या कारवायांमुळेच ज. वैद्य यांनी भारताच्या पंतप्रधान कै. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या काळात ऑपरेशन ब्ल्यू स्टारची कारवाई केली. सुवर्ण मंदिरात लष्कर घुसविण्यात आले. त्यामुळेच ज. वैद्यांची हत्या झाली. सुवर्ण मंदिर हे अतिरेक्यांचे गुप्त कट-कारस्थाने शिजविण्याचे सुरक्षित केन्द्र असून तेथूनच सर्व सूत्र-संचलन होते. पंजाब करार करतांना सरकारने लोंगोवाल व बर्नाला यांचेबरोबर प्रकाशसिंग बादल यांनाही बोलविण्यास हवे होते. कारण बादल व त्याच्या सहकार्यांनी बर्नालांना सतत अडचणीतच आणण्याचा प्रयत्न केला. पंजाब करार अयशस्वी झाला. चंदिगढ पंजाबला देण्याचा प्रश्नही लोंबकळत पडला आहे. अर्थात अतिरेक्यांना चंदिगढचे सोयरसुतक नाही, कारण चंदिगढ पंजाबला दिले तरी त्यांच्या कारवाया थांबतील असे मानणे मूर्खपणाचे ठरेल.

अकाली दलाच्या आनंदपूर - प्रस्तावाच्या अनेक 'आवृत्त्या' आहेत. कोणतीही अधिकृत मानली तरी तिच्यात भारताच्या विघटनाची तत्वे आहेत. आनंदपूर ठराव केन्द्राचे महत्वाचे अधिकार हिरावून घेऊ पहातो आहे. अकाली दलाला जुनी त्रिमंत्री योजना व दुर्बल केन्द्र हवे आहे. आनंदपूर ठराव अमलात आला तर केन्द्राचा निकालच लागेल. आणि असे झाल्यास भारताचे ऐक्य संपुष्टात येईल. खलिस्तानचे भूत गाडायला व कत्तल, खून, रक्तपात यांचा मार्ग सोडायला जोपर्यंत अतिरेकी तयार नाहीत, तोपर्यंत त्यांच्याशी वाटाघाटी व बोलणी यांना काहीच अर्थ नाही. आतापर्यंत बंडाचे अनेक प्रकार पाहिले. परंतु बसमधील निरापराध उतारूंना खाली उतरवून आणि ते विशिष्ट धर्माचे आहेत म्हणून त्यांची निर्घृणपणे हत्या करणे हे निव्वळ राक्षसी वर्तन आहे. त्यामुळे पंजाबप्रमाणेच संपूर्ण देशात घबराट निर्माण होण्याची चिन्हे दिसतात. पर्यायाने देशाची एकता संकटात असून तिला तडे जात आहे.

पंजाबात लोकशाहीपद्धतीनुसार निवडणुक झाली. बर्नालाच्या पक्षाचे सरकार सत्तेवर येऊन इंदिरा काँग्रेसचा पराभव झाला. तरीही बर्नालांच्या राजवटीत अतिरेक्यांचा हिंसाचार थांबला तर नाहीच, याऊलट त्यांच्या हिंसाचाराने थैमान

घातले. त्यामुळेच पुन्हा पंजाबात राष्ट्रपती राजवट आणावी लागली. परंतु राष्ट्रपती राजवट येवो नाहीतर आणखी कोणीही येवोत, अतिरेक्यांच्या कारवायांत काहीही फरक पडत नाही. जास्तीत जास्त हिंदुंचे खून पाडून अतिरेक्यांना देशभर हिंदू व शीख यांच्यात संघर्ष निर्माण करावयाचा आहे. अजून तरी त्यांना त्यात यश आले नाही. परंतु असे हे किती दिवस चालणार? पंजाबमधून घाबरलेल्या हिंदूंचे स्थलांतर मागेच सुरु झाले आहे. हिंसाचार काबूत आणण्यासाठी रिबेरोंना आणण्यात आले. ते तरी काय करणार ? पंजाबातून पोलीसदलच आतून बाहेरून किडले आहे. तिथे रिबेरो तरी काय करणार ? म्हणून तर पोलीस कॉम्प्लेक्समध्ये रिबेरोंवर त्यांच्याच हाताखालच्या लोकांकडून प्राणघातक हल्ला होतो. 'कुंपनानेच शेत खाल्ले' असे म्हणावे लागेल.

पंजाबमधील हिंसाचाराचा स्फोट भारताच्या कानाकोपऱ्यात होऊ शकेल. पंजाबचा प्रश्न पंजाबपुरताच मर्यादित न राहाता देशात सर्वात मोठी समस्या बनत आहे. पंजाब प्रश्न म्हणजे आज भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेची ज्वलंत समस्या होऊन बसली आहे. देश अतिशय कठिण परिस्थितीतून वाटचाल करीत आहे. सरकारने त्याकडे पूर्ण लक्ष देऊन पंजाब प्रश्न जलदरित्या सोडविणे आवश्यक आहे.

पंजाब प्रश्नाप्रमाणेच जम्मू-काश्मिर ही नेहमीच भारताची डोकेदुखी बनून राहिलेली आहे. काश्मिर प्रश्नही अनेक वर्षानुवर्षे तसाच रेंगाळत आहे. असे असले तरी या सर्व समस्यांवर मात करून देशाची एकात्मता बळकट केली पाहिजे व त्यासाठी देशातील संपूर्ण जनतेने जन आंदोलन करण्याची गरज आहे.

भारत सरकारने देशाचे अखंडत्व टिकविण्यासाठी काहीही किंमत मोजावी आणि त्यासाठी जनतेचे सहकार्य घ्यावे. आज देशापुढे पंजाबचा प्रश्न, गुरखा भूमी आंदोलन, आसाम प्रश्न, भाषावाद, प्रांतवाद, प्रादेशिकता, धर्मवाद, जातियवाद, पाणीवाटप प्रश्न अशा अनेक समस्या उभ्या ठाकलेल्या आहेत. पंजाब प्रश्न संपुष्टात आला नाही तर तामिळनाडूतही 'द्रविडस्थानची' पूर्वी मागणी होती ती पुढे येईल. 'खलिस्थानची' मागणी सध्या आहेच. अशा परिस्थितीचे लोण जर संपूर्ण देशात पसरले तर भारताचे विघटन व्हायला अजिबात वेळ लागणार नाही.

१५) प्रादेशिक असमतोल –

प्रादेशिक आर्थिक असमतोल सुद्धा काळजीची परिस्थिती निर्माण करीत असून राष्ट्रीय एकात्मतेला त्यामुळे तडे जाण्याची भीती आहे. सर्वत्र फुटीरतावादी शक्ती बोकाळल्याचे दिसते. आसाम आणि इतर पूर्वेकडील राज्यात घडलेल्या घटना हाच इशारा देत आहेत. प्रादेशिक असमतोलातून निर्माण झालेल्या समस्या भाषिक आणि सांस्कृतिक भावनांशी जोडल्या जातात. आर्थिक मागासलेपणा, भाषिक आणि सांस्कृतिक आशा आकांक्षा एकत्रित झाल्या की त्यांचा स्फोट होऊन शेवटी फुटीरता निर्माण होते. ज्या परदेशी शक्ती आपला देश अस्थिर व्हावा म्हणून वाट पहात आहेत, त्या अशा संधीचा लाभ उठवतात आणि फुटीरता वादाला खतपाणी घालतात. मग पंजाब आणि आसामध्ये बनली तशी स्फोटक परिस्थिती निर्माण होते. सरकारची धोरणे आणि आजपर्यंतचे कार्यक्रम प्रादेशिक असमतोल दूर करण्यात अयशस्वी ठरले आहेत. या प्रश्नामुळे देशाचे ऐक्य आणि एकात्मता धोक्यात येईल. तेव्हा वेळीच उपाय योजना करण्याची गरज आहे.

१६) केंद्र-राज्य संबंध –

केंद्र आणि राज्य संबंधाचाही राष्ट्रीय एकात्मतेशी सरळ संबंध आहे कारण आपला देश संघराज्य आहे. केंद्र आणि राज्यामधील नाते पुनर्रचित करण्याची मागणी विविध व्यासपिठावरून अनेक वेळा जाहीरपणे करण्यात आली आहे. राष्ट्रीय एकात्मता परिषदेतही हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. केंद्र व राज्य यांच्या संबंधांचे जे तपशिल आहेत. त्यातील मुख्य तत्व हे गृहीत धरण्यात आले की केंद्र हे मजबूत असले पाहिजे. केंद्राकडे विशेषत: प्रशासकीय आणि वित्तिय शक्ती ही समर्थ असली पाहिजे. आणि तसे जर नसेल तर केंद्राला राज्यांच्या तोंडाकडे पहावे लागेल आणि अशा तऱ्हेने केंद्र हे खिळखिळे होईल आणि आजूबाजूला जे काही घटक होते, जे काही प्रदेश होते, ते प्रदेशही या राष्ट्रापासून दूर होतील व त्यांची फारकत होईल. अशा तऱ्हेने या देशाची शकले व्हायला वेळ लागणार नाही. म्हणून केंद्र मजबूत असले पाहिजे.

१७) अज्ञान हाच शत्रू –

एकमेकांबद्दल अज्ञान हाच भारतीयतेचा सर्वात सामर्थ्यवान शत्रू आहे.

भारतीयत्वाची भावना दृढमूल करण्यासाठी हिंदूबद्दल मुस्लीमांना अधिक धार्मिक माहिती व्हावी, निरनिराळ्या राज्यातील व प्रदेशातील धार्मिक माहिती व्हावी, निरनिराळ्या राज्यातील व प्रदेशातील धार्मिक ज्ञातींची, आदिवासींची परस्परांना ओळख व्हावी म्हणून प्रयत्न होणे आवश्यक आहे. दिल्लीत अलिकडेच झालेल्या महोत्सवासाठी ईशान्य भागातून आणण्यात आलेल्या अनेक कलाकारांनी नवी दिल्लीच्या काही प्रेक्षकांना आपण विदेशी चिनी किंवा ब्रह्मदेशाचे वाटल्याची तक्रार केली होती. म्हणूनच शाळेपासूनच ही ज्ञान प्रसाराची प्रक्रिया सुरू केली पाहिजे. एका जमातीचे दुसऱ्या जमातीपासूनचे अंतर, एका प्रदेशाचे दुसऱ्या प्रदेशाबद्दलचे अज्ञान आणि देशातील इतर नागरिकांबद्दल माहिती नसल्यामुळे निर्माण झालेले अंतर लक्षात घेऊन भारताच्या अंगभूत एकात्मतेवर भर देणारे कार्यक्रम आखले पाहिजेत. आज आपल्या देशात तीस टक्के साक्षरता असून सत्तर टक्के निरक्षर जनता आहे. तेव्हा त्यांच्यात अज्ञानच पसरलेले आहे व त्यामुळे त्यांना देशात काय चालले हे समजतच नाही. परिणामी ही जनता मेंढराप्रमाणे कोणत्याही मार्गहीन नेत्याच्या मागे जाण्यास तयार असते.

१८) परकीय शक्तींचा हस्तक्षेप –

आपल्या राष्ट्राच्या शेजारील देशांनी आपल्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यास सुरवात केल्यामुळे देशाची एकता व एकात्मता धोक्यात आली आहे. उदा. पंजाबात बाह्य शक्तींचा हस्तक्षेप होत असून भारताचे विघटन कसे घडवून आणता येईल यासाठी निरनिराळ्या योजना बनत आहेत. भारतीय राज्य हे सध्या कमजोर झालेले आहे, अशा भावनेने छोटे-मोठे देश भारतावर डोळे वटारत आहेत. म्हणून याबाबतीत डोळ्यात तेल घालून भारताच्या एकात्मतेची व संरक्षणाची जपणूक करणे आवश्यक आहे.

चिनबरोबर भारताचा सिमाविषयक तंटा मिटलेला नाही. नवीन नवीन भारतीय प्रदेशावर आपला हक्क सांगण्याची चीनची आगळीक मधून मधून चालू असते. अरूणाचल प्रदेशासंबंधीचा चीनचा दावा हा त्यातलाच प्रकार आहे. पंजाबमध्ये सुरू असलेल्या अतिरेक्यांच्या कारवायांना शेजारील पाकिस्तान प्रोत्साहन देत आहे. पाकिस्तान सरकारकडून पंजाबी अतिरेक्यांना पाकिस्तानात लष्करी प्रशिक्षण दिले जात असून सर्व प्रकारची हत्यारेही पुरविली जात आहेत. त्यामुळेच अतिरेक्यांना दहशतवाद चालू ठेवण्याचे शक्य होत आहे.

अमेरिकेसारख्या देशाचीही पाकिस्तानला व पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या अतिरेक्यांनाच सहानुभूती आहे. पंजाबात खून, दरोडे टाकून अतिरेकी सरळ पाकिस्तानात आश्रय घेतात. अशा या चीन, पाकिस्तान इ. राष्ट्रांच्या हस्तक्षेपामुळे भारताच्या एकतेला धोका निर्माण झाला आहे.

खुद्द पाकिस्तानला स्वातंत्र्य मिळून ४० वर्षे झाली तरी अजून आधार गवसलेला दिसत नाही. कारण पाकिस्तानात एकच धर्म, वंश असतांनाही कराचीत जातीय दंगली होतात. ही पाकिस्तानच्या बाबतीत शोकांतिका आहे. जसा भारताच्या एकात्मतेला धोका निर्माण होतो आहे. तसाच पाकिस्तानच्या एकतेला देखील भारतापेक्षा मोठा धोका निर्माण झालेला आहे. सिंध प्रांतातील जनतेला झियाची हुकूमशाही नको आहे. पाकिस्तानात अनेक अंतर्गत भानगडी असूनही भारताच्या विघटनासाठी झिया-उल-हक प्रयत्नशील आहे. कारण अंतर्गत कलह मिटण्यासाठी पाकिस्तानी जनतेचे लक्ष पाकिस्तानचा शत्रू म्हणून भारताकडे वळवून आपली सत्ता टिकविण्याचा त्यांचा डाव आहे. खलिस्तानवादींना आश्रय, शस्त्रास्त्रे पुरवठा व प्रशिक्षण पाकिस्तानात दिले जाते. भारतासाठी खड्डे खोदण्याचा प्रयत्न चालू आहे. पण हे खड्डे पाकिस्तान स्वतःसाठीच खणत आहे, याची पाकिस्तानला जाणीव नाही.

प्रकरण आठवे

एकात्मता वाढीवरील उपाय

"व्यक्तीच्या किंवा देशाच्या जीवनामध्ये जेव्हा संशयाचे, संभ्रमाचे, संकटाचे प्रश्न निर्माण होतात, तेव्हा आपल्या मूलभूत तत्वांची आठवण करणे अतिशय महत्वाचे असते, असे मी मानतो. अर्जूनाला संभ्रम निर्माण झाला त्यावेळी त्याला भगवान श्रीकृष्ण भेटले. पण तुम्हा-आम्हाला थोडेच श्रीकृष्ण भेटणार आहेत? तुमचे आमचे भगवान श्रीकृष्ण म्हणजे आपली मूलभूत तत्वे, आपले मूलभूत सिद्धांत."

— यशवंतराव चव्हाण

कै. यशवंतराव चव्हाण यांच्या मतानुसार आज भारतात संशयाचे, संभ्रमाचे व संकटाचे वातावरण निर्माण झालेले असून ते निवळण्यासाठी व देशाची एकता आबाधित ठेवण्यासाठी मूलभूत तत्वांची आठवण ठेवून त्यानुसार सर्व नागरिकांनी वागले पाहिजे. थोडक्यात म्हणजे देशाची एकात्मता राखण्यासाठी भारतीय जनतेने मूलभूत तत्वांनाच देव मानले पाहिजे.

"भारताच्या सीमा क्षेत्रात राहाणारे जे कोणी आहेत ते सर्व भारतीय आहेत. मग त्यांची जात, धर्म, समाज, वर्ण कोणताही असो. कल्पना, रूढी आणि श्रद्धाबाबत आपल्या देशात मुक्तपणे देवाण-घेवाण होत असे. दुर्दैवाने आम्ही आतापर्यंत आमच्यात दृष्टिकोन निर्माण करू शकलेलो नाही. आम्ही काही क्षुल्लक कारणावरून आणि प्रादेशिक लाभासाठी आपापसात भांडतो. आपल्या व्यापक राष्ट्रीय कल्याणासाठी असे क्षुल्लक हितसंबंध दूर ठेवले पाहिजे.

आपण ज्या भूमीवर रहातो आणि ज्या परंपरांमध्ये आपण वाढलो ती भूमी, ती परंपरा आपल्या राष्ट्राचा स्वभावधर्म बनलेली आहे."

— डॉ. एस. राधाकृष्णन्

डॉ. राधाकृष्णन यांनी राष्ट्रहिताला अत्यंत महत्व देऊन राष्ट्रकल्याणासाठी क्षुल्लक हितसंबंध दूर ठेवण्याचे भारतीयांना आवाहन केले होते की, जेणे-

करून जात, धर्म, समाज, वर्ण याबाबत कोणतीही समस्या निर्माण होणार नाही आणि देशाच्या एकात्मतेला बाधा येणार नाही. परंतु नंतरच्या काळात राष्ट्रापुढे अनेक समस्या व प्रश्न निर्माण झाले, व त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आली.

भारताने घटनेच्या सरनाम्यातच (Preamble) सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबतीत न्याय, विचार, उच्चार, समजुती, श्रद्धा व पूजा यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधी यांची समानता मिळण्याबरोबरच राष्ट्राचे ऐक्य व व्यक्तीची प्रतिष्ठा व बंधुभाव टिकविण्याची निश्चिती दिली आहे.

एकात्मता वाढीसाठी आतापर्यंत देशात सर्व पातळयांवर प्रयत्न होत आहे. परंतु ते अपुरे पडताहेत. तेव्हा जिद्दीने प्रयत्न करून एकात्मता राखणेची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय एकात्मता समिती – १९६०

एकात्मता वाढीसाठी प्रारंभीपासूनच प्रयत्न सुरू असून जबलपूर येथे झालेल्या भीषण सांप्रदायिक दंग्याचा परिणाम म्हणून अखिल भारतीय काँग्रेसच्या १९६० च्या अधिवेशनात श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली एक राष्ट्रीय एकात्मता समिती स्थापन करण्यात आली. १३ मे १९६१ रोजी या समितीने काँग्रेसच्या कार्यवाही समितीस आपला अहवाल सादर केला. त्यात राष्ट्रीय एकात्मता ही भारताची प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले.

राष्ट्रीय एकात्मता परिषद – १९६२

पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली ३६ व्यक्तींच्या एका राष्ट्रीय एकता परिषदेची सभा दिल्ली येथे १९६२ साली झाली. त्यात गृहमंत्री, राज्यमंत्री, राज्यांचे मुख्य-मंत्री, सात राजकीय पक्षांचे नेते व पंतप्रधानाने नियुक्त केलेले सात सदस्य यांचा समावेश होता. यात दोन समित्या निर्माण करून त्यातील एक समिती “ प्रादेशिक विषमता समिती ” आणि दुसरी “ भावनात्मक एकीकरण समिती ” अशा होत्या.

आपल्या राष्ट्रीय जीवनाचा पाया समान नागरिकत्व, विविधतेत एकता, धार्मिक स्वातंत्र्य, ऐहिकता, समता, सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय आणि सर्व जातीजमातींतील भ्रातृभाव हा आहे. या मूल्यांबद्दलची आपली निष्ठा राष्ट्रीय

एकात्मता परिषद सतत जाहिर करीत आली आहे. वरील मूल्य समाजात रूजविण्यांचे प्रयत्न सुरू आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या मूळावरच घाव घालणाऱ्या संकटांचा राष्ट्रीय एकात्मता परिषद सतत निषेध करीत आहे! आणि हिंसा व अव्यवस्था हे प्रकार ताबडतोब बंद करण्यासाठी राजकीय पक्ष, स्वयंप्रेरित संस्था, नागरिकांचा गट, वृत्तपत्रे, विचारवंत आणि सर्व सज्जनांना राष्ट्रीय एकात्मता परिषद हाक देत आली आहे. गेल्या काही वर्षात भारतातील वेगवेगळ्या भागात ज्या जातीय दंगली झाल्या. त्यांची राष्ट्रीय एकात्मता परिषदेने नोंद घेतलेली आहे.

देशातील जातीयतेच्या निर्मूलनाचे कार्यही राष्ट्रीय एकात्मता परिषद करीत आहे. एकात्मता वाढीसाठी आतापर्यंत सुरु असलेले प्रयत्न अपुरे पडत असून त्यासाठी आपण खालील उपाययोजना करू शकू.

१) धर्मवाद व जातीयवादाचे उच्चाटन –

धर्म ही वैयक्तिक बाब असून लोकशाहीशी ती विसंगत आहे. लोकशाही आणि धर्म हे परस्परविरोधी आहेत. प्रत्येक सुजाण नागरिकाने आपला धर्म स्वतःच्या घरापुरताच मर्यादित ठेवावा. धर्म देवाशी वैयक्तिक नाते दाखविणारा असून त्याचा फार उदो उदो होता कामा नये. धर्माप्रमाणेच जातियवादाचाही सुळसुळाट झालेला आहे. जातियवादी संघटना धर्माच्या नावाचा वापर कोणत्याही अध्यात्मिक वा मानवी हितास कारणीभूत कार्यासाठी करीत नाहीत, त्याउलट सत्ता, शक्ती आणि संपत्ती प्राप्त करण्यासाठी चालविलेली, ज्यात कोठेही धर्म आढळत नाही, अशी धडपड असते. त्यामुळे धर्मांधता व जातियतेचे आज उच्चाटन होणेसाठी प्रयत्न हवे. धर्मांधता व जातियता यांचे उच्चाटन झाले तर सर्वधर्मांचे लोक एकत्र येऊन सर्वधर्मसमभाव खऱ्या अर्थाने अवलंबिला जाईल व राष्ट्रीय एकात्मताही वाढेल.

इंग्रजांनी भारताला धर्मांचे जोडे चढविले. तेच जोडे बॅरिस्टर जीनांनी घालून पाकिस्तानची निर्मिती केली. शिखांनाही इंग्रजांनी धर्माचे जोडे १८९७ नंतर चढविले. इंग्रज I. C. S. मैकालिफने १९०९ मध्ये "शीख धर्म" नावाचे ६ खंडात पुस्तक लिहिले. तेच आज अतिरेक्यांचे बायबल बनले. अशा ह्या भारतीयांना लागलेल्या धर्माच्या रोगाचे निदान वेळीच झाले पाहिजे तरच देशाची अखंडता टिकेल.

गांधीजींच्या शिकवणीचे आचरण -

मानवी मूल्य आणि वैयक्तिक नितिनियमांवर गांधीजींचा भर होता. द्वेष आणि भेदभावाला त्यांच्या धर्मात थारा नव्हता. आज आपल्या देशातील राजकारणात आणि सार्वजनिक व्यवहारात याच गोष्टींवर पुन्हा भर देण्याची गरज आहे. धर्माचा बाजार करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी गांधीजींची ही शिकवण आचरणात आणण्याची गरज आहे. तसेच धर्मवाद व जातीयवाद यांचा स्तोम कमी करून मानवतावादाचा प्रसार सर्वत्र करणे आवश्यक आहे.

केरळमधील अत्यंत कडक जातिव्यवस्थेबाबत विवेकानंद म्हणाले होते की,

" केरल इस देशका पागलखाना है । आज तो हम हर प्रांतको पागलखाना बना रहे है । "

स्वामींनी सांगितलेले विचार सर्वांनी आत्मसात करून धर्म व जात प्रत्येक माणसाने आपल्या घराच्या उंबरठ्याच्या आतच ठेवावी. परंतु सध्या मात्र धर्म व जात यांचे बाजारीकरण झालेले असून त्यामुळेच देशाची एकता धोक्यात येईल.

सर्व धर्म, सत्याचा संदेश देतात म्हणून मूलतः सर्व धर्म एकच आहेत. सर्व धर्मांना समान सन्मान देणे, सर्व धर्मांबद्दल समान आदर बाळगणे म्हणजेच निधर्मी आचरण होय. निधर्मी आचरणानेही एकात्मता वाढू शकेल. म्हणूनच धर्मनिरपेक्षतेची जपणूक करणे आवश्यक आहे.

धर्म निरपेक्ष राज्य हे जसे धार्मिक नाही, तसेच धर्मविरोधीही नाही, तसेच कोणतेही धार्मिक तत्वज्ञान व कृती यापासून पूर्णतया अलिप्त व धार्मिक संबंधाबाबत तटस्थ आहे. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, जैन, बौद्ध, पारशी इत्यादींना प्रथम तुम्ही भारतीय आहात ही राष्ट्रधर्माची जाणीव बिंबवून त्यांच्यात सहिष्णूता व सहजीवन नांदवून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला पर्यायच नाही.

सर्व लोकांच्या धार्मिक श्रद्धांची जपणूक करण्याचे म्हणजेच निधर्मीपणाचे धोरण अकबर बादशहाचे होते. या निधर्मी वृत्तीबद्दल तत्वज्ञ कवी महमद इकबाल याने केलेली साधी पण संस्मरणीय काव्यपंक्ती खालीलप्रमाणे आहेत.

मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना ।
हिंदी है हम वतन है हिंदोस्ताँ हमारा ।

निधर्मीपणाचा अर्थ, सहजीवन आणि परस्पर सहिष्णूतेची परंपरा होय. गौतम बुद्ध, अशोक ते महात्मा गांधी या सर्वांनी एकत्रितपणे आपल्यापुढे

ठेवलेल्या सदिच्छा आणि सहकार्याच्या आदर्शांचे आपण वारस आहोत आणि ही परंपरा अंगी बाळगणे हाच निधर्मीपणा काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे, की जेणे करून जातीय व्यवस्थेचेही उच्चाटन त्वरीत होईल.

धर्म आणि माणसाच्या एकतेच्या बाबतीत संत कबीरने खालील काव्यपंक्ती रचलेल्या आहेत.

आये एकै देशसे।
उतरे एकै घाट।
हवा लगी संसारकी।
हो गये बारा बाट।

प्रत्येक माणूस एकाच प्रकारे पैदा होतो व मरतो. परंतु संसारात आल्यानंतर मात्र क्षणात वेगवेगळ्या धर्मांना तो चिकटतो असे होता कामा नये. माणसाचा धर्म कोणताही असला तरी त्याची प्राथमिक निष्ठा धर्मा अगोदर स्वत:च्या देशावर असावी.

धर्मनिरपेक्ष राजकारण हवे –

जातीयतेचे उच्चाटन करण्यासाठी राजकारण्यांनी घातलेले जातीचे व धर्माचे जोडे काढले पाहिजे. धर्म व जात यांची राजकारणापासून फारकत करणे आवश्यक आहे. राजकारणात धर्माचा होणारा हस्तक्षेप थांबविला पाहिजे. आज धर्म व जात यांच्या आधारावरच राजकारण खेळले जाते. उदा. निवडणुकीत उमेदवार निवडतांना, जनतेच्या निष्ठा लक्षात घेऊन, जातीच्या आधारावर प्रत्येक राजकीय पक्ष आपला उमेदवार निवडतो. निवडणुकांच्या वेळी, तसेच मंत्री बनवितांना, जातीचा विचार करण्याचा गुन्हा सर्व राजकीय पक्षांचे पुढारी आतापर्यंत करीत आले असून सध्याही तेच चालू आहे. एवढेच नव्हे तर समाजवादी व कम्युनिष्ट यांनाही जातीचा आधार देऊनच राजकारण करावे लागत आहे. म्हणजेच स्वत: राज्यकर्ते जर जातीयवाद व धर्मांधता यांना खतपाणी घालीत राहिले तर जातीयतेचे भूत देशाच्या एकात्मतेच्या मानेवर बसून फुटीरतेला प्रोत्साहन मिळेल. तेव्हा माझ्या मते आता तरी देशातील सर्व राजकीय पक्षांनी धर्मनिरपेक्ष राजकारण करावे, धर्म व जातीच्या नावावर चालणाऱ्या गेल्या ४० वर्षांच्या या अनिष्ट परंपरेला तिलांजली देणे आवश्यक आहे, तरच भारताची राष्ट्रीय एकात्मता टिकून राहील.

सरकार प्रमुख आपला बराच वेळ पूजास्थानांना आणि साधूंना भेटण्यात घालवतात. एखादा मंत्री भोंदू बुवाच्या पायांना स्पर्ष करीत आहे अशीही प्रसिद्धी होते. या गोष्टीकडे त्यांची 'खाजगी बाब' म्हणून काना डोळा करता येत नाही. बहुसंख्य अज्ञानी हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवतात. त्यामुळे जातीयतेच्या मूळांना खतपाणी मिळते. तेव्हा कोणत्याही सरकार प्रमुखाने सार्वजनिक ठिकाणी पूजेसाठी हजर राहू नये. म्हणजे आपले राज्य धर्मनिरपेक्ष व जातनिरपेक्ष आहे असे वाटून, सर्व धर्मीय लोकांच्या मनात सरकारी प्रमुखांबद्दल आदर व आस्था वाढेल व एकात्मताही वाढीस लागेल.

धर्मनिरपेक्षतेचे तत्व लोकशाहीवाद्यांच्या मनात स्पष्ट असेल तर जातीयवादाला आणि धार्मिक वर्चस्वाला गाडून टाकण्यास देशातील सर्व राजकीय पक्षांनी तयार झाले पाहिजे. तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडत्वासाठी आपण आपल्या सर्वधर्मीय मुलांची मने तयार केली पाहिजेत आणि या भारतीय बंधू भावाच्या तसेच विश्व बंधूभावाच्या वाढीसाठी आपण आपली संपूर्ण राष्ट्रीय साधनसामुग्री राबविली पाहिजे. म्हणजे देशाच्या एकात्मतेत वाढ होईल.

सध्या आपला देश अतिशय मोठ्या संकटातून जात आहे. जातीयवाद व धर्मवाद फोफावला असून भारतीय राजकारणाला या भयंकर धोक्यापासून वाचवले पाहिजे. या धार्मिकतावाल्यांना रोखण्यासाठी शासनाने शक्तीचा तसेच नैतिकतेचे अधिष्ठान असणाऱ्या व्यक्तींचा उपयोग करून घेतला पाहिजे. लोकांची सद्सद्विवेकबुद्धी जागरूक करून या प्रवृत्तीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याची त्यांना जाणीव करून दिली पाहिजे. भारतीय जनतेचे मग ती हिंदू असो, मुस्लीम असो, खिश्चन असो की शीख असो, देव एक आहे. १४ ऑगष्ट १९४७ च्या मध्यरात्री देशाला उद्देशून बोलताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की, "आपण दैवाशी दोस्ती करणार आहोत. आपले नशीब, आपले दैव घडवायची पवित्र जबाबदारी आपल्यावर आहे. या धर्मांध शक्तींचा नायनाट करूनच ती आपण पार पाडू शकतो."

देश एकसंध राहावा म्हणूनच राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच इंदिरा गांधी या महान नेत्यांनी आपल्या प्राणांच्या आहुत्या दिल्या आहेत. धर्मांधतेच्या भस्मासुराला गाडण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी आपण फार मोठी किंमत दिली आहे. यानंतरही आपण आताच काही कृती केली नाही तर इतिहासांचा न मानवणारा कौल आपणास मानावा लागेल. म्हणूनच धर्मवाद व

जातीयवाद यांच्या उच्चाटनासाठी सर्वांनी एकत्र येऊन शासनाला सहकार्य करावयाचे आहे.

भारतात विविध धर्म असले, त्यांची भाषा भिन्न असली तरीही त्यांतील श्रद्धा एकच आहे. त्यासाठी आपण सर्व धर्मांचे तत्वज्ञान तपासून ते सामान्य माणसापर्यंत पोहचविले पाहिजे. म्हणजे एकात्मता वाढीसाठी उपयोग होईल. उदा. ' क्रोध ' विषयक उदाहरण घेता येईल.

हिंदू धर्म सांगतो की, क्रोधाने संमोह निर्माण होतो.

बौद्ध धर्म म्हणतो, " क्रोधाला शरण न जाता त्यावर वर्चस्व मिळविले पाहिजे. "

ख्रिश्चन धर्म म्हणतो की, " प्रभुला क्रोधाचा गंध नाही. "

जैन धर्म सांगतो की, " सुज्ञ विचाराच्या आणि धार्मिक आचरणाच्या माणसासाठी क्रोध काहीच उपयोगाचा नाही. "

शीख धर्म सांगतो क्रोध माणसाला चितेसमान जाळून टाकतो.

इस्लाम धर्म सांगतो की, " जो पुरुष क्रोधावर नियंत्रण ठेवतो तोच खरा शक्तीशाली पुरुष होय. "

यावरून असे दिसते की क्रोधाला कोणत्याही धर्मात स्थान नाही. तर याऊलट प्रेम, त्याग, शांती या गुणांना प्रत्येक धर्मात महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

निरनिराळ्या धर्मातील विचारसूत्रे व तत्वज्ञान मूलतः एकच आहेत हे जाणून घेण्यामागील उद्देश म्हणजे नवीन पिढीच्या मनात सहिष्णुता आणि सामंजस्य रूजविणे हा होय. तसेच सर्व धर्मांच्या बुडाशी असलेली एकात्मता जनसामान्यांना समजून सांगण्यासाठी विविध धर्माचे तत्वज्ञानाचे माध्यम वापरणे आवश्यक आहे.

विश्व बंधुत्वाच्या कल्पनेबाबत प्रत्येक धर्मात समान कल्पनेचा अंतर्भाव आढळतो.

१) हिंदू धर्म सांगतो की, उदार आणि सज्जन माणसे सर्वांच्या बाबतीत समभाव बाळगतात.

२) बौद्ध धर्म सांगतो की, सद्वर्तनी माणसाबरोबर घनिष्ट मैत्री करावी.

३) ख्रिस्ती धर्म सांगतो की सर्व माणसांना आपले बांधव माणले पाहिजे. स्वबांधवांचा तिरस्कार पापसमान होय.

४) जैन धर्म सांगतो सर्व लोकांना सतत बंधूभावाने वागवा.

५) इस्लाम धर्म सांगतो की, सर्व मानव प्राणी एक असून सर्वजण एकमेकांचे बांधव आहेत म्हणून सर्वांनी तसेच रहावयास हवे.

६) शीख धर्म सांगतो की, बांधवांनो एक व्हा. परस्पराविषयी आदरभाव, प्रेम ठेवा, त्यांच्याबाबतचे गैरसमज दूर करा.

एकता टिकविण्यासाठी प्रत्येक नागरिक कृतीशील बनला पाहिजे. कृती संबंधीही सर्व धर्मात एकच विचार मांडले आहे.

१) हिंदू धर्म – आपल्या कृतीनुसार आपली घडण होत असते. सत्कर्म करणारा पुण्यात्मा होतो तर वाईट कर्म करणारा दुराचारी बनतो. म्हणून माणसाने नेहमीच सत्कर्म करण्यात रमावे.

२) बौद्ध धर्म – कृतीनेच समाजातील माणसाचे स्थान ठरत असते. कृतीवरूनच एखादा माणूस समाजद्रोही किंवा समाजभूषण ठरतो. दुष्कृत्ये करणे सोपे असते, सत्कृत्य करणे अवघड असते. तसेच सत्कृत्याची फळेही उत्कृष्ट असतात.

३) खिस्ती धर्म – प्रत्येक समाजातील व्यक्ती ही कृतीवरून ओळखली जाते. माणसाने चांगुलपणाचा नुसता आव आणू नये तर तो कृतीत आणावा. सत्कृत्याला ईश्वरी कृपा प्राप्त होते तर दुष्कृत्याला नाही.

४) जैन धर्म – चांगली कृती करणारे लोक आपल्या सदाचारी वागण्याने इतरांना योग्य मार्ग दाखवित असतात. म्हणून प्रत्येकजणाने सत्कर्म करीत रहावे.

५) इस्लाम धर्म – सत्कर्माबद्दल अमंगल नष्ट होते. जेव्हा जगाचा शेवट होईल तेव्हा प्रत्येक माणसाची परिक्षा त्याने केलेल्या सत्कर्मावरून होईल.

६) शीख धर्म – ईश्वर प्रत्येकाच्या कृत्याची नोंद ठेवतो. सत्कर्मे करूनच मनुष्य ईश्वराचे प्रेम मिळवितो.

संघर्षा संबंधीचे तत्वज्ञान –

१) हिंदू धर्म - सूज्ञ मनुष्य नेहमी संघर्ष टाळून शांततेने राहतो. माणसाच्या जीवनाचा आदर्श संघर्ष नसून शांतता हा आहे.

२) बौद्ध धर्म - संघर्ष हा माणसाचा आदर्श नसून शांती हे उद्दिष्ट आहे.

३) खिस्ती धर्म - जी माणसे खडगे उचलतील ते स्वतःच खडग्याचे

बळी ठरतील. संघर्ष हा विनाशाचा मार्ग आहे आणि शांती हा सुखाचा, आनंदी मार्ग आहे.

४) जैन धर्म - कोणत्याही प्राण्याने कोणतेही कारण असो पण कदापि हत्या करू नका. संघर्ष हा पूर्णपणे निषिद्ध मानणे उचीत ठरते.

५) इस्लाम धर्म - प्रत्येक माणसाने शांततेचा शोध घेणे आवश्यक आहे. शांतता धोक्यात न आणता कोणीही संघर्ष करू शकणार नाही. कारण शांती ही परमेश्वराची आज्ञा आहे.

६) शीख धर्म - शीख धर्मातही संघर्ष टाळण्याचे आवाहन केलेले आहे.

शांतीविषयक तत्वज्ञान -

१) हिंदू धर्म - सुख आणि संरक्षण हवे असल्यास शांती मिळविणे आवश्यक आहे.

२) बौद्ध धर्म - सर्वांनी आपल्या बांधवांसह शांततेने राहाणाऱ्यांना सुख मिळते. सर्वांशी शांततेने राहाणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असले पाहिजे.

३) ख्रिस्ती धर्म - आपण सर्वानी शांततेचाच मार्ग शोधला पाहिजे.

४) जैन धर्म - सुज्ञ व ज्ञानी माणसे शांतता हाच जीवनाचा पाया मानतात. सर्व लोकांनी आपल्या बांधवासह शांततेने राहावे, ही परमेश्वराची इच्छा आहे.

५) इस्लाम धर्म - परमेश्वर माणसाला शांतीकडे नेतो. परमेश्वराच्या उपदेशाकडे लक्ष दिल्यास तो संघर्षाच्या अंधःकारातून शांततेच्या प्रकाशाकडे नेतो.

६) शीख धर्म - सत्यकर्म हेच माणसाचे सर्वश्व असून सत्कर्मच सर्वांना शांती व सुख देईल.

७) पारशी धर्म - सर्व पुरुष महिलांनी आपापसात प्रेम बाळगून बंधू-भगिनीच्या नात्याने शांती टिकवावी.

अशा विविध धर्मांचा तौलनिक अभ्यास करून धर्मांच्या तळाशी असलेली एकात्मता प्रत्येक नागरिकाला समजावून दिली पाहिजे. सर्व धर्मांच्या तत्वज्ञानाच्या व विचारांच्या अभ्यासाने काही धर्मांध मूर्खांचे हृदयपरिवर्तन होऊन शहाणपण प्राप्त होईल. तसेच सध्या अण्वस्त्रांमुळे सर्व मानव जातीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झालेला आहे. तेव्हा अशावेळी सर्व धर्मांच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासामुळे आजच्या तरुण पिढीला विविध धर्मातील एकतेतून साक्षात्कार झाल्याशिवाय राहाणार नाही.

२) दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम कार्यक्षमतेने राबविणे –

ब्रिटिश राजवटीने भारतीय जनतेला आत्यंतिक दारिद्र्याच्या खाईत लोटले म्हणून आजपर्यंत अस्तित्वात असलेली गरीब आणि श्रीमंत ही दोन प्रकारची समाजरचना नष्ट करण्याची वेळ आलेली आहे. त्या दिशेने त्वरित पाऊल उचलणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम पोटतिडकीने आणि गंभीरपणे हाती घेऊन राबविला पाहिजे. या कार्यक्रमात बहुसंख्य असलेल्या गरीबांची क्रयशक्ती वाढविण्यावर भर असला पाहिजे. गरीबांची क्रयशक्ती वाढली नाही तर आपल्या जवळ आज असलेल्या ३ कोटी टन धान्याचे राखीव साठे, या योजनेच्या अखेरीस ९ कोटी टनावर जातील. गरीबांची क्रयशक्ती वाढविण्यासाठी शेतमजूरांच्या वेतनात वाढ करणारे कायदे संमत करून त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. कारण असंघटीत असल्याने संघटीत क्षेत्रातील कामगारांना किंमतीबरोबर जी भरपाई मिळते ही मात्र त्यांना मिळत नाही. शेतमजूर व त्याचे कुटुंब सुखात जगू शकेल, इतकी तरी त्यांना वेतनवाढ दिली पाहिजे.

भारतीय समाजातील वाढती विषमता नष्ट करण्याचा खराखुरा व प्रभावी मार्ग म्हणजे भूमीहीन शेतमजूरांना वाटण्यासाठी किती जमीन जादा आहे, याचा पूर्णपणे शोध घेणे. जादा शेतजमीन भूमीहीन शेतमजूरांना आणि सिमान्त शेतकऱ्यांना वाटून देणे हा विषमता कमी करण्याचा एक मार्ग आहे.

एकात्मिक ग्रामीण विकास योजना –

एकात्मिक ग्रामीण कार्यक्रमात गरीबांना जनावरे, हातमाग शिवणयंत्रे, सायकली, रिक्षा यासारखी उत्पादनाची साधने पुरविण्याचा उद्देश आहे. या कार्यक्रमाची नियमितपणे कसून पाहणी झाली व त्यांचे प्रशासन प्रभावी व कार्यक्षम केले आणि गरीबांऐवजी श्रीमंतांनाच या योजनांचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने स्वार्थी राजकीय हस्तक्षेप व ढवळाढवळ झाली नाही तर गरीबांच्या पदरात काही तरी वाटा पडेल आणि त्यामुळे विषमता कमी होण्यास मदत होईल.

शासनाने दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या अन्न, वस्त्र व निवारा या तिनही गरजा भागविण्यासाठी योजलेले उपाय कमी पडत असून त्यात वाढ करावी. तसेच त्यांच्या औषधोपचाराचीही युद्धपातळीवर सोय करावी. छोटे मोठे शेतकरी जी पिके घेतात., जे उत्पादन काढतात, त्या उत्पादित मालाला शासनाने

उत्पादन खर्चाचा विचार करूनच साजेशा किंमती द्याव्यात. म्हणजे जेणेकरून शेतीत काम करणाऱ्या शेतमजूरालाही वेतन वाढून देता येईल व शेतकरी आणि शेतमजूर यांचा प्रश्न निकालात निघेल. परिणामी त्यांच्या मनात कधीही आणि कोणत्याही प्रकारचा राष्ट्रविरोधी विचार येणार नाही. पर्यायाने एकात्मता जोर धरील.

शिक्षणासाठी पूर्ण सहाय्य –

दारिद्रय रेषेखाली जगणाऱ्या गोरगरीब लोकांच्या मुलांना शिक्षण विनामूल्य देण्याची सोय करून, त्यांना शिक्षण पूर्ण होईपर्यंत शालेय गणवेश, पुस्तके, वह्या, शिक्षणास बाहेरगांवी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना बसचा पास, मधल्या सुट्टीत जेवण व गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीच्या रुपाने अर्थसहाय्य सरकारने करणे आवश्यक आहे. तरच ग्रामीण भागातील गोरगरीबांची मुले स्वतःचे शिक्षण पूर्ण करू शकतील त्यामुळे दारिद्रय निर्मूलन होण्यास मदत होईल. तसेच समानता प्रस्थापित होण्यासही मदत होईल.

सध्या सरकारने गरीबांसाठी म्हणजे दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी विविध उत्कृष्ट योजना आखून त्यांची अंमलबजावणी सुरू केली आहे आणि पुन्हा वेळोवेळी नवीन योजना आखण्याचेही काम चालूच आहे. परंतु दिल्लीत व मुंबईत मान्यता पावलेली योजना गल्लीत येईपर्यंत खिळखिळी होते. त्यांचा गरीबांना काहीही फायदा होत नाही. फायदा होतो फक्त श्रीमंतांनाच ! मग यात दोष कोणाचा ? याचा अर्थ सरळ आहे की, योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने व निःस्वार्थीपणाने होत नाही. म्हणजेच योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन कार्यक्षम करण्याची गरज असून सुरू असलेला भ्रष्टाचार निपटला गेला पाहिजे. तरच सरकारने आखलेल्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचू शकतील आणि दारिद्रयही कमी होण्यास मदत होईल.

सिधा वाटप पद्धतीत कार्यक्षमता निर्माण करणे –

सरकार स्वस्त धान्य दुकानांना परवानगी देऊन जनतेला जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करीत आहे. परंतु मी स्वतः या सिधा वाटप पद्धतीची पहाणी केली असतांना, त्यात ठरवून दिलेल्या अन्नधान्याचा भाग मिळत नाही असे दिसून आले. धान्य, तेल, साखर इ. वस्तू दुकानात आल्या की, दुसऱ्याच

दिवशी या वस्तूंचा साठा संपतो. मग वस्तूंचे वितरण न होता त्या जातात कोठे? तर या सर्व स्वस्त धान्याच्या दुकानातील वस्तू काळ्या बाजाराने नफा घेऊन मोठ्या व्यापाराला विकल्या जातात. आणि सर्वसामान्य लोक इकडे अन्नान्न करीत तडफडतात. त्यामुळे गरीबांच्या मनात या देशाबद्दल व शासन-यंत्रणेबद्दल प्रेम तरी कसे राहील. ते उलट रस्त्यावर येऊन संघर्षास उभे राहतील आणि आपल्या देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण होईल. त्यासाठी शासनाने या सिधावाटप पद्धतीत जो भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्यावर त्वरित उपाय करून अन्नधान्य वितरण पद्धती सुलभ व न्याय्य होणे आवश्यक आहे. तरच गरीबांना न्याय मिळेल व दारिद्र्यही दूर होण्यासाठी प्रयत्न होतील.

३) आर्थिक विषमतेचे उच्चाटन –

आर्थिक विषमतेमुळेच भारतीय समाजात फुटीरतेचे बीजारोपण होत आहे. एकदा का आर्थिक जीवन हे समतोलापासून दूर गेले की, मग जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्याचा प्रत्यय येतो. धर्म, जात, भाषा, प्रदेश इ. मध्ये विघटनवादी शक्ती प्रगट होतात. पर्यायाने यामुळेच आज आपल्या देशाची अखंडता धोक्यात आली आहे. एकतेला निर्माण झालेला धोका टाळण्यासाठी समाजातील आर्थिक विषमता पूर्णपणे नष्ट करून समानता प्रस्थापित करणे गरजेचे आहे. सध्या विषमता विकासाच्या वाढत्या वेगाबरोबर अधिकाधिक वाढतच आहे, असे घडता कामा नये, अन्यथा ही परिस्थिती राष्ट्राला घातक ठरेल.

आज उद्योगधंद्यांचे स्वरूपच असे आहे की, त्यासाठी मोठमोठ्या प्रमाणात भांडवल लागते. याचा परिणाम मूठभर लोकांच्या हातात आर्थिक सत्ता केंद्रीत होण्यावर होतो. त्यामुळे विषमता निर्माण होते. तेव्हा खाजगी क्षेत्रातील नफा आणि संपत्ती यांचे योग्य आणि न्याय्य वितरण होईल असे नियंत्रण ठेवल्यास खाजगी क्षेत्रातील ही सांपत्तिक विषमता दूर होईल. काही बड्या लोकांनाच खाजगी क्षेत्रात लाभ होऊ नये म्हणून सरकारने काही कायदे यापूर्वीच केलेले आहेत. परंतु आज पुन्हा नवीन कायद्यांची आवश्यकता असून सरकारने त्यादृष्टीने पाऊल टाकून आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावेत.

शहरी विभागातील जमीनीवर नियंत्रण असणे, तिचे फेरवाटप हा देखील विषमता दूर करण्याचा एक उपाय आहे. तसेच मोठमोठ्या उद्योगपतींच्या स्वार्थी प्रवृत्तीला शह देण्यासाठी खऱ्याखुऱ्या लघुउद्योग क्षेत्राचा विकास केला

पाहिजे. स्वयंरोजगार म्हणून लघुउद्योग चालविणाऱ्या तंत्रज्ञ-उद्योजकांच्या लघुउद्योग क्षेत्राचा जास्तीत जास्त विकास हा तयार मालाच्या कारखानदारीमुळे निर्माण होणारी आर्थिक विषमता कमी करण्याचा महत्वाचा उपाय आहे.

सार्वजनिक क्षेत्राची पुनर्रचना –

विषमता कमी करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राला प्रभावी कामगिरी करता यावी म्हणून या क्षेत्राची पुनर्रचना करून व्यवस्थापनाचे योग्य विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्राच्या कारभारात राजकीय आणि मुलकी नोकरशहांचा होणारा हस्तक्षेप संपुष्टात आणला पाहिजे. त्याचप्रमाणे आजारी कारखाने ताब्यात घेण्याचे सार्वजनिक क्षेत्राचे धर्मदाय कार्य बंद केले पाहिजे. असे झाले तरच जेवढा अपेक्षित नफा, तेवढा मिळू शकेल. आर्थिक उपाय-योजनांत आणि धोरणात, संपत्ती कर, कंपनी कर, देणगी कर, भांडवली नफा कर, शहरी जमीन कर, आदिंचा अधिकाधिक अवलंब करून आर्थिक विषमता दूर करता येईल. तसेच कमी उत्पन्न गटातील ग्राहकांना अत्यावश्यक वस्तू, मूलभूत सोयीसवलती आणि सामाजिक सेवा विनासायास मिळाव्यात म्हणून किमान गरजा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी झाली तर या विषमतेला आळा घालता येईल. अशाप्रकारे आर्थिक विषमता अधिकाधिक प्रमाणात कमी करण्याचा मार्ग हाच राष्ट्रीय एकात्मतेकडे जाणारा खरा मार्ग आहे.

आर्थिक विषमता संपुष्टात आली किंवा कमी झाली तर लोक सुखाने व आनंदाने एकत्र राहतील. धर्म, जात, वंश या गोष्टींना अजिबात थारा उरणार नाही. त्यामुळे देशात फुटीरतेचे बीज पेरले जाणार नाही. पर्यायाने एकता वाढीस लागेल.

४) बेकारी व भ्रष्टाचाराचे उच्चाटन –

स्वातंत्र्योत्तर चाळीस वर्षानंतरही आमच्या जनतेपैकी फक्त $\frac{1}{3}$ लोकां-पर्यंतच पूर्ण प्राथमिक शिक्षणाचे लोण पोहचले आहे आणि यापैकी ७९% लोकांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा सारखा नसतो. त्यामुळे नोकरीसाठी त्यांना स्पर्धा करता येत नाही. त्याचा परिणाम बेकारी वाढण्यावर झाला. त्याचप्रमाणे भ्रष्टाचारही प्रशासनाच्या सर्व विभागात बोकाळल्यामुळे प्रशासन यंत्रणा अकार्यक्षम बनली आहे. तेव्हा शासनाने त्वरीत सर्व क्षेत्रातील भ्रष्टाचार निपटून

काढण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत. तसेच बेकारीचे निर्मूलन होणेसाठी बेरोजगारांसाठी रोजगार उपलब्ध करून द्यावा. कारण बेरोजगारांना रोजगार मिळाला तर ते अनिष्ट मार्गांकडे वळणार नाही. पर्यायाने देश एकसंध राहाण्यास निश्चित मदत होईल. मिश्र अर्थव्यवस्थेचा लाभ घेऊन तयार मालाचे कारखानदार करीत असलेल्या शिरजोरीचा उल्लेख करणेही आवश्यक आहे. लघुउद्योग क्षेत्राचा विकास करणे आवश्यक असून त्यामुळे बेकारी कमी होण्यास मदत होईल.

५) रोजगारासंबंधीचे स्थानिक बंधने रद्द करावी –

रोजगार संधी व तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश देतांना स्थानिक भाषेतील नैपुण्य व निवाशी कायदे यासंबंधी असलेली बंधने रद्द केली पाहिजे. एकात्मतेचा विचार करून कोणत्याही राज्यातील भूमीपूत्रांनाच रोजगार देता कामा नये. कोणत्याही राज्यातील व्यक्तीला देशात कोठेही रोजगार मिळविण्याची संधी देण्यास सर्व राज्य सरकारांना बंधनकारक असावे. भूमिपूत्राची संकुचित कल्पना नष्ट होऊन सर्व लायक भारतीयांना रोजगार संपूर्ण देशात कोठेही मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे राष्ट्राची अखंडता दुभांगणार नाही.

६ धर्मस्थानांचा उपयोग राजकारणासाठी नको –

राजकीय पक्ष आणि त्यांच्या हालचाली या आपल्या धर्म, भाषा, प्रांत व जाती यांचे उगमस्थान असता कामा नये. धार्मिक प्रार्थना स्थानांचा उपयोग राजकीय कारणासाठी होता कामा नये. धार्मिक बाबतीत गुरुस्थानी असलेल्या व्यक्तींना राजकीय क्षेत्रात स्थान असता कामा नये. त्यामुळेच एकतावाढीसाठी अनुकूलता राहिल.

७) जलसंपत्तीचे समान वाटप –

जलसंपत्तीचा उपयोग संपूर्ण भारताला सारख्याच प्रमाणात झाला पाहिजे. दरवर्षी आपण दुष्काळ निवारण कार्यासाठी जादा खर्च करतो. मात्र पूरनियंत्रणासाठी आपण पुरेसा खर्च करीत नाही. समान वाटपाचे धोरण ठेवल्यामुळे सरकारबद्दल जनतेच्या मनात विश्वास वाढत जातो. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते.

८) सर्वत्र गुणवत्तेचा विचार व्हावा –

भारतीय लोकांना घटनेने प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला कामाची हमी, हा मूलभूत हक्क दिलेला आहे. तसेच सर्वत्र सार्वजनिक किंवा शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्तेचा विचार करावा. धर्म, लोकसंख्या, प्रादेशिकता किंवा जाती यात येऊ नये. त्यामुळे कोठेही गुणवंतांना संधी मिळेल. आणि राष्ट्रावरील निष्ठेत प्रचंड वाढ झाल्याशिवाय राहणार नाही.

९) इतिहासाच्या सुधारित आवृत्त्या –

इतिहासाचा अन्वयार्थ निट लावणे आवश्यक आहे. त्याबाबत महात्मा गांधी म्हणतात, " जोपर्यंत आपल्या शाळा कॉलेजात विकृत स्वरूपातील इतिहास शिकविण्यात येतो, तोपर्यंत या देशात कायम स्वरूपी जातीय सलोखा निर्माण होणार नाही. "

इस्लामबद्दल आपल्या मनात अप्रिती निर्माण होण्यास इतिहासाची पुस्तकेच कारणीभूत असल्याचे ' लाला लजपतराय ' यांनी मान्य केले होते. इतिहास-कारांनी परस्परविरोधी लिखाण न करता सर्व धर्म एकत्र नांदण्यास पोषक असा इतिहास लिहिणे आवश्यक आहे. इतिहास लिहितांना धर्मा-धर्मात, जाती-जातीत भेद निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्यामुळे देशाची एकात्मता कणखर बनेल.

खरे म्हटले तर परकीयांनी आपला इतिहास लिहिला आणि आपल्या इतिहासकरांनी त्याची नक्कल काढतांना हिंदुच्या भावना मुसलमान आणि शीखांविरूद्ध भडकून अनर्थ केला. तेव्हा आता मात्र तसे घडू नये याची दखल घेणे आवश्यक आहे.

१०) वृत्तपत्रांची निर्भिड भूमिका असावी –

वृत्तपत्रांतून धार्मिक भावना किंवा प्रादेशिक वैरभाव निर्माण होईल असे वृत्त छापू नये. कारण त्यामुळे जातीयतेस खतपाणी मिळते व जातीयता आणखी वाढत जावून सामाजिक विषमता निर्माण होते. भारतातील वृत्तपत्र-व्यवसाय हा लोकशाही, स्वतंत्र समाजात लोकांच्या हक्कांचा आणि अधिकारांचा स्पष्टवक्ता रक्षक म्हणून कार्यकर्ता असावा अशी अपेक्षा आहे. पण हे कर्तव्य पार पाडतांना त्याला अनंत अडथळे येतात, ते निरनिराळ्या राजकीय पक्षांचे होय. त्यामुळे वृत्तपत्रांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या दबावाखाली न राहाता

जनतेच्या हक्कांच्या रक्षणार्थ निर्भिडपणे आपली भूमिका पार पाडावी. म्हणजे सामान्य जनतेला दिलासा मिळेल व जनतेच्या मनात देशप्रेमाची लाट निर्माण होईल. परिणामी आपल्या देशाच्या एकात्मतेला कधीही धोका निर्माण होणार नाही. तसे झाले तरी देशातील आम जनता संकटाला तोंड देण्यास उभी राहील.

११) प्रक्षोभांचा बीमोड वेळीच करणे आवश्यक –

आपल्या देशात सध्या निर्माण झालेल्या प्रक्षोभांचा बिमोड वेळीच केला पाहिजे. यासाठी देशातील तमाम जनतेने भारत सरकारला सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे. प्रत्येक माणसाने देह आपला नाही, असे मानून देशकार्यासाठी ईश्वराने आपल्याला दिलेली ती एक ठेव आहे. म्हणून आपण देशाच्या अखंडतेसाठी फुटीरांच्या विरूद्ध सतत उभे राहाणे गरजेचे आहे. तरच देशाची एकता टिकेल-

१२) राष्ट्रभाषा हिंदी सक्तीचे करणे –

हिंदुस्थानातील मान्यता पावलेल्या चौदा भाषापैकी भारताच्या घटनाकारांनी देशाची राष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीऐवजी हिंदी भाषेची निवड केली. पण हिंदी भाषेबद्दल उत्साह फक्त उत्तर भारतीयांमध्येच होता. प्रत्यक्षात हिंदी ही देशाच्या ४३ % लोकांची भाषा होती. हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळाली. पण या राष्ट्रभाषेला दक्षिणात्यांचा भयंकर विरोध होता व तो अजूनही आहे. एवढेच नव्हे तर तामिळनाडू राज्यात हिंदीविरोधी दंगली झाल्या. त्यामुळेच पंडित नेहरूंनी हिंदीबरोबर इंग्रजी सुद्धा राज्यकारभाराची भाषा राहील अशी कायद्यात तरतूद केली.

परंतु आता संपूर्ण देशाच्या कानाकोपऱ्यात राष्ट्रभाषा म्हणून हिंदी सक्तीने लादणे आवश्यक आहे, सर्व राज्यांमध्ये सध्या हिंदी कमी अधिक प्रमाणात बोलली जाते. तरी देखील राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने देवनागरी लिपी व हिंदी भाषा यांना देशातील आम जनतेने मान्यता देऊन स्विकार करण्याची गरज आहे. भाषेविषयी बोलतांना महात्मा गांधी म्हणाले होते की, "भाषा माताके समान है। मातापर हमारा जो प्रेम होना चाहिए, वह हम लोगोमे नही है।" हिमालयातून निघालेली गंगा अनंतकाळ वहात राहील, असा गांधीजींनी हिंदी भाषेचा गौरव केला.

हिंदी आंतरराष्ट्रीय भाषांच्या क्रमात चार क्रमांकाची भाषा आहे. आजही भारताबाहेर संपूर्ण आशियात हिंदी बोलली जाते. ब्रह्मदेश, श्रीलंका, मलाया, इंडोनेशिया, मॉरिशस, दक्षिण-पूर्व आफ्रिका, गुयाना इ. देशात हिंदी बोलणारे लोक राहातात. जगातील लंडन, पॅरीस सारख्या ठिकाणच्या विद्यापीठांमध्ये हिंदी शिकवली जाते. इटलीत तर प्रेमचंदच्या साहित्याचा अनुवाद केला व रोम विद्यापीठात हिंदी भाषा शिकण्याची सोय केली. पूर्व जर्मनीतही मार्टीन ल्यूथर विद्यापीठात हिंदी शिकविली जाते. थोडक्यात म्हणजे परकीय राष्ट्रांमध्ये हिंदीचा प्रसार होतो तर मग आपल्या देशात देखील हिंदी भाषा सक्तीची करणे इष्ट ठरेल.

गुरु नानक सारख्या संताने देखील उपदेश हिंदी भाषेतूनच केलेला आहे. गुरू तेगबहाद्दरने आत्मबलीदानापूर्वी औरंगजेबाला जो उपदेश दिला, तोही हिंदीतच होता. शीखांचे दहावे गुरु गुरुगोविंदसिंग हे पाटण्यात जन्मले. त्यांचे शिक्षण हिंदीतच झाले.

प्राचीन - आर्वाचिन काळात साधू संत रामेश्वर श्रीलंकेपर्यंत पोहोचले होते. ते परस्पर संपर्काने इतरांची भाषा शिकत असत. अनेक अहिंदी प्रदेशातील संतांनी भाषेचे अध्ययन केले. उदा. महाराष्ट्रातील महानुभाव पंथाचे मुख्य प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी यांनी पंजाब - काबूलपर्यंत जाऊन तेथे आपल्या पंथाचे मठ स्थापन केले. श्रीचक्रधरही मराठी किंवा हिंदी माध्यमाचाच उपयोग करीत होते. त्यातूनच राष्ट्रीय एकात्मता साधण्याचा आणि वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता.

त्याचाच परिणाम म्हणून हिंदी भाषा स्वराज्याबरोबरच लोकाभिमुख होऊ लागली. ' विनोबाजी भावे ' म्हणाले होते की, 'पचास सालके बाद जब हिंदी पढने लगा तो मुझे भास हुआ की मै मराठीही पढ रहा हूँ ।' म्हणजेच 'हिंदी ' आणि महाराष्ट्राची स्थानिक भाषा ' मराठी ' यांच्यात अतिशय साम्य आहे. त्यामुळे त्यांच्यात वेगळेपण वाटण्याचे कारण नाही. आणि म्हणूनच आज राष्ट्र भाषा हिंदी महाराष्ट्रात सर्वत्र शिकविली जाते. राष्ट्रभाषेची वाढ किंवा प्रसार होण्यामुळे राष्ट्राची एकात्मता मजबूत होईल.

राष्ट्रभाषा वाढीवरील उपाय –

१) दक्षिण भारतातील लोकांच्या मनातील भीती काढून पंडित नेहरू व इंदिरा गांधी यांनी ज्याप्रमाणे त्रिभाषिक सुत्र वापरून हिंदीला मान्यता देण्यास

प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणेच आजही हिंदी भाषा सर्वमान्य होणेसाठी लोकांच्या मनातून हिंदीबद्दलची भीती दूर केली पाहिजे.

२) राष्ट्रीय नाटके, कीर्तने वगैरे मनोरंजनाच्या गोष्टी हिंदीत करणाऱ्यांना उत्तेजन द्यावे.

३) नागरिकांमध्ये हिंदीत व्याख्याने देण्याची योजना सुरू करावी.

४) हिंदी भाषेवरील प्रेम वाढावे म्हणून हायस्कूल पासून तर पदव्युत्तर शिक्षणापर्यंत बक्षिसे ठेवावी. हिंदी शिष्यवृत्ती द्यावी. तसेच या योजना फक्त अहिंदी प्रदेशातच लागू न करता संपूर्ण देशात लागू कराव्यात.

५) राष्ट्रीय पातळीवर व राज्यस्तरावर नियमितपणे निबंधस्पर्धा आयोजित करून बक्षिसांचे प्रमाण वाढवावे.

६) सिनेमाच्या माध्यमातून हिंदीचा प्रचार व प्रसार करण्यास प्रोत्साहन देणे.

७) हिंदीच्या शिक्षकांना नियमित प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे चालविणे आवश्यक आहे.

८) हिंदी भाषेत साहित्य निर्मितीसाठी उत्तेजन द्यावे.

९) राष्ट्रभाषा प्रचार विद्यालये स्थापन करावी.

१०) भारताचा संपूर्ण कारभार हिंदीत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

११) हिंदीतील साहित्यिकांना पुरस्कार द्यावेत.

१२) प्रांतिक भाषांच्या आधारे हिंदीचा प्रचार व प्रसार करणे.

१३) विद्यालये व महाविद्यालयांमध्ये इंग्रजी विषय सक्तीने शिकविला जातो. तर त्यात बदल करून इंग्रजी व हिंदी हे दोन्हीही विषय समसमान अभ्यासक्रम ठरवून सक्तीचे करावेत.

वरील मार्गांचा अवलंब केल्यास हिंदीचा प्रचार आणि प्रसार त्वरीत होण्यास मदत होईल. देशात 'हिंदी प्रचार सभा' स्थापन केलेल्या असून त्यांच्या मार्फत देशात हिंदी लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु या समित्यांनी फक्त कागदावर न राहता प्रत्यक्ष कार्यरत रहाणे आवश्यक आहे. तसेच हिंदी भाषेतील लेखकांनीही हिंदीच्या प्रचारासाठी भरीव कामगिरी करायला हवी.

संसदेची राजभाषा समिती मुंबईत सरकारी कामकाज हिंदीत कसे चालते. त्याचा प्रयोग पहाण्यासाठी आली होती. त्यांच्या असे निदर्शनास आले की,

हिंदीचे लेखकच कागदावर एकही ओळ हिंदीत लिहित नाहीत. हिंदीचे लेखक गोविंद मिश्र या इंग्रजी प्रेमी लेखकाला समितीने चांगलेच सुनावले. श्री. मिश्र हे उत्तर प्रदेशातील असूनही राष्ट्रभाषा हिंदीकडे दुर्लक्ष करतात. सध्या उत्तर प्रदेशात हिंदीचा विकास व्हायला हवा होता, तेवढा झाला नाही. परंतु दक्षिण भारतात मात्र हिंदीच्या विकासाचा वेग वाढत आहे.

१३) प्रभावी शिक्षणपद्धतीची गरज –

शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मता घडवून आणण्याच्या दृष्टीने एक समर्थ साधन आहे. शिक्षण ही समाजाने, समाजासाठी निर्माण केलेली आणि समाजानेच चालविलेली प्रक्रिया आहे. म्हणून ती समाजाभिमुखच असली पाहिजे. आजच्या प्रचलीत शिक्षणाने केवळ बाह्योपचार होतात. विद्यार्थ्यांच्या मनाला भिडण्याची क्षमता या उपचारांमध्ये नाही. अभ्यासक्रमाचे अध्ययन व अध्यापन होऊनही अभ्यासक्रमातील समाविष्ट असलेली उद्दिष्टये गाठली जात नाहीत. कारण शब्दांचे कृतीत संक्रमण होतच नाही. तसेच जीवन आणि तत्वे यामधील तफावत नष्ट करण्याचे सामर्थ्य प्रचलीत शिक्षणपद्धतीत नाही. भावनात्मक ऐक्य घडवून आणण्याच्या दृष्टीने आजची शिक्षणपद्धती कमी पडते. परिणामी तरुणांमध्ये प्रारंभीपासून आपल्या समाजाबद्दल व देशाविषयी प्रेम निर्माण होणे पूर्णपणे शक्य होत नाही. म्हणूनच प्रचलीत शिक्षणपद्धत बदलून प्रभावी अशी शिक्षणपद्धत अंमलात आणण्याची गरज आहे.

‘ स्वामी विवेकानंद ’ शिक्षणाविषयी म्हणाले होते की, “ शिक्षण म्हणजे जे जीवन सुसंघटित करते, जे माणूस घडविते, ते खरे शिक्षण होय. ” त्यामुळेच शिक्षण लोकाभिमुख करून निरक्षरता कमी केली तर निश्चितपणे राष्ट्राच्या एकात्मता वाढीस हातभार लागेल. म्हणून शैक्षणिक धोरणात खालील गोष्टींचा अंतर्भाव करण्यात यावा.

१) शिक्षणाचे सध्या असलेले सांस्कृतिक स्वरूप कमी करून तेथे उत्पादनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. भविष्यकाळात येणाऱ्या कृषी-औद्योगिक विकासासाठी असणारे ज्ञान व कृती कौशल्य जोपासण्यावर भर असावा.

२) शाळा व महाविद्यालये इतर सामाजिक संस्थांशी संबंध न ठेवता अलिप्तपणे व (एकांडे) शिलेदारासारखे काम करीत आहेत. त्यांचा हा अलिप्तपणा

संपुष्टात आणला पाहिजे. आणि शिक्षणाचा समाजातील सर्व सामाजिक संस्थांशी सर्वार्थाने जवळचा संबंध प्रस्थापित केला पाहिजे त्यासाठी –

अ) विद्यार्थ्यांना अर्धवेळ काम व अर्धवेळ शिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

ब) उद्योग-कारखाने इ. उत्पादन करणाऱ्या संस्थांकडून सक्तीने अर्थ-सहाय्य मिळवावे.

क) शिक्षणात पुस्तकी ज्ञानाला जे महत्व प्राप्त झालेले आहे, ते कमी करून त्याऐवजी अभ्यासूवृत्तीच्या कार्यक्रमांना अधिक वेळ द्यावा.

३) समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी प्रथम वेगवेगळ्या समाज गटातील व विभागातील शैक्षणिक विकासातील असमतोल दूर करण्यावर भर देणे.

४) 'भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास' हा विषय प्राथमिक शाळे-पासून ते महाविद्यालयीन पातळीवरील कला, विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, मेडीकल इ. सर्व विद्यांशाखांतील विद्यार्थ्यांना सक्तीचा विषय ठेवून तो प्रभावीपणे शिकविला जावा.

त्याप्रमाणे स्वातंत्र्य लढ्यात ज्या वीरांनी आपल्या संसाराचा, कुटुंबाचा त्याग करून मायभूमीसाठी प्राणार्पन केले. त्यांचा इतिहास अजूनही ग्रामीण जनतेला ठाऊक नाही. म्हणून या क्रांतिवीरांचा इतिहास ग्रामीण भागातील लोकांना सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक व महाविद्यालयीन प्राध्यापक यांच्यावर ग्रामीण भागात जाऊन 'क्रांतिकारकांचा इतिहास' या विषयावर सक्तीने व्याख्याने देण्याची जबाबदारी टाकावी, त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या मनात स्वदेशाभिमान, देशासाठी लढण्याची स्फूर्ती, क्रांतिकारकांच्या कार्यावर श्रद्धा निर्माण होऊन दुभांगत चाललेली राष्ट्राची एकात्मता त्यांना समजेल व त्यांच्या मदतीने राष्ट्रीय एकतेला बळकटी येईल.

५) एकात्मिक शैक्षणिक कार्यक्रम तयार करणे.

६) नागरिकांना त्यांचे हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देणारा अभ्यासक्रम हवा.

७) प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागातून सक्तीचे करावे, म्हणजे अज्ञान दूर होण्यास मदत होईल. कारण आज ग्रामीण भागात या प्राथमिक शिक्षणाची अवस्था अत्यंत वाईट आहे. बालकांचा सर्वांगिण विकास एक चतुर्थांश इतकाही होत नाही.

८) शिक्षक-पालक मेळावा वर्षातून एकदा घेण्याची सक्ती करावी. त्यामुळे शिक्षक व पालक यांच्यात देवाण-घेवाण होत राहील. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी पालक दूर करण्याचा प्रयत्न करतील.

९) सामाजिक विषमता नष्ट होईल या दृष्टीने नवीन अभ्यासक्रम राबविण्यात यावा. उदा. आंतरजातीय विवाह पद्धतीस उत्तेजन द्यावे. सर्व धर्मांच्या सणासंबंधी व उत्सवासंबंधी एकमेकांना शिक्षणाद्वारे माहिती द्यावी.

१०) कुटुंबनियोजनाचे महत्व सर्वसामान्यांना शिक्षणाद्वारे पटवून द्यावे.

११) सर्वधर्मसमभाव, निधर्मीपणा, लोकशाही या गोष्टी टिकविण्यास पोषक अभ्यासक्रम तयार करणे.

१२) लोकसंख्येला आळा घालण्यासाठी स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढविणे.

१३) ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षकांवर मुलांना शिकविण्याचा कार्यभाग सोडून इतर सरकारी कामे लादू नये. उदा. मतदार याद्या तयार करणे, कुटुंबनियोजनासाठी केसेस उपलब्ध करून देणे, जणगणना करणे इ. या अतिरिक्त कामाच्या बोजामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा होत आहे.

१४) प्रौढ शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम कार्यक्षमतेने राबवून साक्षरतेचे प्रमाण वाढविता येईल. पण आज प्रौढ शिक्षणावर लक्षावधी रुपये खर्चूनही ग्रामीण भागातील लोक साक्षर झालेले नाहीत. कारण बऱ्याच ठिकाणी प्रौढ शिक्षण योजनेत फक्त कागदावरच ही योजना राबविली जाते, असे दिसून आले आहे. निरक्षरांना साक्षर न करताच योजनेचा पैसा खर्ची पडतो. हा अनर्थ टाळणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रौढ शिक्षण योजना ज्या विभागाकडे असेल, त्या विभागातील अधिकाऱ्यांनी कार्यक्षमतेने या योजनेचा लोकांना फायदा होतो की नाही, हे पाहिले पाहिजे.

१५) ग्रामीण समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी खालील गोष्टींची आवश्यकता आहे.

अ) सार्वत्रिक साक्षरता.

ब) प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती.

क) ग्रामीण समाजाचे आधुनिकीकरण नवीन शैक्षणिक धोरणात वरील-प्रमाणे बदल केला तर निश्चितपणे शिक्षण हे लोकाभिमुख होईल आणि देशाची एकात्मताही बळकट होईल. तसेच शिक्षणाचे सार्वत्रीकरण झाल्यामुळे सामाजिक

समता प्रस्थापित होण्यास मदत होईल. त्यामुळे जातीय दंगलीही टळू शकतील आणि त्यातूनच एकात्मता साधली जाईल.

केन्द्र सरकारने नुकतेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. या नवीन-शैक्षणिक धोरणात ग्रामीण भागातील शिक्षणाचे दारिद्रय मान्य करून ते घालविण्यासाठी काही ठोस उपाय योजना सुचविल्या आहेत. पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी ग्रामीण भागातील शैक्षणिक समस्यांची दखल घ्यावी असे आवर्जून सांगितले होते. त्यामुळेच नवीन शैक्षणिक धोरण आखतांना ग्रामीण विद्यापीठांचा समावेश करण्यात आलेला आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर निश्चितपणे शिक्षणाचे सार्वत्रिकरण होईल व शिक्षणाचे सार्वत्रिकरण ही लोकशाही समाजाची गरज आहे. थोडक्यात म्हणजे वरील गोष्टींचा अंतर्भाव केल्यास नवीन शैक्षणिक धोरण अतिशय प्रभावी ठरून दुभांगत चाललेली राष्ट्रीय एकात्मता भक्कम होईल.

१४) प्रसार माध्यमे ग्रामीण भागापर्यंत पोहचविणे –

प्रसार माध्यमांची राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यात फार महत्वाची भूमिका असते. परंतु आज प्रसार माध्यमांचे कार्य फक्त शहरांपुरतेच मर्यादित आहे. ग्रामीण भागात एकही टेलीव्हिजन किंवा चित्रपटगृहे अस्तित्वात नाही. एवढेच काय पण खेड्यात वर्तमानपत्रही वाचण्यास मिळत नाही. तेव्हा प्रत्येक खेड्यातील ग्रामपंचायतीस शासनाने ‘ टेलीव्हिजन ’ विकत घेणेसाठी व वर्तमानपत्रे नियमित बोलविण्यासाठी अनुदान द्यावे. तरच या प्रसार माध्यमांकरवी ग्रामीण भागात एकात्मता वाढू शकेल.

१५) प्रादेशिक विषमता दूर करावी –

भारतासारख्या खंडप्राय देशात आर्थिक दुर्बलता व प्रादेशिक असमतोल या दोषांमुळे विघटनकारी शक्ती निर्माण होऊ शकतात. याचा प्रत्यय आल्यामुळे तरी त्वरित प्रादेशिक विषमता दूर करणेसाठी प्रयत्न व्हावेत. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या कार्यात आपण यशस्वी झालो असलो तरी देशात राष्ट्रवादी भावना निर्माण करण्यास अजून काही काळ जावा लागेल.

१६) केंद्र आणि राज्य संबंध पुनर्रचित करणे –

केंद्र आणि राज्य संबंधाचाही राष्ट्रीय एकात्मतेशी सरळ संबंध आहे.

कारण आमच्या देशात संघराज्य पद्धती आहे. तेव्हा केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध पुनर्रचित करण्याची मागणी अनेक वेळा झाली. सरकारने या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी 'सरकारीया आयोग' ही नेमला. परंतु या आयोगाने अद्याप अहवाल दिला नाही. अहवाल आल्यानंतर त्यावर राष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणावी. त्यामुळे देशातील नागरिकांत जागृती निर्माण होऊन राष्ट्रीय ऐक्य मजबूत होण्यास मदत होईल.

१७) खेड्यांच्या विकासाला अग्रक्रम देणे–

आज आपल्या देशात खेड्यांतून शहराकडे लोकांचा ओघ सुरु असल्याचे दिसते. परंतु आपल्या शेजारील चीन देशात मात्र असे खेड्यांतून शहराकडे जाणारे लोक आढळत नाही. कारण चीन सरकारने आपल्या योजनांमध्ये छोट्या छोट्या शहरांनाही योग्य ते महत्व देऊन त्यांचा पूर्ण विकास घडवून आणला आहे. आपल्याकडे नेमकी उलट परिस्थिती पहावयास मिळते. भारतात शहरी आणि ग्रामीण या एकमेकांपासून अतिशय भिन्न अशा संस्कृती आढळतात. या दोन संस्कृतीतील अंतर कमी करण्याच्या दिशेने जे प्रयत्न चालू आहेत ते अतिशय मंद गतीने होत असल्यामुळे पर्यायाने राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातही अडथळे येत आहेत. तेव्हा सरकारने शहरांप्रमाणेच खेड्यांचाही विकास जलद गतीने करावा. महात्मा गांधींच्या विचारांनुसार अगोदर खेड्यांचाच विकास होणे आवश्यक होते. परंतु आता उशिरा का होईना सरकारने ग्रामीण भागाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणजे खेडी व शहरे यांच्यातील अंतर कमी होऊन एकात्मता वाढीस मदत होईल.

१८) अज्ञानाविरुद्ध लढा देणे आवश्यक

एकमेकांबद्दल अज्ञान हाच राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वात सामर्थ्यवान शत्रू आहे. याबद्दल आता सर्वांची पक्की खात्री झाली. तेव्हा भारतीयतेची किंवा एकात्मतेची भावना दृढमूल करण्यासाठी हिंदूबद्दल मुस्लीमांना अधिक माहिती व्हावी, निरनिराळ्या राज्यातील व प्रदेशातील धार्मिक ज्ञातींची, आदिवाशींची परस्परांना ओळख व्हावी म्हणून आपण प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे. त्यासाठीं शाळेपासूनच ज्ञानप्रसाराची प्रक्रिया सुरु केली पाहिजे. संपर्कमाध्यमातून मनोरंजनात्मक आणि उद्बोधनाच्या स्वरुपाचे कार्यक्रम सातत्याने सादर करण्यात

आले पाहिजे. आकाशवाणी व दूरदर्शनावर कल्पकता वापरून कार्यक्रम करावेत. एका प्रदेशाला दुसऱ्या प्रदेशाबद्दलचे अज्ञान आणि देशातील नागरीकांबद्दलची माहिती नसल्यामुळे निर्माण झालेले अंतर लक्षात घेऊन भारताच्या अंगभूत एकात्मतेवर भर देणारे हे कार्यक्रम असले पाहिजेत.

१९) जनतेला बाह्य धोक्यांची जाणीव करून देणे–

जेव्हा बाह्य शक्तीपासून देशाला धोका निर्माण होतो किंवा देशावर बाह्य संकट येते, तेव्हा राष्ट्रीय एकात्मता सहज शक्य होते. त्यासाठी परकीय शक्तीच्या भारतात होणाऱ्या हस्तक्षेपाची देशातील कानाकोपऱ्यातील जनतेला जाणीव करून दिली पाहिजे. त्यासाठी सरकारने अतिशय दक्ष राहाणे आवश्यक आहे.

२०) नोकरशाहीत शिस्त व कर्तव्याची जाणीव निर्माण करणे–

भारतांतील राजकीय रचना ही लोकशाही पद्धतीची असल्यामुळे आणि सत्ता निरनिराळ्या शक्तींमध्ये विभागली गेल्यामुळे धंदेवाईक राजकारणी, शहरी उद्योगपती, श्रीमंत शेतकरी आणि इंग्रजांचा पगडा असलेली नोकरशाही यांचा भारतीय शासनावर 'नकारात्मक' परिणाम होतो. भ्रष्टाचार देखील मोठ्या प्रमाणावर आहे. भ्रष्टाचाराची पूर्वीप्रमाणे दखल घेतली जात नाही. तसेच सरकारी नोकरांतील शिस्त व कर्तव्याची जाणीव संपुष्टात आली आहे. तेव्हा देशाच्या एकात्मतेसाठी नोकरशाहीत शिस्त व कर्तव्याची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे एकता वाढीस हातभार लागेल आणि नोकरशाहीत प्रामाणिकपणा आला तर सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल.

२१) अल्पसंख्यांकात असुरक्षिततेची भावना बळावू देऊ नये –

सध्या देशातील अल्पसंख्यांकांमध्ये असुरक्षिततेची भावना बळावत चालली आहे. तेव्हा या भावनेस आळा घातला पाहिजे व बहुसंख्यांकांचा क्षोभही होऊ देता कामा नये. बहुसंख्यांकांना विश्वासात घेऊन अल्पसंख्यांकांचे संरक्षण करणे हिताचे ठरेल. अल्पसंख्यांक व बहुसंख्यांकांमध्ये सुसंवाद साधण्यासाठीं उपाय योजना करावी.

२२) लोकभावनांचा उद्रेक होणार नाही याची राजकीय पक्षांनी दक्षता घ्यावी

राजकीय पक्षांनी आपली धोरणे ठरवितांना किंवा भाषेच्या नांवावर लोक-

भावनांचा उद्रेक होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्व जाती धर्मातील पूर्वजांनी जबर किंमत मोजली आहे. म्हणूनच डोळ्यात तेल घालून त्याचे आपण रक्षण केले पाहिजे. प्रत्येक राजकीय पुढाऱ्याने प्रसंगाला सामोरे जाऊन जात-धर्म व पंथ यांच्या भिंती पाडून संकुचित प्रवृत्तींना मूठमाती दिली पाहिजे.

२३) अध्यात्मातून एकात्मता –

आपल्या देशात राष्ट्रीय ऐक्यवाढीस अध्यात्माची मदत होऊ शकेल. कारण या देशाला संतानी, विविध धार्मिक ग्रंथांनी शेकडो वर्षे बंधुभावाची शिकवण दिली आहे. उदा. संत नामदेव महाराज महाराष्ट्रातून पंजाबात जाऊन तेथे त्यांनी उपदेश केला. अजूनही त्यांच्या स्मृती तेथे वास करीत आहे. पंजाबात त्यांनी अढळ स्थान प्राप्त केले. त्याचप्रमाणे शीखांच्या गुरुनींही महाराष्ट्रात नांदेड येथे स्थान प्राप्त केले आहे. कोणताही धर्म देशाचे विघटन होण्यास मदत करीत नाही. परंतु धर्मांधतेमुळे धर्माच्या आड लपून विघटनाची बीजे रुजविण्याचा प्रयत्न चालू असुन तो सर्वांनी हाणून पाडणे आवश्यक आहे. त्यासाठी ऐक्याचा व बंधुभावाचा विचार आपण मनाशी बाळगला पाहिजे. कुराण, गीता, अवेस्ता बायबल, गुरुग्रंथसाहेब या सर्व धर्मग्रंथातील सद्विचार जर आपण लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला तर फार मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय एकतेच्या दृष्टीने त्याचा उपयोग करुन घेता येईल.

२४) समान नागरी कायदा लागू करण्यात यावा –

आज हिंदू समाजात एकच कायदा आहे, तरीही हिंदू समाजामध्ये एकता आलेली नाही. भाषा व जातीवरून वाद आहेत. त्यामुळे असा कायदा व एकात्मता यांचे समीकरण मांडले जाते ते संयुक्तीक वाटत नाही. तरी देखील समान नागरी कायद्याचा आग्रह का धरायचा याची कारणे वेगळी आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न केवळ भाई भाई म्हणून किंवा एकात्मतेचे गोडवे गाऊन किंवा ईदला मिठी मारून, दसऱ्याला सोने देऊन सुटेल इतका सोपा प्रश्न नाही. एकात्मतेचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे. आपल्या समाजात आर्थिक व सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर असून समाजात एकात्मता होणे कठीण आहे. एकात्मतेला असलेल्या विषमता या अडसरा बरोबरच अन्यायाचाही

अडथळा आहेच. काही घटकांवर जर आपण सातत्याने अन्याय करीत राहिलो तर तो समाज एकात्म होऊ शकत नाही. आज जे कायदे अस्तित्वात आहेत त्यांच्यामुळे अन्याय होतो, म्हणून या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी या कायद्यांचे परिवर्तन झाले पाहिजे, आधुनिकरण व्हावयास पाहिजे. असे आधुनिकरण झाले तर शेवटी आपण समान नागरी कायद्यापर्यंत पोहचू.

सध्या धर्मावर आधारीत जे कायदे आहेत ते कालबाह्य झालेले असून बदलणे आवश्यक आहे. तसेच प्रामुख्याने धर्म या संकल्पनेपासून कायद्याची फारकत करणे आवश्यक आहे. आजचे कायदे अन्यायी असून राज्यघटनेत सर्वधर्म निरपेक्षतेचे जे तत्व स्विकारले आहे. त्या तत्वाशी सुसंगत अशी कायद्याची आणि धर्माची फारकत होणे अत्यंत आवश्यक आहे. या कारणांमुळेच समान नागरी कायदा व्हावयास पाहिजे. भारतीय घटनेच्या ४४ व्या कलमात समान नागरी कायदा व्हावा असे नमूद केले आहे. कारण धर्म व शासन यांची फारकत होणे गरजेचे वाटत होते. व्यक्तीगत कायदे आजच्या मूल्यांशी सुसंगत होणे आवश्यक आहे. घटनेने प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु घटनेत कोठेही असे नमूद केले नाही की, व्यक्तीगत कायदा हा धर्मस्वातंत्र्याचा भाग आहे. व्यक्तीगत कायदा धर्मस्वातंत्र्याचा भाग असू शकत नाही. कारण जर सरकारने समाजाच्या कल्याणासाठी कायदा केला तर तो धर्मस्वातंत्र्याशी विसंगत आहे. असा आरोप कोणाला करता येणार नाही. अशी तरतूद राज्यघटनेत केलेली आहे. अशी स्पष्ट तरतूद असतांनाही लोक असे म्हणतात की आमचा व्यक्तीगत कायदा हा आमचा मूलभूत अधिकार आहे. ते पूर्णपणे दिशाभूल करत असतात हे स्पष्ट सांगितले पाहिजे. भारतात कोणत्याहीं घटकाला व्यक्तीगत कायदा मानण्याचा अधिकार नाही. सार्वभौम लोकसभा तो कायदा बदलू शकते.

समान नागरी कायदा याचा अर्थ धर्मावर आधारलेले कायदे पुन्हा तपासायचे आणि त्यांची जागा इहवादी कायद्यांनी घ्यायची. हे इहवादी कायदे न्यायावर आधारलेले असले पाहिजेत, व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आधारलेले असले पाहिजेत, परंतु दुर्दैवाने मुस्लीम पुढाऱ्यांनी घटना समितीच्या चर्चेनंतर समान नागरी कायद्याच्या तत्वाला विरोध केलेला होता. एवढेच नव्हे तर व्यक्तीगत कायदे हे मूलभूत अधिकार मानले जावेत असा आग्रही काही पुढाऱ्यांनी केलेला आहे. मुस्लीमांप्रमाणेच हिंदूनीही हिंदू कोड बिलाला विरोध केला होता. हिंदूच्या

बाबतीत विचार केला तर स्त्रीला अजिबात वाटा नव्हता तो मिळाला, घटस्फोट उपलब्ध झाला. पोटगी उपलब्ध झाली. परंतु मुस्लीम कायद्यात स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत कायदेमंडळाने कोणताही बदल केलेला नाही. याऊलट मुस्लीम पुरुषाला कुराणात चार बायका करण्याचा अधिकार आहे. मुस्लीम पुरुषाला एकतर्फी घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे. मुस्लीम स्त्रीला किमान पोटगीचाही हक्क दिलेला नाही. यामध्ये कायदेमंडळाने ज्या ज्या वेळेला बदल करण्याचा प्रयत्न केला. त्या त्या वेळेस मुस्लीम समाजाने, मुस्लीम पुढाऱ्यांनी पद्धतशीरपणे त्याला विरोध केला आहे. त्याचा परिणाम असा झाला की मुस्लीम समाजात पोटगी नसल्यामुळे वेश्या व्यवसायात मुस्लीम स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. अशी एक पहाणी नुकतीच झालेली आहे. हे घडणे साहजिकच आहे. कारण अडाणी स्त्रिया असतात, पुरुषाने तिला टाकून दिल्यानंतर तिच्यापुढे शरीर विक्रय करण्यावाचून दुसरे काहीच उरत नाही. म्हणूनच आज समान नागरी कायदा होणे उचित ठरेल. मुस्लीम स्त्रीच्या पोटगी प्रश्नाचा विचार करावयाचा झाल्यास शहाबानो प्रकरण सर्वांना ज्ञातच आहे. शहाबानोला तलाक दिला तेव्हा तिला पोटगी किती दिली होती ? तर सुरवातीला २६ रुपये आणि नंतर वाढवून १४३ रुपये केली. तिच्या पतीचे उत्पन्न मात्र वर्षाला साठ हजार रुपये आहे. याबाबत सुप्रीम कोर्टानेही मुस्लीम स्त्रीला पोटगी मिळाली पाहिजे असा निर्णय दिला होता. त्याच्याविरूद्ध मुसलमान नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर दंगा केला.

आज ख्रिश्चन समाजामध्येही घटस्फोटाची सोय नाही. घटस्फोट आहे पण तो कोणत्या कारणासाठी तर फक्त व्याभिचाराच्या कारणासाठी. बाईला जर घटस्फोट मागायचा असला तर पुरुष नुसता व्याभिचारी आहे असे म्हणून चालत नाही तर त्याने बहिणीशी, आईशी अशा नात्यात व्याभिचार केला असला तरच तिला घटस्फोट मिळतो. म्हणजे जवळ जवळ घटस्फोट नाहीच. त्यामुळे आज ख्रिश्चन समाजामध्ये सुद्धा फार मोठी मागणी आहे की आमचा कायदा बदला.

आपल्या समाजात अल्पसंख्यांक लोकांनीही दुर्दैवाने आपली निराळी आयडेंटीटी जपण्याची आवश्यकता मानलेली आहे. ही फार मोठी चूक आहे. तसेच हिंदुना दत्तकाचा कायदा आहे. तर इतर समाजाला दत्तकाचा कायदाच नाही. म्हणजे आज एखाद्या पारशी माणसाला जर दत्तक घ्यायचा झाला तर

अडथळा आहेच. काही घटकांवर जर आपण सातत्याने अन्याय करीत राहिलो तर तो समाज एकात्म होऊ शकत नाही. आज जे कायदे अस्तित्वात आहेत त्यांच्यामुळे अन्याय होतो, म्हणून या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी या कायद्यांचे परिवर्तन झाले पाहिजे, आधुनिकरण व्हावयास पाहिजे. असे आधुनिकरण झाले तर शेवटी आपण समान नागरी कायद्यापर्यंत पोहचू.

सध्या धर्मावर आधारीत जे कायदे आहेत ते कालबाह्य झालेले असून बदलणे आवश्यक आहे. तसेच प्रामुख्याने धर्म या संकल्पनेपासून कायद्याची फारकत करणे आवश्यक आहे. आजचे कायदे अन्यायी असून राज्यघटनेत सर्वधर्म निरपेक्षतेचे जे तत्व स्विकारले आहे. त्या तत्वाशी सुसंगत अशी कायद्याची आणि धर्माची फारकत होणे अत्यंत आवश्यक आहे. या कारणांमुळेच समान नागरी कायदा व्हावयास पाहिजे. भारतीय घटनेच्या ४४ व्या कलमात समान नागरी कायदा व्हावा असे नमूद केले आहे. कारण धर्म व शासन यांची फारकत होणे गरजेचे वाटत होते. व्यक्तीगत कायदे आजच्या मूल्यांशी सुसंगत होणे आवश्यक आहे. घटनेने प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु घटनेत कोठेही असे नमूद केले नाही की, व्यक्तीगत कायदा हा धर्मस्वातंत्र्याचा भाग आहे. व्यक्तीगत कायदा धर्मस्वातंत्र्याचा भाग असू शकत नाही. कारण जर सरकारने समाजाच्या कल्याणासाठी कायदा केला तर तो धर्मस्वातंत्र्याशी विसंगत आहे. असा आरोप कोणाला करता येणार नाही. अशी तरतूद राज्यघटनेत केलेली आहे. अशी स्पष्ट तरतूद असतांनाही लोक असे म्हणतात की आमचा व्यक्तीगत कायदा हा आमचा मूलभूत अधिकार आहे. ते पूर्णपणे दिशाभूल करत असतात हे स्पष्ट सांगितले पाहिजे. भारतात कोणत्याहीं घटकाला व्यक्तीगत कायदा मानण्याचा अधिकार नाही. सार्वभौम लोकसभा तो कायदा बदलू शकते.

समान नागरी कायदा याचा अर्थ धर्मावर आधारलेले कायदे पुन्हा तपासायचे आणि त्यांची जागा इहवादी कायद्यांनी घ्यायची. हे इहवादी कायदे न्यायावर आधारलेले असले पाहिजेत, व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आधारलेले असले पाहिजेत, परंतु दुर्दैवाने मुस्लीम पुढाऱ्यांनी घटना समितीच्या चर्चेनंतर समान नागरी कायद्याच्या तत्वाला विरोध केलेला होता. एवढेच नव्हे तर व्यक्तीगत कायदे हे मूलभूत अधिकार मानले जावेत असा आग्रही काही पुढाऱ्यांनी केलेला आहे. मुस्लीमांप्रमाणेच हिंदूनीही हिंदू कोड बिलाला विरोध केला होता. हिंदूच्या

बाबतीत विचार केला तर स्त्रीला अजिबात वाटा नव्हता तो मिळाला, घटस्फोट उपलब्ध झाला. पोटगी उपलब्ध झाली. परंतु मुस्लीम कायद्यात स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत कायदेमंडळाने कोणताही बदल केलेला नाही. याऊलट मुस्लीम पुरुषाला कुराणात चार बायका करण्याचा अधिकार आहे. मुस्लीम पुरुषाला एकतर्फी घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे. मुस्लीम स्त्रीला किमान पोटगीचाही हक्क दिलेला नाही. यामध्ये कायदेमंडळाने ज्या ज्या वेळेला बदल करण्याचा प्रयत्न केला. त्या त्या वेळेस मुस्लीम समाजाने, मुस्लीम पुढाऱ्यांनी पद्धतशीरपणे त्याला विरोध केला आहे. त्याचा परिणाम असा झाला की मुस्लीम समाजात पोटगी नसल्यामुळे वेश्या व्यवसायात मुस्लीम स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. अशी एक पहाणी नुकतीच झालेली आहे. हे घडणे साहजिकच आहे. कारण अडाणी स्त्रिया असतात, पुरुषाने तिला टाकून दिल्यानंतर तिच्यापुढे शरीर विक्रय करण्यावाचून दुसरे काहीच उरत नाही. म्हणूनच आज समान नागरी कायदा होणे उचित ठरेल. मुस्लीम स्त्रीच्या पोटगी प्रश्नाचा विचार करावयाचा झाल्यास शहाबानो प्रकरण सर्वांना ज्ञातच आहे. शहाबानोला तलाक दिला तेव्हा तिला पोटगी किती दिली होती? तर सुरवातीला २६ रुपये आणि नंतर वाढवून १४३ रुपये केली. तिच्या पतीचे उत्पन्न मात्र वर्षाला साठ हजार रुपये आहे. याबाबत सुप्रीम कोर्टानेही मुस्लीम स्त्रीला पोटगी मिळाली पाहिजे असा निर्णय दिला होता. त्याच्याविरूद्ध मुसलमान नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर दंगा केला.

आज ख्रिश्चन समाजामध्येही घटस्फोटाची सोय नाही. घटस्फोट आहे पण तो कोणत्या कारणासाठी तर फक्त व्याभिचाराच्या कारणासाठी. बाईला जर घटस्फोट मागायचा असला तर पुरुष नुसता व्याभिचारी आहे असे म्हणून चालत नाही तर त्याने बहिणीशी, आईशी अशा नात्यात व्याभिचार केला असला तरच तिला घटस्फोट मिळतो. म्हणजे जवळ जवळ घटस्फोट नाहीच. त्यामुळे आज ख्रिश्चन समाजामध्ये सुद्धा फार मोठी मागणी आहे की आमचा कायदा बदला.

आपल्या समाजात अल्पसंख्यांक लोकांनीही दुर्दैवाने आपली निराळी आयडेंटीटी जपण्याची आवश्यकता मानलेली आहे. ही फार मोठी चूक आहे. तसेच हिंदुना दत्तकाचा कायदा आहे. तर इतर समाजाला दत्तकाचा कायदाच नाही. म्हणजे आज एखाद्या पारशी माणसाला जर दत्तक घ्यायचा झाला तर

त्याला गार्डीयन अँड वॉर्डस ॲक्ट खाली स्वतःला गार्डीयन म्हणवून घ्यावे लागते. त्या मुलाला वारसा मिळेल याची खात्री नाही. म्हणून या सर्व समाजासाठी दत्तकाचा कायदा असायला पाहिजे. दत्तकाचा कायदा हा मानवी हक्कांचा (Human Rights) एक भाग आहे. हा कायदा करण्याचा पहिला प्रयत्न जनता सरकारने केला आणि मुस्लीमांनी त्याला विरोध केल्यानंतर जनता पक्षाने तो मागे घेतला. श्रीमती इंदिरा गांधीच्या काळातही दत्तकाचे विधेयक मांडले असता पारशी समाजाने त्यास विरोध केला आणि त्यामुळे तेव्हाही ते विधेयक मागे घेतले. म्हणजे ऐच्छिक कायद्याची ही शोकांतिका आहे. यासाठी सर्वांना समान कायदा करणेच इष्ट ठरेल. कारण प्रश्न हा परिवर्तनाचा आहे, प्रश्न हा प्रबोधनाचा आहे. या संबंध समाजातील प्रत्येक पुरोगामी गटाला उत्तेजन दिले पाहिजे, त्यांच्याकडून हे करुन घेतले पाहिजे.

समान नागरी कायदा करणे आवश्यक आहे. परंतु तत्पूर्वी सर्व कायद्यांमधील तरतूदी बघून, तौलनिक अभ्यास करुन, ज्या चांगल्या आहेत त्या सर्व एकत्र करुन अशातून समान नागरी कायदा करण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. समान नागरी कायद्यास मुस्लीमांप्रमाणेच हिंदुचाही विरोध होईल. उदा. बालविवाहावर बंदी घातलेली असून कोणी तसे केल्यास त्यांना शिक्षा ठेवलेली आहे. पण ती शिक्षा कधीच आमलात येत नाही. म्हणून खूप मोठ्या प्रमाणावर बालविवाह होतात. त्यासाठी बालविवाह पूर्णपणे रद्द ठरावा मुसलमान समाजात चुलत बहिणीशी लग्न होते. हिंदू समाजात मात्र तशी पद्धत नाही. सर्वांना हिंदू धर्माचे नियम लावायचे ठरवले तर मुस्लीम लोक चिडतील. किंवा चुलत बहिणीशी लग्न करायला परवानगी दिली तर हिंदू विरोध करतील. म्हणून समान नागरी कायद्यातही काही प्रमाणात विविधता ठेवावी लागेल.

प्रत्येक समाजात परिवर्तनाला विरोध करणाऱ्या शक्ती असतात. त्या सर्व शक्तींचा विरोध परिवर्तनाला होणार आहे. उदा. वारसा कायदा जर स्त्रीला समान हक्क देण्याचे ठरविले तर त्याला मोठ्या प्रमाणात विरोध होईल. स्त्रियांच्या आर्थिक हक्कांबद्दल जर कोणतेही पाऊल पुढे टाकले तर त्याला कडाडून विरोध होणार आहे. साधे मॅटर्निटी बेनिफिटस ॲक्ट घ्या. या कायद्यानुसार बाईला प्रसुतीची रजा द्यावी लागेल म्हणून बाईला नोकरीवर ठेवत नाहीत. त्यांच्यावर नैतिकता लादण्यासाठी मध्यंतरी टेलिफोन डायरेक्टरने असा एक फतवा काढला की प्रसुतीची रजा घेण्यासाठी बाईने आपल्या लग्नाचा दाखला

दिला पाहिजे. आता प्रसुतीच्या कायद्यात कोठेही असे म्हटले नाही की ती बाई विवाहित असली पाहिजे. प्रश्न फक्त मॅटर्निटी बेनिफिटचा आहे. ती बाई जर गरोदर असली तर तिला रजा मिळायलाच पाहिजे. समजा माणसाला हृदयरोग झाला तर तो रजा घेतो, तर आपण असे म्हणतो की त्याने भयंकर स्मोकिंग केले म्हणून त्याला हृदयरोग झाला, त्याला रजा देऊ नका ? म्हणजे त्याच्या नैतिक गोष्टीचा त्याच्या शारीरिक अवस्थेशी काहीच संबंध नसतो. तो हृदय-रोगाने आजारी असला तर त्याला आपण रजा देतो. तसे ही बाई गरोदर आहे आणि ती विवाहित नसतांना झालेली आहे. या नैतिक पार्श्वभूमीवर तिला प्रसुतीची रजा नाकारण्याचा अधिकार नाही. हा त्या स्त्रीचा मूलभूत हक्क आहे. बऱ्याच स्त्री संघटनांनी आरडाओरड केली. तेव्हा त्या अधिकाऱ्यांनी तो फतवा बदललेला आहे. म्हणून समान नागरी कायद्याला फक्त मुस्लीम लोक विरोध करतील असे काही नाही.

एका बाजूला समान नागरी कायदा हा सर्व लोकांच्या न्यायासाठी, स्वातंत्र्यासाठी व समतेसाठी व यातून होणाऱ्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. तर दुसऱ्या बाजूला यापुढील काळात शासनाने हा कायदा पास करण्यास विरोध करू नये. ज्यावेळेला आपण जास्त न्याय्य समाज व्यवस्था निर्माण करतो त्यावेळेला आपण एकात्मतेकडे जात असतो. एकात्मतेकडे जाण्यासाठी आपण समान नागरी कायदा करणे इष्ट ठरेल. अशी समाजव्यवस्था असल्याशिवाय समाज एकात्म होऊ शकत नाही.

२५) सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेची निर्मिती –

सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होण्यासाठी समजण्यापेक्षा अनुभवाला प्राधान्य दिले पाहिजे. सातत्याने वेगवेगळे अनुभव दिले गेले पाहिजेत. विद्यार्थ्यांपुढे समाजातील दुःखे, उणीवा, गरजा प्रत्यक्ष आणल्या गेल्या पाहिजेत. ती आव्हाने म्हणून त्यांच्यासमोर ठेवली पाहिजेत. त्यांच्यावर मात करण्याची जिद्द विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे. गौतम बुद्धाला समाजातील वेदनांचे दर्शन घडले तेव्हाच त्यास सामाजिक बांधिलकीची जाणीव झाली. केवळ ग्रंथाभ्यास करून ही जाणीव झालेली नव्हती.

गरीबीने पिडलेल्या लोकांच्या वस्त्यांना भेटी देणे, मागासवर्गीय वस्त्यांना भेटी देणे, भटके जीवन जगणाऱ्यांचे जीवन प्रत्यक्ष पहाणे, त्यांच्याशी संभाषण

करणे व त्यांच्या जीवनाचे स्वरुप समजावून घेणे. आदिवासींचे जीवन प्रत्यक्ष पहाणे रुग्णालयांना भेटी देऊन रुग्णांच्या अडचणी व दु:खे जाणून घेणे, परिसरातील गरीब मुलांच्या व्यथा जाणणे, अपंग, अनाथ यांच्याही व्यथा जाणणे इत्यादी उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या संवेदना जागृत करून त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेची निर्मिती करता येईल.

तसेच खडी फोडणारा मजूर, शेतात घाम गाळणारे शेतकरी, त्यांचे जाडे भरडे अन्न, त्यांची उघडी व अर्धपोटी मुले यांचेही विद्यार्थ्यांना दर्शन घडवून आपल्याला मिळणाऱ्या सुखसोयी यांना का मिळत नाहीत. याचा विचार करण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. म्हणजे यातून सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होईल.

शिक्षणातून सामाजिक बांधिलकी –

शिक्षण प्रक्रिया ही समाजाभिमुख असली पाहिजे. सामाजिक बांधिलकीची जाणीव तिच्यातून झाली पाहिजे. प्रचलीत अभ्यासक्रम व शैक्षणिक कार्यक्रम यांच्यामार्फत सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करता येणे शक्य आहे. मात्र त्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांची योग्य भूमिका तयार झाली पाहिजे. अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सतत सामाजिक बांधिलकीच्या संदर्भात झाली पाहिजे. परंतु फक्त माहिती पुरविणाऱ्या शिक्षणापेक्षा सुसंस्कार करणारे शिक्षण दिले पाहिजे.

अभ्यासक्रमात निर्धारीत केलेल्या विविध विषयातून सामाजिक बांधिलकीची प्रेरणा देणे शक्य आहे. विज्ञानामार्फत समाजाने आपल्यावर कोणते उपकार केले आहेत याचे विविध अनुभव व घटना विद्यार्थ्यांसमोर मांडून सामाजिक बांधिलकी त्यांच्या मनात खोलवर रूजवली पाहिजे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता राष्ट्रीय ऐक्यासाठी, देशाच्या अखंडतेसाठी, एकात्मतेसाठी आज संपूर्ण समाजाबद्दल किमान तरुणांमध्ये प्रेम, आस्था निर्माण होईल. त्यासाठी वरीलप्रमाणे तरूणांना समाजातील अरिष्टांची जाणीव करून दिली म्हणजे त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होईल. पर्यायाने भारताचे ऐक्यही मजबूत होण्यास मदत होईल.

२६) पंजाब समस्या अहिंसेने सोडवावी –

पंजाबात सध्या खलिस्तानच्या कल्पनेने पछाडलेल्या अतिरेकी शक्तीकडून परकियांच्या मदतीने सर्वसामान्य व निष्पाप लोकांची निर्घृण हत्या वेगाने होत आहे. वास्तविक पहाता पंजाबात पूर्वीपासून शीख व हिंदू यांच्यात मोठे सामंजस्य होते व आजही आहे. हिंदूंच्या मुली शीखांच्या घरात सुना म्हणून नांदत होत्या व आजही नांदताहेत. शीख व हिंदू यांच्यात इतके स्नेहाचे नाते असतांना देखील आज पंजाबात हिंदूंवर असुरक्षित राहाण्याची वेळ यावी ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. दिवसा-ढवळ्या बसमधून प्रवाशी खाली उतरवून त्यांच्यावर बंदुकीने गोळ्या झाडल्या जातात व सार्वजनिक स्वरुपाची हत्त्या केली जाते आणि तीही अहिंसेचे तत्वज्ञान संपूर्ण जगाला दिलेल्या महात्मा-गांधीजींच्या देशात! हे जे घडते आहे, ते बरोबर नाही. पंजाबातील ही कृत्ये देशाला विघटनाकडे नेणारे व देशाच्या एकात्मतेस ओहोटी लावणारे आहेत.

पंजाबमध्ये निर्माण झालेल्या अस्थिरतेवर व दहशतवादी कृत्यांवर तोडगा शोधावयाचा झाल्यास तो फक्त अहिंसेचाच आहे. अहिंसेच्या मार्गानेच पंजाब समस्या हाताळली पाहिजे तरच ती सुटू शकेल. ठोशास-ठोसा, जशास-तसे, बळीस-बळी, असे वागून चालणार नाही कारण त्यामुळे ही समस्या सुटण्याऐवजी गुंतागुंतीची बनत जाईल. त्यासाठी राजकारण, समाजकारण, धर्मकारण या क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी पंजाबमध्ये जाऊन रहावे. आणि तेथे जाऊन रहात असतांना भडकलेल्या अतिरेक्यांना अहिंसेच्या मार्गानेच त्यांच्या दुष्कृत्यांपासून परावृत्त करणे, हा उपयुक्त उपाय सांगता येईल. तसेच 'बाबा आमट्यां' सारख्या थोर समाजसुधारकांप्रमाणे 'भारत जोडो' यात्रा पंजाबात नेऊन अतिरेक्यांना हिंसेच्या विचारापासून दूर नेणे खासदार सुनिल दत्तने पंजाबात नेलेल्या शांती यात्रेप्रमाणे असंख्य 'शांती यात्रा' देशाच्या कानाकोपऱ्यातून पंजाबात नेणे आवश्यक वाटू लागले आहे.

बाबा आमटेंनी 'जोडो भारत' यात्रा सुरु केली, तेंव्हा लोक त्यांना म्हणत होते की, तुम्ही पंजाबात गेले तर अतिरेकी मारतील. त्यावेळी बाबा आमटेंनी उत्तर दिले की, 'मारले तरी चालेल' पण ही यात्रा पंजाबात नेणार! परंतु जेंव्हा बाबा आमटे प्रत्यक्षात पंजाबात गेल्यावर त्यांचे प्रचंड असे स्वागतच झाले. त्याचबरोबर आमटेंनी यात्रा सुरु केली तेंव्हा मरणाचीही तयारी ठेवली होती, हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील इतर राज्यातील सर्व पक्षांच्या,

नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी जर 'शांती यात्रा' काढून पंजाबात जाऊन अहिंसेच्या मार्गाने अतिरेक्यांशी सामना दिला तर निश्चितपणे त्यांची सध्या सुरु असलेली दुष्कृत्ये थांबतील. हा अतिशय धाडसाचा प्रयोग असून तोच पंजाबात शांतता व सुरक्षितता निर्माण करण्याचा एक सर्वसामान्य तोडगा आहे असे मला वाटते. असे केल्यास पंजाब समस्येमुळे देशाच्या एकात्मतेला लागलेले ग्रहण सुटेल आणि एकात्मता अत्यंत मजबूत होईल.

२७) शिक्षकांची अदलाबदल –

एका राज्यातील शिक्षकांनी दुसऱ्या राज्यातील शिक्षकांशी पत्रव्यवहार करून तेथे आपल्या सोयीनुसार जाऊन रहावे. शिक्षकांची अशा प्रकारे अदलाबदल केल्यास त्या त्या राज्यातील राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक व भौगोलिक परिस्थितीची सत्य स्थिती कळेल आणि राज्याच्या समाज-मनाची ओळख पटेल. एकात्मता निर्माण होण्यास खऱ्या अर्थाने कोणत्या अडचणी आहेत ते कळेल, व त्या दूर करायचा प्रयत्न करता येईल. हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर झाल्यास परस्परातील गैरसमज दूर होतील असे वाटते. शिक्षकांप्रमाणेच विद्यार्थ्यांचाही आदलाबदलीचा कार्यक्रम घडवून आणता येईल.

२८) सामाजिक समारंभ –

भारतीय संस्कृतीच्या अनेक थोर परंपरा आहेत, उदा. संक्रातीच्या वेळची 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला' ही प्रथा अतिशय चांगली आहे. तीळ-गूळ देताना त्यामागील भावना तर एकदम उदात्त आहे. काही कारणांनी कटुता निर्माण झाली असेल तर ती या सणाच्या निमित्ताने घालविता येते. हा या सणाचा थोर भाव. या सणाच्या प्रसंगी परिचितांप्रमाणेच अपरिचितांनाही भेटणे, ओळख करून घेणे, व त्यांच्या मनात स्नेहभाव निर्माण करणे अधिक मोलाचे ठरेल. एवढेच नव्हे तर या सणाच्या वेळी कोणाकडेही निमंत्रणाशिवाय जाता येते. त्यामुळे आपोआपच मन उदार बनते.

२९) भारतातील सर्व राज्यांची माहिती देणारे चित्रपट दाखविणे –

भारत सरकारतर्फे व राज्य सरकारतर्फे सध्या राज्यांची माहिती देणारे

अनेक चित्रपट प्रकाशित झाले आहेत. हे चित्रपट प्रकाशित झाले आहेत हे नर योग्य त्या कालावधीत नियोजनानुसार वारंवार दाखविले तर त्या त्या राज्याविषयी सखोल माहिती विद्यार्थ्यांना मिळते. आज भूगोलच्या पाठ्यपुस्तकां-मुळे फार तोकडी माहिती मिळते. सर्वंकश परिचय करून घेणेसाठी माहिती वजा चित्रपटच दाखविले गेले पाहिजेत.

मोठ्या शहरातील मुलांना थोड्याफार प्रमाणात त्या त्या राज्यांची तोंडओळख होते. पण खेड्यातील विद्यार्थ्यांना मात्र त्याचा गंधही नसतो. परंतु चित्रपट शहरापेक्षा खेड्यातून फार उपयुक्त ठरतात. खेड्यातील शेतकरी, मजुर, लुतेदार, यांना हे चित्रपट दाखवावेत. त्यामुळे त्यांना भारताचे विशाल चित्र दिसेल. अनेक निरक्षर बंधूंनाही संपूर्ण भारताचे ज्ञान होईल. आणि राष्ट्रीय एकात्मतेला नि:संशयपणे मदत होईल. भारतातील गरीब जनतेला भारताचा परिचय चित्रपटाद्वारेच अधिक होईल. अजूनही कोट्यावधी भारतीयांना हिमालयाचे दर्शन झाले नाही. तेव्हा त्यांना हिमालयाविषयी आत्मियता कशी वाटावी?

र्व-धर्म-प्रार्थना –

सर्व-धर्म-प्रार्थना घेतल्यास विद्यार्थ्यांवर व जनतेवर त्याचा फार चांगला रिणाम होतो. प्रार्थना आरंभीच्या अगोदर व नंतर कमीत कमी दोन तीन मिनिटे पूर्ण शांतता असावी.

०) एकात्मता परिषदा –

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ४० वर्षे लोटली पण देशाची स्थिती पाहून सामान्य णूसही समाधानाचा सुस्कारा सोडू शकत नाही. अनेक विचारवंतांना याचे ल्य बोचू लागले. त्यामुळे अनेकांना राष्ट्रीय एकात्मतेची गरज भासू लागली. गरजेमुळे काही सुज्ञ नागरिकांनी एकात्मता परिषदा स्थापिल्या. पण या कात्मता परिषदांची संख्या आपल्या विशाल भारताच्या व लोकसंख्येच्या मानाने ण्य आहेत. एकात्मता परिषदा हजारोंनी निर्माण व्हायला हव्यात. त्यांनी ष्ट्रीय एकतेचे कंकण हाती बांधून कार्यक्रम करणे गरजेचे आहे. परराष्ट्रीय रताच्या अनेक कार्यांत हस्तक्षेप करून उठाठेव करीत असतात, व भारतीय वन अशान्त करीत असतात. परराष्ट्रांचा हा डाव ओळखून एकात्म परिषदांनी नतेला वारंवार सावध करून सरकारला जागृत ठेवायला हवे.

समाज-शिक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी, अशा एकात्मता परिषदा भरविण्यासाठी मदत करू शकतील. उन्हाळ्याच्या सुट्टीत बराच काळ व्यर्थ जातो; अशा वेळी परिषदा योजून या विद्यार्थ्यांची मदत घेता येईल. त्यांनाही परिषद निर्मितीचा निर्भेळ आनंद मिळेल.

३१) एकात्मता वाढीसाठी शालेय प्रकल्प राबवावे –

राष्ट्रीय एकात्मता व भावनात्मक एकतेसाठी नवीन अभ्यासक्रमाची रुपरेषा निश्चित करणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रांतातील सण, उत्सव, व्रते, दागिणे, पोषाख, भांडी यांची एकमेकांना ओळख करून देणे आवश्यक आहे.

प्रकल्पाच्या अभ्यासासाठी खालील विषय निवडावेत.

१) प्रतिज्ञा

२) आमचे राज्य [भौगोलिक, ऐतिहासिक - संक्षिप्त परिचय]

३) आमचे सण व समारंभ [चालीरितींची यादी]

४) आमच्या राज्यातील वीर पुरुष
[वीरांच्या कथा - समाज क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर]

५) आमच्या राज्यातील संत व मंदिरे

६) आमच्या राज्यातील प्रेक्षणिय स्थळांची माहिती
[प्राचीन, आधुनिक, तीर्थक्षेत्रे]

७) आमचे साहित्यिक [प्राचीन, आधुनिक]

८) आमची उद्योग केंद्रे [कारखाने, विद्युतगृहे इ.]

९) आमची नृत्ये व इतर कला कौशल्य
[नृत्यप्रकार, भांड्यावरील कला, हस्तीदंत, लाकूड, कोरीव काम]

प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुलांना वरील विषयांनुरूप त्या त्या राज्यासंबंधी माहिती द्यावी. पण त्यात निर्मितीचा, प्रत्यक्ष काम करण्याचा, अर्थात कार्यानुभवाचा,भाग असावा; म्हणून प्रत्यक्ष कार्यासाठी खालील गोष्टी घ्याव्यात. या यादीतील गोष्टी एकच वेळी व एकाच व्यक्तीने न ठरविता, शिक्षक विद्यार्थी प्रतिनिधींच्या संयुक्त बैठका घेऊन त्यात वेळोवेळी विचार-विनिमय करावा. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

अ) पुणे व मुंबईतून त्या त्या प्रांतात जाण्यासाठी रेल्वेमार्ग दाखविणारा नकाशा.
ब) चित्रसंग्रह क) हस्तलिखित पत्रिका

ड) वार्तासंग्रह [बातम्या देणे, त्यांचा संग्रह करणे]
इ) प्रदर्शने [वर्षांच्या अखेर]
ई) भाषेसंबंधी प्राथमिक स्वरूपाची १९ वाक्ये.

प्रकल्प वही –

अभ्यासक्रम निश्चित केल्यावर मुलांना प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी ९ ते ६ तासांची योजना करावी. प्रारंभी शिक्षकाने मनोरंजक पद्धतीने गोष्टींच्या माध्यमातून तर कधी आकाशवाणीवर ऐकवल्या गेलेल्या बातम्यांच्या माध्यमातून प्रस्तावना करून या प्रकल्पाच्या पाठ्यक्रमाप्रमाणे मुलांना माहिती सांगावी. त्यानंतर सदरची माहिती मुलांना वहीत लिहून द्यावी. वहीत लिहिलेल्या माहितीच्या आधारावर सामान्य ज्ञानाची १०० गुणांची एक एक प्रश्नपत्रिका चारमाही, आठमाही व वार्षिक परिक्षांच्या वेळी दिली जावी. सदरच्या प्रश्नपत्रिकेत निम्मे प्रश्न उतरून दिलेली माहिती किंवा आकाशवाणीवर सांगितलेल्या बातम्यांवर आधारित असावेत.

आपल्या ठरविलेल्या राज्याची सांगोपांग माहिती मिळविण्यासाठी मुलांना प्रेरीत करण्याचा प्रयत्न वर्गशिक्षकाने करावा. या माहितीतूनच हस्तलिखित पत्रिकेचे विषय, प्रदर्शनाचे विषय निश्चित केले जावे.

वर्षभर प्रत्येक विद्यार्थ्याने आठवड्यातून एक तास या प्रकल्पाद्वारे राज्याची भौगोलिक ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक माहिती मिळवावी. विद्यार्थी पूर्णपणे राज्यमय होण्यासाठी हा प्रयत्न असला तरी त्या विद्यार्थ्यात राज्याभिमान निर्माण न होण्यासाठी त्यास रोज प्रतिज्ञा घेण्यास प्रवृत्त करावे. त्यासाठी खालील प्रकारची प्रतिज्ञा शिक्षकाने विद्यार्थ्यांस घेणेस सवय लावावी.

प्रतिज्ञा –

"जरी मी महाराष्ट्रीयन (किंवा इतर राज्याचा) असलो तरी सर्वप्रथम भारतीय आहे व सदैव भारतीय राहीन. कारण भारत माझा देश आहे. आणि महाराष्ट्र (किंवा इतर राज्य) त्याचा एक अविभाज्य घटक आहे."

रोज घेतल्या जाणाऱ्या या प्रतिज्ञेचा सखोल अर्थ सर्वांनी समजून घेतला पाहिजे. तुम्ही महाराष्ट्रीयन, बंगाली, पंजाबी आदि आहात. कारण

आपण त्या त्या राज्यात जन्म घेतला आहे. पण ही सर्व राज्ये भारताचे भाग आहेत. भारत आपला देश आहे. तेव्हा देशाभिमान सर्वप्रथम आणि राज्याभिमान असला तरी तो देशाभिमानापुढे गौण समजावा. देशासाठी प्रत्येक राज्याने समर्पण करण्यास सिद्ध असले पाहिजे. कारण कोणत्याही भयंकर अशा संकटात देशच टिकला नाही तर राज्य कसे टिकणार? आपण कोणत्याही कुलाचे असलो तरी भारत हे सर्वात मोठे कुल आहे, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. पंजाब, काश्मिर, राजस्थान, मद्रास इ. सर्व राज्ये भारताचे अविभाज्य घटक आहेत. आपल्या शरीराच्या अवयवाला शरीरापासून आपण अलग लेखू शकत नाही. अलग केले तर आपले शरीर सुंदर दिसेल का? ज्या त्या अवयवांचे स्वतंत्र महत्व आहे. परंतु त्याने जर शरीरापासून अलग व्हायचे ठरविले तर तो वेडेपणाच ठरेल. आपल्या शरीराप्रमाणेच आपल्या देशाचीही स्थिती आहे. भारतातील सर्व राज्ये प्राचीन काळापासून कला, संस्कृती. आचार-विचारांची देवाण-घेवाण यांच्यामुळे एक राज्य दुसऱ्याशी स्नेहरुपी दोरीने बांधली गेली आहे. परंतु आज मात्र व्यक्तीगत आणि राज्यगत स्वार्थामुळे ही बंधने सैल होत आहेत. ही बंधने पुन्हा घट्ट करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्नशील राहिले पाहिजे.

मूळता आपण भारतीय आहोत. भारतातल्या एका राज्यातले आहोत. उदा. एखाद्या केरळी विद्यार्थ्याचे केरळीपण कोणी हिरावून घेणार नाही. त्याला त्याच्या राज्याचा योग्य अभिमान असेल तर त्यात वाईट काहीच नाही; पण आपण भारतीय आहोत ही गोष्ट विसरता कामा नये. आपला भारत देश इतका संपन्न आहे की, प्रत्येक राज्य आपापल्या वैशिष्ठ्याने परिपूर्ण आहे. कोणी तुछ नाही, कुणी उच्च नाही, कुणी नीच नाही; कुणाला निसर्गाचे वरदान आहे, तर कुणाला अन्न-धान्याची समृद्धी आहे. असा प्रतिज्ञेचा नवीन अर्थ सांगता येईल.

या प्रतिज्ञेच्या माध्यमातून मी चालू वर्षी महाराष्ट्राचा रहिवाशी आहे, पुढील वर्षी पंजाबचा असेल, तेव्हा पंजाबची माहिती मिळविली तितक्याच आपुलकीने गुजरातची माहिती मिळवीन, असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करून शेवटी मी भारतीय आहे; या देशाशी, या भिन्न-वेशी, भिन्नभाषी भूमीशी माझी बांधिलकी आहे. हा थोर संस्कार प्रत्येक शिक्षकाने मग तो प्राथमिक शाळेतील किंवा माध्यमिक शाळेतील किंवा माध्यमिक विद्यालयातील

महाविद्यालयातील शिक्षक असो, त्याने आपापल्या विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे काम पुरे करावे.

एकात्मतेसाठी आज लाखो मिशनरींची गरज –

वृक्षाला किंवा लाकडाला लागलेल्या वाळवीमुळे वृक्ष किंवा लाकूड दिवसेंदिवस क्षीण होत जाते. ते एकदम नाश पावत नाही. परंतु त्याचा नाश होणार हे तितकेच सत्य असते. अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरामुळे निर्माण झालेले भयानक स्वरुप पाहून सर्व बाजूंनी मदत येऊ लागते व लोक कामाला लागतात. जसे वाळवी लागलेल्या वृक्षाचा नाश थांबवायला स्वतः वृक्षाचा मालकही धाऊन जात नाही. काही तरी उपाय केला पाहिजे असे तो म्हणतो, आणि विसरून जातो. पुन्हा कधी तरी वाळवी लागलेला वृक्ष दिसला की पुन्हा तो तसेच म्हणतो. परंतु झाड जर मोलातोलाचे असेल तर लाख कामे सोडून वाळवी - नाशाचे उपाय योजतो.

आपल्या भारताची हानी होण्याचे स्वरुप वर दिलेल्या वाळवी लागलेल्या वृक्षाच्या नाशासारखेच आहे. आज देशात अनेक वादांची व भांडणांची वाळवी देशाला पोखरून काढीत आहे हे देशातील जनतेला व नेत्यांना का कळत नाही? पण ही पोखरण्याची क्रिया संथ गतीने होत आहे. आपल्या देशाचा विस्तार अफाट असल्यामुळे वादांनी व अंतर्गत संघर्षांनी पोखरल्या जाणाऱ्या क्रियेचा परिणाम सामान्य जनतेला स्पष्टपणे दिसत नाही. जाणते व सूज्ञ लोक या वादांच्या वाळवीपासून परिणामांची भयानकता पाहून अस्वस्थ आहेत. हे सूज्ञ लोक या वाळवीपासून वाचविण्याचे प्रयत्न करीत आहेत, पण ते मूठभर आहे.

त्यामुळे राष्ट्रीय व भावनात्मकतेच्या बाण्याचे निष्ठावंत लाखो मिशनरींची आज देशाला गरज आहे. सर्वसामान्य जनतेला आपल्या देशातील या अनेक वादापासून अलिप्त ठेवले पाहिजे. जे वादात अडकले त्यांना वादातून बाहेर काढले पाहिजे. देशनिष्ठेच्या प्रचारातून त्यांना राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व पटवून दिले पाहिजे. समग्र देशाच्या विकासाचा, संपूर्ण देशाचा बलाढ्यतेचा जो नेता असेल तोच खरा नेता, हे समजण्याची सामान्य जनतेची पात्रता वाढली पाहिजे. लाल बहादूर शास्त्रींनी आपल्या परमोच्च कोटींच्या निःस्वार्थी नेतृत्वाने सामान्य जनतेच्या हृदयात केवळ दीड वर्षाच्या कारकिर्दीत अढळ स्थान मिळविलेच ना?

तेव्हा या मिशनऱ्यांनी हेच कार्य करायचे आहे. राष्ट्रीय एकतेचे कार्य

आज तरूण पिढीला पटणारे वाटते. त्यांनी आपल्या फावल्या वेळेत हे कार्य करून एकात्मतेची भावना वाढविणे शक्य आहे. काही ठिकाणी हे कार्य जोमाने चालू आहे. पण या विस्तारीत देशाच्या अवाढव्य पसाऱ्यात ते कार्य क्षीण वाटते. लाखो तरूणांनी या विधायक कार्यात उडी घेतली पाहिजे. तसेच राष्ट्रीय एकात्मता परिषदेने तरुणांना एकत्र येण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

प्रकरण नववे

एकात्मता वाढीतील महाराष्ट्राचा सहभाग

संपूर्ण भारताची संस्कृती एका विशिष्ट प्रकारची असली तरी प्रत्येक प्रांताची काहीतरी निराळी आहे. कारण त्याचा भूगोल व इतिहास आणि विशेषत: भाषा दुसऱ्या प्रांताहून निराळी असते. महाराष्ट्राची संस्कृती संपूर्ण भारतीय संस्कृतीप्रमाणेच सर्वसमावेशक आहे. महाराष्ट्रात पूर्वीपासूनच अनेक धर्म, जाती, उपजातींचे लोक एकदिलाने रहात आले आहे. सर्वांना एकत्र ठेवण्याची कुवत येथील संस्कृतीत आहे. म्हणूनच आज महाराष्ट्र राज्य भारताच्या एकात्मता वाढीसाठी होणाऱ्या प्रयत्नात अग्रेसर दिसते. समाजसुधारक बाबा आमटे, खा. सुनिल दत्त यांच्यासारख्या थोरांनी धगधगत्या पंजाब प्रांतात धोका पत्करून एकात्मता व अखंडता टिकविण्यासाठी प्रचंड जनसंख्येबरोबर शांतता प्रस्थापित होण्यासाठी पदयात्रा काढली. या पदयात्रेचा निश्चित परिणाम झाल्यावाचून राहिला नाही.

महाराष्ट्राला अनेक महान साधुसंतांचा वारसा लाभलेला आहे. तेराव्या शतकात या राज्याला महाराष्ट्र हे नामाभिधान झाले. कारण ज्ञानेश्वराच्या ग्रंथा-मुळे मराठी परिपक्व दशेस आली. त्यांनी आपल्या ग्रंथात आम्ही आमचा ग्रंथ महाराष्ट्र मंडळात रचला असे सांगितले. ज्ञानेश्वर म्हणतात –

ऐसे युगी वरी कळी। आणि महाराष्ट्र मंडळी
श्री गोदावरीच्या कुळी। दक्षिणिली

यावरून स्वतंत्र भाषेप्रमाणेच स्वतंत्र नावही राज्याला तेराव्या शतकाच्या शेवटी निश्चित झाले होते. मराठी अस्मितेचाही याच काळात उदय झाला असे म्हणावे लागेल. महाराष्ट्र हे नांव सर्वांत अगोदर महानुभाव पंथियांनी आपल्या ग्रंथात वापरले.

आपल्या प्रांताचे वैशिष्ट्ये काय आणि भारताचा एक घटक भाग म्हणून त्याने भारतासाठी काय केले, का तो आपल्यापुरताच पहात असतो हे

महाराष्ट्राच्या लोकांना नेहमीच जाणावेसे वाटते. भारतावर कोणत्याही स्वरुपाचे संकट आले तरी भारताचा घटक म्हणून महाराष्ट्र नेहमी मदतीसाठी सर्वात पुढे असतो. मग तो गुजरातचा दुष्काळ असो की, आंध्रचे वादळ असो, की आसाममधील महापूर असो. भारताची एकता मजबूत होण्यासाठी महाराष्ट्र राज्य सतत प्रयत्नशील आहे.

संतांची कामगिरी –

महाराष्ट्रातील अनेक संत-महंतांनी अप्रत्यक्षपणे एकतावाढीसाठीच आपले आयुष्य खर्ची घातले. या संतांचा एकात्मता वाढीचा मार्ग होता अध्यात्माचा. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, समर्थ रामदास, एकनाथ, नामदेव, चोखामेळा, रोहिदास, इ. संत होऊन गेले. त्यात संत तुकाराम महाराजांनी तर 'सर्वधर्म समभाव' ही कविताच लिहिलेली असून त्यांनी जातीयतेचा निषेध केलेला आहे. संतांनी समतेचा विचार महाराष्ट्रातील जनतेच्या मनात खोलवर रुजविला. जुन्या संत साहित्यातील ईश्वरभक्तीवर विचार जनतेपर्यंत पोहचले म्हणूनच केवळ या राज्यातील जनतेत समानतेचे तत्व रुजू शकले. संतांनी किर्तनाच्या माध्यमातून आपले विचार सर्वसामान्य माणसांपर्यंत नेऊन त्यांच्या मनात देशप्रेम निर्माण केले. उदा. आज पंढरपूरच्या विठ्ठलदर्शनासाठी लाखो लोक तेथे उभ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच कर्नाटक राज्यातून स्वतःचा कामधंदा सोडून आषाढी-कार्तिकी एकादशीला जमतात. ते केवळ पूर्वी संतांनी केलेल्या जागृकतेमुळेच होय. हे भारताच्या एकात्मतेचे प्रतिकच म्हणता येईल. संतांनी महाराष्ट्रातील लोकांना अध्यात्माची गोडी लावली. त्यामुळेच त्यातून एकता निर्माण झाली. पंढरपूरच्या वारीला येणाऱ्यांमध्ये वेगवेगळ्या जातीचे लोक असतात. त्यातून जातीयतेचे उच्चाटन होण्यासही मदत होते. संत एकनाथ यांनी जातीभेद नष्ट होणेसाठी अनंत त्रास सहन केला.

संत नामदेव महाराष्ट्रातून पंजाबात गेले व तेथील लोकांना त्यांनी उपदेश केला. पंजाबातील जनतेने नामदेवास योग्य मानसन्मान दिला. म्हणजेच नामदेवाने महाराष्ट्रापासून ते पंजाबापर्यंतच्या प्रवासात आपल्या कार्यातून एकता वाढीसाठीही प्रयत्न केले हे स्पष्ट होते. संत गाडगे महाराजांनी संपूर्ण महाराष्ट्रभर आपले मठांची स्थापना करुन आदिवाशी व मागासवर्गीयांची सेवा केली. प्रत्येक खेड्यात जाऊन समाजात समता व समाजवादाचे तत्वे रुजविण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळेच ग्रामीण भागात संत गाडगे महाराज गेले की सर्व गांवकरी त्वरीत एकत्र येत असत. म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून अप्रत्यक्षरित्या महाराष्ट्राच्या जनतेत एकीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

श्री चक्रधरस्वामी आणि राष्ट्रीय एकात्मता –

महानुभावपंथाचे मुख्य प्रवर्तक श्री चक्रधरस्वामींचा महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्याशी अत्यंत निकटचा संबंध होता. त्यांच्या उपदेशाचे अनेक परिणाम महाराष्ट्राच्या संस्कृतीवर झालेले आहेत. मूळचे गुजराथी असूनही महाराष्ट्र व मराठीवर त्यांचे प्रेम होते. ते अनवरत मराठी बोलायचे. लोकांना समजेल अशा भाषेतच त्यांनी धर्माचे ज्ञानदान केले.

महाराष्ट्री असावे चा उपदेश –

श्री चक्रधरस्वामी आपल्या शिष्यांना इतर प्रांतात न जाता 'महाराष्ट्री असावे' असा उपदेश करीत असत. महाराष्ट्र म्हणजे मर्यादित प्रदेश नव्हे हा शब्द स्थलवाचक तसा गुणवाचक आहे. संपूर्ण भारत देश जर तो एकसंघ व एकात्म राहिला, तर 'महा-राष्ट्र बनू शकतो याची ग्वाही जणू श्री चक्रधरांनी बाराव्या शतकात दिलेली आहे. 'धर्मसिद्धी जाये ते महाराष्ट्र' असे पुढे सांगून आपले कर्म, ज्ञान, भक्ती यांच्या सिद्धीसाठी धर्मासाठी हीच भूमी योग्य असल्याने या देशात अनेक धर्म व पंथ संप्रदाय रुजू शकले.

भारतमातेचे अखंड सौभाग्य रक्षण करण्याचे काम तिच्या पुत्रांचेच आहे. आपला देश खंडित होईल, असे कृत्य कोणीही मायेचा पूत करणार नाही. यासाठी श्री चक्रधर म्हणतात, "ऐसा कवण मायेचा पोटी उपजैल जो देशावरी खांडे काढौनि जाये" शत्रूपासून आपल्या देशाचे रक्षण करण्यांऐवजी आपल्या राष्ट्रावर व बांधवांवर स्वतःच खड्ग घेऊन उभे रहाणारे करंटेच मानावे लागतील. कोणतीही माता अशा पुत्रांना आपले पुत्र म्हणणार नाही. यासाठीच अनेक वीरांनी आत्मबलिदान करुन आपली राष्ट्रभक्ती व्यक्त केली.

फुटिरतेचा धिक्कार, प्रेमाचा स्विकार –

असेतुहिमाचल सर्वांना एका आचारविचाराच्या जाणीवेने एकसंघ-एकात्म असे होण्यास श्री चक्रधरांनी आवाहन केले.

'तुम्ही अच्युत गोत्रीय कीजे:'

अच्युत या शब्दाचा अर्थ आपल्या विचारापासून, कार्यापासून न ढळणारे, न मेदले जाणारे असा घेता येईल. आपणात आपापसात कोणी फूट पाडण्याचा प्रयत्न केला तर आपण अगदी 'अच्युत' गोत्रीय आहोत याचे भान ठेवले की ही फाटाफूट, व फुटीरता टळू शकते व मतभेद मिटू शकतात. पुढे चक्रधर म्हणतात 'तुम्हा परस्परे परम प्रीती हो आवी' आपण सर्वांनी परस्परांवर प्रेम केले पाहिजे. प्रेमामुळे सामाजिक, राष्ट्रीय जीवनातील अनेक तणाव कमी होऊ लागतील. वैर, मतभेद प्रेमाच्या वाटाघाटीने मिटू शकतील व राष्ट्रीय एकात्मता वाढू शकेल.

संघर्ष आणि प्रेम या संदर्भात चक्रधरांनी एक दृष्टांत कथन केला आहे. तो अतिशय समर्पक आहे. ते म्हणतात.

"एकी कोठाचे बैल भांडति झुंजति परी कुसीसि कुसी लाउनी बैसति."

या दृष्टांतावरुन राष्ट्रीय एकात्मतेच्या बाबतीत निश्चितच बोध घेता येईल. चक्रधरांनी अतिरेकी वागणुकीच्या शिष्यांचाही त्याग केला होता. तसेच ते अहिंसेचे महान पुरस्कर्ते होते.

सर्वज्ञ श्रीचक्रधरांनी आपल्या आचार विचारांमधून संपूर्ण आयुष्यभर जीवोद्धारणाचे जे कार्य केले. ते आजही तितकेच महत्वाचे आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या आजच्या निकडीच्या गरजेच्या काळात श्रीचक्रधरांचे जीवनचरित्र, त्यांचे आचार विचार भारताला मार्गदर्शक ठरतील याचा मला विश्वास वाटतो. थोडक्यात म्हणजे प्रारंभी संतांच्या कार्यांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात एकतेची भावना निर्माण झाली व त्यातूनच पुढे भारताची एकात्मता टिकविण्यासाठी महाराष्ट्राच्या जनतेत प्रेरणा शक्ती निर्माण झाली.

सतराव्या शतकात महाराष्ट्राचे स्फूर्तीस्थान छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनीही दिल्लीच्या तक्तावर झेप घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या प्रशासनात सर्व जाती धर्मांच्या लोकांना त्यानी संधी दिली होती. त्यांनी सर्व धर्म समभाव म्हणजेच निधर्मीपणाचा स्विकार केला होता. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत छत्रपती शिवाजी बद्दल व महाराष्ट्राबद्दल प्रेम निर्माण होऊन एकता मजबूत झाली, छत्रपती शिवाजी नंतर पेशवेंच्या राजवटीत पेशवा राघोबा दादाने तर आपल्या मराठी राज्याचा विस्तार थेट अटकेपर्यंत केला होता. त्यांच्या या

राज्यविस्तारामुळे राजकीय एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली असे म्हणावे लागेल. परंतु १८१८ त इंग्रजांनी पेशवाई नष्ट केली व इंग्रजी अंमल सुरु झाला. या इंग्रजी राजवटीतही महाराष्ट्रात अनेक राष्ट्रीय पुरुष जन्माला आले की ज्यांनी महाराष्ट्र व भारतात राष्ट्रीयत्वाचे रोपटे रूजविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

१९ व्या व २० व्या शतकाच्या प्रारंभी भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही अनेक समाजसुधारक जन्माला आले, की ज्यांनी जातियता व विषमता, रुढी परंपरा नष्ट करुन महाराष्ट्रातील जनतेत राष्ट्रीय भावना व एकी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, महर्षि शिंदे, आगरकर, कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, लोकहितवादी इ. समाजसेवकांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. महात्मा फुल्यांनी तर अस्पृश्यता नष्ट करून समतेचा पुरस्कार केला. महाराष्ट्रातील समाजात समता प्रस्थापित होण्यासाठी तसेच स्त्रीशिक्षणाच्या प्रसारासाठी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपले पूर्ण आयुष्य वेचले. या समाज सुधारकांचे कार्य सुरु असतांनाच इ. स. १८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली.

राष्ट्रीय कॉंग्रेस व महाराष्ट्र –

राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापनाही महाराष्ट्रातच होऊन पहिले अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईस भरले होते. या अधिवेशनात महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, न्या. रानडे, लोकमान्य टिळक, गोखले इ. नेते सहभागी झाले होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी जी कॉंग्रेस संघटना अहोरात्र झटली त्या संघटनेचे कार्य प्रारंभी महाराष्ट्राच्या नेत्यांच्या खांद्यावर होते. त्यामुळेच केवळ ही कॉंग्रेस संपूर्ण हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात पसरुन जनजागृती होऊन ब्रिटिशांच्या विरुद्ध एकीची भावना निर्माण झाली. आजपर्यंत एकसे दोन वर्षे कॉंग्रेसच्या इतिहासात महाराष्ट्र कधीही देशहितासाठी मागे राहिलेला नाही असेच दिसेल. लोकमान्य टिळकांनी तर राष्ट्रीय कॉंग्रेस संघटनेस अतिजहाल स्वरुप दिले व त्यामुळेच केवळ इंग्रजांनी हिंदुस्थानातून लवकर काढता पाय घेतला. त्यांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर उभ्या हिंदुस्थानातील तरुणांना कॉंग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आणून त्यांच्यावर जहाल विचारांचा प्रभाव पाडून इंग्रज सरकारविरुद्ध आवाज उठविला. सरकार स्वातंत्र्य

मिळेपर्यंत हिंदी जनतेचा आवाज दबवू शकले नाही. १५ आगष्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर १ मे १९६० रोजी मुंबई राज्याचे दोन विभाग होऊन महाराष्ट्र व दुसरे गुजरात राज्य यांची निर्मिती झाली.

स्वातंत्र्यलढ्यातही महाराष्ट्र इतर प्रदेशापेक्षा अग्रेसर होता. म्हणजे स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचा मोलाचा सहभाग असून त्यासाठी लोकमान्यटिळक, सावरकर, अनंत कान्हेरे, पिंगळे, असे अनेक ज्ञात अज्ञात देशभक्तांनी महाराष्ट्राच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. स्वातंत्र्य मिळाले तरी स्वातंत्र्योत्तर काळातही समाजवादी नेते श्री. एस. एम. जोशी व ना. ग. गोरे हे देखील देशाच्या एकात्मतेसाठी सतत झटत आहेत.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन आतापर्यंतच्या महाराष्ट्राच्या इतिहासात भारताच्या एकतेसाठी व एकात्मतेसाठीच प्रत्येक राज्यसरकारने प्रयत्न केलेले आहेत. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून कै. यशवंतराव चव्हाण यांनी १९६२ पर्यंत काम केले.

कै. यशवंतराव चव्हाण –

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे सहा वर्षे मुख्यमंत्री होते. त्या काळात त्यांनी नियमितपणे भारतावर आलेल्या संकट निवारण्यात महाराष्ट्र अग्रस्थानी ठेवला होता. त्यांनी लोकशाही व एकात्मतावाढीसाठी खालील चार कसोट्या सांगितल्या होत्या.

१) सर्वांना समान संधी - सर्वांना राज्यात व देशात प्रत्येक क्षेत्रात समान संधी दिली पाहिजे असे त्यांचे मत होते. खरे म्हणजे ही लोकशाहीची व्याख्याच मानली गेली होती. यामुळे एकतावाढीवर निश्चितपणे परिणाम होईल असे ते म्हणत असत.

२) उत्पादनाच्या पाठीमागची प्रेरणा ही वैयक्तिक नफेबाजीपेक्षा समाजाच्या सुखाची व राज्याच्या हिताची असली पाहिजे.

३) उत्पादनाच्या विभागणीचा प्रश्नही तितकाच महत्वाचा असून ही विभागणी होत असतांना लोकांच्या गरजा आणि त्यांच्या विकासाची शक्य-शक्यता यासंबंधीचा विचार ही तिसरी कसोटी होय.

४) जातीयता व धर्मांधतेचे उच्चाटन

अशारितीने कै. चव्हाणसाहेबांनी देशाची एकता आबाधित राहाण्यासाठी आपले विचार व्यक्त केलेले आहे पुढे ते म्हणतात, 'देशाच्या आर्थिक प्रगतीचे जे तत्व आपण स्विकारले आहे, त्या तत्वाचा आपल्याला त्याग करता येणार नाही. ज्या दिवशी आपण या तत्वाचा त्याग करु त्यादिवशी देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नांची धुळधाण होईल हे आपण नक्की समजा. माझ्या या सगळ्या म्हणण्याचा सारांश असा की, देशाची अंतर्गत नीती, परराष्ट्र नीती आणि संरक्षण नीती अलग अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणजे त्या देशाचे भवितव्य धोक्यात येते''

यशवंतराव चव्हाण यांनी वरील विचार मांडून देशाची एकात्मता धोक्यात येऊ नये म्हणून भारत सरकार व भारतीय जनता यांनी जागृत राहाण्यासाठी सुचना केलेली आहे. देशाची आर्थिक प्रगती सतत होत राहिली तरच देशाचे संरक्षण होऊ शकेल. असाही त्यांनी इशारा दिलेला आहे.

जातीयता आणि धर्मांधता याविषयी चव्हाण साहेब म्हणतात. "हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन येथे स्वतःचे अधिराज्य ब्रिटिशांनी निर्माण केले होते, त्यांनीच येथून जातांना एक विषारी विचार मागे सोडून दिला. हा विषारी विचार हिंदुस्थानच्या दृष्टीने शाप ठरला आणि या विषारी विचारातूनच पाकिस्तानचा जन्म झाला. तो विचार हा की येथील मुसलमान हा एक स्वतंत्र देश आहे. धर्म हा एक स्वतंत्र देश बनू शकतो, हा भयानक विचार जर हिंदुस्थानने स्विकारला तर हिंदुस्थानला हिंदुस्थान म्हणून राहाण्याची शक्यताच नाही.''

थोडक्यात म्हणजे अजून तरी जातीयता व धर्मांधतेचा भारतीय समाजाने त्याग केला पाहिजे, अन्यथा एकात्मतेला व अखंडतेलाही जातीयतेचे व धर्मांधतेची कीड लागून देश संकटात येईल असे त्यांचे मत होते. आज तीच परिस्थिती देशात निर्माण होत आहे. जातीयतेचा पगडा अजूनही निघत नाही. धर्मांधता वाढतच आहे. परिणामी भारतावर अनेक अंतर्गत व बहिर्गत संकटे येण्याची चिन्हे दिसत आहेत. म्हणूनच चव्हाणसाहेबांचे विचार प्रत्यक्षात आणून त्यानुसार जनतेने व सरकारने वागणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्रीपदावरुन कै. चव्हाण साहेबांना पंडित नेहरूंनी केंद्रातील मंत्रीपदाचा कार्यभाग सांभाळण्यासाठी दिल्लीत बोलविले. परंतु त्यांनीही अतिशय खंबीरपणे संरक्षण खाते, गृहखाते, परराष्ट्रीय खाते इ. खात्यांचे

प्रशासन कार्यक्षमतेने सांभाळले व महाराष्ट्राचा माणूस हा देशहितासाठी व देशाच्या संरक्षणासाठी सदैव तयार असल्याचे सिद्ध केले. महाराष्ट्रातील जनतेला त्यांनी दरक्षणी आधार दिला व नेत्यांना त्यांच्यापासूनच राजकारणाचा वारसा लाभला हे आपण विसरून चालणार नाही. देशाच्या संरक्षणाच्या बाबतीत चव्हाणसाहेबांकडे तडजोड नव्हती. 'पंडित नेहरूसारख्या हिमालयाच्या मदतीस महाराष्ट्राचा सह्याद्री धावून गेला होता.' असेच त्यांच्या कार्याचे वर्णन करावे लागेल.

मरणाच्या शेवटच्या क्षणापर्यंत महाराष्ट्र व देशाचाच ते विचार करीत होते. कै. चव्हाणसाहेब अतिशय उत्कृष्ट साहित्यिक व विचारवंत होते. त्यांचे मार्गदर्शन आजही आपणा सर्वांना उपयोगी पडत आहे. चव्हाण साहेबांच्या कर्तृत्वामुळेच महाराष्ट्राची जडण-घडण झाली. त्यांच्या प्रयत्नांनीच महाराष्ट्र भारतातील राज्यांमधील विकसीत राज्य म्हणून गणले गेले. म्हणून चव्हाण साहेबांच्या स्मृती समोर ठेऊनच महाराष्ट्रातील जनता देशरक्षणासाठी उभी आहे.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन महसूलमंत्री व नाशिक जिल्हा नव्हे महाराष्ट्राचे दुसरे नेते कै. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनीही आपल्या महाराष्ट्रात समानतेचे तत्व रूजविण्यासाठी प्रयत्न केले. उदा. महसूलमंत्री असतांना कुळकायदा करून तळागाळातल्या लोकांना त्यांनी न्याय मिळवून देऊन जमीनदारांना हादरा दिला. त्यामुळे विषमता नष्ट होण्यास मदत झाली. नाशिक जिल्ह्याचा कायापालट करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. सहकारी तत्वावर साखर कारखाने सुरु करण्यासाठी भाऊसाहेबांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वेळोवेळी प्रेरणा व सहकार्य दिले. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेत देशाविषयी व आपल्या राज्याविषयी प्रेम निर्माण होऊन एकता वाढीस लागली.

यशवंतराव चव्हाणांनतर १९६२ ते १९६३ या वर्षात श्री. मारोतराव कन्नमवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांच्यानंतर त्याची जागा मा. वसंतराव नाईक यांनी घेतली.

वसंतराव नाईक – (१९६३ ते १९७५)

वसंतराव नाईक हेच एकमेव असे मुख्यमंत्री होऊन गेले की जे सर्वाधिक-

काळ मुख्यमंत्रीपदावर राहिले. वसंतराव नाईक अल्पसंख्यांक जमातीचे असूनही महाराष्ट्रातील लोकांनी त्यांच्या कार्यावर प्रेम केले. म्हणजे महाराष्ट्रात देशाच्या इतर राज्याप्रमाणे जातीयतेचे व धर्मांधतेचे स्तोम नाही. जात व धर्म कोणताही असो फक्त सहकार्य करणे एवढेच महाराष्ट्रातील माणसाला समजते. वसंतराव नाईकांनी खेड्यातील शेतकऱ्यांपासून ते शहरातील उद्योगपतींबरोबर संबंध यशस्वीरित्या ठेवल्यानेच त्यांच्या काळात राज्यात शांतता नांदत होती व महाराष्ट्रातील जनता देशहितासाठी व देशाच्या संरक्षणासाठी सदैव कशाचाही त्याग करण्यास तयार होती. ते सर्वसमावेशक असे मुख्यमंत्री होऊन गेले.

मा. वसंतदादा पाटील –

मा. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे तीन वर्षे मुख्यमंत्री होते. दादा म्हणजे तळागाळातल्या आणि ग्रामीण भागातील लोकांचे नेते म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात त्यांनी इंग्रजांविरूद्ध चलेजाव चळवळीत भाग घेऊन स्वातंत्र्य मिळविण्यास हातभार लावला होता. त्यानंतर ते अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीसही होते. दादासाहेब एक कुशल संघटक असून त्यामुळेच त्यांच्याभोवती राज्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे मोहोळ नेहमीच जमलेले दिसते. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेत एकता निर्माण करून देशाच्या एकात्मता-वाढीसाठी नियमितपणे हातभार लावला.

मा. शरदराव पवार –

वसंतदादा पाटील यांचे नंतर १९ जुलै १९७८ रोजी मा. शरदराव पवार यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. त्यांनी आपल्या दोन वर्षांच्या कारकिर्दीत राज्यातील सर्वसामान्य जनतेला आपल्याकडे आकर्षून घेण्यासारखे कार्यक्रम राबविले आणि त्यामुळेच मा. श्री. शरदराव पवार लोकाभिमुख व्यक्तीमत्व बनले. महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासात एकूण पांच नेते लोकमान्य व जनताभिमुख होऊन गेले. यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आणि नंतरचे शरदराव पवार हे होत. या पांचपैकी आज शरदराव पवार हे देशाच्या एकतेसाठी व अखंडतेसाठी सतत प्रयत्नशील आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला देखील देशाच्या संरक्षणासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याचे आव्हान केले आहे. त्यांनी देशाची एकात्मता

अबाधित राहावी, देश अतिशय कठीण परिस्थितीतून वाटचाल करीत आहे म्हणून काँग्रेसशी ऐक्य घडवून आणले. आजही ते आपली जबाबदारी योग्यरितीने पार पाडीत आहेत. काँग्रेसमध्ये एकी घडवून आणण्यासाठी त्यांनी औरंगाबाद येथे काँग्रेस एकता मेळावा भरविला. हा मेळावा राष्ट्रीय स्वरुपाचा असून त्यात देशाची एकात्मता टिकविण्याची शपथ घेण्यात आली. त्यानुसार भारताच्या राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी पवार साहेबांचे सतत काही ना काही प्रयत्न चालूच आहेत यात शंका नाही.

काँग्रेस एकता मेळावा (डिसेंबर १९८६) –

डिसेंबर १९८६ मध्ये श्री. शरदराव पवार यांनी औरंगाबाद येथे घेतलेला काँग्रेस एकता मेळावा हा ऐतिहासिक मेळावा ठरला. या मेळाव्यास काँग्रेसचे अध्यक्ष व देशाचे पंतप्रधान श्री. राजीव गांधीही हजर होते. काँग्रेसच्या इतिहासात या मेळाव्याची नोंद सुवर्णाक्षरांनी झाली. शरदराव पवारांनी महाराष्ट्रातील जनतेला हाक देताच या मेळाव्यास महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून सात ते आठ लाख काँग्रेसप्रेमी लोक जमा झाले होते. या सात लाख लोकांपुढे दिलेल्या एकतेच्या संदेशात शरदराव पवार म्हणाले होते की, "देशातील अंतर्गत कलह शिगेस पोहचले असून ते मिटविण्यासाठी आणि देशाची एकात्मता टिकविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन झटले पाहिजे. मग तो राजकारणी असो की सामान्य माणूस असो." मुळात हा एकता मेळावाच राष्ट्राच्या अखंडत्वासाठी व एकात्मता वाढीसाठी भरविण्यात आला होता. या मेळाव्यात पंतप्रधान राजीव गांधीनींही महाराष्ट्राच्या जनतेला भारताची एकात्मता वाढीसाठी झटण्याचे आवाहन केले.

या मेळाव्यात जातीयता नष्ट करून आपण आपल्या राष्ट्राची एकात्मता बळकट केली पाहिजे असे विचार मांडणारे जम्मू-काश्मिरचे मुख्यमंत्री मा. श्री. फारूक अब्दुल्ला म्हणाले की, "पाकिस्तान आणि त्याला शस्त्र पुरवठा करणाऱ्या अमेरिकेला नेस्तनाबूत करून टाकू एवढी ताकद आमच्याजवळ आहे. तुम्ही रक्तासाठी इस्पितळात जाताना ? मग तेथे पहाता काय की रक्त कुणाचं आहे, हिंदुचं की मुसलमानाचं ? सर्वांचे रक्त एकच असते. माणूस एकच आहे. तेव्हा एकदिलाने व बंधूभावाने आपल्या देशात वावरले पाहिजे व राष्ट्रीय एकात्मता भक्कम करणे आवश्यक आहे."

मा. फारूक अब्दुल्ला यांनी हिंदु-मुस्लीम, हिंदु-शीख यांनी संघर्ष न करता शांततेत राहावे व एकता बळकट करावी असेही आवाहन केले. मा. फारूक अब्दुल्ला पुढे म्हणाले की, " पाकिस्तानला आम्ही तीन वेळा पराभूत केले. चौथ्यांदा आला तर तुम्हाला नष्ट करून टाकू " असा इशाराही त्यांनी जातीय ऐक्याबाबत बोलतांना दिला.

शेतकरी दिंडी –

शरदरावांनी देशाच्या एकात्मतेसाठी जणू मोहिमच हाती घेतली आहे. कारण हा मेळावा भरविण्यापूर्वी शरदरावांनी जळगांव ते नागपूरपर्यंत शेतकरी दिंडीही काढली होती. या दिंडीत २० ते २९ हजार शेतकरी सामील झाले होते. शेतकरी दिंडी म्हणजे जणू एकात्मतेचेच प्रतिक म्हणता येईल. यशवंतराव चव्हाण, राजाराम बापू पाटील, गणपतराव देशमुख, एन. डी. पाटील हे देखील दिंडीत सामील झाले होते.

'दिंडी' या सांस्कृतिक शब्दानेच महाराष्ट्रातल्या खेड्यातल्या शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नावर योग्य वेळी कवेत घेतलं व त्यांच्यात एकता निर्माण झाली. शरदराव पवार काळजाला हात घालतात म्हणण्यापेक्षा ते प्रश्नांच्या पोटालाच हात घालतात. त्यामुळेच त्यांनी हाक दिल्याबरोबर लाखो लोक एकत्र आले व त्यांना एकतेचा संदेश दिला.

नुकतेच पुणे येथे काँग्रेसचे शिबीरही त्यांनी आयोजित करुन पंतप्रधान श्री. राजीव गांधींना तेथे मार्गदर्शनासाठी बोलविले होते. तेथेही लक्षावधी लोक एकत्र जमले होते. हे देखील एकात्मतेचेच प्रतिक म्हणावे लागेल.

"प्रत्येक ढगाला रुपेरी कडा" असे म्हटले आहे आणि म्हणूनच सध्या देश संकटात असतांना शरद पवार यांची दूरदृष्टी, पुरोगामी वैचारिक बैठक यांच्या-योगे ते गुंतागुंतीच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीला निश्चित दिशा देतील. त्यादृष्टीने त्यांची पाऊलेही पडत आहेत. ते जे जे कृत्य करतात ते भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला पुरकच असते कारण जुलैमध्ये नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनींचा प्रश्न समजावून घेणेसाठी शरदराव पवार तेथे गेले, तर साठ ते सत्तर हजार लोक त्यांच्या भेटीस आलेले होते. तेव्हा त्यांनी लोकांना "हिंसेच्या मार्गाने प्रश्न सुटत नसतात तर त्यासाठी शांततेचाच मार्ग अवलंबिणे आवश्यक असते" असे मार्गदर्शन केले. तेव्हा सर्व शेतकरी तीव्र

आंदोलन करण्यापासून परावृत्त झाले व त्यांच्या मनात शरदरावांनी देशाच्या एकात्मतेची भावनाही खोलवर रूजवली. महात्मा गांधीच्या राजकीय तत्वज्ञानाचा स्विकार करुन त्याचा ते आजपर्यंत प्रसार करीत आले. त्याचा परिणाम देशाची एकात्मता वाढीवर झाला.

देश संकटात असल्यामुळेच शरदरावांनी दोन्ही काँग्रेसचे विलिनिकरण घडवून आणून राष्ट्रीय एकात्मतावाढीसाठी एकसंघ असा राष्ट्रीय काँग्रेस पक्ष उभा करण्यास पंतप्रधान श्री. राजीव गांधींना साथ दिली. या एकता अधिवेशनात मा. शरदराव म्हणाले.

"देशावर अंतर्गत अथवा बाह्य संकट आले तर काँग्रेसजन सरकारच्या मदतीला धाऊन जातो. आमच्या या परंपरेला अनुसरुन आजच्या परिस्थितीत पंतप्रधान श्री राजीव गांधी यांच्या सहकार्याच्या हाकेला आम्ही प्रतिसाद दिला. आणि सहाय्याचा हात पुढे केला, तर त्यात गैर काही नाही. देशावरील संकट टाळणे, देश वाचविणे व देशाची राष्ट्रीय एकात्मता आबाधित राखणे हे आम्ही आमचे आद्य कर्तव्य मानतो."

थोडक्यात म्हणजे भारताची राष्ट्रीय एकात्मता आबाधित राहावी व एकतेत वाढ व्हावी हा दृष्टीकोन समोर ठेऊनच त्यांनी आपला पक्ष महाराष्ट्राच्या आठ लाख जनतेच्या साक्षीने राजीव गांधीच्या काँग्रेसमध्ये विलीन केला.

मा. बॅरिस्टर अंतुले –

बॅरिस्टर अब्दुल रहेमान अंतुले यांनीही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना जनतेचे लक्ष राष्ट्राच्या एकात्मतेकडे वेधून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी किंवा जेथील नागरीकाने स्वातंत्र्यलढ्यात आत्मबलिदान केलेले आहे. अशा ठिकाणी 'हुतात्मा स्मारक' महाराष्ट्रात सर्वत्र उभारले. तसेच गावोगाव एकात्मता चौक असे नव्याने नावे देऊन जनतेत एकात्मतेची भावना रूजविली.

शिवाजीराव निलंगेकर यांच्या काळात २८ डिसेंबर १९८५ रोजी राष्ट्रीय काँग्रेस शताब्दी सोहळा पार पडला. त्यात लाखो लोक देशाच्या कानाकोपऱ्यातून या सोहळ्यास हजर राहिले. हे एका प्रकारे एकात्मतेचेच प्रतिक होते.

मा. शंकरराव चव्हाण –

सध्या महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी

भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी अनेक उपक्रम हाती घेतले असून अनेक शिबीरात एकात्मतेविषयी त्यांनी मार्गदर्शनही केले. महाराष्ट्र शासनाची एकात्मताविषयीची भूमिकाही चव्हाणांनी स्पष्ट केली आहे. "एकात्मतेच्या प्रश्नाच्या मुळाशी ज्या गोष्टी असतील त्या शक्यतो हळूवारपणे हाताळल्या पाहिजेत. म्हणजे लोकांच्या मनामध्ये मूलभूत प्रश्नासंबंधी कसलीही गल्लत रहात नाही. जातीय विखार पसरवण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर त्याच्याशी कठोरपणाने वागले पाहिजे. फक्त हातामधे दंडुका घेऊन कुणाच्या मागे लागून हा प्रश्न सुटेल यावर माझा विश्वास नाही."

त्यानंतर अध्यात्माचा एकात्मतेला फार मोठया प्रमाणावर उपयोग होऊ शकतो असेही त्यांनी सांगितले. तसेच धर्मांधता, जातीयता, यांच्याऐवजी ऐक्याची व बंधुभावाची भावना जनमाणसात आज रूजविली पाहिजे. धर्माचं, अध्यात्माचं खरं वैशिष्ठये लोकांपर्यंत पोहचवण्याचा जर आपण प्रयत्न केला तर फार मोठया प्रमाणात राष्ट्रीय एकतेच्या दृष्टीने त्याचा आपल्याला उपयोग होईल. असे त्यांनी स्पष्ट विचार मांडले. अध्यात्माविषयी बोलतांना ते म्हणाले, "अध्यात्मिक गोष्टींचा निश्चित राष्ट्रीय एकात्मतेला फार मोठया प्रमाणावर उपयोग होऊ शकतो. अध्यात्मावर ज्या लोकांचा विश्वास आहे. ती माणसे कधीही जातीचा विचार करू शकत नाही. आमच्या संस्कृतीचं एक मोठं वैशिष्ठय हे सांगितलं जातं की, बाहेरून जितक्या शक्ती आल्या त्यांना आपण सामावून घेतलं. त्यांच्यातलं जेवढं चांगलं होतं तेवढं आत्मसात केलं."

महाराष्ट्र शासनाने एकात्मतावाढीसाठी अनेक योजना हाती घेतल्या आहेत. १) धर्माचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी म्हणून एक विद्यापीठ म्हणजे ज्ञानेश्वर विद्यापीठाच्या स्थापनेचे नियोजन. २) संस्था पातळीवर व व्यक्तीगतरित्या एकात्मता वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्यांना बक्षिसे देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या वतीने एकात्मतावाढीसाठी शंकरराव चव्हाण सतत प्रयत्नशील आहेत. परंतु ते गृहमंत्री असतांना त्यांच्याच काळात ऑपरेशन ब्लूस्टार ही घटना घडली. त्यांनी भारताच्या एकात्मतेवर व अखंडतेवर संकट आलेले पाहूनच सुवर्ण मंदिरात सैन्य घुसविण्याच्या निर्णयास अनुकुलता दाखविली होती. पंजाब प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. आसाम प्रश्नही सुटावा म्हणून क्रियाशील राहिले. थोडक्यात म्हणजे एकात्मता आबाधित राहाण्यासाठी व एकतावाढीसाठी महाराष्ट्राच्या वतीने ते नियमित क्रियाशील आहेत.

राज्याची प्रसारमाध्यमेही एकात्मतेस पोषक असे वातावरण निर्माण करीत आहेत.

महाराष्ट्राच्या जनतेने नेहमीच राष्ट्रीय एकात्मतेवर पूर्ण विश्वास ठेवलेला आहे. त्यांनी कधीही या जातीय भावनेला, विघटन शक्तींना थारा, आधार दिलेला नाही. हीच भूमिका सरकार व जनतेने ठेवली पाहिजे. आणि सर्वांची पूर्ण शक्ती शेवटी देशाच्या उत्कर्षासाठी, एकात्मतेसाठी खर्च केली पाहिजे. महाराष्ट्रात फार मोठया प्रमाणावर याच विचारांची माणसं आहेत. तेव्हा चुकीच्या मार्गाने जाणाऱ्यांना योग्य मार्गावर आणणे देखील सर्वांचे कर्तव्यच ठरते. महाराष्ट्रातील लोक महात्मा गांधींसारखे अहिंसा व सत्य यांना मानणारे आहेत. पंडित नेहरूंप्रमाणे शांततेचे पुरस्कर्तेही आहेत. आणि इंदिराजी गांधीजींप्रमाणे मनाने खंबीरही आहेत. तेव्हा एकात्मतेवर व अखंडतेवर कधीही अंतर्गत अगर बहिर्गत संकट आले तर पहिल्यांदा महाराष्ट्रातील लोक ते संकट निवारण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास पुढे राहातील यात शंका नाही.

"मी राष्ट्रासाठी कोणताही त्याग करण्यास, देशाची एकात्मता अबाधित राखण्यासाठी बलिदान करायला तयार आहे." ही भूमिका आजही महाराष्ट्रातील नागरिकांची आहे. कारण जर भारत देशाची एकता टिकली तरच महाराष्ट्र हे नांव शिल्लक राहील अन्यथा नाही. याची प्रत्येकाला जाणीव आहे. म्हणूनच भारताची राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी नेहमी महाराष्ट्र अग्रभागी असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात इतर राज्यांच्या मानाने सहिष्णुता अधिक आहे. तसेच महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी एकात्मता वाढीच्या दृष्टीने घेतलेली भूमिकाही उल्लेखनिय आहे. सर्वसामान्य ग्रामीण माणसापर्यंत एकात्मतेसंबंधी विचार आज राज्य व जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रे पोहचविण्याचे कार्य करीत आहेत. महाराष्ट्रात सर्व जाती धर्माचे लोक आहेत. मुंबईत येणारी प्रत्येक गाडी झोपडपट्टीत भर घालते. तरीही सर्व परक्या राज्यातील लोकांना महाराष्ट्रातील लोकांनी आपल्यात सामावून घेऊन भारतातील इतर राज्यांना आदर्श घालून दिला.

"भारत हा माझा देश आहे आणि त्यासाठी मी माझे प्राणही वेचीन." अशी महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाची भावना बनलेली असून देशातील सर्व राज्यातील नागरिकांचीही अशीच भावना असणे आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षता, समाजवाद, व एकता आणि लोकशाही या तत्त्वांचा सर्वांनीच स्विकार करावा. त्यातून निश्चितपणे देशाची एकता वाढेल व देशावरील संकट टळेल.

प्रकरण १७ वे

उपसंहार

"भारत हाच तुमचा देव व तुमच्या देशबांधवांची सेवा हीच तुमची देवपूजा होय."

- स्वामी विवेकानंद

प्राचीन काळापासून भारतात सांस्कृतिक एकता आढळते. भारतीय संस्कृतीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समन्वयाची प्रवृत्ती होय. त्यामुळेच विविधतेतून एकता कशी निर्माण करावी, ही भारताने जगाला दिलेली देणगीच आहे. विविधतेने जीवनाला जसे सौंदर्य येते, तसेच एकतेत जीवनाचे सामर्थ्य प्रतीत होते. कारण ऐक्य हेच आपल्या जीवनाचे अधिष्ठाण आहे. भेदातून अभेद पाहण्याची, विविधतेतून एकता अनुभवण्याची भारतीय संस्कृतीची प्राचीन काळापासून चालत आलेली समन्वयदृष्टी आज आपल्या देशाला विशेष तारक ठरण्यासारखी आहे. जीवनाचे सत्य स्वरुप तत्वत: एकच असले तरी त्याचा बाह्य आविष्कार नानाविध स्वरुपात होत असतो; म्हणून विविधतेमुळे विद्वेश निर्माण होण्याची गरज नाही. याऊलट विविधतेतील सौंदर्य अनुभवण्याची शक्ती माणसांनी वाढविली पाहिजे. स्पर्धेऐवजी सहकार, द्वेषाऐवजी प्रेमच जीवनाचे अधिष्ठान बनणे आवश्यक आहे. रविंद्रनाथ टागोर यांच्या मते, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक जीवनातही वरिल दृष्टी स्विकारल्याशिवाय मानवी जीवन विकसित होणार नाही. एकात्मता हा मानवी जीवनाचा गाभा आहे. व भारतीय संस्कृतीचा मूलाधार आहे"

आज आपल्या देशात फुटीरतेची प्रवृत्ती वाढत आहे. जाती-जातीत, समाजातील विविध गटात वैमनस्य निर्माण झाले आहे. प्रांतीयता, जातीयता संकुचित धर्मनिष्ठा, यांचे दुष्परिणाम सर्वत्र आज पाहवयास मिळत आहेत. राष्ट्रविघातक कृत्यांना उत आला आहे. यातून आपले राष्ट्र बलवान आणि

ऐश्वर्यसंपन्न होणार नाही. या सर्व वादांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केल्यास असे दिसते की, हे सर्व वाद मानवनिर्मित असून मानवाच्या अहंकारातून किंवा संकुचित वृत्तीतून निर्माण झालेले आहेत. गेल्या काही वर्षातील आपल्या देशातील घटनांचा अभ्यास केला तर राजकीय व सामाजिक क्षेत्रात राष्ट्रीय ऐक्याला बाधा आणण्याच्या विघटनकारी शक्तींनी डोके वर काढल्याचे दिसून येईल. यासाठी 'एक हृदय हो भारत जननी'

हा विचार प्रत्येकाने आत्मसात करायला हवा. "भारत देश विशाल असून त्याचे हृदय एक आहे" असे प्रत्येक राज्याने मानणे आवश्यक आहे. याबाबतीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. पायाला ठेच लागली की, जसे हृदय हेलावते, तसेच तामिळनाडूत वादळ झाले तर महाराष्ट्र हेलावतो. गुजरात, राज्यस्थान, कर्नाटक इ. कोणत्याही राज्यात दुष्काळ पडला किंवा कोणतेही संकट आले तर महाराष्ट्राला त्रास होतो. म्हणजेच महाराष्ट्राने आतापर्यंत स्वतःला इतर घटकराज्यापेक्षा कधीही वेगळे मानल नाही. इतर राज्यानी प्रामुख्याने पंजाब व आसाम यांनी महाराष्ट्राचा आदर्श समोर ठेवावा. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता बळकट होईल व बाह्य संकटाला एकमुखाने खंबीरतेने यशस्वी तोंड देता येईल.

भारतात सांस्कृतिक एकता होती. पण राजकीय एकता मात्र नव्हती. ब्रिटिश भारतात आल्यावर त्यांनीच एकतेचे बीज पेरले, ते राजकीय स्वरूपाचे होते. त्यांच्या सुधारणांमुळे भारतीय समाजात एकी निर्माण होण्यास मदत झाली. पण एकी निर्मिती बरोबरच बेकीचे बीज पेरुन ते मायदेशी निघून गेले. त्याचा भोग आजही आपल्याला भोगावा लागत आहे. इंग्रजांनी पेरलेल्या बेकीचे निर्मूलन करण्यात अजूनही आपण पूर्णपणे यशस्वी ठरलो नाही. त्यामुळे आज लोकांत असा एक भ्रम निर्माण झाला आहे की, आता यापुढे राष्ट्रीयत्वाच्या, राष्ट्रप्रेमाच्या भावनेचा शेवट होणार. परंतु हा भ्रमच आहे, कारण कोणताही आणीबाणीचा प्रसंग उद्भवला तर देशात पुन्हा खोलवर रूजलेल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचाच उदय उत्तरोत्तर झाल्याशिवाय राहाणार नाही. त्यावेळी राष्ट्रीय भावना सर्वात अधिक प्रभावी ठरेल.

भारतमातेच्या असंख्य थोर सुपुत्रांच्या असीम त्याग, बलिदान, देशाभिमान, देशप्रेम यामुळे बलाढ्य विदेशी शासनाच्या विळख्यातून भारतमातेची मुक्तता झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात देशातील युवाशक्तीमध्ये देशाभिमानाची, समाज

जागृतीची, राष्ट्रीय ऐक्याची भावना जागृत झाली होती, वृद्धींगत झाली होती. तीचा आजच्या युवापिढीत अभावच दिसतो. ही बाब चिंतनीय व संवेदनाशील मनाला व्यथित करणारी आहे. या युवाशक्तीचा विधायक कार्यासाठी उपयोग करून आपणास २१ व्या शतकाकडे वाटचाल करायची आहे.

आपल्या देशाने स्वातंत्र्योत्तर काळात अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली असतांना, तसेच २१ व्या शतकाकडे आपण गतीने वाटचाल करीत असतांना देशात घडत असणाऱ्या घटनांनी मन सुन्न होते. दंगली, घातपाताचे प्रकार, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी यांनी समाजाचे व देशाचे नुकसान होते हे समजत असूनही त्या गोष्टी वारंवार घडतात. त्यामुळे देशाची एकता भंग पावते. या गोष्टींना आळा घालण्यासाठी सरकार खंबीरतेने कारवाई करीत असले तरी जनतेच्या सहकार्याशिवाय ही गोष्ट अशक्य वाटते. म्हणून राष्ट्रीय एकात्मतेच्या साध्यासाठी प्रथम या देशातील माणूस साधला पाहिजे. जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, वगैरेंची अहंता सोडून सर्वांना समान लेखण्याची वृत्ती वाढीस लागली पाहिजे. भेदभावांना तिलांजली दिली पाहिजे. फुटीरतेचा धिकार झाला पाहिजे. अतिरेकी हिंसाचाराची संगत सोडली पाहिजे. देशात निर्भयतेचे वातावरण निर्माण झाले पाहिजे. सर्वांनी परस्परांवर परमप्रिती केली पाहिजे. परधर्मसहिष्णुवृत्ती जोपासली जाणे आवश्यक आहे. सत्य, अहिंसा या चिरंतन तत्वांचा अवलंब प्रत्येकाने केला पाहिजे. तरच भारतीय समाजाच्या मनातील एकमेकांबद्दल असलेला संशय दूर होऊन राष्ट्रीय एकात्मतेला पोषक वातावरण निर्माण होईल.

देशाच्या एकात्मतेसाठी महात्मा गांधी जीवनभर झटले व शेवटी त्यासाठीच बळी गेले. तसेच इंदिरा गांधींनीही देशाची अखंडता टिकविण्यासाठी अतिरेक्यांच्या बंदुकीच्या गोळ्या आपल्या छातीवर झेलून बलीदान दिले. तेव्हा एकता टिकविण्याच्या दृष्टीने आज या एकतेसाठी बळी गेलेल्या नेत्यांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनतेने आपल्या देशाच्या पूर्वेतिहासाची ओळख ठेवली पाहिजे. पूर्वेतिहासात ' भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास ' तर तीव्रतेने आठवणीत ठेवणे आवश्यक आहे की, जेणेकरून देशप्रेमात देशभक्तीत भर पडेल व एकात्मता साधण्यास मदत होईल. स्वातंत्र्यासाठी बलीदान केलेल्या क्रांतिकारकांचा व आंदोलनातील नेत्यांचा इतिहास ग्रामीण भागातील जनतेला सांगणे आवश्यक आहे. कारण त्यांना अजूनही

भगतसिंग, राजगुरु, पिंगळे, फडके, कान्हेरे इ. क्रांतिकारांपैकी एकाचेही नांव माहित नसल्याचे माझ्या निदर्शनास आले. या देशभक्तांचा इतिहास सामान्य माणसापर्यंत पोहचविला तर निश्चितपणे एकात्मता साधेल.

आज देशाच्या एकात्मतेला अडथळे येऊ लागल्यामुळे देशाच्या पंतप्रधाना-पासून तो अगदी गांवच्या सरपंचापर्यंत प्रत्येकजण राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करण्याचे प्रतिपादन करीत आहे. परंतु प्रत्यक्षात कृती मात्र अद्यापही शून्य दिसते. तेव्हा सर्वांनी प्रत्यक्षात कृती करून त्या दिशेने पाऊल टाकले पाहिजे. तरच एकतेला निर्माण झालेले धोके कमी होतील.

भारत सरकारने प्रारंभापासूनच निधर्मीवादाचा स्विकार केलेला असल्या-मुळे आपले सर्वसामान्य धोरण असे आहे की, जातीयवादाला विरोध आणि निधर्मीपणाला पाठिंबा. त्यासाठी खरी कशाची गरज असेल तर ती म्हणजे भारतीय संदर्भात जातीयवाद आणि निधर्मीपणा यांची शास्त्रशुद्ध व्याख्या करून आपल्या देशात राबविता येतील अशा परिपूर्ण मार्गदर्शक तत्वांची ! निधर्मी व सर्व धर्मसमभावाचे धोरण असले तरी सध्या आपल्या समाजात जाती-व्यवस्थेची मुळे खोलवर रूजलेली असून अल्प संख्यांकांचा जातीयवाद आणि बहुसंख्यांकांचा जातीयवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हिंदू-मुसलमान आणि शीख यांच्या परस्पर संबंधाच्या संदर्भात पाहिले तर सामुदायिक स्वरूपात भडकवलेला द्वेष आणि हिंसा असे या जातीयवादाचे स्वरूप असून राजकीय सत्ता मिळविण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी तो भडकविण्यात आला आहे. तेव्हा हा जातीयवाद समूळ नष्ट करण्यासाठी सामु-दायिकरित्या प्रयत्न केले पाहिजे. म्हणजे भारताची निधर्मी लोकशाही बळकट होईल. देशात धर्माची अधिसत्ता वाढू न देण्यासाठीच निधर्मी प्रजासत्ताकाची निर्मिती करण्यात आली आहे, याचे भान प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे.

धार्मिकतेची तीव्रता कमी करण्यासाठी मुस्लीमांना हिंदूंचा सांस्कृतिक वारसा, रामायण, महाभारत यासारखी महाकाव्ये, तत्वज्ञान आणि हिंदू रिति-रिवाज व श्रद्धा याबद्दल माहिती द्यावी. तसेच हिंदूंना इस्लामची मूलतत्वे, शांतता व बंधूभाव, त्याग आणि क्लेश यावर इस्लामने दिलेला भर, याची माहिती करून द्यावी. या देवाण घेवाणीमुळे संघर्ष टळेल व सामाजिक एकात्मता वाढेल. तसा पंडित नेहरूंनी आपल्याला धर्मनिरपेक्षतेचा वारसा दिला आहे. नेहरूंना विविधतेतून एकता ही भारताची प्रतिमा अतिशय प्रिय होती.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काही दिवसांनी भारतीय समाजाला अलग करणाऱ्या घटना आपल्या आवती भोवती घडत आल्या आहेत व घडत आहेत. पंजाब समस्या हे त्यातील सर्वात मोठे आवाहन आहे. पंजाबात घडणाऱ्या घटना या धर्मांधतेचेच फळ आहे. धर्माच्या नांवाखाली लोकांचे प्राण घेतले जात आहेत. अतिरेक्यांना पाकिस्तानचे प्रोत्साहन मिळत आहे. पंजाबप्रमाणेच इतर प्रांतातही धर्मांधतेचे पडसाद उमटलेले दिसतात. इशान्य भारतही अस्वस्त आहे. आसामतही असंतोष आहे. तेव्हा धार्मिक शक्तींचा विजय म्हणजे निधर्मी भारतीय प्रजासत्ताकाच्या अस्तित्वालाच धोका, हे सर्वांनी जाणले पाहिजे. याकरिता भारतीय राजकारण्यांनी धर्मांधतेवर आधारीत असे राजकारण करणे थांबवावे, मग सत्ता नाही मिळाली तरी चालेल ! तरच एकता वाढू शकेल. वास्तविक सर्व धर्मांनी सत्याचा संदेश दिलेला आहे. सत्य हे दृष्य नाही, म्हणूनच सर्वधर्म मूलत: एकच आहेत असे मला वाटते. याबाबतीत ' विनोबा भावे ' म्हणतात. की, " धर्माच्या नांवावर फेकलेला दगड माणुसकीला लागतो, रक्त माणसाचे नाही माणुसकीचे पडते व खूनही माणुसकीचाच होतो. "

भारताच्या भवितव्याला धोका निर्माण करणाऱ्या शक्तींचा मुकाबला करण्यासाठी सर्वांना एकत्र आणण्याचा मार्ग आपण शोधला पाहिजे. हा प्रयत्न केवळ सरकारी पातळीवर होता कामा नये, तर एका व्यापक स्तरावर होऊन राजकीय पक्षांबरोबरच, विद्यार्थी, लेखक, सामान्य नागरिक, शिक्षण तज्ञ, कलाकार, विविध सेवाभावी संघटना यांना सहभागी करून घेतले पाहिजे. आपल्या सामाजिक व राजकीय अस्तित्वाचा धागा नष्ट करू पाहणाऱ्या अनिष्ट शक्तींचा रस्त्यावर, खेड्यांमध्ये व शहरात मुकाबला करण्यासाठी एक भरीव राष्ट्रीय कार्यक्रम तयार करण्याच्या दिशेने त्वरित पाऊल टाकावे.

आपल्या देशापुढे ज्या समस्या आहेत. त्या अनेक धर्म, भाषा, व वांशिक गट नसलेल्या इतर देशांपुढेही आहेतच. तेव्हा भारतीयांनी इतके हतबल होण्याचे काहीच कारण नाही. अमेरिकेत गौरवर्णीय अँग्लोसॅक्सन, प्रोटेस्टंटस हा तेथील समाजकारणात व राजकारणात नेहमीच सत्ता गाजविणारा गट राहिला आहे. उत्तर आयर्लंडमध्ये रोमन कॅथॉलिक व प्रोटेस्टंट यांना गुण्यागोविंदाने नांदण्याचे अजून शिकायचे आहे. भारतापेक्षा शेजारील पाकिस्तानात तर मोठ्या प्रमाणावर फुटीरता दिसून येते. तेथे एक धर्म, पंथ, वंश असतानाही स्वकीयांमध्ये आपापसात दंगली झाल्या व होत आहेत. त्यामुळे

आपल्यापुढे असलेल्या समस्या आपण सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करून सहजपणे सोडवू.

राजकीय पक्षांनी लोकभावनांचा उद्रेक होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. स्वातंत्र्यासाठी आपण जर किंमत दिली आहे. तेव्हा डोळ्यात तेल घालून त्याचे रक्षण केले पाहिजे. प्रत्येक राजकीय पुढाऱ्याने प्रसंगाला सामोरे जाऊन जात, धर्म, वंश, प्रांत यांच्या भिंती पाडून संकुचित फुटीर प्रवृत्तींना मूठमाती दिली पाहिजे. शांततेच्या मार्गाने परस्परांबद्दल आदराची भावना जागृत ठेवून राष्ट्रीय एकात्मतेद्वारा भारत बलशाली बनविण्यासाठी आपण सर्वांनी कार्य केले पाहिजे. त्यात तरुणांना सहभागीही करून घ्यावे.

पंडित नेहरूंनी एकदा म्हटले होते की, 'नवभारताची उभारणी करतांना सर्वप्रथम गरज आहे ती देशाची एकजूट राखण्याची—फक्त भौगोलिक एकसंघपणा नव्हे तर जनतेची वैचारिक व भावनिक एकजूट.'

पंडित नेहरू, ज्यांनी भारत घडवला अशा या नेत्याचे अखंड भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी संपूर्ण भारतीय समाजाने प्रयत्न करून एकात्मता सबळ व भक्कम करावी.

समाजवाद नसेल तर त्या देशात लोकशाही नांदू शकत नाही. म्हणून आपल्या देशातील लोकशाही टिकविण्यासाठी सर्वसामान्य जनतेला देशाच्या कार्यक्रमात खऱ्या अर्थाने सहभागी व्हावे लागेल. लोकशाही व जनतेचा सहभाग याचा अर्थ कोणाच्याही मनात भीती किंवा संशय असता कामा नये. त्यामुळे सर्व जाती धर्माच्या लोकांना आपले अधिकार समजतील आणि खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल.

पंडित नेहरूंनी सांगितलेली पंचशील तत्वे म्हणजेच एकीची पांच बोटे म्हणता येईल. जी कर्मरूपी हाताला जोडली आहेत, नव्हे त्यातून जन्म पावली आहेत. म्हणूनच भारताची अखंडता आणि ऐक्य हे केवळ भारतासाठीच नव्हे तर विश्वकल्याणासाठी सुद्धा अत्यंत आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर त्यांनी पंचवार्षिक योजनांद्वारे प्रगतीचे मार्ग खुले केले व स्वावलंबी भारताचे स्वप्न साकार करण्याचे प्रयत्न सुरु ठेवले. ते नेहरूंचे स्वप्न आज साकार होत आहे कारण भारत बऱ्याचशा बाबीत स्वावलंबी बनला आहे. नेहरूंनी सुरु केलेल्या या प्रगतीला नख लावण्याच्या हेतूनेच भारतावर परकीय आक्रमणे व युद्ध लादली गेली. पाकिस्तान व चीन या दोन देशांनी भारतावर लष्करी हल्ले केले. तेव्हा

भारतीय जनतेने आपल्या एकतेच्या सामर्थ्याचे दर्शन घडविले. १९६२ साली दिल्लीच्या प्रचंड सभेत "ओ मेरे वतन के लोगो' या लता मंगेशकरांनी म्हटलेल्या गाण्यामुळे तेथे हजर असलेल्या पंडित नेहरूंचे डोळे पाणावले होते.

राष्ट्राच्या उभारणीसाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे व म्हणून प्रत्येक सरकारने त्यासाठी लागणाऱ्या पैशांची सोय केली पाहिजे. शिक्षणासाठी लादला जाणारा कराचा बोजाही लोकांनी उचलला पाहिजे. 'महात्मा गांधीनी' १४ कलमी योजना जाहीर केली, तीत देशातील निरक्षरतेची समस्या व साक्षरतेचा प्रसार हे कलम होते. शिक्षणाच्या प्रसाराचे महत्व गांधीजीनी ओळखले होते. पण अजूनही ६९ % जनता आपल्या देशात निरक्षरच आहे की ज्यांना आपल्या देशाच्या इतिहासाचीही कल्पना नाही.

जीवन व तत्वे यामधील तफावत नष्ट करण्याचे सामर्थ्य आजच्या शिक्षण-पद्धतीत नाही. भावनात्मक व क्रियात्मक विकास घडवून आणण्यात आजची शिक्षण पद्धती कमी पडते. केवळ माहिती देणाऱ्या शिक्षणापेक्षा संस्कार करणारे शिक्षण दिले गेले पाहिजे. तरच सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होईल व त्यातून एकता वाढीस लागेल.

ग्रामीण भागातील व्यक्तीला, कुटुंबाला आणि एकंदर ग्रामीण समाजाला स्वावलंबी बनविणे हे गांधीजींच्या शिक्षणप्रणालीचे प्रमुख उद्दीष्ट होते. हे उद्दीष्ट आज आपल्या डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. शिक्षण ही आजची व उद्याची एकमेव अद्वितिय गुंतवणूक आहे. देशाची साक्षरता जेव्हा १०० % होईल त्यावेळी एकात्मतेलाही धोका असणार नाही. कारण आज निरक्षरांना एकात्मता म्हणजे काय, क्रांतिकारक म्हणजे काय याबाबत काहीही आकलन होत नाही. त्यामुळे अज्ञानाचे प्रमाण आहे तसेच आहे. शिक्षणप्रसार जोमाने केल्याने सामान्य निरक्षरांत जे अज्ञान आहे ते दूर होईल.

सर्व प्रकारच्या शिक्षणाचा मूळ हेतू मुळात 'स्वदेशाभिमान' निर्माण करणे हा आहे. पण आपल्या देशात नेमके या हेतुने शिक्षण दिले जात नाही. एकात्मतेच्या सर्व समस्या भारतीय जाणत्या नेत्यांना स्पष्टपणे बजावून सांगत आहे की, 'वेळीच सावध व्हा. वेळीच दुभंगलेली मने जोडा,' व या सर्व भारती-यांच्या हृदयात एकात्मतेची ज्योत क्षीण झाली असल्यास त्वरित 'स्नेह' घालून पेटवा, नाही तर महत्प्रयासाने आपल्या हाती आलेल्या स्वातंत्र्य कलशाची शकले आपल्याला पहावी लागतील. म्हणून आज एकात्मतेसाठी हिमालयाएवढे प्रचंड

कार्य भारतीयांना करावयाचे आहे. प्रखर राष्ट्रनिष्ठा, लोकशाहीवरील निस्सीम श्रद्धा, व घटनेचे पावित्र्य यांच्या ज़ोरावर भारताच्या राष्ट्रीय एकतेची इमारत टिकून राहील.

आपल्या देशाच्या इतिहासात आजवर अनेक लढाया झाल्या. पण त्या लढायांपेक्षा आजच्या लढाईचे स्वरुप वेगळे आहे. खैबरखिंडीतून पूर्वी आमच्यावर आक्रमणे झाली, पण ती आम्ही पचवली. पश्चिमेकडून आलेल्या इंग्रजांशी, फ्रेंचांशी, पोर्तुगिजांशी आम्ही लढाया केल्या. पण त्यांची लढण्याची पद्धत वेगळी होती. ते औद्योगिक क्रांतिचे तत्व घेऊन आले होते. त्यांनी आमच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन आमच्यावर वर्चस्व मिळविले होते. परंतु आज भारताच्या एकात्मतेची लढाई जिंकणे आवश्यक आहे. एकतावाढीसाठी अंतर्गत कलह शांततेत मिटविणे आवश्यक असून वेळप्रसंगी प्रत्येक भारतीय नागरीकाने कोणत्याही संकटास सामोरे जाण्याची तयारी ठेऊनच देशापुढे व्यक्ती नगण्य असे समजून सर्वस्वाच्या त्यागाची भूमीका घेणे आवश्यक आहे.

आज आपण स्वतःकरताच जगतो. देशासाठी काहीच करीत नाही. याची प्रत्येक नागरिकाला जाण हवी. प्रत्येकाने आपला स्वार्थ टाळून देशसेवा केली पाहिजे. प्रत्येकाने देशसेवेचे कंकण हाती बांधून जागृतीचे कार्य करावे. असे झाले तर देशाच्या कानाकोपऱ्यात विसावलेल्या विविधतेत सर्वत्र एकात्मतेचे गाणे ऐकू येईल.

एकात्मता टिकविण्यासाठी व तीत वाढ करण्यासाठी केंद्र सरकारकडेच सर्व सत्ता असावी. कोणत्याही राज्याने स्वतंत्र बाण्याने वागण्याचा प्रयत्न करू नये. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी सर्वस्वाचा होम केला. त्यांचा सर्व राज्यांनी अभिमान बाळगला पाहिजे. महाराष्ट्रात लोकमान्य टिळक झाले, तसेच इतर राज्यामध्येही इतर नेत्यांच्या रूपात टिळक होतेच. सर्वांमध्ये सर्व प्रांतांची आवड निर्माण झाली पाहिजे. 'माझ्या राज्यापेक्षा भारत श्रेष्ठ आहे, कारण माझ्या राज्यासारखी अनेक राज्ये एकत्र येऊन भारत तयार झाला आहे असेच प्रत्येकाने समजावे. तसेच 'या भारताशी - या भिन्न वेषी, भिन्न भाषी - भूमीशी मी बांधलो गेलो आहे.' हा थोर संस्कार समाजात रूजविला पाहिजे.

अखंड भारताच्या भावना जोपासण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात सर्व राज्यांविषयी प्रेम निर्माण केलं पाहिजे.

'आमचा महाराष्ट्र भारतासाठी' 'आम्ही महाराष्ट्रीयन लोक भारतासाठी'

अशी भावना प्रत्येक राज्यात निर्माण केली तर एकात्मतेच्या भावनेत सर्व राज्य बांधली जातील. आणि त्यामुळे विशाल भारताची पंडित नेहरूंची कल्पना साकार होईल. वरील भावना महाराष्ट्रात वाढीस लागली आहे. महाराष्ट्राचा आदर्श इतर राज्यांनी आपल्या समोर ठेवावा.

महाराष्ट्रात सरकारने स्वातंत्र्यानंतरच्या काळापासून ते आजपर्यंत भारतीय एकात्मता राखणेसाठी सतत एकात्मतेला पोषक असे निर्णय घेतलेले आहेत. आजतागायत बहुतेक मुख्यमंत्र्यांनी अखंड भारतासाठी महाराष्ट्र वेळोवेळी उभा करण्यासाठी उपयुक्त धोरणे आखली. महाराष्ट्रात एका विशिष्ट पद्धतीने काम चालते. ही पद्धत म्हणजे जुनी परंपरा आहे. या परंपरेने राज्याच्या कामाच्या बाबतीत प्रशासकांना थोडीफार मदतही केली आहे, ही परंपरा अशी आहे की, आम्ही एकत्र बसावे, बोलावे, थोडेसे भांडावे, रूसावे, रागवावे आणि प्रसंग आला तर रडावेही. कारण मित्र भांडू लागले आणि शेवटी ते रडले नाहीत तर ते मित्र नव्हेत. एकमुखाने, हसतमुखाने शेवटी बाहेर पडावे. अशी आमची महाराष्ट्राची परंपरा आहे. ही परंपरा भारताच्या एकात्मतेस नेहमीच पोषक होती, आजही आहे, व उद्याही राहील. ह्या परंपरा प्रत्येक राज्याने समोर ठेवून महाराष्ट्राचा आदर्श गिरवावा. तसेच सर्वधर्मसमभाव व परस्पर बंधुभाव ही महाराष्ट्राच्या मातीची शिकवण आहे. त्यामुळे एकतेस पोषक असे वातावरण निर्माण होत आहे.

देशातील जनतेने एकात्मता राखण्यासाठी खालील प्रतिज्ञा करावी.

'मी हिंदू, तू मुसलमान, मी गुजराथी, तू मद्रासी असे भेदभाव विसरून या मी आणि माझे या वृत्तींचे सर्वसंग्राहक भारतीय राष्ट्रीयत्वात विसर्जन करु या.'

तसेच पुढील संस्मरणीय काव्य पंक्ती एकात्मता राखण्याच्या दृष्टीने सर्वांना गुणगुणण्यास अधिकार आहे.

महजब नही शिखाता।
आपसमे बैर रखना।
हिंदी है हम, वतन है।
हिंदोस्ताँ हमारा।

परिशिष्ट

एकात्मतेवरील काही राष्ट्रीय नेत्यांचे विचार

"राष्ट्रीय एकात्मतेची गरज ही केवळ नैतिक हेतूसाठी निर्माण होत नाही. तिच्या पाठीमागे नैतिक कारण तर आहेच, पण जग आज जसे आहे आणि ज्या पद्धतीने जगाची जडणघडण होत आहे ती पाहता राष्ट्रीय एकात्मता ही राष्ट्र म्हणून जीवंत राहायला देखील आवश्यक आहे. आपल्या विकासाच्या योजनांना गती मिळायची असेल तर राष्ट्रीय एकात्मता ही एक व्यावहारिक गरज आहे."

"स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतासमोर मुलभूत प्रश्न राष्ट्रीय एकात्मतेचा आहे. राष्ट्रीय एकात्मता पूर्ण झाली असली तरी ती पुरेशी नाही. आपण राजकीय ऐक्यापेक्षा मुलभूत स्वरूपाचा बदल करावयास हवा. यास विलंब लागेल. हे काम केवळ कायद्याने होणार नाही. त्यांच्या वृद्धीसाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक असून त्यास प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळेच भारतापुढील आजची समस्या राजकीय ऐक्यापेक्षा मानसिक एकात्मतेची आहे. प्रादेशिकवाद, जातीयवाद, भाषावाद, इ. देशाच्या ऐक्यावर हल्ला करणारे वाद नष्ट करून देशाची एकात्मता बळकट करायला हवी."

"बेकीपेक्षा एकी अर्थातच चांगली पण ती सक्तीने लादली तर ते, केवळ ढोंग आहे, त्यात मोठा धोका आहे, त्याचा केव्हा भडका उडेल त्याचा नेम नाही. एकी सर्वतोपरी अगदी मनापासून असली पाहिजे. आपण एकमेकांचे आहोत, आपल्या एकीवर जर कोणी हल्ला केला तर सर्वांनी मिळून तो परतवून लावला पाहिजे. माझी अशी खात्री आहे की ही एकी भारतात आहे. पण ती काही अंशी झाकळली आहे."

"भारताच्या अंगी जी काही कर्तृत्वशक्ती असेल ती नेहमीच शांतता व सहकार्याच्या पक्षाचे व आक्रमकांविरुद्ध कार्य करीत राहील."

"भारतात सध्या प्रचलित असलेल्या सर्व प्रश्नांचे जातियवाद, अल्प-संख्यांकांचा प्रश्न, प्रांतीयवादाचा प्रश्न, भाषा प्रश्न, या साऱ्या प्रश्नांचे मूळ शोधून पाहिले तर ते अखेर निघते ते हे की, सामाजिक स्थित्यंतराला विरोध. खरी खरी लोकशाही आली की सामाजिक स्थित्यंतरे होण्याचा संभव विशेष असल्यामुळे मुळात लोकशाहीलाच विरोध करण्यात येतो. परंतु हे प्रश्न चीन, स्पेन किंवा इतर युरोपियन देशातील प्रश्न एकसारखेच आहेत."

"परस्परांबरोबर सलोख्याने राहण्याची भारतीयांची प्राचीन काळापासून परंपरा आहे. ही भारताची मूलभूत संस्कृती आहे. बुद्धाने फार पूर्वी आपणास ही शिकवण दिली. आपल्या काळातही महात्मा गांधींनी धार्मिक सलोखा व सद्‌भावना यांच्यावर भर दिला. म्हणूनच आपणास एक मूल्यवान ठेवा जतन करायचा आहे."

पंडित नेहरू

नवी दिल्ली, २६ मार्च १९६४

"भारताच्या प्रत्येक नागरिकाला कोणताही धर्म स्वीकारण्याची परवानगी राहील आणि त्याचा वंश अगर धर्म कोणताही असला तरी तो इतरांना समान राहील असे भारतीय घटनेत निःसंदिग्धपणे म्हटले आहे. एखाद्या नागरिकाचे श्रद्धास्थान इतरत्र राहाणाऱ्या एखाद्याप्रमाणे असल्यास त्याच्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्याची नैतिक जबाबदारी म्हणूनच प्रत्येक भारतीयावर आहे. बदला घेण्याची भावना पूर्णपणे चुकीची आहे. कारण चुकीच्या क्षणी आपण येथे काहीतरी केले तर ज्याच्यासाठी म्हणून ते करीत आहोत त्यांना मदत होण्याऐवजी त्यांच्यावर दुष्परिणाम होईल. आणि त्याच्या हालअपेष्टात भर पडेल अशीही शक्यता आहे. म्हणूनच नैतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टया आपल्या जनतेने योग्य प्रकारे वागून स्वतःला योग्य अशा भूमिकेत ठेवणे आवश्यक आहे."

"या देशात आपणाला स्वत्व जपले पाहिजे. हा संपूर्ण देश एकत्र ठेवला तरच ते शक्य आहे. स्वातंत्र्य आबाधित ठेवण्यासाठी, स्वातंत्र्य रक्षणासाठी आणि जनतेच्या हितासाठी तसेच इतर देशाच्या गरजेच्या घडीला उपयोगी ठरण्यासाठी जे सामर्थ्य लागले ते सामर्थ्य असे घडले तरच आपण जगाला दाखवू शकू. म्हणूनच राजकीय ऐक्याचे महान मूल्य आपण समजून घेऊन

हे ऐक्य आपणास शक्य तेवढ्या चांगल्या स्थितीत जतन करणे निकडीचे आहे. स्वातंत्र्यलढ्यानंतर प्राप्त झालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी लोकांना आपले कर्तव्य समजावे अशी माझी कळकळ आहे. आज प्रत्येक भारतीयाचे हे प्राथमिक कर्तव्य आहे.

डॉ. राजेंद्र प्रसाद
मद्रास, ३ एप्रिल १९६१

"राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर तिला भरभक्कम असा सामाजिक लोकशाहीचा आधार हवा."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

"ज्या शक्तीनं आम्ही स्वातंत्र्य मिळवलं त्याच शक्तीनं आम्ही ते टिकवू, असं म्हणण्याचं धैर्य लोकांच्या अंगी असेल तरच ते त्यांच्या कामाचे होते. मग त्यांचं शारीरिक दुबळेपण, नैराश्य एका क्षणात उडून जाणार होतं."

महात्मा गांधी

"देशाच्या प्रेमाचे, स्वातंत्र्य प्रेमाचे, लोकशाहीच्या प्रेमाचे, जागृकतेचे वातावरण आपण देशात निर्माण करा व येणाऱ्या अडचणींना तोंड देण्याची तयारी ठेवा. असे झाल्यास तुमचा आमचा हा भारत देश वाढत जाईल, प्रगत होत जाईल. यासंबंधी मला मुळीच शंका नाही."

"अलग-अलग धर्म आणि अलग-अलग जाती-जमाती आणि भाषा यामध्ये आम्ही जरी वाटलो गेलो तरी भारताचा प्रश्न आल्यानंतर पहिल्या प्रथम मी भारताचा, नंतर बाकीचे प्रश्न, ही भावना आम्ही आमच्या विचारांमध्ये, आमच्या कामामध्ये वाढवू शकलो आणि उमेदीने, धैर्याने व ईर्षेने आपल्या सर्व प्रश्नांना तोंड देण्याचा आम्ही प्रयत्न केला तर भारत हे एक पहिल्या प्रतिचे मोठे प्रगत राष्ट्र म्हणून दुनियेत अभिमानाने जगू शकेल अशी माझी श्रद्धा आहे."

यशवंतराव चव्हाण

मानवजातीसमोर असलेले गंभीर धोके माणसानेच निर्माण केलेले आहेत. न्याय आणि प्रेमाच्या भावनांवर हिंसाचार आणि द्वेष भावनांनी मात केली तर

भविष्याला धोका निर्माण होईल. जगातील कोणत्याही देशातल्या योग्य विचाराच्या माणसांनी परस्परांचा आदर करून सहकार्य आणि सामंजस्य यांच्या भावनेतून परस्पर व्यवहार केले पाहिजेत. माणसांच्या अंत:करणातील चांगुलपणाचा विकास दिवसेंदिवस झाला पाहिजे आणि आपणास एकत्र आणणाऱ्या गोष्टींना अधिकाधिक समजून घेतले पाहिजे. स्वातंत्र्याचे जतन करण्यासाठी जे झटतात त्या सर्वांना त्याचा लाभ मिळेल असा दिवस उजाडावा यासाठी आपण सगळे प्रदान करू या. आपल्याकडून परिश्रम आणि प्रामाणिक कार्यांची अपेक्षा आहे.

आकाशातून होणारी बाँबफेक, सैनिक आणि नागरिक यांच्यात फरक करीत नाही. कोणतेही अण्वस्त्र राष्ट्रा-राष्ट्रात भेद करणार नाही. आपण अशा परिस्थितीत आहोत की केवळ एखादे बटन दाबून एक संपूर्ण खंड नष्ट करणे आपणाला शक्य होणार आहे. अशा दुष्ट, संहारक अस्त्रांचा विकास करण्याचे नेतृत्व मिळविण्याचा प्रयत्न करून आपल्याला ते साध्य होण्याची शक्यता नाही. आपल्याला ही जाणीव झालेली आहे की एक तर आपण एकत्रित जिवंत राहू किंवा एकत्रितपणेच विनाश पाहू. एकत्र राहण्यासाठी इतरांच्या दृष्टिकोनाबद्दल सहिष्णुता बाळगावी लागेल.

डॉ. एस. राधाकृष्णन
७ जुलै १९५६

भारतकी संतान हम हैं, भारतकी संतान
नदियाँजैसी बहुभाषाएँ, सबका स्थान समान ....

सालेम सुब्बाराव

संदर्भसूची

मासिके –

१) लोकराज्य – सप्टें. १९८६, डिसें. फे. १९८७
२) शिक्षण आणि समाज – एप्रिल १९८७
३) भारतीय स्वतंत्रता संग्राम और महाराष्ट्र – डिसें. १९८५, १९८७
४) योजना
५) सामाजिक परिषद शताब्दी महोत्सव स्मरणिका – नो. १९८७
६) साधना

वृत्तपत्रे –

७) महाराष्ट्र टाईम्स
८) लोकसत्ता
९) Times of India, Indian - Express.
१०) नवभारत टाईम्स
११) दै. गांवकरी
१२) दै. देशदूत
१३) दै. रामभूमी
१४) लोकमत
१५) केसरी
१६) सकाळ
१७) तरुण भारत
१८) आधुनिक भारताचा इतिहास – वैद्य, कोठेकर
१९) भारताचा शोध – साने गुरुजी, करंदीकर
२०) भारतीय गणराज्य आणि शासन – नवलगुंदकर एस. एन.
२१) प्राचीन भारतीय संस्कृती – लोहार र. म.
२२) Ancient India and Indian Civilization. – by Paul M. Oursel Helena wo Grabowska Philippe stern.

२३) A Cultural History of Indian – Edited by A. L. Basham
२४) A Cultural History of India – by M. L. Vidyarthi.
२५) Ancient India – by V. D. Mahajan.
२६) Resurgence of Rajive Gandhi – Rai Singh.
२७) Indira Gandhi The last Post – K. A. Abbas.
२८) Indira Gandhi promise to keep – Vishnu Datta.
२९) Indira Gandhi and her power game – J. Thakur.
३०) Rajiv Gandhi – B. K. Aluwala, Shashi Aluwala.
३१) Political thought and leadership – N. R. Inamdar.
of Lokmanya Tilak.
३२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – भालचंद्र फडके
३३) Gandhi and Swaraj – Dr. S. H. Patil
३४) Studies on Gandhi – V. T. Patil.
३५) Mahatma Gandhi – Dhananjay Keer.
३६) गांधीजींच्या जीवनाचे अखेरचे पर्व – सरिता पदकी
३७) Mahatma and Netaji – Samar – Guha.
३८) Nationalism and Communial – by Mushirul Hasan
politics in India.
३९) रक्तकमळे – गोडगे
४०) रणझुंझार

लेखक परिचय



प्रा. डॉ. बाबुराव पवार
एम्. ए.पीएच्.डी.

उसवाड, ता. चांदवड, जि. नाशिक येथे दि. ६ मार्च १९५३ रोजी जन्म. १९७६ साली पुणे विद्यापिठातून 'इतिहास' हा विषय घेऊन एम.अे. पदवी संपादन.१९७८ ते १९८६ कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राहूरी, जि.अ.नगर येथे 'इतिहास विभाग प्रमुख.'१९८४ ते ८५ 'सावंतवाडी संस्थानचा इतिहास' हा शोध प्रबंध सादर करून पुणे विद्यापिठाची पीएच्.डी. संपादन. सध्या के.टी.एच्.एम्.कॉलेज, नाशिक येथे पदव्युत्तर इतिहास विभागात व्याख्याता.

लेखन संपदाः

ग्रंथ

- भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास.

शोध निबंधः

- सावंत- करवीरकर संबंध
- सावंत-पोर्तुगिज संबंध
- ब्रम्हा-विष्णू-महेश एकत्र

व्याख्यानेः

- राष्ट्रीय एकात्मतेवर नाशिक व अ.नगर जिल्ह्यातील विषेशतः ग्रामिण भागातील विद्यालये, महाविद्यालये तसेच सेवाभावी संस्थातून आजवर एकूण ४५ व्याख्याने.
- विवेकानंद-जीवन व कार्य- ३ व्याख्याने
- भारतीय क्रांतीकारकांचे कार्य ५ व्याख्याने